म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय ....
दा. क्र. 96366
IRBK-0117387
IRBK-0117387

# लाखातील एक

बाळ गाडगीळ

IRBK-0117387

अमेय
विनोदी कथा

प्रकाशन
क्रमांक
चाळीस

© अमेय प्रकाशन

पहिली आवृत्ती
मार्च १९७८

किंमत
रुपये
१५

प्रकाशक
मनोहर पिंपळापुरे
अमेय प्रकाशन
रुईकर मार्ग
नागपूर
४४०००२

मुद्रक
दिवाकर धाक्रस
नाग मुद्रणालय
रुईकर मार्ग
नागपूर
४४०००२

मुखपृष्ठ
सुभाष अवचट

लाखातील एक स्नेही
जयवंत दळवी
यांना

## कथानुक्रम

आजीचे कुटुंबनियोजन १ रॅकेट ११ पाच लाखांचा वैताग ! २४
बाई ३४ खिडकीतील चांदका टुकडा ४३ कौल ५३ एका
अलिशान फ्लॅटची गोष्ट ६१ गोष्ट : माझी आणि अप्पासाहेबांची ७२
बेपत्ता ८० माझ्या कथेचं बंडल ८९ हिसका ९६ नानाची
शंभर नंबरी थाप १०५ ट्रिंग १११ माझी लाखातील एक पाकक्रिया १२०

# आजीचे
# कुटुंबनियोजन

अ. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
दा. क्र. ९५३८८ नं. दि. २५.९.८८
वि. ७२५

**मी** हळूच आमच्या आजीच्या खोलीत डोकावलो. आपल्या खोलीच्या खिडकी-पाशी उजेडात बसून ती काहीतरी शिवत बसली होती. नाकाच्या शेंड्यापर्यंत ओघळलेला तिचा चष्मा फार मजेदार दिसत होता.

आपल्याला अलीकडे कमी ऐकायला येतं असं आजी म्हणते. त्यामुळं तिच्या खोलीत पाय न वाजवता गेले तर तिला अजिबात कळणार नाही असं मला वाटलं. म्हणून मी आपला हलक्या पावलांनी आत जाऊन तिच्या मागं उभा राहिलो. ती काय करीत होती ते मला आता नीट कळलं. आजीबाईचं दुपटी शिवण्याचं काम चालू होतं. निर-निराळ्या रंगीबेरंगी कापडांचे अनेक छोटे छोटे तुकडे आजूबाजूला पडलेले दिसत होते.

सुट्टीचा दिवस असल्यामुळं मला थोडा अभ्यास करून खूप कंटाळा आला होता. अशा वेळी आजीकडे गेलं म्हणजे कधी एखादी छानशी गोष्ट ऐकायला मिळते, कधी वर खाऊसुद्धा. मात्र मर्जी नसेल तर यातलं काहीच नाही. भरीला एखादी चापटी.

"का रे बाबा, आलास का तू माझ्या राशीला ?" तिनं मला विचारलं. आता पाहा हं ! तिनं नुसतं मागं वळूनसुद्धा पाहिलेलं नव्हतं. साधं

तिच्या मागोमाग निघालो.

पण आधी आमच्या आजोबांबद्दल सांगितलं पाहिजे. आजोबा म्हणजे पांडुरंग सीताराम करमरकर. स्वभावानं भारी तापट. रिटायर मामलेदार. म्हणजे रावसाहेब. त्यांच्यापुढं म्हणे भाऊसाहेब, कारकून आणि इतर नोकरमंडळी नुसती चळाचळा कापत असत. जमदग्नीचा अवतार म्हणून सगळे त्यांना ओळखायचे. मी तर त्यांच्या खोलीच्या आसपाससुद्धा फिरकत नाही. बिघडली आजोबांची स्वारी तर काय घ्या ! आजोबांचंही एक बरं असतं. आई म्हणते त्याप्रमाणं. त्यांच्या वाऱ्यालाही कुणी उभं राहत नाही आणि तेही कुणाच्या अध्यात नसतात, मध्यात नसतात. आपण बरं की आपली खोली बरी. आणि खोलीतली ही आरामखुर्ची. तिथं बसून ' केसरी ' वाचायचा. किंवा एखादं भलंजाडं पुस्तक. एकदा मनाचा हिय्या करून पाहिलं होतं, ते बाहेरगावी गेले असताना. ' गीता-रहस्य ' की असल्या काही नावाचं.

तर असे आमचे आजोबा. आता आमच्या आजीसाहेब यांना काय सांगणार होत्या कुणास ठाऊक. आजी त्यांच्या खोलीत शिरली आणि मी दाराआड लपून ऐकू लागलो.

मला दिसत नव्हतं तरी ओळखू मात्र येत होतं. आजोबा आरामखुर्चीत बसलेले असणार. खुर्ची खोलीच्या दाराकडे पाठ करून ठेवलेली. त्यांच्याशी बोलायचं म्हंजे आजी किंवा दुसरं कुणीच कधी त्यांच्यासमोर जाऊन उभं राहत नसे. बोलायचं म्हणजे खुर्चीच्या पाठीशी बोलल्यासारखं.

" मी काय सांगते ते ऐकणार का ? " आजीनं खुर्चीच्या पाठीला विचारलं.

प्रथम आजोबा काहीच बोलले नाहीत. नुसतेच खाकरले. आपण ऐकतो आहोत हे सांगण्याची त्यांची ही पद्धत. मग आजी परत काही बोलली तेव्हा मात्र ते म्हणाले,—

" अहो, ऐकतोच आहे तेच चाललंय जन्मभर. तुमचं ऐकणं आज काय नवीन काढलंत ? कुणाबद्दलची तक्रार ?. . . " अरे बाप रे, म्हणजे आजही आजोबांची स्वारी युद्धा-तच होती वाटतं. आजीशी बोलतानादेखील. आणि आवाजही घर दणाणून सोडणारा.

पण आजोबा युद्धात असले म्हणून काय झालं ? आमची आजी त्यांना थोडीच डरते ? त्यांच्या बोलण्याकडं तिनं मला वाटतं लक्षसुद्धा दिलं नाही.

" हे असलं शिकवतात वाटतं पोरांना आजकाल शाळेत ? कुटुंबात मुलं किती असावीत अन् काय. . .हे ? आजींनं खालच्या आवाजात विचारलं. पण तिच्या बोलण्यातला ठसका बिलकुल कमी नव्हता. मीही इकडे दारामागे दचकलो. एकंदरीत, आमच्याबद्दल तक्रार होती ही.

" अहो हेच शिकवतात आजकाल आणि तेच बरोबर आहे ! जुने दिवस राहिले नाहीत आता."

आजोबा असं काही बोलतील अशी आजीला कल्पना नसावी. त्यामुळं ती क्षणभर थांबली. पण मग तिला राहावलंच नाही.

" पण मी म्हणते की, त्याला काही धरबंध आहे की नाही ? आता या पोराचं वय काय ? शाळकरी पोर ते. हे का शिकायचं वय आहे त्याचं ? " आजीनं नेहमीप्रमाणं आपला ठेका सोडला नाही.

पण यानंतर मजाच झाली ! एकदम गडगडाट व्हावा तसं झालं. इतक्या मोठ्यांदा की, मला वाटलं वरची माडी खाली येणार. म्हणजे काय, तर आमचे आजोबा हसले ! मी तरी त्यांना इतक्या मोठ्यांदाच काय, पण नुसतं हसतानासुद्धा ऐकल्याचं आठवत नाही. आजी आपली चूपचाप उभीच होती. आणि मीही. दारामागं.

" अहो, हेच चुकतं तुमचं. शाळकरी पोर म्हणजे तरी काय ? दहा–अकरा वर्षांचा झालाच असेल तो. आपला वसंताच ना ? या वयातच शिकवलं पाहिजे पोरांना ! काही लहान नाही वय हे. यानंतर चार वर्षांच्या वयातच आमचं लग्न झालं. तुमचं वय तर लग्नात हेच होतं. आठवतं का ? " एकंदरीत आजोबांच्या गडगडाटी हसण्याचं कारण हे होतं. आधी गडगडाट व्हावा आणि मग पाऊस यावा तसं त्यांचं हसणं आणि बोलणं.

आणि आश्चर्य म्हंजे काय, तर आमची आजी अगदी शोभाकाकूसारखी किंवा आमच्या नलीसारखी लाजली की हो !

" इश्श ! केवढ्यांदा हसायचं ते ! " ती म्हणाली. आणि आई किंवा काकू करते तसा तिनं लुगड्याचा पदर सारखा केला.

" तेव्हा तात्पर्य काय, की या बाबतीत आपल्याला काही करता येणार नाही. आपण स्वस्थ बसायचं आणि पाहायचं. काय ? आणि नाही पाहवलं तर डोळे मिटून घ्यायचे. अहो, मी म्हणतो की, हे काहीच नव्हे. आणखी काय एकेक होतंय ते पाहाच तुम्ही ! ... आणि आज आमचा चहा आला नाही अजून. " आजोबांचं हे शेवटचं वाक्य म्हणजे आजीला घरात जाण्याची सूचना होती. ती अर्थातच काय ते समजली. आणि तुरूतुरू स्वैंपाकघराकडे जायला निघाली.

" एकूण काय, माझंच चुकलं ! " ती जाताजाता पुटपुटली. तेवढं मला ऐकू आलं.

' कुटुंब लहान तर सुख महान ' या आमच्या निबंधाबद्दल आजीला आणखी विचारण्यात आता काही अर्थ नव्हता. माझा निबंध मी कसाबसा लिहून पुरा केला. चाळीस ओळींना तो जरा कमी झाला. त्यामुळं आमचे मराठीचे सर रागावलेसुद्धा. पण या विषयावरचं माझं चित्रं चांगलं आल्यामुळं सर नुसतेच रागावले. त्यांनी नेहमीसारखा रुद्रावतार काढला नाही. आणि त्या दुपारचं ते सगळं मी विसरलोसुद्धा होतो.

पण आमच्या आजीचा घुस्सा मात्र कायमच होता. आणि खरं सांगायचं म्हणजे तो वाढतच गेला. याला अर्थात मी कारण नाही बरं का. सांगितलं ना, आपण नंतर तिच्या वाटेलासुद्धा गेलो नाही ! तर आजीच्या या घुश्शाचं कारण म्हणजे आमचा अच्युतकाका. आणि खरं म्हणजे आमची काकूच–शोभाकाकू.

हे सगळं काही मला सगळंच्या सगळं एकदम कळलं नाही. कळलं ते तुकड्या-

आणि सटकू पाहणारी नली जागच्या जागी घुटमळली. मग तिनं थोडा विचार केला असावा. शेवटी क्रेपच्या कागदांचा जय झाला. तिनं खुणेनंच मला जवळ बोलावलं.

"अरे, थुला माहिथ न्हाही खा ?" नली काही गुपित सांगत असली म्हणजे अशाच आवाजात बोलते. आणि आम्हाला ते समजून घ्यावं लागतं.

"अध, फण खाय थे ? थेच विछारतोय ना थुला ?" मी तिचा हात झटकून टाकीत म्हणालो.

"अरे, आपल्या शोभाकाकूला बाळ होणार आहे ना, त्याबद्दल आहे हे सगळं !" नलीनं दबलेल्या आवाजात सांगितलं.

"मग होणार असेना ! होईल ! आपल्याला काय त्याचं ?"

"ॲहॅ रे ! होणार आहे पण त्यांनाच व्हायला नको आहे ते !"

"त्यांना म्हणजे कुणाला ?"

"त्यांना म्हणजे काकाकाकूंनाच नको आहे. आता काढ माझा क्रेपचा कागद."

"ए नले, कागद एकदा देईन म्हटलं म्हणजे देईन. पण सगळं नाही सांगितलंस. आजीचं आणि त्यांचं भांडण का ?"

"का म्हणजे काय ? आजीला हवं आहे ना ते व्हायला बावळटा ! तिला भीती वाटते काकूला काहीतरी होईल म्हणून."

अस्सं ! म्हणजे असं सगळं होतं तर. आणि आजोबांच्या कानावर जाऊ न देता अशी भांडणं चालवायची ही काही साधी गोष्ट नव्हती. मला राहूनराहून आश्चर्य वाटत होतं ते याचंच की, आजीनं स्वतःच हे आजोबांना सांगितलं नसणार का ? माझ्या चाळीस ओळींच्या निबंधाबद्दलसुद्धा तरातरा त्यांच्याकडे ही तक्रार करायला गेली. ती हे त्यांना सांगितल्याशिवाय थोडीच राहते ?

पण आजीनं काय केलं असेल हे पाहायला आम्हाला फार दिवस थांबावं लागलं नाही.

त्या दिवशी रात्री नेहमीप्रमाणं जेवणं चालू होती. नेहमीप्रमाणं सगळे चूपचाप होते. भांड्यांच्या आणि भुरक्यांच्या आवाजांशिवाय दुसरं काही ऐकू येत नव्हतं. तेवढ्यात आजोबा एकदम थांबले. "हे बघा अच्युतराव आणि विनायकराव, तुम्ही जेवल्यावर दोघंही माझ्या खोलीत या. मला बोलायचंय तुमच्याशी काही." आणि ते हात धुवायला उठलेच. उठताउठता त्यांनी म्हटलं, "आणि मुलांना जाऊ द्या आपापल्या खोलीत झोपायला."

इतकी लांबलचक सबंध तीन वाक्यं आमचे आजोबा जेवताना क्वचित बोलले असतील. शिवाय आजोबांनी अच्युतकाकांना अच्युतराव आणि बाबांना विनायकराव म्हटल्याचं मी आधी कधीच ऐकलेलं नव्हतं.

एवढं सगळं असताना जेवण झाल्यावर मी खोलीत झोपायला कसला जातो ? हातावर पाणी पडताच आईच्या नकळत धूम ठोकली आणि आजोबांच्या खोलीची खिडकी

खुट् झालं तरी कोण आलं आहे, काय करते आहे, सगळं हिला दिसतं. पाठीला डोळे असल्यासारखे. हिला कमी ऐकायला येतं हे मला खरं वाटत नाही याचं कारण हेच. आता हिला कसं नेमकं कळलं, मीच आलो आहे म्हणून ?

आजीच्या बोलण्यावरून स्वारी एकं ीत खुषीत नव्हती हे मला समजलं. कारण नाहीतर ती म्हणाली असती, " ये हं, बैस असा माझ्याजवळ. " आणखी काय काय !

मी म्हटलं, नसेना का खूष ! आपल्याला काय करायचं आहे ? घरात आणि आसपास कोणीसुद्धा खेळायला नाही. अगदी नलीसुद्धा. काकूची मुलं म्हणजे सगळं चिल्लारपिल्लार. त्यांच्याबरोबर कोण खेळतो ? आजीच्याच खनपटीला बसलं पाहिजे.

" ए आजी, तुला एक विचारू का ? "

" मला काहीही विचारू नकोस ! कामात आहे मी. हे दुपटं शिवून पुरं केलं पाहिजे मला. "

" अग पण आजी, असं कसं म्हणतेस ? मला अगदी महत्त्वाचं विचारायचं आहे तुला. "

" मला वेळ नाही सांगितलं ना तुला ? " आजीचा आपला एकच ठेका : " आई-लाच जाऊन विचार तुझ्या. "

" अग, मला कुटुंबाबद्दल विचारायचं आहे. फार महत्त्वाचं आहे ते ! आई म्हणाली की, मला काही कळत नाही त्यातलं. आजीलाच विचार तुझ्या म्हणून. "

आता मात्र आजीनं कान टवकारले.

हातातलं दुपटं तिनं बाजूला ठेवलं. सुई त्यात खोवून ठेवली. नाकावरचा चष्मा काढून तिनं तो नीट चष्म्याच्या घरात ठेवला. मग ती म्हणाली, —

" काय विचारायचंय तरी काय एवढं तुला ? मला माहीतच होतं, तू ऐकायचा नाहीस माझं म्हणून ! हे ठेवलं माझं काम बाजूला. काय महत्त्वाचं आहे एवढं ? "

" अग आजी, किनई मला निबंध लिहायचाय्. ' कुटुंब लहान तर सुख महान ' या विषयावर. तू सांगतेस ? "

" छट् ! मला काही समजत नाही असला फाजीलपणा ! "

" अग तसा फाजिलपणाबिजिलपणा काहीही नाही त्यात. सरच म्हणाले तसं. म्हंजे काय आहे सांगू का ? आपल्या देशात अनेक कोटी लोक आहेत. आणि इतक्या लोकांना पुरेल एवढं अन्नच आपल्याकडे नाही. म्हणून कुटुंब लहान पाहिजे. आणि म्हणूनच या विषयावर लिहायला सांगितलंय सरांनी आम्हाला सगळ्यांनाच ! "

यावर कोणतं उत्तर देऊन मला गप्प बसवावं या विचारामुळं असेल, पण आजी काहीच न बोलता स्वस्थ बसली. आमच्या आजीचं असं आहे की, तिला बोलायला काही मुचलं नाही की ती गप्प बसते. आणि असं गप्प बसावं लागलं म्हंजे ती रागावते.

" अग, त्यात वाईट काही नाही बाई. सांगतो ना तुला, आमच्या सरांनीच सांगि-तलं आणि ड्रॉइंगच्या सरांनी तर आमच्याकडनं एक चित्रच रंगवून घेतलंय. एक बाई,

एक बुवा–म्हणजे तिचा नवरा बरं का. आणि या दोघांची तीन मुलं. ”

एवढं मी सांगितलं ना, पण आजी आपली ढिम्म ! एक नाही अन् दोन नाही ! नाहीतर नेहमी काय असतं, ही आपली मला धमक्या देत बसते. पोकळ धमक्या बरं का. म्हणजे ‘ तू अलीकडे फार आवगुण वस ’, ‘ फार शेफारलायस ’, ‘ थांब, सांगतेच तुझ्या अच्युतकाकाला — किंवा तुझ्या बाबांनाच ’, ‘ भुईतून वर आला नाहीस धड, तर या पोरवयात सांगितल्यात कुणी नसत्या उचापती करायला ’ वगैरेवगैरे. असं आणखी कितीतरी.

हे आपलं नेहमीचं. पण त्या दिवशी ती अजिबात बोलेच ना. उलट आपली माझ्याकडे पाहतच बसली वेड्यासारखी. आणि कपाळाला ह्या आठ्या. खूप विचारात पडल्यासारख्या. मला राहवेना. म्हटलं, हिचं काहीतरी बिनसलंय गाडं.

“ अग आजी, हे तुझ्याबद्दल नाहीयेय. आता तुला सात मुलं होती ना. पण सरच म्हणाले की, आपण जुन्या पिढीबद्दल बोलत नाही. हे सगळं आपल्या नव्या पिढी-बद्दल आहे. ”

इतकं मी बोललो तेव्हा कुठं आजीला कंठ फुटला,

“ शिव शिव शिव ! हेच का रे शाळेत शिकवतात तुला बाबा ? आणि तुला म्हंजे नलीलाही शिकवीत असतील. आणि आज नसले शिकवीत तर उद्या शिकवतील. ”

आजी बोलली म्हणून मला बरं वाटलं. आणि आणखी बोलायला हुरूप आला.

“ बरं का आजी, आणि सरच म्हणाले की, कुटुंबनियोजनाची ही जबाबदारी मोठ्या माणसांची आहे. त्यांनी विचार केला पाहिजे आणि इतरांना सांगितलं पाहिजे. आता तूच आमच्या घरात मोठी ना ? म्हणजे आजोबांच्या खालोखाल. पण आपण बुवा आजोबांच्याकडे नाही जाणार. त्यांचं आणि आपलं नाही जमायचं ! ”

एव्हाना आजीच्या कपाळावरच्या आठ्या नाहीशा झाल्या होत्या. आणि आश्चर्य म्हणजे ओठाच्या कोपऱ्यात हसूही फुटलं होतं.

“ तुझ्यापुढं हद्द झाली रे बाबा ! ” ती म्हणाली आणि तिनं मला कोपरापासून हात जोडले.

मग नेहमीप्रमाणं न मागता आमची खंडणी आम्हाला मिळाली आणि मी बाहेर पळालो. नंतर लगेच मला तहान लागली म्हणून पाणी प्यायला घरात आलो. पाहतो तो आमच्या आजीसाहेब उठून तरातरा कुठंतरी चालल्या होत्या. मी पाणी पिण्याचं विसरलो आणि जागच्या जागी उभा राहून पाहायला लागलो. घरात आई नाही, काकूही नाही. आजोबांशिवाय कुणीच नाही. अन् आता ही चाललीय तरी कुठं ?

आणि काय आश्चर्य ! पाहतो तो आजी आजोबांच्या खोलीकडे निघाली होती. हे मात्र हिच्या मनात विशेष काहीतरी असल्याशिवाय नव्हे. सहसा आजोबांच्या खोलीकडे न फिरकणारी आजी आज आपली उठते आणि त्यांच्याकडे जायला निघते म्हंजे आहे काय ? मी दचकून स्वतःच्याच तोंडावर बोट ठेवलं. आणि अगदी मांजराच्या पावलानं

तिच्या मागोमाग निघालो.

पण आधी आमच्या आजोबांबद्दल सांगितलं पाहिजे. आजोबा म्हणजे पांडुरंग सीताराम करमरकर. स्वभावानं भारी तापट. रिटायर मामलेदार. म्हणजे रावसाहेब. त्यांच्यापुढं म्हणे भाऊसाहेब, कारकून आणि इतर नोकरमंडळी नुसती चळाचळा कापत असत. जमदग्नीचा अवतार म्हणून सगळे त्यांना ओळखायचे. मी तर त्यांच्या खोलीच्या आसपाससुद्धा फिरकत नाही. बिघडली आजोबांची स्वारी तर काय घ्या ! आजोबांचंही एक बरं असतं. आई म्हणते त्याप्रमाणं. त्यांच्या वाऱ्यालाही कुणी उभं राहत नाही आणि तेही कुणाच्या अध्यात नसतात, मध्यात नसतात. आपण बरं की आपली खोली बरी. आणि खोलीतली ही आरामखुर्ची. तिथं बसून ' केसरी ' वाचायचा. किंवा एखादं भलंजाडं पुस्तक. एकदा मनाचा हिय्या करून पाहिलं होतं, ते बाहेरगावी गेले असताना. ' गीता-रहस्य ' की असल्या काही नावाचं.

तर असे आमचे आजोबा. आता आमच्या आजीसाहेब यांना काय सांगणार होत्या कुणास ठाऊक. आजी त्यांच्या खोलीत शिरली आणि मी दाराआड लपून ऐकू लागलो.

मला दिसत नव्हतं तरी ओळखू मात्र येत होतं. आजोबा आरामखुर्चीत बसलेले असणार. खुर्ची खोलीच्या दाराकडे पाठ करून ठेवलेली. त्यांच्याशी बोलायचं म्हंजे आजी किंवा दुसरं कुणीच कधी त्यांच्यासमोर जाऊन उभं राहत नसे. बोलायचं म्हणजे खुर्चीच्या पाठीशी बोलल्यासारखं.

" मी काय सांगते ते ऐकणार का ? " आजीनं खुर्चीच्या पाठीला विचारलं.

प्रथम आजोबा काहीच बोलले नाहीत. नुसतेच खाकरले. आपण ऐकतो आहोत हे सांगण्याची त्यांची ही पद्धत. मग आजी परत काही बोलली तेव्हा मात्र ते म्हणाले,—

" अहो, ऐकतोच आहे. तेच चाललंय जन्मभर. तुमचं ऐकणं आज काय नवीन काढलंत ? कुणाबद्दलची तक्रार ?..." अरे बाप रे, म्हणजे आजही आजोबांची स्वारी फुश्शा-तच होती वाटतं. आजीशी बोलतानादेखील. आणि आवाजही घर दणाणून सोडणारा.

पण आजोबा फुश्शात असले म्हणून काय झालं ? आमची आजी त्यांना थोडीच डरते ? त्यांच्या बोलण्याकडं तिनं मला वाटतं लक्षसुद्धा दिलं नाही.

" हे असलं शिकवतात वाटतं पोरांना आजकाल शाळेत ? कुटुंबात मुलं किती असावीत अन् काय...हे ? आजीनं खालच्या आवाजात विचारलं. पण तिच्या बोलण्यातला ठसका बिलकुल कमी नव्हता. मीही इकडे दारामागे दचकलो. एकंदरीत, आमच्याबद्दल तक्रार होती ही.

" अहो हेच शिकवतात आजकाल आणि तेच बरोबर आहे ! जुने दिवस राहिले नाहीत आता."

आजोबा असं काही बोलतील अशी आजीला कल्पना नसावी. त्यामुळं ती क्षणभर थांबली. पण मग तिला राहावलंच नाही.

" पण मी म्हणते की, त्याला काही धरबंध आहे की नाही ? आता या पोराचं वय काय ? शाळकरी पोर ते. हे का शिकायचं वय आहे त्याचं ? " आजीनं नेहमीप्रमाणं आपला ठेका सोडला नाही.

पण यानंतर मजाच झाली ! एकदम गडगडाट व्हावा तसं झालं. इतक्या मोठ्यांदा की, मला वाटलं वरची माडी खाली येणार. म्हणजे काय, तर आमचे आजोबा हसले ! मी तरी त्यांना इतक्या मोठ्यांदाच काय, पण नुसतं हसतानासुद्धा ऐकल्याचं आठवत नाही. आजी आपली चूपचाप उभीच होती. आणि मीही. दारामागं.

" अहो, हेच चुकतं तुमचं. शाळकरी पोर म्हणजे तरी काय ? दहा–अकरा वर्षांचा झालाच असेल तो. आपला वसंताच ना ? या वयातच शिकवलं पाहिजे पोरांना ! काही लहान नाही वय हे. यानंतर चार वर्षांच्या वयातच आमचं लग्न झालं. तुमचं वय तर लग्नात हेच होतं. आठवतं का ? " एकंदरीत आजोबांच्या गडगडाटी हसण्याचं कारण हे होतं. आधी गडगडाट व्हावा आणि मग पाऊस यावा तसं त्यांचं हसणं आणि बोलणं.

आणि आश्चर्य म्हंजे काय, तर आमची आजी अगदी शोभाकाकूसारखी किंवा आमच्या नलीसारखी लाजली की हो !

" इश्श ! केवढ्यांदा हसायचं ते ! " ती म्हणाली. आणि आई किंवा काकू करते तसा तिनं लुगड्याचा पदर सारखा केला.

" तेव्हा तात्पर्य काय, की या बाबतीत आपल्याला काही करता येणार नाही. आपण स्वस्थ बसायचं आणि पाहायचं. काय ? आणि नाही पाहवलं तर डोळे मिटून घ्यायचे. अहो, मी म्हणतो की, हे काहीच नव्हे. आणखी काय एकेक होतंय ते पाहाच तुम्ही ! ... आणि आज आमचा चहा आला नाही अजून. " आजोबांचं हे शेवटचं वाक्य म्हणजे आजीला घरात जाण्याची सूचना होती. ती अर्थातच काय ते समजली. आणि तुरूतुरू स्वैंपाकघराकडे जायला निघाली.

" एकूण काय, माझंच चुकलं ! " ती जाताजाता पुटपुटली. तेवढं मला ऐकू आलं.

' कुटुंब लहान तर सुख महान ' या आमच्या निबंधाबद्दल आजीला आणखी विचारण्यात आता काही अर्थ नव्हता. माझा निबंध मी कसाबसा लिहून पुरा केला. चाळीस ओळींना तो जरा कमी झाला. त्यामुळं आमचे मराठीचे सर रागावलेसुद्धा. पण या विषयावरचं माझं चित्रं चांगलं आल्यामुळं सर नुसतेच रागावले. त्यांनी नेहमीसारखा रुद्रावतार काढला नाही. आणि त्या दुपारचं ते सगळं मी विसरलोसुद्धा होतो.

पण आमच्या आजीचा घुस्सा मात्र कायमच होता. आणि खरं सांगायचं म्हणजे तो वाढतच गेला. याला अर्थात मी कारण नाही बरं का. सांगितलं ना, आपण नंतर तिच्या वाटेलासुद्धा गेलो नाही ! तर आजीच्या या घुस्शाचं कारण म्हणजे आमचा अच्युतकाका. आणि खरं म्हणजे आमची काकूच–शोभाकाकू.

हे सगळं काही मला सगळंच्या सगळं एकदम कळलं नाही. कळलं ते तुकड्या-

तुकड्यानं. आमची आई आणि शोभाकाकू यांचं चांगलं मेतकूट आहे. आणि आजी कुठं देवदर्शनाला किंवा शेजारी गेलेली असली म्हणजे आजीची चाहूल लागेपर्यंत त्या मोठमोठ्यानंसुद्धा बोलत राहतात. तिच्याविरुद्ध. त्या दिवशी मात्र हे बोलणं मोठ्या आवाजात चालू नसावं. या असल्या बोलण्यात मला कधीही थारा नसे. नली मात्र कधीकधी ऐकत असली तरी या दोघी तिच्याकडं दुर्लक्ष करीत असत. नली म्हणजे बाई पडली ना! आम्ही पुरुष! आम्हाला कोण तिथं येऊ देतो? मी मात्र अशा गोष्टी कान देऊन ऐकत असतो. दाराच्या आडून. बोलणी रंगात आली की आवाजही मोठे होतात. आमचं तेवढंच फावतं.

तर त्या दिवशी आई म्हणत होती. "म्हंजे मी काय म्हणते बरं का शोभा, या सासूबाईंना तुमच्या दोघांत पडायचं कारणच काय? तुम्हाला कळत नाही का? चांगली दोघंही शिकलीसवरलेली आहात की!"

"हो ना! आम्ही तेच म्हणतो. शिवाय डॉक्टरांना विचारूनच चाललंय सगळं."

"तेच तर! डॉक्टरांच्या सल्ल्यानंच चाललंय ना? मग ह्यांना कशाला हवं जिथं-तिथं नाक खुपसायला? मी नसते बाई मध्ये पडले."

"अहो, तुम्हीच सांगा! आता यांची प्रॅक्टिसही धड चालू नाही. आणि कशाला वाढवायचा उगाच भार? आपल्याला काही हे आहे की नाही?"

आणि परत एकदा कधीतरी आणखी थोडंसं.

या वेळी आमच्या आईसाहेब म्हणत होत्या, "मी काय म्हणते, की जिवाला जर यात काही धोका नसेल तर यांची का एवढी हरकत?"

"तेच तर! आणि असला धोका तर माझ्याच जिवाला ना?"—ही शोभाकाकू.

एवढंच—त्यानंतर आजीच आली एकदम! आणि सगळे एकदम चूपचाप. जसे काही आपण त्या गावचेच नाही. 'आता उठलंच पाहिजे मला चहा करायला.' आई म्हणाली. आणि शोभाकाकू तर चक्क कुठल्यातरी नाटकातलं गाणं गुणगुणू लागली.

या दोघींचं काय गुपित चाललं होतं ते मला अखेर कळलंच नाही. पण अशा कामात नली नेहमी उपयोगी पडते. अर्थात सहजासहजी नव्हे. दर वेळी तिला काहीतरी द्यावं लागतं. मोठी शिसपेन्सिल म्हणा, किंवा क्रेपचा फुलं तयार करायचा कागद किंवा वर्तुळं काढायला कंपासपेटी. काहीना काही द्यावं तेव्हाच हिची कळी खुलते.

एकदा मी नलीला असंच गाठलं. कुणी आसपास नसताना.

"काय ग नले, काय चाललेलं आहे ग या तिघींमध्ये? आणि आजीवर का या दोघींचा राग एवढा?"

"का राग म्हणजे? पण नाहीच सांगणार मी तुला पुढचं! तू मला सांगतोस का तुम्ही मुलंमुलं काय बोलत असता ते?" नली तिथून सटकू पाहत होती.

"ए भवाने, क्रेपचा कागद हवाय की नको तुला? गुलाबी, पिवळा, जांभळा. फुलं कुणाला करायची आहेत?"

आणि सटकू पाहणारी नली जागच्या जागी घुटमळली. मग तिनं थोडा विचार केला असावा. शेवटी क्रेपच्या कागदांचा जय झाला. तिनं खुणेनंच मला जवळ बोलावलं.

" अरे, थुला माहिथ न्हाही खा ?" नली काही गुपित सांगत असली म्हणजे अशाच आवाजात बोलते. आणि आम्हाला ते समजून घ्यावं लागतं.

" अघ, फण खाय थे ? थेच विछारतोय ना थुला ?" मी तिचा हात झटकून टाकीत म्हणालो.

" अरे, आपल्या शोभाकाकूला बाळ होणार आहे ना, त्याबद्दल आहे हे सगळं !" नलीनं दबलेल्या आवाजात सांगितलं.

" मग होणार असेना ! होईल ! आपल्याला काय त्याचं ?"

" ॲहॅ रे ! होणार आहे पण त्यांनाच व्हायला नको आहे ते !"

" त्यांना म्हणजे कुणाला ?"

" त्यांना म्हणजे काकाकाकूंनाच नको आहे. आता काढ माझा क्रेपचा कागद."

" ए नले, कागद एकदा देईन म्हटलं म्हणजे देईन. पण सगळं नाही सांगितलंस. आजीचं आणि त्यांचं भांडण का ?"

" का म्हणजे काय ? आजीला हवं आहे ना ते व्हायला बावळटा ! तिला भीती वाटते काकूला काहीतरी होईल म्हणून."

अस्सं ! म्हणजे असं सगळं होतं तर. आणि आजोबांच्या कानावर जाऊ न देता अशी भांडणं चालवायची ही काही साधी गोष्ट नव्हती. मला राहूनराहून आश्चर्य वाटत होतं ते याचंच की, आजीनं स्वतःच हे आजोबांना सांगितलं नसणार का ? माझ्या चाळीस ओळींच्या निबंधाबद्दलसुद्धा तरातरा त्यांच्याकडे ही तक्रार करायला गेली. ती हे त्यांना सांगितल्याशिवाय थोडीच राहते ?

पण आजीनं काय केलं असेल हे पाहायला आम्हाला फार दिवस थांबावं लागलं नाही.

त्या दिवशी रात्री नेहमीप्रमाणं जेवणं चालू होती. नेहमीप्रमाणं सगळे चूपचाप होते. भांड्यांच्या आणि भुरक्यांच्या आवाजांशिवाय दुसरं काही ऐकू येत नव्हतं. तेवढ्यात आजोबा एकदम थांबले. " हे बघा अच्युतराव आणि विनायकराव, तुम्ही जेवल्यावर दोघंही माझ्या खोलीत या. मला बोलायचंय तुमच्याशी काही." आणि ते हात धुवायला उठलेच. उठताउठता त्यांनी म्हटलं, " आणि मुलांना जाऊ द्या आपापल्या खोलीत झोपायला."

इतकी लांबलचक सबंध तीन वाक्यं आमचे आजोबा जेवताना क्वचित बोलले असतील. शिवाय आजोबांनी अच्युतकाकांना अच्युतराव आणि बाबांना विनायकराव म्हटल्याचं मी आधी कधीच ऐकलेलं नव्हतं.

एवढं सगळं असताना जेवण झाल्यावर मी खोलीत झोपायला कसला जातो ? हातावर पाणी पडताच आईच्या नकळत धूम ठोकली आणि आजोबांच्या खोलीची खिडकी

आहे ना, तिच्या खालच्या बाजूला जाऊन मी उभा राहिलो. आणि माझ्या मागोमाग अर्थात आमची नलीसुद्धा.

थोड्या वेळानं मला कळलं की, बाबा आणि अच्युतकाका आजोबांच्या खोलीत आले आहेत. आरामखुर्ची सरकली.

" बसा तुम्ही दोघे. " आजोबा या दोघांना म्हणत होते. पण ते बसल्याचं दिसलं नाही. खिडकीतून त्या दोघांच्या ज्या लांबलचक सावल्या अंगणात पडत होत्या, त्यावरून ते उभेच असावेत. मला खरं म्हणजे हसूच आलं. सरांच्या समोर आम्ही जसे उभे राहायचो तसं हे आजोबांच्या समोर ! एवढे मोठे बाबा आणि आमच्यावर सारखा वट चालवणारे अच्युतकाका—दोघेही उभे ! का हसू येणार नाही ?

कोणत्याही गोष्टीला वेळ लावणाऱ्यांपैकी आमचे आजोबा नव्हते. त्यांनी बोलायला सुरुवातच केली,—

" अच्युतराव, मी काय ऐकतो आहे ते खरं का ? आणि विनायकराव, तुमचंही काही लक्ष दिसत नाही घरात !"

मोठ्या माणसांना त्यांच्याहीपेक्षा मोठ्या माणसांनी रागावल्याचं मी कधी ऐकलंच नव्हतं. त्यामुळं मला खूप मौज वाटली. आणखी गंमत अशी की, काका काय अन् बाबा काय, एक अक्षरसुद्धा बोलले नाहीत. जसेच्या तसे उभे आपले ! बाहेर पडलेल्या त्यांच्या सावल्यासुद्धा हलल्या नाहीत.

परत आजोबांनीच बोलायला सुरुवात केली, " तर मी काय सांगत होतो अच्युतराव ? तुमचा बेत हा काही तुमच्या मातोश्रींना पसंत नाही. आणि त्यामुळं तो आम्हालाही पसंत नाही. हो, म्हणजे हे घरच मुळी त्यांचं ! त्यामुळं त्यांचं ऐकणं तुम्हाला भाग आहे. तुमची काही मतं असतील; पण त्याला आपण मुरड घालावी. आम्हीही वेळीप्रसंगी घालत असतो. आणखी एक नातवंड आम्हाला झालं तर त्याला पोसायची ताकद आहे आमच्यात अजून ! " आणि पुढे न थांबता ते म्हणाले, " ठीक आहे. मी पडतो आता. तुम्हालाही उशीर होईल झोपायला, " असं म्हणून आजोबा आराम-खुर्चीतून उठलेच असावे. कारण अंगणातल्या दोन सावल्या हलल्या आणि तिथून दिसेनाशा झाल्या.

माझ्या शेजारी इतका वेळ चुपचाप उभी राहिलेली नली खरं म्हणजे मला म्हणत होती की, तुझ्या पाठीवर उभं राहून मला दाखव. मी म्हणालो, " हत गाढवे ! दाखवायचंय काय तुला ? मला तरी दिसलं का काय चाललं होतं ते ? आजोबांना कळलं तर दोघांचेही कान चांगले लांबच लांब करतील. समजलीस ? " आणि अक्षरशः ओढीत मी नलीला घरात नेलं.

आमच्या खोलीत गेल्यावर नली मला हळूच म्हणाली, " काय रे, पाहिलेस ना आजीचा काय वट आहे तो ? उगाच नाही ! "

" नले, तू शेफारून जाऊ नकोस हां उगीच ! एक तर आजीचा वट म्हणजे तुझा

वट नव्हे. आणि आजी जशी तुझी आहे तशीच माझीही आहे म्हटलं. आणि शिवाय यात आजोबांचाही वट आहे हे विसरलीस का ? " मी तिला गप्प केलं.

यानंतर आमच्या घरातली धुसफुस एकंदर खूपच कमी झाली. आजीनं आपलं दुपटी शिवण्याचं काम अधिकच जोरानं सुरू केलं. पाळण्यावर लावण्यासाठी रंगीबेरंगी कापडांच्या लहानलहान चिमण्याही तिनं तयार केल्या. गंमत म्हणजे या कामात माझी आणि नलीची मदतसुद्धा आजीनं घेतली.

आजोबा अच्युतकाकांना रागावले त्याला एखादा दिवस झाला असेल. मी शाळे-तून येऊन आजीच्या पलंगावर तिच्या उबदार पांघरुणात झोपलो होतो. आजीचं शिवण-काम चालूच होतं.

तेवढ्यात काका आजीच्या खोलीत आला. आणि मला पलंगावर झोपलेला पाहून तो जायलादेखील लागला.

काका आत आल्याचं आजीला नेहमीप्रमाणं कळलं होतंच. तो परत जायला लागला तेव्हा ती म्हणाली, " असे ना का तो ? शाळेतून दमून येऊन झोपला आहे. काही कळणार नाही त्याला."

एवढं ऐकल्यावर मात्र मी झोपलो नसलो तरी आज्ञाधारकपणं डोळे मात्र मिटून घेतले.

" आई, तुझी मात्र कमाल आहे हां ! थेट दादासाहेबांनाच जाऊन सांगावंस ना तू ? " काका म्हणत होता.

" अरे बाबा, माझं तरी काय चुकलं तू सांग ! तुला फक्त दोन मुली...विनाय-काचा हा एकुलता एक. नाव चालवायला नको का कुणी ? आणि कुळाचार पाळायचे कुणी ? पोरी लग्नं होऊन भुर्रकन उडून जातील. हा विचार नको का करायला ? " आजीचं शिवणकाम मला वाटतं चालूच होतं.

" अग पण असं काय आई ? अन् मला आता मुलगाच होणार आहे असं भविष्य का सांगितलंय तुला कुणी ? उगाच खर्च कशाला वाढवायचा ? आणि माझी वकिली ही अशी चाललेली रुटुखुटु ! " काका या वेळी पायाच्या नखांकडे पाहत असावा.

यावर आजी क्षणभरच थांबली.

" भविष्याचं कुणी सांगितलंय ? पण मला त्या पोरीची तब्येतही दिसत्येय. हे आप्रेशन का काय म्हणतात ते सोसलं पाहिजे ना तिला ? नुस्ती पांढरीफटक झाली आहे अलीकडे. त्यापेक्षा मी म्हणते, बाळंतपण होऊ द्या, काय औषधपाणी करायचं आहे ते नंतर आणखी करा."

दादासाहेबांच्या पुढं बोलण्याची सोय नाही, आणि तुझ्यापुढं बोलणं अशक्य आहे ! " काका जवळजवळ स्वतःशीच बोलल्यासारखं म्हणाला. आणि तिथून उठलाच. मी आपलं किलकिल्या डोळ्यांनी पाहिलं. पण जाताना त्यानं आपले डोळे का पुसले हे मात्र मला कळलं नाही. एवढा मोठ्ठा आमचा काका आणि खुश्शाल रडतो म्हणजे

काय ? बायल्या कुठचा !

यानंतर किती दिवसांनी ते आठवत नाही, पण एकदा मी शाळेतून घरी आलो तर आमची शोभाकाकू हॉस्पिटलात गेलेली होती. आजी गेली होतीच तिच्याबरोबर. गेली ती तिकडेच हॉस्पिटलात रात्रभर !

दुसऱ्या दिवशी सकाळी हॉस्पिटलातून निरोप आला. काका, नलू आणि मी धावतच गेलो तिकडे.

आम्हा दोघांना बाहेर थांबायला सांगून काका आत गेला. नंतर नर्सबाईनं आम्हालाही लगेच बोलावलं. तशी आम्हीही आत पळालो. तेव्हा आजी काकाला म्हणत होती,–

" रडतोयस काय मेल्या पेढे वाटायचे सोडून ? मुलगा झाला तुला ! "

मग नर्सबाईकडे वळून ती म्हणाली, " सुटले ग बाई मी एकदाची ! आता मला घरी गेलं पाहिजे. चहासुद्धा व्हायचाय माझा अजून सकाळचा ! "

○ ○ ○

# रॅकेट

नानासाहेब आपल्या नव्या ओनरशिप फ्लॅटमध्ये राहायला आले त्यानंतर दोन दिवसांनीच चांगला मुहूर्त काढून त्यांनी सत्यनारायण केला. त्या निमित्तानं अर्थातच त्यांनी आपल्या हपिसातल्या मित्रमंडळींना तीर्थप्रसादाला बोलावलं होतं. त्याप्रमाणे गिरगावातल्या कांदा—बटाटा चाळीतल्या आपल्या सर्व शेजाऱ्यांनाही आमंत्रण केलं होतं. तीर्थप्रसादाशिवाय आपल्या नव्या मालमत्तेचं प्रदर्शन करण्याचा हेतू त्यात होताच. पण शिवाय 'तुम्ही कसला फ्लॅट् घेता!' असे म्हणणाऱ्या या सगळ्यांची न बोलता चांगली खोडकी जिरवावी हाही त्यांचा हेतू होता. नानासाहेबांपेक्षा अधिक जहाल स्वभावाच्या सौ. शांतादेवींच्या मते तर विशेषतः या शेजारीण बायकांच्या नाकांना मिरच्याच झोंबायला हव्या होत्या.

बरीच मंडळी घरी लवकर परतण्याच्या उद्देशानं अगदी वेळेवरच येऊन पोचली होती. दिवसाउजेडी नानासाहेबांचा फ्लॅट पाहता आला तर त्यातले दोष पुढे सांगण्याच्या दृष्टीनं नीट पाहून लक्षात ठेवता येतील हाही हेतू यात होताच.

नानासाहेबांनी पूजेसाठी नेसलेला ठेवणीतला पीतांबर अजून बदललेला नव्हता. पण खाजगीत 'दोंदिल बुवा' म्हणून त्यांना चिडविणाऱ्या शांता-

बाईंनी आज त्यांच्याकडं दुर्लक्ष केलं होतं. एकतर स्वतःच्या नटण्या मिरविण्यात नाना-साहेबांकडं लक्ष द्यायला त्यांना वेळ नव्हता. पण खरे म्हणजे त्या आज इतक्या खुषीत होत्या की त्यांच्या ते लक्षातही आलं नसेल.

'या या या– बसा. हां, आता तीर्थप्रसाद आणि फराळ झाल्याशिवाय मुळीच जाऊ देणार नाही– अरे, कॉफी आणा पाहू लवकर –आणि त्या बटाटेवड्याच्या डिशेस्ही–

'सुटे पैसे सत्यनारायणापुढे ठेवायला– अँ–हॅत्तीच्या. एवढं काय त्यात ? हे घ्या. अहो, फार तर काय, अर्धं पुण्य आम्हाला मिळेल. म्हणजे फिफ्टी पर्सेंटच हां फक्त– बाकी तुमचंच.'

'खूप दिवस यांचं चाललं होतं. स्वतंत्र, सेल्फ कंटेंड फ्लॅट पाहिजे. मी म्हणत होतो सबूर जरा, पण नंतर म्हटलं घेऊन टाकू. चांगला प्रशस्त, हवेशीर मिळाला म्हणजे. आता हा मनासारखा मिळाला. घेऊन टाकला. आय ॲम सॅटिसफाइड बुवा.'

'त्याचं काय आहे, एकदा हौस करायची म्हटली की पैशाची पिशवी सैल सोडावी लागते. तिथं तुम्ही इकॉनमी करायची म्हणाल तर नाही जमत. सवड होती, घेऊन टाकला झालं—'

'आता जरा लांब पडतो सगळ्यांनाच, गिरगावापेक्षा. म्हणजे ट्रॅन्स्पोर्ट कॉस्टचा प्रश्न आला. प्रभ्या म्हणत होता, आता गाडी घ्या नाना. मी म्हटलं घेऊ. हळूहळू गाडीही घेऊ.'

'चाळीतल्या त्या राहणीला कंटाळलो बुवा. म्हणजे अगदी 'फेड अप'च झालो. धड हवा नाही, उजेड नाही. कोंदटपणा सगळा. फारच स्टफी. आणि गर्दी–गजबजाट किती ? इथं पाहा कसं शांत, मोकळं, प्रशस्त, प्रसन्न वाटतं. बरं, सगळं इंडिपेंडंट. नळावर त्रास नाही. किंवा आणखी कुठं क्यू लावायला नको. कुरबुरी नकोत, आणि भांडणं नकोत, शेजारी कोण आहेत, कोण नाहीत. आम्हाला त्यांचा बिलकुल त्रास नाही.'

अशा थाटात नानासाहेब सगळ्यांशी बोलत होते. पीतांबराचे टोक गळ्याभोवती गुंडाळून घेऊन चक्क मांडी ठोकून ते सोफ्यावर बसले होते. अधूनमधून ते आपल्या आकारदार पोटावरून आणि टकलावरून कृतकृत्यतेचा हात फिरवीत होते. इतक्या सुंदर, इतक्या स्वस्तात मिळविलेल्या फ्लॅटचे समाधान जसे काही त्यांच्या पोटात मावत नव्हते. आणि हाताने दाबून जागच्या जागी ते ठेवले नाही तर डोक्यातून उडून जाईल अशी भीती त्यांना वाटत होती.

आलेल्यांपैकी प्रत्येकाला जातीने हिंडून नानासाहेबांनी सगळा फ्लॅट दाखविला. स्वतःची सेप्रेट बेडरूम, मुलांची सेप्रेट. बाहेरचा हॉल, दोन्हीकडचे व्हरांडे, स्वैंपाकघर, भिंतीतली 'बिल्टइन' कपाटे, डायनिंग टेबल–सगळे काही. अगदी पंखे, स्वैंपाकघरातला ओटा, दिव्यांना लावलेल्या वेगळ्या फॅशनेबल शेड्स् यासकट. निरोप देताना प्रत्येकाला त्यांनी परत येण्याचे आमंत्रणसुद्धा देऊन ठेवले. 'कधीही, निःसंकोचपणे यायचं, वाटल्यास

राहायलासुद्धा एखाद्या दिवसाच्या सवडीनं ' असं ऐसपैस आमंत्रण.

शांताबाईंनीही आपल्या पद्धतीनं या सगळ्या गोष्टी केल्या. या जागेच्या प्रश्नावरून ज्यांनी ज्यांनी म्हणून त्यांचा त्यांच्या मते अपमान केला होता, त्यांना टोचण्याची एकही संधी त्यांनी सोडली नाही. पण आजचा दिवसच मुळी त्यांचा होता. त्यामुळे त्यांच्या बोलण्याला कोणी हरकतही घेतली नाही. प्रसंग लक्षात घेऊन सगळ्यांनी सगळे हशावारी नेले.

रात्री सगळे आटपेपर्यंत बराच उशीर झाला होता. नानासाहेब तर खूपच दमले होते. थोडंफार काहीतरी खाऊन आणि बारीक पंखा सुरू करून ते जे झोपले ते पाच मिनिटांत घोरायलाच लागलं. आणि शांताबाई झाकपाक करून बेडरूममध्ये आल्या तेव्हा नाही म्हटलं तरी नानासाहेबांचा त्यांना रागच आला. ' असावे घरटे आपुले छान ' ही गाण्याची एकच ओळ त्या स्वतःला ऐकविण्यात अगदी तल्लीन झाल्या होत्या. एवढ्या दिवसभराचं काम. पण त्यांना त्याचा शीण म्हणून वाटत नव्हता. जीवनातल्या अशा आनंदाच्या प्रसंगी काहीतरी वेगळं करायचं असतं असं त्यांनी ' संसार संगीत ' की असल्याच कुठल्या लेखमालेत वाचलं होतं. म्हणजे अगदी तारुण्य संपलं असलं तरी नवराबायकोचं असं जोडीनं, शक्यतो हातात हात घालून, चांदण्यात, समुद्रावर फिरायला जायचं वगैरे. पण करणार काय ? दोंदिलबुवांची चक्क ब्रह्मानंदी टाळी लागली होती.

शांताबाई खट्टू झाल्या. पण एकदम त्यांनी काहीतरी ठरविलं. स्वतः गुणगुणत असलेलं गाणं त्यांनी थांबविलं. हळूच जाऊन त्या नानासाहेबांच्या शेजारी वाकल्या आणि त्यांनी प्रेमळपणे यजमानांना हाक मारली–' साहेऽब ' त्या म्हणाल्या.

नानासाहेब एकाएकी जागे झाले. त्यांना पडत असलेल्या स्वप्नात ते विमानात न बसताच हवेत तरंगत होते. ते एकाएकी पंख तुटलेल्या पक्षासारखे जमिनीवर आदळले. त्यांना जाग आली. पण शृंगार करण्याच्या मनःस्थितीत ते नव्हते. अशा झोपेत बायकोनंसुद्धा व्यत्यय आणावा हे त्यांना खपलं नाही.

' ए माझे आई, आता झोपायला काय घेशील ? आणि मेहेरबानी कर तुझी ती घरटे आपुलेची रेकॉर्ड जरा बंद ठेव. उद्या सकाळपर्यंत.' –आणि एवढं प्रेमळ संभाषण पुरे झालं असं ठरवून त्यांनी कुशी बदलली. ते परत घोरायला लागले.

' अगदी अरसिक ग बाई ' असे म्हणत शांताबाई पलंगावर येऊन पडल्या. ' असल्या अरसिक माणसाशीच गाठ पडल्यावर आपल्यासारख्या हौशी बाईनं करायचं तरी काय ? नाहीतरी आपण त्यांच्या मानाने खूपच तरुण आहोत आणि दोघांच्या वयातलं अंतर तसं पाहिलं तर जास्तच आहे हेच खरं. '

काहीशा अस्वस्थ मनानेच त्या पडल्या होत्या. अशा स्थितीत लवकर झोप येणेही कठीणच होते. उजवा हात लांब करून नानासाहेब जागे होतात का पाहावे असा एक विचार त्यांच्या मनात येऊन गेला. पण तो मोह त्यांनी आवरला. उगाच मघाचच्यासारखं चिडणं बडबडणं नको.

झोपतेवेळी आपल्या कुलस्वामिनीची त्या एक लांबलचक प्रार्थना करीत. नानासाहेबांना खूप पैसे मिळू देत, शैलूला चांगला पैसेवाला नवरा मिळू दे, प्रभाला पैसेवाला सासरा मिळू दे. आपल्याला खूप दागदागिने आणि कपडे मिळू देत इत्यादी इत्यादी. त्यात असेच अनेक उत्तमोत्तम फ्लॅट्स आपल्याला मिळू देत अशीही एक जादा मागणी त्यांनी आज केली. आता अनेक फ्लॅट्सचं त्यांना काय करायचं होतं कुणास ठाऊक. पण आपली केलेली असावी म्हणून असेल, तीही मागणी त्यांनी करून टाकली. नानासाहेबांच्यात थोडी रसिकता निर्माण कर असंही एक मागणं त्यांनी केलं ... आणि या सगळ्या मागण्या एकेक चालू असतानाच त्यांचा डोळा लागला.

आणि देवी त्यांच्यावर इतकी प्रसन्न झाली की त्यांना लगेच आणखी एक फ्लॅट्ही मिळाला. एवढंच नव्हे, तर सुंदर संगीताचे सूरही तिथं येत होते. म्हणजे नानासाहेब आता त्यांच्या मागणीबरहुकूम रसिकही झाले होते की काय? वा वाः आणि हे गाणं तर किती रंगेल, किती गोड ... 'राया पुढ्यात घ्या ना मला.'

स्वप्नातसुद्धा शांताबाईच्या अंगावर रोमांच फुलले. मात्र नानासाहेब तेवढे स्वप्नात कुठं दिसत नव्हते. त्यांना शोधून काढायला हे सुंदर, शृंगारिक गाणं त्यांना ऐकवायला हवं होतं. पण त्या गाण्याची मोहिनीच इतकी विलक्षण होती की शांताबाईंना जागचं हलवेना. मग तर आणखीच गंमत झाली. म्हणजे त्या गोड गाण्याचा, त्याबरोबर साथ करणाऱ्या वाद्यांचा आवाज त्यांच्या अगदी जवळ जवळ येऊ लागला. आवाज गोड झाला म्हणून काय झालं? इतक्या कानठळ्या बसतील इतका आवाज मोठा नसावा तो. पण स्वप्न शांताबाईचं असूनही त्यांचा त्यावर ताबा राहिला नाही. मग तबल्यावर एक कडकडीत थाप बसली तेव्हा इतका मोठा आवाज झाला की त्याच्या धक्क्याने शांताबाई एकदम खडबडून जाग्याच झाल्या.

आणि त्यांच्या लक्षात आलं की त्या जे गाणं ऐकत होत्या ते स्वप्नातलं नव्हतंच मुळी. याचं कारण उघड होतं. कारण स्वप्न संपलं तरी ते गाणं आणि ते आवाज चालूच राहिले होते.

शांताबाईंनी डोळे ताणूनताणून उघडले. आपण झोपेत नाही, चांगल्या जाग्या झालो आहोत याची खात्री करून घेतली. एक दोन चिमटेही घेऊन पाहिले. कान टवकारून ऐकलं आणि मग मात्र त्यांच्या मनात संशय राहिला नाही. इतका वेळ त्या ऐकत असलेलं गाणं स्वप्नातलं नसून पलीकडच्या फ्लॅटमध्ये चालू असलेलं गाणं होतं. पलीकडच्या म्हणजे त्यांच्या अगदी शेजारच्याच. एक मित्र-काय ती त्यांच्या आणि या संगीत फ्लॅटमध्ये होती. शांताबाई ताडकन पलंगावर उठून बसल्या. आणि त्यांचं लक्ष डाव्या बाजूच्या खिडकीकडं गेलं. घाईघाईनं पलंगावरून उतरून त्या खिडकीपाशी गेल्या. पलीकडच्याच फ्लॅट्मधून ते गाण्याचे सूर ऐकू येत होते याबद्दल त्यांच्या मनात असलेली उरलीसुरली शंकाही नाहीशी झाली. त्या पलीकडच्या खिडकीतून प्रकाशाचा झोत बाहेर पडत होता. आणि त्यामुळे झालेला प्रकाशाचा एक चौकोन बाल्कनीच्या भिंतीवर पडला

होता तो शांताबाईंना आपल्या बेडरूमच्या खिडकीतून दिसत होता. खिडकीला असलेल्या डिझाईनच्या चौकटीवर हात ठेवून शांताबाई चाहूल घेत होत्या. आणि ती घेत असताना त्या एकदम दचकल्याच. त्या प्रकाशाच्या चौकोनात आता दोघांच्या सावल्या पडल्या. दोन अगदी जवळजवळ आलेल्या सावल्या. भयानकच दृश्य होतं ते. म्हणजे ते रंगेल गाणं बजावणं आणि नंतर हे भडक शृंगारिक दृश्य ! छे छे आता नानासाहेबांना उठवल्या-वाचून इलाजच नव्हता.

शांताबाई आवाज न करता पण घाईघाईनं नानासाहेबांपाशी गेल्या. यावेळी त्यांनी कोणताही नाजूकपणा दाखविला नाही की नानासाहेब रागावतील याची पर्वा केली नाही. त्यांना गदागदा हलवीत त्या म्हणाल्या,

'नानासाहेब, अहो पाहिलंत का काय चाललंय शेजारच्या फ्लॅटमध्ये ते ? कमाल आहे बाई तुमच्या झोपेची तरी ...'

झालं. नानासाहेबांची स्वप्नसमाधी परत एकदा भंगली. त्यांच्या या स्वप्नातही ते विमानात न बसता आकाशात उडत होते. आणि गंमत म्हणजे त्यावेळी तर खूपच वर गेले होते. हे थ्रिल तर काही अजबच चीज होती. आणि आणखी वर जात असतानाच परत एकदा धाडकन जमिनीवर कोसळले होते ... ताडकन उठून ते गादीवर बसले.

'शांता अग हे काय चाललंय काय ? आज झालंय तरी काय तुला ? मी चांगला झोपलेला. तर तू तिथं येऊन कानात 'साहेब ... साहेब' म्हणून हाका काय मारतेस, झोपायच्या वेळी गातेस काय, चिमटे काय घेतेस,' ते तणतणले.

'अय्या, मी तुम्हाला का घेतले ते चिमटे ? मला वाटलं मी मलाच चिमटे घेतेय हो ...'

पण नानासाहेबांना आणखी भडकविण्यात काही अर्थ नाही हे शांताबाईंनी लगेच ओळखलं. घाईघाईनं त्या म्हणाल्या,

'अहो, तुमची झोप आहे का सोंग ? शेजारच्या फ्लॅटमध्ये एवढा धांगडधिंगा चालला होता. पण तुमचं आपलं हुं नाही की चूं नाही.'

'धांगडधिंगा ? शेजारच्या फ्लॅटमध्ये ? शांता, अग काय काय काय काय चाललंय काय हे तुझं ?' आपल्या ढेरपोटावरून घसरलेला नाइट-लेंगा सावरीत नानासाहेबांनी आपला राग अजूनही उतरलेला नाही हे स्पष्ट केलं.

पण शांताबाईंना आणखी काही सांगावेच लागले नाही. भिंतीच्या पलीकडे तबला की डग्गा की डफ की जे काय वाद्य होतं त्याच्यावर एक कडकडीत थाप बसली आणि गाणं सुरू झालं.

'इष्काची इंगळी डसली ग ... '

आणि थोड्याच वेळात परत पूर्वीप्रमाणे शेजारचा फ्लॅट आणि त्यामुळे नाना-साहेबांची बेडरूम निरनिराळ्या आवाजांनी दणाणून गेली.

एव्हाना आपला लेंगा सावरीत नानासाहेब पलंगावरून उतरलेले होते.

'बापरे हा काय प्रकार आहे ? आहे तरी काय ही भानगड ?'

'ही भानगडच आहे आणि तीसुद्धा आपल्याला नीट कळायला हवी असेल तर इकडे या.' शांताबाईंनी त्यांना खिडकीच्या बाजूला येण्यासाठी खुणावले.

'तो प्रकाशाचा चौकोन दिसतो का ?'

'हो. दिसतो. प्रकाशाच्या चौकोनात काय पाहायचं म्हणतेस ?'

'मी मघाशी पाहिलं तेच' आणि शांताबाईंनी आपण काय पाहिलं याचं साग्रसंगीत वर्णन केलं.

भयंकर सात्विक संतापानं नानासाहेब त्यांना शक्य होते तितके लाल झाले.

'आत्ताच्या आत्ता जातो. अस्साच्या अस्सा. आणि जाब विचारतो त्याला. काही मॅनर्स आहेत की नाही ? भर मध्यरात्री हा धांगडधिंगा म्हणजे आहे काय ? आय शॅल रिपोर्ट टू द पोलीस. काय समजला आहे हा ?' इंग्रजीत बोलणं नानासाहेबांच्या रागाची परमावधी असे.

'काही जायचं नाही. आत्ताच्या आत्ता तर नाहीच. कारण रात्रीचा एक वाजला आहे म्हणून. आणि अस्साच्या अस्सा तर नाहीच नाही. या अवतारात तुम्ही तिथं गेलात तर आपलीच शोभा व्हायची. ते काही नाही. उद्या सकाळी बघून घेता येईल काय करायचं ते.' बायकोनंच असा अवसानघात केल्यामुळं नानासाहेबांचाही नाइलाज झाला. पण उद्‌ईक हे प्रकरण धसाला लावायचंच असा मात्र निश्चय केल्याशिवाय ते राहिले नाहीत.

सकाळी उठेपर्यंत मात्र नानासाहेबांचा घोर निश्चय बराच डळमळित झाला होता. उगाच आपलं एखाद्याच्याकडे जाऊन त्याला विचारायचं, हे काही शिष्टाचाराला धरून झालं नसतं. आपल्याकडं नव्हता का सत्यनारायण, तसंच त्यांच्याकडंही काही असेल आणि त्यानिमित्तानं त्यांच्याकडं गाणंबजावणं असलं तर आपण त्याला कशी हरकत घ्यायची ? उगाच फाड्‌दिशी काहीतरी बोलून त्यांनी आपल्याला घराबाहेर काढलं तर बायको म्हणाली तशी आपली शोभा व्हायची. नाही, असा घसमुसळेपणा करून नाही चालणार. जरा दमानंच घेतलं पाहिजे.

पण त्या फ्लॅटमध्ये निदान राहतो कोण, तो काय करतो, त्याच्या घरी कोण आहे याची चौकशी करायला तर हरकत नव्हती. म्हणून ऑफिसला जाताना नानासाहेब जरा लवकर निघाले. मनाचा हिय्या करून त्या फ्लॅटच्या दारावर त्यांनी टकटकसुद्धा केलं. दारावर फक्त एस.एस. गावकर एवढं नाव कोरलेली एक चकचकीत पाटी होती तेवढीच.

अर्धा एक मिनिट वेळानं दार उघडलं. आणि एक अत्यंत सुंदर, हसतमुख बाई त्यांच्यासमोर उभी राहिली. खरं सांगायचं तर नानासाहेब गांगरलेच. इतकं विलक्षण सौंदर्य इतक्या जवळून त्यांनी उभ्या जन्मात कधी पाहिलंच नव्हतं. दार उघडल्याबरोबरच कसल्याशा उंची सेंटचा वासही हवेत दरवळला. बाई हसल्या तेव्हा कुंदकळ्यांसारखे दात

म्हणून आपण आजवर जे नुसतं वाचलं होतं ते हेच, हेही नानासाहेबांच्या ध्यानात आलं.

'या ना या. आत या. आणि माफ करा. मला दार उघडायला वेळ लागला. दारावर नुसतीच टकटक झाली. बेल वाजली नाही म्हणून गोंधळात पडले मी ' आणि बाई थांबल्या नाहीत. नानासाहेबांच्या अंगावरून जाऊन त्यांनी बेलचं बटनसुद्धा दाबलं. त्याबरोबर मंजुळ स्वरात आत कुठंतरी बेलचा नाद किणकिणला. पण त्या मंजुळ आवाजानं सुद्धा नानासाहेब भानावर आले. बेल दाखवायला जाताना बाई त्यांच्या इतक्या जवळून गेल्या होत्या की त्यांनी चोपडलेल्या त्या मादक सेंटच्या वासानं ते जवळजवळ गुदमरून गेले होते.

'परत यायचं झालं तर आणखी गैरसोय नको. म्हणून मुद्दाम दाखवून ठेवली. एकदम दिसत नाही ती. ' बाईंनी स्पष्टीकरण केलं.

एवढ्यानंच नानासाहेब चांगले गांगरून गेले होते. पण काहीतरी बोलायला तर हवंच होतं.

'नाही नाही. . .मी आत येत नाही. मिस्टर गावकर नाहीत का ? दोन मिनिटं त्यांना भेटून पुढं ऑफिसला जायचं होतं मला. '

'मिस्टर गावकर नाहीत हो. गावाला गेले आहेत ते. टूरवर...आपण असे उभे का ? आत या ना. मिस्टर नाहीत पण मी आहे ना. '

नानासाहेब चरकलेच. मिस्टर गावकर जर नाहीत तर बायकोनं काल रात्री प्रकाशाच्या चौकटीत पाहिलं ते जोडपं कुठलं ? तेवढ्यात सुदैवानं त्यांच्या लक्षात आलं की ही कुंदकळ्यावाली बाई अजूनही हसतहसत आपल्या समोर उभी आहे आणि आपण खुळ्यासारखं तिच्याकडं पाहत आहोत. रात्रीच्या जागरणामुळं असणार नक्कीच. बाईचे डोळे थोडेसे लाल झाले आहेत. पण त्यामुळंच ते अधिक सुंदर दिसत आहेत काय ?

पण बाईचा नवरा घरात नसताना आपण आत जाऊन त्यांच्याशी चक्क बोलत बसलो तर ते आपल्या धर्मपत्नी सौ. शांतादेवी यांना रुचणार नाही. आणि कळल्याशिवायही राहणार नाही. हे नानासाहेबांनी तत्काळ जाणलं.

'असं पाहा. आता मी जरा ऑफिसच्या घाईतच आहे. नंतर जरा सावकाशीनं येईन. मिसेसना घेऊन. तुमच्या मिस्टरांची ओळख करून घ्यायची जमते का पहावं म्हटलं आणि डोकावलो. ' ते म्हणाले आणि घाबऱ्याघुबऱ्या तिथून ते बाहेरच पडले.

'जरूर या हं परत सावकाशीनं. अहो शेजाऱ्यांशी ओळख करून घ्यायला हवी माणसानं...याऽ हं. संकोच नाही करायचा. ' परत एकदा बाई हसल्या. आणि नानासाहेबांची विरोधाची शस्त्रं त्या हसण्यानं अनेकाव्यांदा बोथट करून टाकली.

त्या दिवशी स्टेशनवर पोहचेपर्यंत नानासाहेबांच्या छातीतली धडधड थांबली नव्हती. आणि आपण गावकरबाईंच्या घरात जाण्याचा मोह टाळला याबद्दल ते करीत असलेलं स्वतःचं कौतुक संपलं नव्हतं.

संध्याकाळी हपिसातून परत आले तोपर्यंत बाईंची आणखी ओळख करून घेण्याचा

प्रश्न शांताबाईंनी बाकी ठेवलाच नव्हता.

त्यांचं पाऊल घरात पडताच फ्लॅटचं बाहेरचं दार घाईघाईनं लावून घेत शांताबाई म्हणाल्या,

' बित्तंबातमी काढली हो मी त्या बयेची. कधी सांगेन तुम्हाला असं झालंय मला.'

नानासाहेबांच्या पोटात धस्स झालं. म्हणजे हपिसात जाताना आपण बाईंच्या तिथं थांबलो होतो हे सौभाग्यवतींना कळलेलं तर नाही ?—त्या विचारानं त्यांचा चेहरा गोरामोरासुद्धा झाला.

' नाही मी नाहीच तुम्हाला दोष देणार. त्यांची चौकशी करायला तुम्ही थांबला होतात हे मी पाहिलं. आत गेला नाहीत हे फार चांगलं केलंत हो तुम्ही. बयेनं तुम्हाला आपल्या जाळयातच पकडलं असतं. तुम्ही गेला नाहीतच. पण मी होते ना ! गेला असतात तरी बाहेर काढलं असते. आणि तिला दाखवला असता माझा इंगा.'

नानासाहेबांना उरावरचा धोंडा उतरल्यासारखं हायसं वाटलं. खरं म्हणजे एकदम असं एखाद्याविषयी माहिती नसताना वाईट-साईट बोलू नये असं म्हणून बाईंची तरफदारी करण्याचा विचार त्यांच्या मनात येऊन गेला होता. तो त्यांनी मोठ्या धोरणीपणानं आवरला.

दुपारी सगळं आटपल्यावर शांताबाईंनी गावकरबाईंच्या फ्लॅटवर चाल केली होती. ती म्हणे रेडिओ, फिल्म आणि टी. व्ही. चंद्रिका होती. तिचं नाव सुरंगा होतं. आपले मिस्टर टूरवर असतात असं ती म्हणत असली तरी ते खोटं असलं पाहिजे. कालच्या प्रकाराबद्दल बोलायला ती उत्सुक दिसली नाही. काही मैत्रिणी आणि त्यांचे नवरे आले होते, त्यांनी गायचा फार आग्रह केला म्हणून उगाच दोन गाणी म्हटली असा तिचा बचाव होता. पण तिचे साथीदार म्हणे नेहमीच तिच्याकडं येत आणि त्यांची प्रॅक्टिस रात्रीच चाले. बाईंच्या घरातलं फर्निचर, गालिचे, पडदे सगळेच बडेजावी होते. हो, आणि कोपऱ्यातल्या कपाटात दारूच्या बाटल्याही दिसत होत्याच, ग्लासेसही भरपूर होती. थोडक्यात म्हणजे ही धंदेवाली बाई होती. माझ्यासारख्या बाईमाणसालासुद्धा जिथं तिनं भुरळ पाडली तिथं ती पुरुषांना केव्हाच आपल्या मायाजालात ओढीत असणार. तिचे ते भिरभिरणारे डोळे, कोरलेल्या भुवया, तोंडाला केलेली रंगरंगोटी, शरीराचं प्रदर्शन करणारे कपडे, सेंटचा भपकारा-सगळं एकच सांगत होतं.

आणि हे सगळं सांगतासांगता शांताबाईंचा चेहरा अधिकाधिक चिंताग्रस्त होत गेला होता. शेवटी शेवटी तर त्यांचा चेहरा रडवेलासुद्धा झाला.

आता मात्र नानासाहेबांना काहीतरी बोलणं आवश्यकच वाटलं.

' अग असेना का ती कशीही बाई ? आपल्याला करायचंय काय तिच्याशी ? आपण तिच्या वाऱ्याला उभं राहिलं नाही की झालं. घर बरं की आपण बरे ' ते म्हणाले.

यावर शांताबाईंनी त्यांना कोपरापासून हात जोडले.

' वाटलंच होतं मला तुम्ही असं म्हणणार म्हणून. मी मुळीच ऐकायची नाही हो.

माझी शैलू लग्नाची पोर आहे. आणि प्रभ्यासुद्धा तरुण आहे. या बाईचा का आदर्श ठेवायचा त्यांच्यापुढं ? आणि अशा ठिकाणी आपण राहतो असं कळलं तर मुलीशी लग्न तरी करायला तयार होईल का कुणी माझ्या ? छे छे, हा फ्लॅट् तुमचा तुम्हाला लख-लाभ होवो. मी सांगते, मी आणि माझी मुलं इथं क्षणभरसुद्धा राहणार नाही—' शांताबाईंनी सगळं भडाभडा सांगून टाकलं.

अहो पण—अग पण—मी काय म्हणतोय, आपण उगीचच—' पण शांता-बाईंनी नानासाहेबांना पुढं बोलूच दिलं नाही.

' आणि मुलंच काय ? मला तुमचीसुद्धा भीती वाटते. कधी पाघळाल ते नाही सांगता येत. आताचंच पाहा ना. सकाळी दोन मिनिटं ती बया बोलली तुमच्याशी, तर तुम्ही लागलात तिची तरफदारी करायला. गाऊन दाखवलं असतंन तर गळ्यातच पडला असतात. छे ग बाई, मी नाही इथं राहणार एक क्षणभरसुद्धा. तुम्ही आपला दुसरा फ्लॅट बघा—'

खलास. म्हणजे शांताबाई अगदी निकरावरच आल्या होत्या.

नानासाहेबांचं डोकं सुन्न झालं. जिंदगीची कमाई घालून आपण स्वतःच्या माल-कीची जागा घेतो काय, सत्यनारायण तिथं करतो काय आणि जवळजवळ त्याच रात्री-पासून ही पीडा सुरू होते काय, आणि ही पीडा साधीसुधी नव्हे, सर्वात भारी अशी बाई–पीडा.

पण म्हणून काय झालं ? एवढ्यावरून डोक्यात राख घालणं बरं नव्हे. आणि आपल्याला ही बाई नक्की काय करते हे तसं कुठं माहीत आहे ? अशा वेळी उतावळे-पणा बरा नव्हे. नोकरीला लागलेल्या दिवसापासून साहेब आपली नित्यनेमानं हजामत करतो, तोंड टाकून आपल्याला वाट्टेल ते बोलतो. पण म्हणून का आपण नोकरी सोडली ? तसं करायचं असतं तर आजतागायत एक हजार वेळा नोकरीवर लाथ मारणं आवश्यक होतं.

त्यातल्या त्यात नशीब एवढंच की गिरगावातली कांदा–बटाटा चाळीतली जागा त्यांनी अजून सोडली नव्हती. म्हणजे चारचौघात सांगण्यासारखी गोष्ट नव्हे. पण त्यांना पाहिजे होती तेवढी पागडी द्यायला कोणी मिळत नसल्यामुळं सुदैवानं ती जागा अजून कोणाला दिलेली नव्हती.

अर्थात हे सगळं शांताबाईंना आता सांगण्यासारखं मुळीच नव्हतं. त्याचा काहीही परिणाम त्यांच्यावर झाला नसता. म्हणून मग नानासाहेब काहीच बोलले नाहीत. कपडे बदलून आणि पुढे आलेला चहा कसाबसा घशाखाली ढकलून ते सोफ्यावर गुमान बसून राहिले.

सुचायचं तेव्हा स्वतःचं शहाणपण शांताबाईंना स्वतःच सुचत असे. तसं त्या दिवशीही झालं की काय कुणास ठाऊक. पण त्याही नंतर त्याबद्दल लगेच काही बोलल्या नाहीत. शिवाय कांदा–बटाटा चाळीत परत जायचं म्हणजे होणाऱ्या नामुष्कीची चित्रंही त्यांच्या

डोळ्यांपुढे तरळू लागली असतील. परत गेल्यावर ऐकावे लागणारे तिथल्या गायकांचे छद्मी उद्गार त्यांच्या कानावर पडले असतील.

त्या रात्री दोघांनाही शांत झोप लागणं कठिणच होतं. सुदैवानं शेजारच्या बाईकडे त्यांच्या मैत्रिणीचे नवरे किंवा नवऱ्याच्या मैत्रिणी आल्या नाहीत आणि त्यांनी कसलाही संगीत छळ केला नाही. पण दोन-तीनदा वाजलेली बेल आणि तीन-चारदा बाहेरच्या दारावर झालेली टकटक यामुळं दोघेही आणि विशेषतः नानासाहेब चांगलेच अस्वस्थ झाले.

साडेअकराच्या सुमाराला पहिल्यांदा बेल वाजली तेव्हा नानासाहेब धडपडत उठले. तार कोणाची असेल आणि या तारा नेमक्या मध्यरात्रीच कशा येतात असं म्हणत ते दारापाशी गेले. दिवा लावून त्यांनी दार उघडलं.

'सुरंगादेवी हितंच राहत्यात का तात्या ?' बाहेर उभ्या असलेल्या दोघा बाप्यां-पैकी एकानं विचारलं. त्यानं तोंड उघडता क्षणीचा दारूच्या दर्पाचा भपकारा नाना-साहेबांवर येऊन आदळला. अर्धवट झोपेतून ते चांगलेच जागे झाले. एवढेच नव्हे तर संतापलेदेखील.

'सुरंगादेवी इथं राहत नाहीत. आणि माझं नावही तात्या नाही. अपरात्री यायचं तर नीट पाहून येत जा. इथं भडकमकर राहतात'---आणि ते धाडकन दरवाजा बंद करून घेणार होते. पण तेवढ्यात दुसऱ्या बाप्यानं तोंड उघडलं.

'असं भडकून कसं चालेल भडकमकरसाहेब ? तुमचं नाव तात्या नसेल तर अण्णा समजू. आणि नीट पाहून म्हणालात तेही बरोबरच. आता पाहून घेतलंय तुम्हाला अण्णा. आम्ही दोघांनीही. मगही पाहून घेता येईल. चल रे आधी आपण सुरंगादेवीकडं जाऊ. नंतर अण्णांना पाहून घेऊ !' असं हसत हसत म्हणताना त्यानं नानासाहेबांच्या-कडं पाहून एक डोळा मिटला होता.

नानासाहेब पुढं होऊन त्या माणसाला आपला इंगा दाखवणार होते खरं म्हणजे पण त्यांनी तो फक्त दारालाच दाखवला. पुढं होण्याऐवजी ते मागे झाले. आणि धाडकन त्यांनी दरवाजा लावून घेतला. पण तरीही त्या दोघांचं विकट हास्य त्यांना चुकविता आलं नाही.

यानंतर रात्री दोनदा बेल वाजली. एकदोनदा दारावर टकटकही झाली. नाना-साहेब जागेच असल्यामुळं त्यांना सगळं ऐकू आलं. पण ते उठले नाहीत; किंवा त्यांनी दारही उघडलं नाही. पण त्यांच्या कानात मात्र ती बेल सतत वाजतच राहिली.

दुसऱ्या दिवशी दुपारीसुद्धा अशीच बेल वाजल्याची आणि दारावर टकटक झाल्याची तक्रार शांताबाईंनी केली. 'मुलं कॉलेजात जातात, तुम्ही हपिसात. मी एकटीच घरी-एकानं तर सरळ विचारलं, सुरंगादेवी तुम्हीच का म्हणून.' त्या म्हणाल्या. आणि म्हणता म्हणता कपाळाला हात लावीत खालीच बसल्या.

नानासाहेबही स्वस्थ बसले नाहीत. लगेच त्यांनी पोलिसातल्या एका मित्रातर्फे तक्रार केली. खरं म्हणजे या तक्रारीत काही अर्थ नाही, या बाई म्हणजे रेडिओ-स्टार

आणि नर्तिका आहेत असं तुम्हाला कळेल. शिवाय अब्रुनुकसानीची फिर्यादही तुमच्यावर होण्याची शक्यता आहे असं त्यानं बजावलं. प्रत्यक्षात तसं काही झालं नाही हे खरं. फक्त खुनाची धमकी तेवढी मिळाली. अशा धमक्यांना आपण बिलकुल घाबरणार नाही असे थराथरा कापत त्यांनी शांताबाईंना सांगितलंसुद्धा. आणि शांताबाईंचीही बोबडी वळली असल्यामुळं नानासाहेब घाबरणार नाहीत हे त्यांनाही पटलं.

त्यातल्या त्यात समाधानाची गोष्ट एवढीच की प्रम्या आणि शैलू यांना या प्रकरणाची फारशी माहिती नव्हती.

खुनाची धमकी नानासाहेबांना आजपर्यंत कधीच मिळालेली नव्हती. म्हणजे साहेब तसा त्यांच्यावर खेकसे, लेजर बुकं त्यांच्या अंगावर भिरकावी. पण नुसतं खरचटणं वेगळं आणि खुनाची धमकी वेगळी. इतकी अपूर्व गोष्ट आपल्याबाबतीत व्हावी याचं त्यांना थोडंसं 'थ्रिल'ही वाटलं. पण थोडा वेळच. स्वतःचाच खून होणं ही गोष्ट नाही म्हटल तरी तितकी आनंददायक नव्हेच !

नानासाहेब त्या दिवशी हपिसात गेले ते अगदी त्रस्त विमनस्क मनःस्थितीतच. फ्लॅट्चा बंदोबस्त कडक ठेव; कोणत्याही परिस्थितीत कोणालाही दार उघडू नकोस; बेल वाजविली, दार वाजवलं तर तिकडं दुर्लक्ष कर, आतून वाटल्यास कुलूपच लावून घे, इत्यादी सविस्तर सूचना देऊनच ते बाहेर पडले होते. कोणालाही दार उघडू नकोस म्हणजे मी त्यात येत नाही हं ! असा विनोद करून प्रसंगाचा ताण कमी करायचाही त्यांनी प्रयत्न केला होता. आनंद निवास हाऊसिंगच्या त्या इमारतीतून बाहेर पडताना जिन्यात, दारात कोणी भेटून आपल्याला आणखी धमकावतो की काय अशा भीतीनं त्यांची धाडधाड होत होती. पण सुदैवानं तसं काही झालं नाही.

'पुढं काय ?' हा एकच प्रश्न त्यांच्यासमोर फिरत होता. लेजर बुकावर ठळक अक्षरात तो लिहिलेला होता यात काही आश्चर्य नव्हतं, पण ते बसत त्या समोरच्या भिंतीवरही प्रचंड मोठ्या अक्षरात तो लिहिलेला होता. हवेतसुद्धा तोच प्रश्न कोरलेला होता, आणि खुद्द साहेबाच्या टकलावरसुद्धा ? नानासाहेबांना खरं म्हणजे यावेळी हसूच आलं.

'पुढं काय ?' हा प्रश्न डोक्यात गरगरत असतानाच नानासाहेबांना सुर्वे भेटले. सुर्वे हे नानासाहेबांचे जुने परिचित. मित्रसुद्धा.

'काय नाना, खूप दिवसांनी भेटताय. अलिकडं काय जुन्या मित्रमंडळींना भेटायचंच नाही असा निश्चय केला आहे की काय ?'

नानासाहेब एकदम भानावर आले. 'पुढं काय ?' याबद्दल कोणा इष्टमित्राला विचारावं असं त्यांच्या मनात होतंच. त्यामुळं सुर्वे भेटल्याचा त्यांना फार आनंद झाला. इतका की त्या आनंदाच्या भरात त्यांनी आपल्या या जुन्या मित्राला मिठीसुद्धा मारली असती. पण तेवढं मात्र त्यांनी केलं नाही. सुर्व्यांचा हात हातात घेऊन त्यांनी तो प्रेमभरानं दाबला.

'आता तुम्ही भेटलातच म्हणून म्हणत नाही. पण मला खरोखरच फार आनंद झाला. तुम्ही भेटलात याचा. तुम्हाला हा माझा स्वार्थीपणाच वाटेल बापू. पण मी एका फार मोठ्या अडचणीत सापडलो आहे हो.'

बापूसाहेब सुर्वे प्रथम काही बोलले नाहीत. एरवी त्यांनी हे बोलणं थट्टेवारीही नेलं असतं. पण नानासाहेबांच्या चेहऱ्यावरूनच त्यांनी सगळं ओळखलं असावं.

'खरं म्हणजे तुम्हाला मी आधीच कळवायला पाहिजे होतं. मी इथली जागा सोडून गेलो तेव्हाच पण ते राहिलं—आय् ॲम् सॉरी' नानासाहेब म्हणाले.

'चालायचंच हो, त्यात काय एवढं मोठसं, सांगा ना काय म्हणता. कदाचित मी तुम्हाला मदत करू शकेनही.'

एवढा दिलासा मिळाल्यावर नानासाहेबांनी घडाघडा सगळी माहिती सांगितली.

यावेळीही लगेच सुर्वे काही बोलले नाहीत. मग ते म्हणाले, 'काय हो, ही जागा तुम्हाला नवनीतलाल नावाच्या एजंटानं दिली होती का ?'

'हो हो ऽ तेच त्याचं नाव. नवनीतलाल सगळं लोणी खाऊन बसला आहे हरामखोर.'

'आणि हा फ्लॅट तुमचा आनंद हाऊसिंगमध्ये होता का ?'

'हो ना. बरोबर तिथंच.'

'शेजारच्याच फ्लॅट्मध्ये गावकर म्हणून कोणी बाई राहत होती का ?'

'हो राहत होती ना, म्हणजे आताही राहते आहे.'

'रेडिओ स्टार आणि नर्तिका ?'

'होय हो, पण तुम्हाला हे कसं कळलं सगळं ?'

'मला कळलं याचं कारण तुम्ही ज्या फ्लॅट्मध्ये सध्या राहता आहात तिथंच मीही राहत होतो पूर्वी. मी सोडल्यानंतर तोच फ्लॅट या नवनीतलालनं तुमच्या गळ्यात बांधलेला दिसतोय. स्वस्तात पडला म्हणून तुम्हीं घेतला असणार. माझ्यासारखाच.'

'अगदी तंतोतंत बरोबर' नानासाहेब म्हणाले. आपण बनवले गेलो या दुःखातच बापूसाहेब सुर्वेही बनवले गेले हे समाधान त्यांना वाटत होतं.—'पण आता काय करावं म्हणता ?'

'करावं काय म्हणजे काय नाना ? अहो, फ्लॅट् सोडायचा. दुसरं काय करणार ? आणि तो त्यानं परत घ्यावा म्हणून नवनीतलालचे पाय धरायचे. जे काय वाचेल ते वाचवायचं. आपल्या जुन्या जागेत परत राहायला जायचं.'

'या नवनीतलालला गाठायचं कसं हा एक प्रश्न आहे, बापू. तुम्ही कराल ना मला या सगळ्यात मदत. पण काय हो, हा कितीचा खड्डा समजायचा ?'

'अरे वा वा. तुम्हाला मदत करायची नाही तर कोणाला हो नाना ? दहा हजाराचा खड्डा हे खुशाल समजा. पण मी काय म्हणतो की चोराच्या हातची लंगोटी. काय, खरं की नाही ? वाटल्यास माझ्यावर सोपवा. मी करीन हे काम. मित्रकर्तव्य म्हणून.'

दहा हजारांचा सरळसरळ फटका खाण्याचा प्रश्न होता. पण सगळेच पन्नास हजार जाण्यापेक्षा दहा हजार काही वाईट नाहीत. आणि हा भला माणूस देवानं पाठविल्यासारखा उभा राहिला म्हणून ते शक्य झालं. खरं म्हणजे याबाबतीत शांताबाईंचा सल्ला घेणं योग्य झालं असतं. पण सुर्वे अनायासे भेटले आहेत तर ही संधी गमावणं मोठाच मूर्खपणा झाला असता. दहा हजार कमी घेऊन फ्लॅट् परत द्यायची तयारी नानासाहेबांनी केली. आणि पुढचं सगळं काम करण्याची जबाबदारी बापुसाहेबांनी स्वीकारण्याचं मान्य केलं तेव्हाच त्यांना खरं समाधान वाटलं.

सगळा व्यवहार दोन दिवसांत पुरा करण्याची हमी अखेरीस सुर्व्यांनी दिली तेव्हाच नानासाहेब घरी गेले.

नानासाहेब दिसेनासे होताच सुर्व्यांनी लांब ढांगा टाकीत सर्वांत जवळचा टेलिफोन गाठला. फोनवर सुदैवानं नवनीतलाल त्यांना लगेचच भेटला.

' हॅलो नवनीत, मी सुर्वे बोलतोय. '

' हॅलो, काय नवा जुना ? '

' अरे, नवा जुना कसलं घेऊन बसलास ? आपली कामगिरी फत्ते. नानाला आताच भेटलो. दहाहजार कमी घ्यायला तयार झालाय तो. '

' वा : फर्स्टक्लास काम केलं तुम्ही बापू . '

' फर्स्टक्लास वगैरे ठीक आहे नवनीत. पण फिफ्टी पर्सेंट म्हणजे रुपये पाच हजार आधी मला मिळाले पाहिजेत हे विसरू नकोस. '

' हां जी. त्येमंदी कायबी संशय नाय बापू . आधी तुझा पाच हजार. मंग माझा. '

' ठीक आहे. मग उद्या दुपारीच भेटतो तुला ' सुर्वे म्हणाले, आणि त्यांनी फोन खाली ठेवला.

बिलकुल संशय येऊ न देता नानाला आपण किती शिताफीनं बनवला या कल्पनेनं ते स्वतःवर भलतेच खूष झाले होते.

○○○

# पाच लाखांचा वैताग !

वसंतरावांच्या हातातला पेपर एकाएकी थरथर कापू लागला. नंतर हळूहळू आपला उजवा हात कापत असल्यानं पेपरचा थरकाप उडाला आहे हे त्यांच्या लक्षात आलं. म्हणून डाव्या हातानं उजव्या हातातला कंप थांबविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यामुळं त्यांच्या दोन्ही हातां-सकट पेपर थरथरू लागला. मग हातांबरोबरच आपले पायही कापत आहेत हे त्यांच्या लक्षात आलं. खरं म्हणजे आपलं सर्वांगच कापत आहे हे त्यांना समजलं. देहभान हरपणं असं ज्याला म्हणतात तेच आपल्याला झालं असावं अशी त्यांची खात्री पटली.

परत एकदा शांतपणे त्यांनी तो पेपर टेबलावर पसरला आणि तिकिटाचा नंबर नीट ताडून पाहिला. पहिल्यांदा पाहिलं तेव्हा आपली काही चूक झालेली नव्हती हे त्यांच्या ध्यानात आलं. तिकिटावरील व पेपरातील नंबर एकच होता.

लॉटरीच्या मालिकांतील पहिलं बंपर प्राइझ् त्यांच्या नंबरलाच होतं. पहिलं बक्षीस म्हणजे पाच लाख रुपये ! पा—च ला—ख रु—प—ये ! अवघ्या एका रुपयाच्या तिकिटावर पाच लाख रुपये ! का कोणाचंही सर्वांग थरारून जाऊ नये ?

मग वसंतरावांना स्वतःचंच फार आश्चर्य

वाटलं. 'देना होगा तो छप्पर फाडके देता है' असं त्यांच्या ऑफिसातला मानकामे म्हणत असे त्याप्रमाणं अक्षरशः छप्पर फाडून त्यांना त्यांच्या नशिबानं पाच लाख रुपये दिले होते. त्यांचं सतरा की अठरा विश्वे दारिद्रय एका क्षणार्धात जादूच्या कांडीनं नाहीसं व्हावं तसं होऊन ते लक्षाधीश झाले होते. भिक्षाधीशाचा लक्षाधीश! पण आश्चर्य याचं की एवढी अतर्क्य, अलौकिक, अभूतपूर्व घटना खुद्द आपल्या बाबतीत घडूनही आपल्याला अजून वेड कसं लागलं नाही? यापेक्षाही कमी रकम मिळाल्यावर भ्रमिष्ठ झालेल्या लोकांच्या हकीगती त्यांनी पेपरातून वाचल्या होत्या.

अंगातील थरकापाशिवाय आपल्या छातीतही ब-याच घडामोडी या काळात होऊन गेल्या हेसुद्धा वसंतरावांना जाणवलं. जेव्हा त्यांचे हात कापत होते तेव्हा त्यांची छातीही धडधडत होती. केबिनमध्ये बसणाऱ्या साहेबानं बोलावणं धाडल्यावर धडधडे तशी. पण खरं म्हणजे तशी नाहीच. कारण साहेबानं बोलावणं ही चिंतेची बाब असे आणि ही धडधड त्यातली नव्हती. मिळालेल्या पाच लाख रुपयांच्या बक्षिसाची होती.

आपण लक्षाधीश झाल्याची खात्री होऊन चांगली पाच दहा मिनिटे गेली तरी अजूनही आपल्याला वेड लागलेलं नाही, आपण बरेचसे ठिकाणावर आहोत, सगळं जसंच्या तसंच आहे ही जाणीव वसंतरावांना दिलासा देणारी होती. कारण कोणी सांगावं? एवढं मोठं बक्षीस अनायासं मिळाल्यावर वेड्यासारखे हातवारे करीत आणि 'मी लक्षाधीश' असं ओरडत आपण रस्त्यातून धावत जाणं ही गोष्ट सहज शक्य होती. पण आपला मूळ स्वभावच शांत, विचारी. त्यामुळंच आपलं आज डोकं फिरलं नाही. खरं म्हणजे आपल्या जागी दुसरा कोणी कच्च्या दिलाचा माणूस असता तर त्याचं सौ. शांताबाईशी लग्न होताच त्याला वेड लागायचं, पण आपण म्हणूनच सगळं निभावून गेलं.

शांताबाईंची नुसती आठवण होताच वसंतरावांच्या पोटात धस्स झालं.

आपल्याला मिळालेल्या बक्षिसाबद्दल तिला सांगायचं की नाही? त्यातल्या त्यात बरं एवढंच की आपल्याला सध्याच्या अवस्थेत तिनं पाहिलेलं नाही. लॉटरीच्या तिकिटाचा नंबर पाहताना आपण सावधगिरीनं नेहमीच खोलीचा दरवाजा लावून घेतो हा आपला केवढा शहाणपणा! नाहीतर मघाशी झालेला आपला थरकाप काय शांताबाईंच्या चाणाक्ष नजरेतून सुटला असता? अशक्य. क्षणार्धात त्यांनी ओळखलं असतं. आणि सगळंच बेंड फुटलं असतं, आपल्याला बक्षीस मिळाल्याची बातमी वाऱ्यासारखी नव्हे, वणव्यासारखी हां हां म्हणता सगळीकडे पसरली असती. छे छे, कोणत्याही परिस्थितीत आपल्याला मिळालेल्या पाच लाखांचा सुगावा हिला लागता कामा नयेच. साड्या, दागिने, रेफ्रिजरेटर, टी. व्ही. सेट या सगळ्या व आणखी क्षणाक्षणाला वाढत जाणाऱ्या तिच्या मागण्या पुऱ्या करता करता आपल्या तोंडाला फेस येईलच. पण शिवाय सगळ्या पाचही लाखांची चटणी व्हायला वेळ लागणार नाही.

वसंतरावांनी अजूनही थरथरणाऱ्या हातांनी त्या तिकिटाची नीट घडी केली. पैशाच्या पाकिटाच्या आतल्या कप्प्यात ते ठेवलं. आणि पाकिट कोटाच्या चोर-खिशात

ठेवून दिलं. नंतर ते त्या खिशातून पडलं नाही याची खात्री करण्यासाठी चाचपूनही पाहिलं. पाकिट आतल्या तिकिटासह शाबूत होतं.

खोलीचं दार हलक्या हातांनी उघडून ते बाहेर आले. आणि जसं काही झालच नाही अशा थाटात घरामध्ये वावरू लागले. आजपर्यंतच्या एवढ्या लांबलचक आयुष्यात कधी फारशी वापरावी न लागलेली त्यांची गंजलेली विचाराची चक्रं कुरकुरत फिरू लागली. बक्षिसाचे पैसे आणायचे कसे ? कधी ? कुठून ? सुरक्षितता म्हणून कुणाला बरोबर न्यावं काय ? आणि अखेरीस पैसे एकदाचे आणले म्हणजे ते ठेवायचे कुठं ? मुख्य म्हणजे एवढ्या पैशांचं करायचं तरी काय ? नवीन ब्लॉक, घर, जमीन यासारखे मोठ मोठे खर्च करायचे ? की लहान सहान खर्च, जुनी देणी वगैरे भागवून उरलेलं सगळं जसंच्या तसं ठेवून द्यायचं ? जुनी देणी तरी एकदम देऊन टाकावीत का ? ही भयंकर कटकटीची, जीव खाणारी नोकरी संधी मिळाली तर सोडायची आणि नोकरीवर लाथ मारताना शक्य तो साहेब व हेडक्लार्क या दोघांनाही सणसणीत लाथा मारायच्या असं एक गोड स्वप्न वसंतरावांनी आज अनेक वर्षं मनाशी बाळगलं होतं. तसंच करावं काय ? आणि नोकरी सोडल्यावर काय नुसतं हात जोडून घरीच बसायचं ? शांताबाईंची बडबड ऐकत ? त्यापेक्षां एखादा धंदा टाकला तर ? किराणा मालाच्या धंद्यात खूप फायदा असतो आणि विशेष म्हणजे तो कोणाच्या डोळयात भरत नाही असं त्यांना वाटत असे. पण किराणा मालापेक्षा एखादं हॉटेल टाकलं तर ? ‘ वसंत विहार ’ असं हॉटेलचं एक छानदार नावही त्यांच्या मनात नाचत गेलं. हॉटेलचा धंदाच उत्तम. मसालेदार, चमचमीत पदार्थ वसंतरावांना खूप आवडत. पण सुग्रणपणा आणि शांताबाई यांचा उभा दावा. त्यामुळे त्यांच्या घरी खमंग पदार्थांचा घमघमाट आला असं कधी होतच नसे. तसं वीरकर यांच्या वेलणकर हॉटेलात वसंतराव कधीमधी जात. पण असा खर्च आपल्या सारख्याला कुठं नेहमी नेहमी परवडतो ? त्यामुळं आपल्या जिभेचे चोचले पुरविणं आजपर्यंत त्यांना कधी जमलंच नव्हतं. आता घरचंच हॉटेल झालं म्हणजे पहायला नको. भजी म्हणू नका, डोसा म्हणू नका, मिसळ म्हणू नका, डिंक लाडू म्हणू नका–वाटेल ती वस्तू घेतली आणि चापली, आपण मालक. आपल्याला विचारणारा कोण ? शिवाय हॉटेलात शांताबाई येण्याची शक्यता कमी. त्यामुळं सासुरवास नाही. घेतलं आणि मटकावलं, घेतलं आणि हाणलं. फार मजा येईल. दररोज नवे पदार्थ आणि आपल्याच हॉटेलातले. त्यामुळं जवळ जवळ फुकटच. वा ! ही हॉटेलची – खरं म्हणजे वसंत – विहार काढण्याची कल्पना मोठी नामी होती. आणि अशी बेस्ट कल्पना आपल्याला योग्य वेळी सुचली. वसंतरावांना स्वतःचं खूप कौतुक वाटलं. आहे, म्हणजे आपल्यालाही डोकं आहे ! तसं डोकं असायला तरी काय लागतं म्हणा ? पैसा असला म्हंजे सगळं काही समजतं आणि सुचतं. हॉटेलचा धंदा चांगला भरभराटीत आला – आणि तो येणारंच – म्हणजे मग आणखी पैसा येणारच. पैशाकडं पैसा जातो म्हणतात ते काय उगाचच ? मग आयुष्यात बाकी करायचं उरलं काय ? चैन. फक्त चैन. चोवीस तास चैन. वसंतरावांना एकदा असंही वाटल की आपलं

हॉटेल सगळ्या पुण्यात प्रसिद्ध व्हावं. म्हंजे सगळे लोक इथं भजी, मिसळ, बटाटेवडा, बटाटा भाजी, सामोसे खायला गर्दी करणार. उभं राहायला सुद्धा जागा नाही उरणार. अशा वेळी एखाद दिवशी साहेबही आपल्या हॉटेलात यावा. डुचका हेड क्लार्कही यावा. आणि आपण त्या दोघांचा फर्स्ट क्लासपैकी अपमान करून आणि वेटरकडून धक्के मारून त्यांना बाहेर काढावं. 'प्रत्येक कुत्र्याचाही एकेक दिवस असतो' हे त्यांना ऐकवावं म्हणजे खूप मजा येईल. पण साहेबाचाही आपण अपमान करावा का ? वाटल्यास त्याला सोडून देऊ, पण डुचक्या हेडक्लार्कला मात्र सूर्याची पिल्लं म्हणजे काय असतात ते दाखविल्याशिवाय नाहीच सोडायचा. का म्हणून सोडायचा ?

आणि ही कल्पना वसंतरावांना इतकी पसंत पडली, इतकी पसंत पडली की त्या आनंदाच्या भरात त्यांनी टाळी सुद्धा वाजवली.

आता मात्र शांताबाईला राहवलं नाही.

'अहो, चाललंय काय तुमचं सकाळपासून ? आणि आता 'नाहीच सोडायचा' काय म्हणता ? टाळी कसली वाजवता ?'

आपल्याला हिनं बरोबर पकडलं या कल्पनेनं वसंतराव केवढ्यांदा तरी दचकले. पण आता पैशांबरोबर तेवढीच समयसूचकता त्यांच्याजवळ आली होती की काय कोण जाणे. आणखी एक टाळी वाजवीत ते म्हणाले,

'अग असं काय करतेस तू तरी ? नाहीच सोडायचा म्हणजे या डासाला उद्देशून म्हणालो मी. हरामखोर लेकाचा चावतो तो चावतोच आणि वर शिवाय गुणगुणही करतो. आहे काय ?'

पण वसंतरावांना आपल्या समयसूचकतेबद्दल काहीही वाटत असले तरी त्यांच्या दुर्दैवानं शांताबाईंना मात्र तसं वाटलं नाही. आपल्या हातातलं काम त्यांनी बाजूला ठेवलं आणि पातळावर हात कोरडे करीत त्या वसंतरावांसमोर येऊन उभ्या राहिल्या.

'अहो, असं काय करताय तुम्ही आज उठल्यापासून ? मघाचपासून मी आपली पाहतेय. पण बोलले नाही. सक्काळीच खोलीत परत गेलात काय ? तासन् तास दार लावून काय बसला होतात ? आणि मग बाहेर आलात ते तरी कसे ? जळ्ळी मेली ती पट्ट्या पट्ट्यांची अर्धी तोकडी विजार. त्यावर नुसता कोट आणि टोपी ? शर्ट सुद्धा नाही. बरं तर बरं. कुणी पाहिलं नाही म्हणून ! आणि मघापासून ही बडबड. हे हातवारे. क्षणात नोकरीवर लाथ मारायचं काय बोलता ? क्षणात डुचक्यालाच लाथा मारीन म्हणता ! कोण हो हा डुचक्या ? मग काय तर म्हणे किराणा मालाचं दुकान टाकावं. मग म्हणे हॉटेल—वसंत-विहार. वाः तिथं सुद्धा दुसऱ्या कुणाचं नाव सुचलं का ? शांता-विहार होतं. सोन्यासारखी मुलींची नाव होती...पण मी म्हणते ते राहू द्या. हे चाललंय काय तुमचं वेडया वेडयासारखं ? खूळ तर नाही ना लागलं ? की लॉटरीचं बक्षीस मिळालं ? परवा मी वाचलंच होतं पेपरात की एका कुणाला म्हणे मिळाली अडीच लाखाची लॉटरी आणि धावत सुटला की रस्त्यातून नागडा उघडा' ! ... बरंचसं स्वतःशीच बोलल्या-

सारखं शांताबाईचं चाललं होतं.

वसंतरावांच्या पोटात परत धस्स् झालं. म्हंजे हिला आपल्या लॉटरीचं कळलं की काय अखेर ? आणि ज्या गोष्टी आपण मनातल्या मनात बोलतो आहोत असं आपल्याला वाटलं होतं त्या आपण नक्कीच मोठ्यांदा बोललेलो दिसतो आहोत. अर्धी चड्डी, तीवर नुसता कोट आणि टोपी घालून जेव्हा आपण खोलीच्या बाहेर आलो तेव्हा आपल्याला कोणी पाहिलं नाही हे बरंच. बायको म्हणते ते खोटं नाही. पण त्या अवतारात आपण काय विचित्र दिसलो असू ?

या कल्पनेनं वसंतरावांना हसूच आलं. पहिल्यांदा त्यांच्या नेहमीच्या सवयीप्रमाणं. चोरून हसल्यासारखं, घाबरत, घाबरत. नको. उगाच साहेब काय म्हणेल, डुचक्या उगाच कातावेल का, अशा भीतीनं दाबून ठेवलेलं हसू. आणि नाही म्हटलं तरी मनमोकळे-पणानं घरच्यावरी हसायलासुद्धा नकोच वाटायचं. शांताबाईंचा खडा पहारा पडला ना ? उगाच त्या म्हणायला नकोत. ‘ हसताय काय लहान पोरासारखं फिदीफिदी. लोक काय म्हणतील ? बरं दिसतं का या वयात ? ’—पण नंतर त्यांच्या मनातल्या कोणीतरी त्यांना ढोसून म्हटलं, हस की लेका, हस भरपूर. हसायला काय पैसे पडतात का ? आणि पडले तर पडले. चांगले पाच लाख मिळवून बसलायस ना गब्रू ? हस. साहेबाला आणि त्या डुचक्याला काय भितोस ? साहेबच काय, त्याचा बाप आला तरी कसली भीती आहे तुला ? अरे, फार काय, नोकरीवरून काढून टाकील. काढेना का. तुझं काय नुकसान होणार आहे त्यात ? महिना पाचशे रुपडक्या ? गेल्या खड्यात.

आणि खरोखरच वसंतराव अगदी त्यांना मनापासून वाटत असे त्याप्रमाणं खो खो हसले. पोट धरधरून हसले.

अवाक होऊन शांताबाई आपल्या यजमानांकडं पाहतच राहिल्या.

‘ खरंच, फार मजेदार दिसलो असेन मी. नाही ? त्या ड्रेसात. तसे कपडे करून एकदा साहेबाच्या समोरच जाऊन उभं राहिलं पाहिजे. उगाच गंमत आपली. ’

आणि शांताबाईंनी कपाळाला हातच लावला. एक शब्दही त्यांच्या तोंडून बाहेर फुटेना.

या संधीचा फायदा घ्यायचा वसंतराव कसे सोडतील ? एरवी सतत बोलतच राहून वसंतरावांना अवाक करून सोडणाऱ्या शांताबाईंवर आज बाजू उलटलेली दिसली.

‘ आणि आज जेवण सावकाश होऊ द्या बरं का. चांगलंचुंगलं करा काही तरी. आज ऑफिसला जाणार नाही मी. आणि दुसरं म्हणजे आज दुपारच्या गाडीनं मी मुंबईला चाललो. ’ वसंतरावांनी धडाधडा आपला प्लॅन सांगून टाकला.

शांताबाईंचं डोकं चक्रावूनच गेलं. सकाळी उठल्यापासून हे काय वेडेचार करताहेत एकेक. तरी मी म्हणते, तेही ठीक होतं. एखाद्या दिवशी होतं काहीतरी मागं पुढं. पण आता हे काय आणखी ऑफिसलाही जायचं नाही म्हणतात. सिक नोटही पाठविलेली नाही आणि कधी नाही ती मुंबईला जायचीच भाषा बोलतात. जेवायलासुद्धा चांगलंचुंगलं

करायला फर्मावतात. आहे काय हा प्रकार ?

एकाएकी महिलामंडळात नुकत्याच झालेल्या कोणत्याशा मानसशास्त्रज्ञ डॉक्टरीण-बाईंचं भाषण त्यांना आठवलं. माणसाच्या मनात त्याच्या अशा काही सुप्त इच्छा असतात, त्या कितीही दांडग्या असल्या तरी माणूस मोठ्या प्रयत्नानं त्या दाबून ठेवीत असतो. पण याचे परिणाम मात्र त्याच्या वागणुकीवर झाल्याशिवाय राहत नाहीत. पुरुष असला तर तो कुढा, अबोल, आतल्या गाठीचा बनतो. बाई असेल तर ती बडबडी, त्रागा करणारी, भांडखोर, क्वचित प्रसंगी खादाड व आळशी बनते. आणि दाबून ठेवलेल्या या इच्छा, आकांक्षा कायमच काही तशा दबलेल्या अवस्थेत राहत नाहीत. प्रकट होण्यासाठी, उफाळून वर येण्यासाठी त्या वाटच पाहत असतात. मग एखादे दिवशी अशी योग्य संधीही त्यांना अचानक मिळते. आणि त्या ज्वालामुखी किंवा भूकंपासारख्या स्फोटक स्वरूपात व्यक्त होतात. अशा वेळी माणूस काय करील हे सांगता येत नाही. आजपर्यंत त्यानं कधी मनातही आणल्या नसतील अशा वाटणाऱ्या गोष्टी तो सहजासहजी करून जातो. आपण त्याच्या कृतींना वेडेपणा म्हणतो हे खरं, पण अशा प्रत्येक वेड्या कृतीला फार मोठा इतिहास असतो. आणि प्रत्येक माणसाचं विशेषतः स्त्रीचं कर्तव्य आहे की अशा प्रसंगी गडबडून न जाता तिनं परिस्थिती समजावून घेतली पाहिजे. ' डोक्यावर परिणाम ' झालेल्या माणसाशी सहानुभूतीनं वागलं पाहिजे. विशेषतः स्त्रीनं, असं म्हणण्याचं कारण सांगताना या मानसशास्त्रज्ञ बाई हसल्या होत्या. ' असं मी मुद्दाम म्हणते, स्वतः स्त्री असूनही म्हणते, याचं कारण हेच की अनेक प्रकारच्या वेडांचं कारण आपण स्त्रियाच असतो. '

खरं म्हणजे शांताबाईंना हे भाषण मुळीच आवडलं नव्हतं. स्वतःवर नेहमी कर-ण्यात येणारे बडबडी, त्रागा करणारी, भांडखोर--हे सगळे आरोप या बाईंनं ओळीनं आपल्यावरच केल्यासारखे काय म्हणून करावे ? म्हणजे वसंतराव कुठे अबोल बनले त्याला आपणच जबाबदार की काय ? वा ग वा.

आणि म्हणूनच त्यांनी ते सगळं भाषण विसरून जाण्याचा प्रयत्न केला होता. पण आता मात्र ते त्यांना एकदम आठवलं. एकदम होणाऱ्या स्फोटाचा बाईंनी जो उल्लेख केला होता तो वसंतरावांच्या बाबतीत आज झाला होता काय ? त्यांना खरोखरच वेड लागलं होतं काय ? तसंच असलं पाहिजे. नाहीतर आता ही नोकरीवर लाथ मारण्याची, साहेबाचा अपमान करण्याची अवदसा त्यांना कुठून सुचली ? आणि ती मानसशास्त्रीय बया म्हणाली त्याप्रमाणे त्यांचा हा ज्वालामुखी किंवा भूकंप किंवा वेड आणखी कशाकशा प्रकारे प्रकट होणार ? खरोखरच का हे त्या दिवशी आपण वाचलं होतं त्याप्रमाणं वेड्या-सारखं रस्त्यातून धावणार ? अन् लगेच शांताबाईंनी आपली जीभ कचकन चावली. खरं म्हणजे असा अभद्र विचार मनातच यायला नको होता. म्हणजे त्यांना असं वाटून गेलं होतं की त्या माणसालाही वेड लागले हे एकवेळ खरं असेल. पण निदान त्याच्या पोराबाळांचा आणि बायकोचा तरी तसा प्रश्न नव्हता कारण वेड लागलं असलं तरी

त्याला बरंचसं घबाड मिळाल्यामुळं ते लागलं होतं आणि यांना—फक्त वेडच ! असा विचार अशा वेळी आल्यावर कोणीही जीभ चावायची नाहीतर काय करायचं ? शांताबाईंनी तर कुल-स्वामिनीपुढं नाक घासून हलक्या हातानं स्वतःच्या दोन-चार थोबाडीतही मारून घेतल्या. पण त्यामुळं त्यांचे गाल घेताचे हुळहुळले आणि जीभ चावल्यामुळं तीही जराशी चुरचुरली पण तो उनाड विचार काही त्यांच्या डोक्यातून हटला नाही. उलट त्यांना वाकुल्या दाखवीत राहिला.

घाबऱ्या घाबऱ्या शांताबाई म्हणाल्या,

‘ अहो, असं काय करताय तुम्ही आज ?’ आवाजात त्यांनी नेहमीपेक्षा कितीतरी अधिक मार्दव आणलं होतं. आणि खरं म्हणजे ‘ वेड्यासारखं ’ असा शब्द शेवटी त्यांच्या ओठावर आला असूनही त्यांनी तो गिळला होता.

पण वसंतराव काहीही न बोलता नुसते त्यांच्याकडं पाहतच राहिले. त्यांचा चेहरा निर्गुण आणि निराकार दिसत होता.

आपल्या मृदु वाक्यामुळं मग शांताबाई स्वतःच गहिवरल्या.

‘ असं नाही हां करायचं ! जरा स्वस्थ पडून राहता का ? त्यामुळंच बरं वाटेल तुम्हाला. ताप तर काही अंगात दिसत नाही. पण मेलं नुसतं अंगाला हात लावून नाही हो कळत. आणि नकाच जाऊ ऑफिसात. तुम्ही म्हणता तेच बरोबर आहे. आणि सिकनोटसुद्धा नाहीच पाठवायची. काय करणार आहेत मेले. इतकं मरीमर काम करायचं माणसानं वर्षामागून वर्षं. आणि रोज दहादहा बाराबारा तास ! ह्यांना मेल्यांना आहे का त्याची काही ही ? खुश्शाल पडून राहा. आणि मीसुद्धा लागतेच आता स्वैंपाकाला. चांगल्या पुऱ्या करते, बटाट्याची भाजी, कांद्याची भजी तळते, पापडही तळलेलेच आवड-तात ना तुम्हाला ? तेही तळते. भजी झाली की पापड. आहे काय ? आणि चांगलंचुंगलं करा म्हणालात म्हणजे गोडही हवंच नाही का ? शिकरण नाहीं तुम्हाला आवडत. मला माहीत का नाही ? मुळीच शिकरण नको. आज एवढं कधी नाही ते सांगितलंत तुम्ही तर श्रीखंडच आणते चितळ्यांकडचं. दिवाळीलासुद्धा काही झालं नव्हतं माझ्या हातून. एखाद दिवशीच करायचं असं, तर मी म्हणते काही कमी पडायला नको. आपल्याच माणसासाठी करायचं ना सगळं. त्यात हात तरी आखडता कशाला घ्यायचा मी म्हणते—!’ गहिवरल्यामुळंच शांताबाई इतकं बोलू शकल्या असं नाही. पण गहिवरानं त्यांना असं बोलायला लावलं हे मात्र खरं. त्या दिवशी मात्र इतक्या गोष्टी तयार करण्याचं कबूल केल्याबद्दल स्वतःचा तितकासा राग त्यांना आला नाही.

एवढं सगळं ऐकल्यावर मात्र वसंतरावांचा इतका वेळ कोराकरकरीत असलेला चेहरा खुलला. कधी नाही ते त्यांच्या चेहऱ्यावरचं हास्य उमललं. जणू काही ही आपली बायकोच बोलते आहे ना, याची ते आपल्या मनाशी खात्री करून घेत होते.

‘ खरंच, मी ऑफिसला नको जाऊ ’ एखाद्या लहान मुलासारखं त्यांनी विचारलं. आणि याचाही शांताबाईंना फार आनंद झाला. मनातल्या मनात त्या खरं म्हणजे

फार बावरल्या होत्या. एकाएकी वसंतराव इतके कसे बदलले असावेत याचं कोडं मनाशी सोडवीत होत्या. आणि वास्तविक याच्या मुळाशी आपणच असलो पाहिजे असे त्या आपल्या मनोदेवतेला बजावीत होत्या. कालच रात्री त्यांनी नव्हतं का वसंतरावांशी एक प्रचंड भांडण उकरून काढलं ? नेहमीपेक्षा जास्तच त्रागा, अधिक बडबड, अधिक कर्कश आवाजात, मुळीच न थांबता कालच रात्री त्यांनी नव्हती का केली ? ' अग पण—अग पण—' असं म्हणून वसंतराव आपल्याला शांत करण्याचा प्रयत्न सारखा करीत असताही त्यांना आपण कुठं जुमानलं बरं ? माणसाला वैताग येऊ नये तर काय ? आणि या वैतागाचा स्फोट होऊन त्यांनी आपल्या एखादी श्रीमुखात भडकावली असती तरी शांताबाईंना त्याचं आश्चर्य वाटलं नसतं. पण तसं काहीच न करता ते एवढंच म्हणाले होते, ' खरंच, मी ऑफिसला नको जाऊ ? '

' नाहीच जायचं ऑफिसला. मी म्हणते ना, आता शांतपणे नुसतं पडून राहायचं. कसला विचार न करता. आपल्याला काऽही कमी नाहीयै. नसता विचार करायला. तुम्ही आराम करा तिकडं. आणि सगळा स्वैंपाक झाला म्हंजे मीच बोलावीन तुम्हाला. ' शांताबाई म्हणाल्या आणि वसंतराव काय करताहेत म्हणून त्या वाट पाहत बसल्या नाहीत. त्यांनी चक्क वसंतरावांना हाताला धरून खोलीत नेलं आणि ते कॉटवर पडल्यानंतर त्यांना पांघरूण घालून मायेनं थोपटलंदेखील.

आपलं काय होतं आहे हे कळत असूनही वसंतरावांचा त्यावर विश्वास बसत नव्हता. पण तसं पाहिलं तर पहिल्या पाच लाख रुपयांच्या बक्षिसाचं तिकीट आपल्याजवळ आहे यावर तरी सुरुवातीला त्यांचा विश्वास कुठं बसला होता ?

वसंतराव कॉटवर पडल्यानंतर शांताबाई तिथून निघून गेल्या तरी वसंतरावांच्या अंगातल्या सुखाच्या झिणझिण्या अजून संपल्या नव्हत्या. उलट कॉटवर पडलेले नसून मधाच्या तळ्यात तरंगतो आहोत असंच त्यांना वाटत होतं. पाच लाखांच्या त्या बक्षिसापेक्षासुद्धा शांताबाईंच्या गोड बोलण्यानंच सगळं काम केलं होतं, की काय !

वसंतरावसुद्धा विरघळले. आपल्याला एवढं पाच लाख रुपयांचं बक्षीस मिळालं, आपल्यासारख्या सामान्य कारकुनाच्या दरिद्री आयुष्यात एवढं नवल घडलं आणि जिच्याबरोबर आपण आजवरचे एवढे दिवस आयुष्य काढलं त्या आपल्या खुद्द बायकोलासुद्धा आपण ते सांगितलं नाही, या कल्पनेनं त्यांना अपराधी वाटू लागलं. त्यांचं मन त्यांना खाऊ लागलं. परिणाम काहीही होवोत. अखेर आपलं नशीब. पण आपण तिला सांगितलंच पाहिजे. त्या बक्षिसाच्या पाच लाखांबद्दल आणि आपण त्याचं काय काय करायचं ठरविलं आहे त्याबद्दल सुद्धा.

मग बऱ्याच वेळानं जेव्हा वसंतरावांना जाग आली तेव्हा अनेक खमंग पदार्थांचे सुवास आपल्या भोवती दरवळत आहेत असं त्यांच्या लक्षात आलं आणि त्यांची तब्येत अधिकच खूष होऊन गेली. बायकोच्या प्रेमानं त्यांचं मन भारावलं.

शांताबाईंनी सुद्धा कधी नव्हे इतका मन लावून स्वैंपाक केला होता. वसंतरावांचं

वेड म्हणा, वेडाची लहर म्हणा, ही इतरांइतकी गंभीर स्वरूपाची नव्हती की, तीबद्दल त्यांनी फार काळजी करायला हवी होती. होतं कधी कधी माणसाला असं. भावनांचा अतिरेक झाला म्हणजे. आणि कोणी सांगावं की ती क्वचित येणारी वेडाची लहर सुद्धा नसेल. ते वेडच नसेल. साधा चक्रमपणा असेल. जसा आपण नेहमीच करीत असतो तसा, पण म्हणून का आपण वेड्या आहोत ? आता आपण वसंतरावांशी असंच गोड वागायचं. आजपर्यंत झालं इतकं खूप झालं.

मग शांताबाईंना वाटलं आपण वसंतरावांना स्वैंपाकघरात जेवायला यायचा त्राससुद्धा नाही द्यायचा. खोलीत नेऊन तिथंच त्यांना जेवू घालायचं.

आणि तसंच त्यांनी केलं. एवढंच नव्हे, तर त्यांना प्रेमानं भरवलं सुद्धा.

वसंतराव अजूनही मधाच्या तळयात बुचकळया मारीत होते. त्यांनी सगळे खमंग पदार्थ चवीनं खाल्ले. आता ते स्वतःवर आणि स्वतःपेक्षा शांताबाईवर बेहद्द खूष झाले होते. छे, यानंतर तरी आपले आतापर्यंतचे गुपित आपल्या सहधर्मचारिणीपासून लपविणं त्यांना शक्यच नव्हतं. म्हणजे तसं करायचा त्यांनी प्रयत्न केला असता तरी त्यांना वेड लागलं असतं.

जेवण झाल्याबरोबर लगेच टॉवेलानं हात कोरडे करीत असतानाच वसंतराव म्हणाले, ‘ शांता, इकडे ये बघू ! ’

पण शांताबाईंचं लक्ष आता स्वैंपाकघरात होतं. त्या म्हणाल्या, ‘ जरा आटपून आलेच मी ! ’ पण अर्थात वसंतरावांना धीर नव्हता.

‘ नाही, नंतर नाही. आताच्या आत्ता ये ! ’ ते जवळ जवळ ओरडलेच. आणि त्यांच्या आवाजातली वेगळी जरब शांताबाईंना इतक्या तीव्रतेनं जाणवली की त्यांना धसकाच बसला. त्यांच्या हातातलं भांडं दाणदिशी जमिनीवर आदळलं.

‘ झालं, यांचं काहीतरी बिघडलं वाटतं परत ’ असं म्हणत म्हणत शांताबाई लगबगीनं वसंतरावांच्या तिथं आल्या.

वसंतराव हात पसरून उभे होते.

‘ ये, माझ्याजवळ ये ’ ते म्हणाले. आणि ते म्हणतात तसे करण्यावाचून, आपल्याला काही पर्याय नाही असं शांताबाईंनाही जाणवलं. त्या वसंतरावांच्या जवळ गेल्या आणि वसंतरावांनी त्यांना जवळ घेतलं, आणि ते म्हणाले,

‘ शांता—शांतू , अग आपण खूप श्रीमंत झालो. आपल्याला पाच लाख रुपये मिळाले. पाच लाख रुपयांचं घबाड. काय समजलीस ? आता आपल्याला काही कमी नाही, काही कमी नाही— ’

शांताबाईंनी ते ऐकलं मात्र, त्यांचा चेहरा खर्रकन् उतरला. त्या खुळ्यासारख्या वसंतरावांच्याकडं पाहतच राहिल्या. पण वसंतराव आता मुळीच थांबणार नव्हते. शांताबाईंना त्यांनी परत आपल्याजवळ ओढलं.

‘आणि आजच्या इतकं गोड तू कायम वागलीस तर मला काहीच कमी नाही,

काहीच नाही !' आणि त्या उद्गारांनी अधिकच बावचळलेल्या शांताबाईंचं त्यांनी मोठ्ठ आवाज करून चुंबनसुद्धा घेतलं !

शांताबाईंचं डोकं आता कमालीचं सुन्न झालं होतं. वसंतरावांना सकाळपासून जे झालं आहे असं त्यांना वाटत होतं ते खरंच होतं यात त्यांना आता शंका वाटत नव्हती. आणि तरीही वसंतरावांचा झालेला हृदयपालट त्यांना स्पष्ट दिसत होता.

— हसावं की रडावं हेच मुळी त्यांना कळेना !

○ ○ ○

# बाई

सौ. देशपांडे अगदी हलून गेल्या.

या अपूर्व घटनेत एक आश्चर्य लपलेलं नसून दोन आश्चर्ये होती. बाई या मुळातच इतक्या वजनदार की त्या हलणं हे पहिलं आश्चर्य. कुठूनही बसल्या ठिकाणचं हलणं हा त्यांना स्वतःला मोठा व्यायाम असे. हलण्याचे क्लेश त्यांना स्वतःला जितके होत तितकेच त्यांना हलताना पाहणाऱ्या इतरांनाही होत. तेव्हा अशा या देशपांडेबाई हलल्या हे आश्चर्य नव्हे काय ? आणखी असं की बाई कशामुळे म्हणजे कशाहीमुळे कधीही हलून जात नसत. या त्यांच्या गुणाबद्दल बोलताना श्री. देशपांडे नेहमी त्यांना शांत, धीरोदात्त, खंबीर वगैरे म्हणत. बाई स्वतः उपस्थित नसताना श्री. देशपांडे बायकोच्या याच गुणांचं वर्णन ढिम्म, मंद, निगरगट्ट इ. विशेषणांनी करीत, हे सोडून द्या. महत्त्व विशेषणांना नसून बाई हलून गेल्या या घटनेला आहे.

तर ही दोन आश्चर्ये एकसमयावच्छेदेकरून घडली याला कारणही तसंच होतं.

त्या दिवशी शाळेच्या मुख्याध्यापकांनी सर्व शिक्षकांची एक तातडीची सभा बोलाविली होती. या सभेत संस्थेच्या आर्थिक हलाखीचं दारुण, हृदयभेदक, हृदयद्रावक असं वर्णन नेहमीप्रमाणं त्यांनी केलंच. हे करताना त्यांनी नेहमीप्रमाणं बरेच हातवारे आणि

त्यांच्या मते अभिनय केला. नेहमीप्रमाणंच भयानक लांबणही लावली. आणि नाही म्हटलं तरी इतरांप्रमाणंच बाईंच्या मनावर एक परिणाम झालाच. त्यांनाही नेहमीप्रमाणं कंटाळा आला. एरवी एवढ्यावरच संपलं असतं. मुख्याध्यापकांचं भाषण संपताच ते संपूर्णपणे विसरून, आलेला कंटाळा झटकीत देशपांडेबाई धीम्या पावलांनी घरी गेल्या असत्या. पण त्या दिवशी तसं झालं नाही.

याचं महत्त्वाचं कारण म्हणजे मुख्याध्यापक केवळ आर्थिक हलाखीचं वर्णन करून थांबले नाहीत. शिवाय ते असंही म्हणाले की, ही आर्थिक परिस्थिती शाळा यापुढं सहन करू शकणार नाही. याचा निदान एक परिणाम असा होईल की निदान काही शिक्षकांना शाळेच्या सेवेतून कायमची रजा द्यावी लागेल. काही जणांना कमी पगारावर व नेहमीपेक्षा जास्त कामही करावं लागेल. परिस्थितीचे परिणाम खेदजनक असले तरी अटळ आहेत.

मुख्याध्यापक काकडे गुरुजींच्या या वाक्यांमुळेच देशपांडेबाई हलल्या. हलल्या म्हणजे चांगल्या हादरल्याच म्हणा ना. ‘ म्हणजे याचा अर्थ असा की, आपली नोकरी जाणार. आपण बेकार होणार. आपलं शंभर टक्के नुकसान होणार. किंवा बेकारीच्या कुऱ्हाडीतून आपण वाचलो तरी आपला पगार निम्मा होणार आणि आपल्याला नेहमीपेक्षा दुप्पट काम करावं लागणार ! चौपट नुकसान होणार आपलं. ’ हीसुद्धा फार भयंकर गोष्ट होती. पण बाई आणखीही एका अर्थानं हलल्या. मुख्याध्यापकांचं भाषण ऐकताना त्यांचं नेहमी होई तसंच आजही झालं होतं. म्हणजे या भाषणाचा अतिशय कंटाळा येऊन त्यांना झोप येऊ लागली होती. या अवस्थेला श्री. देशपांडे ‘ समाधी ’ असं म्हणत असत. मुख्याध्यापकांच्या धक्कादायक भाषणानं आज मात्र बाईंची समाधी भंग पावली. नीट झोपता यावं म्हणून आतापर्यंत त्या खुर्चीत मागं रेलून बसल्या होत्या, त्या या धक्यानं जाग्या होऊन एकदम सावरून बसल्या. इतक्या एकदम, की त्यांचं त्यांनाच एरवी आश्चर्य वाटलं असतं.

पण या आर्थिक आपत्तीवर अखेर उपाय काय ? सावरून बसल्यानंतर बाईंच्या टवकारलेल्या कानांवर काकडे गुरुजींचे शब्द पडले ते असे. ‘ आहे, या आपत्तीतूनही मार्ग आहे. प्रत्येक शिक्षकानं मनापासून प्रयत्न केले, माजी विद्यार्थ्यांना गाठलं, उद्योगपती, व्यापारी, हितचिंतक यांच्या भेटी घेऊन त्यांना समजावून सांगितलं तर शाळेसाठी देणग्या मिळविता येतील. अशा देणग्यांचा एक प्रचंड निधी झाला की, शाळेवर आर्थिक आपत्ती म्हणून येणं शक्य नाही. मग कोणाला बेकारीची किंवा अर्धबेकारीची काळजीच करावी लागणार नाही. ’

‘ ठीक आहे. म्हणजे आताच सगळं संपलेलं नाही. अजूनही आपल्याला स्वतःचा बचाव करणं शक्य आहे. पण मग ही निधी गोळा करण्याची मोहीम यशस्वी व्हायची असेल तर त्यासाठी काकडे गुरुजी म्हणाले त्याप्रमाणे आपण कंबर कसून कामाला लागलं पाहिजे. ’

घरी जात असताना बाई जरी नेहमीप्रमाणं धीम्या पावलांनी चालत होत्या तरी

अनेक विचारांची एकच धावपळ त्यांच्या मनात चालली होती. त्यांच्या नोकरीच्या पगारातला एक रुपयाही कमी होणं हे त्यांना परवडणारं नव्हतं. बाई आपल्या पगाराचे सगळे पैसे सेव्हिंग्ज बँकेत टाकीत आणि त्या सगळ्या पैशातून एक फर्स्टक्लासपैकी सेल्फ कंटेंड ब्लॉक घ्यायचे त्यांनी मनाशी पक्कं केलं होतं. सध्याच्या जागेच्या गैरसोयींना त्या कंटाळल्या होत्या. त्यांच्या दोन मुलींची लग्नं करून त्यांनी मुलींना सासरी पिटाळलं होतं हे खरं. पण त्यांना आणखी दोन मुलगेही होते. त्यांची लग्नं व्हायची होती आणि या वाढत्या संसाराला त्यांची सध्याची जागा अपुरी पडणार होती. शिवाय स्वतःच्या फ्लॅट्स-बद्दल गमजा मारणाऱ्या त्यांच्या सहकारी शिक्षिकांची मिजासही त्यांना उतरवायची होती हे वेगळंच. मुलींच्या लग्नाच्या वेळी त्यांच्या सेव्हिंग्ज बँक बुकाला दोन मोठे खड्डे पडल्या-मुळे ब्लॉक घेण्याइतपत पैसे त्यात अजून जमलेले नव्हते. तेव्हा आताच थांबून चालण्या-सारखं नव्हतं. शाळेची नोकरी कसंही करून टिकवायलाच हवी होती.

पण सगळं कसं करायचं ? शाळेसाठी पैसे मिळवू हे खरं, पण ते आपल्याला देणार कोण ? काकडे गुरुजींनी उद्योगपतींचा उल्लेख केला होता. पण स्वतःच्या निरुद्योग-पतीखेरीज उद्योगाशी संबंध असलेला एकही पती त्यांना माहीत नव्हता. उद्योगपती काय, किंवा उद्योगपत्नी काय, त्यांचं दर्शन बाईंना फक्त चित्रातूनच झालेलं होतं. बरं, आता व्यापाऱ्यांचं म्हणावं तर त्यांचा किराणा मालाचा दुकानदार रोकडे हा एकच व्यापारी त्यांना माहीत होता आणि पुडीचा कागद व दोरा या बाबतीतही कमालीचा कद्रूपणा करणारा हा व्यापारी शाळेला पैशांची मदत देण्याच्या दृष्टीनं अगदी कुचकामी हेही त्यांना माहीत होतं. हितचिंतकांच्या बाबतीत म्हणावं तर त्यांच्याकडं पैशांची मागणी करताच शाळेचं हित चिंतण्याचं बंद करून बाईंचं अहित चिंतायचं ते ताबडतोब सुरुवात करणार हेही बाईंना समजत होतं. राहता राहिले माजी विद्यार्थी. शाळेच्या आजी विद्यार्थ्यांचं बाईंबद्दल जे मत होतं ते लक्षात घेता माजी विद्यार्थीही या मदत करण्याच्या प्रकाराला फार अनुकूल असतील असं समजणं धोक्याचं होतं. पण एकदा शाळा सोडल्यानंतर परत तिथं जावं लागणार नाही या कल्पनेनं विद्यार्थी एकंदर आनंदात असतो, वाईट अनुभवांचं विस्मरण होऊन चांगलेच त्यांच्या लक्षात राहिलेले असतात, असा आपला बाईंचा कयास. पण ते कसंही असलं तरी आता या माजी विद्यार्थ्यांचे पाय धरण्याखेरीज दुसरा इलाजच नव्हता.

अशा माजी विद्यार्थ्यांची नावं आठवण्याचा बाई प्रयत्न करू लागल्या. आणि इतर नावांच्या आधी त्यांना रेगे वकिलांचं नाव अगदी सहजासहजी आठवलं. हे रेगे बापलेक दोघंही वकील होते आणि दोघंही शाळेचे विद्यार्थी. अनेक गुन्हेगारांना सहीसलामत सोडविल्याबद्दल त्या दोघांचाही नावलौकिक मोठा होता. फौजदारी कायद्यात दोघंही वाकबगार होते. कमाईचा प्रश्नच नव्हता. या दोघा रेग्यांना नावानं ओळखण्याऐवजी लोक सीनिअर गब्रू आणि ज्यूनिअर गब्रू या नावांनीच ओळखत असत.

बाईंनी धाकट्या गब्रूला गाठायचं ठरविलं. मागं तो त्यांच्याकडे शाळेशिवाय

शिकवणीलासुद्धा येत असे. साहजिकच बाईंना त्याची चांगली माहिती होती. आता हेमंतही बाईंना ओळखून असणं हे शाळेच्या दृष्टीनं फारसं हितावह नव्हतं हे खरं, पण बाईंच्या आठवणीप्रमाणं पोरगं विसराळू होतं. गणिताच्या साध्यासाध्या रीती तो विसरत असे आणि बाईंकडून त्याबद्दल रीतसर मारही खात असे. त्याचा विसराळूपणा तसाच कायम राहिला असून तो एव्हाना बाईंकडून खाल्लेला मारही विसरला असेल असंच गृहीत धरणं आवश्यक होतं.

सारांश, हेमंत रेगे वकील हे नाव निश्चित ठरलं. आणि शाळेसाठी त्याला कापायचं हे सुद्धा.

आता बाईंच्या इतर गुणांचं सोडा, पण त्यांच्या अंगात एक गुण मात्र नक्की होता. तो हाच की एकदा एखादी गोष्ट त्यांच्या मनानं घेतली की कसंही करून तिचा त्या पिच्छा पुरवीत असत. अगदी शेंडी तुटो, नाहीतर पारंबी तुटो. मनाप्रमाणं होईपर्यंत बाई थांबत म्हणून नसत. ' एका कोळियाने –' ही लहानपणी वाचलेली कविता त्यांच्या मनावर एक खोल ठसा उमटवून गेली होती.

गब्रू रेगे ज्यूनिअर याला कापायचं हे खरं. पण त्यासाठी त्याला भेटायला पाहिजे. ही गोष्ट लक्षात येताच विचारांची अनेक चक्रं संथ गतीनं बाईंच्या डोक्यात फिरू लागली. याला भेटायचं ते तडक भेटायला जावं की आधी फोनवर अपॉइंटमेंट घेऊन जावं ? तडक जाऊन भेटायचं ठरवलं आणि हा नाही भेटला तर काय ? परत हेलपाटा पडणार. बरं, फोन करून जावं तर फोन कुठून करायचा इथपासून प्रश्न होता. शेजारच्या कुळकर्ण्यांकडून करावा तर फोनचे पैसे चापून घेऊन शिवाय त्या कपाळाला सतराशेसाठ आठ्या घालणार. रोकड्याच्या दुकानातून तो करावा तर कपाळाला आठ्या घालून, पन्नास पैसे आकारून शिवाय ते रोख मागणार. नावावर लिहून ठेवायला रोकड्या तयार होणार नाही. शिवाय दोन्हीकडे पन्नास पैशांचा प्रश्न होताच. शिवाय गब्रूनं भेटायला बोलावलं तरीही रिक्षा किंवा निदान बसनं जायला हवंच. तंगड्या तोडत जाणार कोण ? म्हणजे परत तो खर्चही आलाच. शाळेकरिता पैसे जमा करायचे म्हणजे बाजारच्या भाकऱ्या भाजायच्या, पदरचे पैसे खर्च करून. कोणी सांगितलाय हा नसता उपद्व्याप आपल्याला ? त्यापेक्षा या नोकरीलाच एक सणसणीत–छे छे, हे तर अशक्यच होतं. नोकरीला मारण्यासाठी उचललेली लाथ त्यांनी हळूहळू खाली आणून जमिनीवर टेकविली. नोकरीला लाथ मारणं म्हणजे साक्षात लक्ष्मीला लाथाडण्यासारखं होतं. तेव्हा तो विचार बाईंनी मनातून पिटाळून लावला. एकदा देणगी मिळाली की हे खर्च काय आपण सहज शाळेकडून वसूल करून घेऊ. अर्थात काकडे गुरुजी हा कवडीचुंबक गृहस्थ आहे. पण आपण नाही सोडणार.

अशा प्रकारे बरीच भवति न भवति होऊन शेवटी बाईंनी गब्रूला फोन करायचं निश्चित केलं.

त्यात आणखी फोन न करता तडक वकीलसाहेबांना भेटायलाच जावं असं

श्री. देशपांडे यांचं मत पडल्यामुळं तर फोन करून जाणं हेच योग्य असं बाईंनी ठामपणे ठरविलं. आपलं मत पक्कं करण्याकरिता बाई देशपांड्यांचं मत नेहमी घेत, ते असं.

रेगे वकिलांकडचा फोन वाजू लागला तेव्हा 'ज्यूनिअर गव्हूशी मला बोलायचं आहे' असंच आपण सांगावं असा एक खोडकर विचार बाईंच्या मनात येऊन गेला. पण आपल्या कामाचं स्वरूप लक्षात घेऊन तो त्यांनी घाईघाईनं बाजूला सारला.

'ह ल्‌ ल्‌ लो ऽ कोण बोलतंऽय ? कोऽण पायजेय आपल्याला ?' दुसऱ्या टोका-कडून मंजुळ आणि लाडिक आवाज आला.

अशा फाजील लाडिक बोलण्याचा बाईंना भयंकर संताप येत असे. आपल्याशी कोण बोलतंय हे माहीत नसताना ही बया असं लाडिक बोलते आहे ! आता मी नसून समजा, एखादा फाजील पुरुष असता तर ? असं या पोरी बोलतात आणि कोणी त्याचा फायदा घेतला तर त्याला नावं ठेवत बसतात.

काय बोलावं हे बाईंना क्षणभर सुचेना. पण रागावून बोलणं तर शक्यच नव्हतं.

'मला हेमा पाहिजे आहे ..हेमन्त रेगे' बाईंनी शक्य तितक्या मृदू आवाजात सांगितलं. आणि नाही म्हटलं तर। त्यांच्या आकाराच्या मानानं बाईंचा आवाज भलताच गोड होता हे स्वतः श्री. देशपांडे यांनाही नाकारता आलं नसतं.

पण काय असेल ते असो. पलीकडच्या टोकाचा सूर एकदम बदलला.

'अस्संऽऽ आपल्याला हेमा हवा आहे काऽ ? पण आपण कोण बोलता आहात ते नाही सांगितलंत !' बदललेला सूर बाईंना समजला. ही काय या पोरीची बोलायची पद्धत झाली का ?

'मी हेमाची बाई आहे बरं ! त्याच्या वडिलांचीही मी बाई होते. माझं नाव मिसेस देशपांडे.' बाईंनी शांतपणे आणि संथपणे सांगितलं.

'अस्सं ऽ ? आपण हेमाच्या आणि त्याच्या वडिलांच्याही बाई का ? मिसेस देशपांडे ? खूप आनंद झाला मला हे ऐकून. पण काय गंमत आहे सांगू का ? तुम्हाला हेमा हवा आहे तसा मलाही हवा आहे तो. त्याची वाइफ बोलते आहे मी.'

बाईंचं डोकं अगदी चक्रावून गेलं. ही पोरगी जरा सरळ का बोलत नाही ? त्यांना समजेचना.

'म्हंजे तो घरी नाहीयै का ? मला बोलायचं होतं त्याच्याशी. हेमा खूप दिवसांत भेटला नाही मला. फार महत्त्वाचं काम होतं माझं त्याच्याशी.' बाईंनी सांगितलं.

'बरं, पण तो तर आता घरी नाही. काही निरोप सांगायचा असला तर मी सांगू शकेन.'

'तुम्हाला सांगून काय उपयोग ? मला हेमाशीच बोलायला हवं ?'

'मग काय करू आता ? त्यालाच तुम्हाला भेटायला सांगू का ?' हे बोलणं खूपच सरळ होतं.

'छे छे. तो कसला येतोय मला भेटायला ? मोठा झालाय आता तो. मला नक्कीच

विसरला असणारच. नको, त्याला नका तसदी देऊ. मीच येते उद्या सकाळी. चालेल ? त्याला सांगू नका हे बरं का. पण चांगले पैसे उकळायचे आहेत मला त्याच्याकडून ?'

'अवश्य. अवश्य या. मी त्यांना थांबवून ठेवते.' हेमाची मिसेस म्हणाली. आणि हुश्श् करीत बाईंनी टेलिफोन खाली ठेवला. आज नाही उद्या तरी ज्यूनिअर गद्रूची आणि त्यांची भेट होणार होती. आणि त्याला नीट कापण्यासाठी कशा तऱ्हेचा शाब्दिक व्यूह रचावा याचे विचार बाईंच्या मनात मंदगतीनं सुरूही झाले होते.

'तुमच्या बाईंचा फोन आला होता.' हेमन्त रेगे घरी येऊन पोचताच त्याच्या मिसेस् म्हणजेच सौ. मंजू रेगे यांनी आपल्या यजमानांच्या कानावर घातलं.

'माझी बाई ? व्हॉट् नॉन्सेन्स ? आर यू जोकिंग मंजू ? काय मूर्खासारखं बडबडते आहेस ?' छोटे गद्रू गरजले.

'अहो, एकटी तुमचीच नाही. तुमच्या वडिलांचीसुद्धा ती बाई होती! म्हणे ऽ—!' मंजूनं मान वेळावीत आगीत तेल ओतलं.

'स्टॉप् इट अँड शट अप मंजू. आय ॲम टेलिंग यू.' हेमन्तनं आपला टाय खसकन काढला आणि वाऱ्यावर भिरकावून देत तो ओरडला. दोघांचंही नशीब एवढंच की सीनिअर गद्रू किंवा इतर कोणीच त्यांच्या आसपास नव्हतं.

'खूप दिवसांत भेटला नाही. फार महत्त्वाचं काम होतं माझं त्याच्याशी...' मंजू म्हणाली. 'आणि पुढचं मी काही सांगायला हवं असेल तर तुमचा हा चढलेला आवाज खाली उतरल्याशिवाय मी काहीही बोलणार नाही. म्हंजे हे विचित्रच दिसतं तुमचं वागणं. खरं म्हंजे मीच तुमच्यावर रागवायला पाहिजे तर तुम्ही माझ्यावर रागावताय् हो ?—' एवढं बोलून ती तिथून आत जायला निघाली. नव्हे, गेलीसुद्धा.

कुठली तरी केस आपले अशील हरणार असं आताच झालेल्या चर्चेतून हेमन्त रेगे वकिलांच्या ध्यानात आलं होतं. आणि तशा त्रस्त मनःस्थितीत असतानाच हे बाई-प्रकरण उपटलं. त्यामुळं एरवी अगदी शांतपणे सगळ्यांचं सगळं ऐकून घेणारे हे वकील-साहेब आपला स्वभाव विसरून इतके भडकले होते.

आणि आता मंजूच्या मागोमाग ते स्वैंपाकघरात येऊन दाखल झाले तेव्हा त्यांच्या रागाचा पारा संपूर्णपणे उतरलेला होता.

'मंजू, माफ कर हां मला. मी इतक्या मोठ्यांदा ओरडायला नको होतं ...' त्याच्या आवाजात आता मूर्तिमंत अजीजी आली होती.

'बरोबरच आहे तुमचं. ओरडायला पाहिजे होतं मी. अहो, ही बाई मला चक्क सांगते. मी त्यांची बाई आहे...आणि वर तुम्हाला निरोप सांगून काय उपयोग ? मला हेमाशीच बोलायला हवं. हेमा बरं, हेमा. हेमंतराव किंवा नुसतं हेमंतसुद्धा नव्हे. शिवाय तो कसला येतोय मला भेटायला आता ? मीच येते. त्याला सांगू नका, पण चांगले पैसे उकळायचे आहेत मला त्याच्याकडून, हे आणखी वर. कसले हो हे पैसे ? तुम्ही देणं लागता वाटतं या बाईंचं ?'

श्री. देशपांडे यांचं मत पडल्यामुळं तर फोन करून जाणं हेच योग्य असं बाईंनी ठामपणे ठरविलं. आपलं मत पक्कं करण्याकरिता बाई देशपांडयांचं मत नेहमी घेत, ते असं.

रेगे वकिलांकडचा फोन वाजू लागला तेव्हा 'ज्यूनिअर गव्रूशी मला बोलायचं आहे' असंच आपण सांगावं असा एक खोडकर विचार बाईंच्या मनात येऊन गेला. पण आपल्या कामाचं स्वरूप लक्षात घेऊन तो त्यांनी बाईबाईनं बाजूला सारला.

'ह ल्ल् लो ऽ कोण बोलतंऽय ? कोऽण पायजेय आपल्याला ?' दुसऱ्या टोका-कडून मंजुळ आणि लाडिक आवाज आला.

अशा फाजील लाडिक बोलण्याचा बाईंना भयंकर संताप येत असे. आपल्याशी कोण बोलतंय हे माहीत नसताना ही बया असं लाडिक बोलते आहे ! आता मी नसून समजा, एखादा फाजील पुरुष असता तर ? असं या पोरी बोलतात आणि कोणी त्याचा फायदा घेतला तर त्याला नावं ठेवत बसतात.

काय बोलावं हे बाईंना क्षणभर सुचेना. पण रागावून बोलणं तर शक्यच नव्हतं.

'मला हेमा पाहिजे आहे ..हेमन्त रेगे' बाईंनी शक्य तितक्या मृदू आवाजात सांगितलं. आणि नाही म्हटलं तरी त्यांच्या आकाराच्या मानानं बाईंचा आवाज भलताच गोड होता हे स्वतः श्री. देशपांडे यांनाही नाकारता आलं नसतं.

पण काय असेल ते असो. पलीकडच्या टोकाचा सूर एकदम बदलला.

'अस्सं ऽऽ आपल्याला हेमा हवा आहे काऽ ? पण आपण कोण बोलता आहात ते नाही सांगितलंत !' बदललेला सूर बाईंना समजला. ही काय या पोरीची बोलायची पद्धत झाली का ?

'मी हेमाची बाई आहे बरं ! त्याच्या वडिलांचीही मी बाई होते. माझं नाव मिसेस देशपांडे.' बाईंनी शांतपणे आणि संथपणे सांगितलं.

'अस्सं ऽ ? आपण हेमाच्या आणि त्याच्या वडिलांच्याही बाई का ? मिसेस देशपांडे ? खूप आनंद झाला मला हे ऐकून. पण काय गंमत आहे सांगू का ? तुम्हाला हेमा हवा आहे तसा मलाही हवा आहे तो. त्याची वाइफ बोलते आहे मी.'

बाईंचं डोकं अगदी चक्राबून गेलं. ही पोरगी जरा सरळ का बोलत नाही ? त्यांना समजेचना.

'म्हंजे तो घरी नाहीये का ? मला बोलायचं होतं त्याच्याशी. हेमा खूप दिवसांत भेटला नाही मला. फार महत्त्वाचं काम होतं माझं त्याच्याशी.' बाईंनी सांगितलं.

'बरं, पण तो तर आता घरी नाही. काही निरोप सांगायचा असला तर मी सांगू शकेन.'

'तुम्हाला सांगून काय उपयोग ? मला हेमाशीच बोलायला हवं ?'

'मग काय करू आता ? त्यालाच तुम्हाला भेटायला सांगू का ?' हे बोलणं खूपच सरळ होतं.

'छे छे. तो कसला येतोय मला भेटायला ? मोठा झालाय आता तो. मला नक्कीच

विसरला असणारच. नको, त्याला नका तसदी देऊ. मीच येते उद्या सकाळी. चालेल ? त्याला सांगू नका हे बरं का. पण चांगले पैसे उकळायचे आहेत मला त्याच्याकडून ?'

'अवश्य. अवश्य या. मी त्यांना थांबवून ठेवते.' हेमाची मिसेस म्हणाली. आणि हुश्श् करीत बाईंनी टेलिफोन खाली ठेवला. आज नाही उद्या तरी ज्यूनिअर गद्रूची आणि त्यांची भेट होणार होती. आणि त्याला नीट कापण्यासाठी कशा तऱ्हेचा शाब्दिक व्यूह रचावा याचे विचार बाईंच्या मनात मंदगतीनं सुरूही झाले होते.

'तुमच्या बाईंचा फोन आला होता.' हेमन्त रेगे घरी येऊन पोचताच त्याच्या मिसेस् म्हणजेच सौ. मंजू रेगे यांनी आपल्या यजमानांच्या कानावर घातलं.

'माझी बाई ? व्हॉट् नॉन्सेन्स ? आर यू जोकिंग मंजू ? काय मूर्खासारखं बड-बडते आहेस ?' छोटे गद्रू गरजले.

'अहो, एकटी तुमचीच नाही. तुमच्या वडिलांचीसुद्धा ती बाई होती ! म्हणे ऽ-!' मंजूनं मान वेळावीत आगीत तेल ओतलं.

'स्टॉप् इट अँड शट अप मंजू. आय ॲम टेलिंग यू.' हेमन्तनं आपला टाय खसकन काढला आणि वाऱ्यावर भिरकावून देत तो ओरडला. दोघांचंही नशीब एवढंच की सीनिअर गद्रू किंवा इतर कोणीच त्यांच्या आसपास नव्हतं.

'खूप दिवसांत भेटला नाही. फार महत्त्वाचं काम होतं माझं त्याच्याशी...' मंजू म्हणाली. 'आणि पुढचं मी काही सांगायला हवं असेल तर तुमचा हा चढलेला आवाज खाली उतरल्याशिवाय मी काहीही बोलणार नाही. म्हंजे हे विचित्रच दिसतं तुमचं वागणं. खरं म्हंजे मीच तुमच्यावर रागवायला पाहिजे तर तुम्ही माझ्यावर रागावताय् हो ?–' एवढं बोलून ती तिथून आत जायला निघाली. नव्हे, गेलीसुद्धा.

कुठली तरी केस आपले अशील हरणार असं आताच झालेल्या चर्चेतून हेमन्त रेगे वकिलांच्या ध्यानात आलं होतं. आणि तशा त्रस्त मनःस्थितीत असतानाच हे बाई-प्रकरण उपटलं. त्यामुळं एरवी अगदी शांतपणे सगळ्यांचं सगळं ऐकून घेणारे हे वकील-साहेब आपला स्वभाव विसरून इतके भडकले होते.

आणि आता मंजूच्या मागोमाग ते स्वैंपाकघरात येऊन दाखल झाले तेव्हा त्यांच्या रागाचा पारा संपूर्णपणे उतरलेला होता.

'मंजू, माफ कर हां मला. मी इतक्या मोठ्यांदा ओरडायला नको होतं ...' त्याच्या आवाजात आता मूर्तिमंत अजीजी आली होती.

'बरोबरच आहे तुमचं. ओरडायला पाहिजे होतं मी. अहो, ही बाई मला चक्क सांगते. मी त्यांची बाई आहे...आणि वर तुम्हाला निरोप सांगून काय उपयोग ? मला हेमाशीच बोलायला हवं. हेमा बरं, हेमा. हेमंतराव किंवा नुसतं हेमंतसुद्धा नव्हे. शिवाय तो कसला येतोय मला भेटायला आता ? मीच येते. त्याला सांगू नका, पण चांगले पैसे उकळायचे आहेत मला त्याच्याकडून, हे आणखी वर. कसले हो हे पैसे ? तुम्ही देणं लागता वाटतं या बाईंचं ?'

हेमन्त रेगे वकील हे आता इतके शांत झाले होते की ही जी कोण बाई टेलिफोनवर बोलली होती ती असेच बोलली असेल तर मंजूला आपला राग येणं साहजिक होतं हे त्यांना पटलं. शिवाय हे बाई-प्रकरण त्यांच्या बाबतीत खरं नसेल. पण सीनिअर वकील-साहेब आपल्या ठेवलेल्या बाईबरोबर बरीच वर्षं राहिल्यानंतर आता घरी परत आलेले होते हेही ज्यूनिअरसाहेब विसरले असले तरी मंजूनं ते विसरण्याचं कारण नव्हतं.

'ओ. के...ओ. के...हे सगळं मी ऐकलं. पण मला आता या बाईचं नाव सांग बघू. तिनं सांगितलं का ते तरी?' हेमंतनं शांतपणे, उतरलेल्या आवाजात विचारलं. नाही म्हटलं तरी त्याचं डोकंही थोडं चक्रावूनच गेलं होतं. अगदी मंजूचा काही तरी घोटाळा होतो आहे याची खात्री पटली असूनसुद्धा.

'तेसुद्धा तिनं निर्लज्जपणे सांगितलं. मिसेस् देशपांडे...'

बाई...मिसेस् देशपांडे...पैसे...इतके दुवे मिळाल्यावर चवथा दुवा मिळविणं हेमंतला कठीण नव्हतं. चुटकी वाजवत आणि स्वतःभोवती एक गिरकी घेत तो ओरडला.

'येऽस्. अग बावळटे, त्या आमच्या देशपांडेबाई. शाळेसाठी पैसे मागायला येणार असतील त्या. दुसरं काय? शाळेनं कसलीतरी मोहीम सुरू केल्याचं ऐकलंच होतं मी!'

मंजूच्या मते मिसेस् देशपांडे म्हणजे शाळेतल्या बाई ही चक्क सारवा-सारवी किंवा उडवाउडवी असणंही अशक्य नव्हतं. पण तरीही काही हरकत नव्हती. ही बया उद्या सकाळी यायचीच होती. तेव्हा सगळी शहानिशा बरोबर झाली असती.

'अग पण मंजू, या देशपांडेबाईंना तू कशाला बोलावलंस शहाणे? त्या एकदा खनपटीला येऊन बसल्या म्हणजे शेपाचशे रुपयांना मला बुडविल्याशिवाय नाहीच राहणार ग!' बाई येण्याअगोदरच आपण लुबाडले गेलेलो आहोत असं हेमन्तला वाटू लागलं होतं.

'आता का? झाली का तुमची पळापळ सुरू? येताहेत तर येऊ देत की. पार्ट्यांवर इतके पैसे नाही तरी उडवता. शाळेला दिलेत त्यांतले थोडे तर काही बिघडणार नाही.' मंजूला वाटलं की आपल्या पळपुट्या नवरोजींना आपण बरोबर पकडलं.

'छे छे, तसं करून नाही चालणार बाईसाहेब. तुला यातलं काही म्हणजे काहीही समजत नाही. आमच्या या बाईंना उद्या या बंगल्यात पाऊलसुद्धा टाकू देता कामा नये. अग, शाळेला पैसे देण्यात आपल्याला काय फायदा? अं! नाही, मला त्या व्यवस्थेला लागलंच पाहिजे.' हेमंत गडबडीनं म्हणाला. आणि अवाक झालेली मंजू तो काय करतो त्याबद्दल विचारच करीत राहिली.

हेमंतला आपला आणखी बचाव देण्याची काही गरजच भासली नाही. तो उठला आणि कामाला लागला. आपल्या खोलीत गेल्याबरोबर कसलाही विचार न करता त्यानं एक कागद काढला. 'कुत्र्यापासून सावध राहा' असं त्यावर ठळक अक्षरांत लिहिलं. तो कागद त्यानं व्यवस्थित एका पुठ्ठ्यावर चिकटवला. आणि नंतर जाऊन त्यानं तो बंगल्याच्या बाहेरच्या फाटकावर लटकावूनसुद्धा दिला. मंजूला यातलं काही कळणार नाही याची त्यानं नीट खबरदारी घेतली होती. आपल्या खोलीचं दार लावून घेऊनच त्यानं ही

पाटी तयार केली होती. आणि कोर्टात जाताना बाहेरून फाटक नीट लावून घेऊनच ती फाटकावर लटकावून दिली होती.

एखाद्या सराईत गुन्हेगाराप्रमाणं आपण किती झटपट आपल्या बचावाची व्यवस्था करून टाकली या विचारानं त्याचं स्वतःचं स्वतःलाच कौतुक वाटलं. शक्य असतं तर ही बहाद्दुरी मंजूला सांगून त्यानं तिची शाबासकीही मिळविली असती. पण तो मोह त्यानं मोठ्या प्रयासानं आवरला.

'मी म्हणालो होतो खरं, बाईंना येऊ देता कामा नये म्हणून. पण आता येताहेत तर येऊ दे ... तरीही मला आपलं वाटतं बुवा की त्या येणार नाहीत!' उलट त्यानंच रात्री मंजूला सांगितलं.

आणि पाचशे रुपये वाचविल्यावर कोणत्याही माणसाला जशी शांत झोप लागेल तशी त्या रात्री हेमंतला लागली. मग त्याला जे मजेदार स्वप्न पडलं त्यात तो अजूनही पलंगावरच पडलेला असून पांघरुणात गुरफटलेला होता आणि बेडरूमच्या किलकिल्या झालेल्या दारातून मंजू बाहेर कोणाशी तरी बोलत असल्याचं त्याला ऐकू येत होतं.

'गुड मॉर्निंग. आपणच मिसेस् रेगे का?' कोणी तरी विचारलं.

'गुड मॉर्निंग, गुड मॉर्निंग. या ना. हो. मीच मिसेस् रेगे. बसा. . .आपण कोण?'

'मी मिसेस् देशपांडे. हेमंतला भेटायला आले होते. हेमाच म्हणायची शाळेत असताना त्याला मी, पण आता हेमंतराव म्हणायला हवं!' बाई हसत हसत म्हणाल्या.

... बाप रे, म्हंजे ही धाडसी बाई ती पाटी फाटकावर लावली असता आत घुसली की! छे, छे! पण आपल्याला दचकायचं काय कारण एवढं? काही झालं तरी हे स्वप्न आहे ... अरे, पण हे काय? या बाई आणखी काय विचारताहेत?

'काय हो, मिसेस् रेगे, पण तुम्ही कुत्रा कधीपासून ठेवलात हो?' बाई विचारीत होत्या.

'कुत्रा? नाही बाई. मला तर कुत्रा मुळीच आवडत नाही. आणि हेमा . . हेमंतराव ... हेसुद्धा कुत्र्याला फार घाबरतात. पण का असं विचारताय आपण? कुत्रा पाहिलात वाटतं आपण कुठं?'

'कुत्रा नाही पाहिला प्रत्यक्ष. पण पाटी मात्र पाहिली. तुमच्या बंगल्याच्या फाटकावरच लावलेली आहे. हातानंच लिहिलेली आहे. मला वाटलं नव्यानंच कुत्राबित्रा घेतलाय की काय बंगल्याची राखण करायला?'

'छे हो. काही तरी घोटाळा झालेला दिसतोय तुमचा. आमच्या बंगल्यावर तशी पाटी नाही, मुळीच लावलेली नाही...'

'अहो, असं काय करताय मिसेस रेगे? चक्क पाटी आहे तिथं. स्वतःच्या डोळ्यांनी पाहिलीय मी...'

'मग घाबरला कशा नाहीत तुम्ही? मी तर बाई पळूनच गेले असते.' मंजूनं घाबऱ्या घाबऱ्या विचारलं.

‘ मी कसली घाबरतेय ? आणि खूप घाबरले तरी मला पळता यायला हवं ना मुख्य म्हणजे ? पण मी घाबरले नाही याचं साधं कारण म्हणजे मी थोडं डोकं लढवलं...’

‘ मला नाही समजलं. काय केलंय तुम्ही ? ’

‘ काही विशेष नाही तसं. अहो, मी पाटी पाहिली. पण म्हटलं, हे आपलेक दोघं एवढे मोठे वकील. यांच्याकडे सारखी ओळखी-अनोळखी लोकांची वर्दळ. त्यामुळं यांच्या-कडं कुत्रा असला तरीही अशी पाटी असणं शक्य नाही. ’

‘ आणि— ’

‘ आणि काय ? कुत्र्यापासून सावध राहा, असं ती पाटी दरडावीत असतानाही खुश्शाल फाटक उघडलं आणि आले आत. म्हटलं असलंच तर असू द्या. इतक्या दूर मी आले आहे तर त्याला भेटल्याशिवाय नाहीच जायचं आता. शिवाय सांगू का, नाही म्हटलं तरी कुत्रीसुद्धा मला थोडी भितातच. ’ बाईंनी शांतपणे सांगितलं.

‘ मार्व्हलस हं. किती वकिली डोकं लढवलंत तुम्ही. तरी मी हे ह्यांना सांगत असते की चांगलं डोकं असायला वकीलच असावं लागतं असं नाही. बरं, आपण बसा आता. आणि एक्स्यूज हं. मी केव्हाच चहा टाकायला हवा होता, ती बोलतच बसले.’ असं म्हणता म्हणता मंजू उठूही लागली होती.

‘ छे छे, चहाबिहा नंतर. आधी मला हेमाला भेटायचं आहे. एवढं मी त्याला लहानपणी शिकवलं. अन् मी आले आहे एवढी दूर, तर अजून येतही नाही बाहेर नुसता. आहे काय ? शाळेचं काम आधी आणि नंतर सगळं. चहा, बिस्किटं, पोहेसुद्धा आवडतील हो मला. ’

‘ शाळेचं काम ना ? त्यांचं त्यांना विचारा तुम्ही. पण माझ्यापुरतं मी ठरवलंय बरं का बाई. पाचशे रुपये देणार आहे तुम्हाला मी. माझ्या अकाउंटमधून. ’ मंजू सांगत होती.

‘ पण हा कुठं आहे हेमंत ? झोपला असला तर मीच उठवते त्याला. अधिकारच आहे माझा तेवढा ’ बाई म्हणत होत्या. आणि हेमंतराव रेगे शांतपणे स्वप्नात हे सगळं ऐकत होते.

मग मंजूनं त्यांना काही खूण केली की काय कुणास ठाऊक.

बेडरूमचं किलकिलं असलेलं दार हळूहळू उघडलं. आणि ते सबंध उघडल्यावर समोर उभ्या असलेल्या देशपांडे बाई त्याला दिसल्या.

‘ हेम्या ऊठ पाहू. किती वेळ झोपला आहेस, आणि ती कुत्र्याची खोटी पाटी लिहून मला घाबरवू पाहात होतास काय ? लहानपणचा खोड्याळ स्वभाव गेलेला दिसत नाही तुझा अजून ...’ मग स्वप्नातल्या देशपांडे बाई दारातून हलल्या, व धीम्या पावलांनी त्या हेमंतच्या बेडरूममध्ये शिरल्या.

—आणि खूप उशिरा आपण पाहतो आहोत हे स्वप्न नसून खऱ्या देशपांडे बाई आहेत हे त्याच्या ध्यानात आलं ! खूप उशिरा !

○ ○ ○

# खिडकीतील चांद्का टुकडा

बापूचा स्वतःच्या डोळ्यांवर विश्वासच बसला नाही. डोळ्यांची जोरात उघड-झाप करून त्यानं पाहिलं. स्वतःला एक मोठासा चिमटासुद्धा त्यानं घेतला. पण त्याला दिसत असलेल्या दृश्यात काहीही एक बदल झाला नाही. खरोखरच ती समोरच्या बंगल्याच्या खिडकीत उभी होती. खरं म्हणजे तिच्याबाबतीत ' खिडकी ' हा रूक्ष, खडबडीत, कठोर शब्द वापरणं हे सुद्धा बापूला अन्यायाचं वाटलं असतं. त्यात बापू हा मराठी भाषेचा विद्यार्थी व किंचित कवी असल्यामुळं तर त्याला अधिकच तसं वाटलं. या थोर मराठी भाषेत ' खिडकी ' साठी एखादा तरी नाजुक प्रतिशब्द असू नये— अं ? पण ते काहीही असो. ती तिथं उभी होती यात काहीही संशय नव्हता.

—एक सुंदर डोळ्यांची, भुरभुरणाऱ्या केसांची, सुंदर मालकीण.

खरं म्हणजे ती ती नव्हतीच. पौर्णिमेचा चंद्रच निरभ्र निळ्या आकाशात उगवला होता. ( असं आपलं बापूला वाटलं म्हणून आपण सांगितलं. ) पण या चंद्रोदयावर कोणाचाही कसा विश्वास बसावा ? आपण म्हणजे कोणी हिंदी सिनेमातील नायक नव्हे. की हे एखाद्या हिंदी चित्रपटातील दृश्यही नव्हे. धडपडे गल्लीतील एका जुनाट कौलारू घरात

राहणारे आपण एक कॉलेज–विद्यार्थी, आपल्या जुनाट, पडक्या घरासमोर एक आधुनिक फॅशनचा देखणा बंगला असण्याचा तरी आपल्याला मुळात अधिकार काय ?

पण हा कोणी कर्नल गुळगुळे होता. त्याच्या मनात देव उभा राहिला आणि रिटायर झाल्यानंतर टेकडीच्या आसपास मोकळ्या हवेशीर जागेत राहायला जायचं सोडून या बखळीतल्या वाडवडिलार्जित जागेत त्यानं आपलं ' चंदेरी स्वप्नं ' उभं केलं होतं. हे सुद्धा काही कमी नव्हतं खरं म्हणजे. पण त्या सुंदर बंगल्यानं तयार होताच आपल्या खिडक्या ज्या मिटून घेतल्या होत्या त्या कायमच्याच. एखाद्यानं कायमचेच डोळे मिटावे किंवा एखाद्या कमलपुष्पानं आपल्या पाकळ्या कायमच्याच मिटून घ्याव्या असं वाटायला लावणाऱ्या. जणू काही बंद खिडक्यांचाच बंगला या सद्गृहस्थानं बांधला होता.

पण नंतर मात्र या धूर्त गुळगुळ्यानं स्वतःचं वैभव हळूहळू दाखवायला सुरवात केली होती. म्हणजे प्रथम ऐटदार पोशाखातले आणि ऐटबाज मिशावाले आपण स्वतः, नंतर आपली चकचकीत, कोरी मोटार. नंतर हा देखणा ' चंदेरी स्वप्न ' नावाचा बंगला. आणि आता हे खिडकीआड लपवून ठेवलेलं जडजवाहिर.

...ऑं...आणि ती आपल्याकडे पाहून हसली की काय ? छे छे, ते कसं शक्य आहे ? तो केवळ एक भासच असला पाहिजे. तिनं आपल्याला पाहताच जरी ती खिडकी खाडकन आपटून बंद केली असती आणि आपल्याला दृष्टिआड करून टाकलं असतं तरीही तिला दोष देता आला नसता. पण ती हसली हे खरंच. कारण त्याशिवाय तिचे शुभ्र, सुन्दर, कुंदकळ्यासारखे वगैरे दात कसे दिसले असते ? ते तिचं हास्य म्हणजे एक भास नव्हता तर. खरोखरच ती हसली होती. देवा, या कर्नल गुळगुळ्याचं भलं कर रे बाबा ! एवढ्या अल्प काळात त्यानं आपल्यावर किती तरी मेहेरबान्या एका पाठोपाठ करून टाकल्या बरं !

त्या मुलीचं नाव काय असेल ते असो. ( तेही सुंदरच असलं पाहिजे. ) पण खिडकीत उभं राहण्याशिवाय तिला दुसरा काहीच उद्योग नसावा काय ? दिवसातून अनेकदा ती खिडकीतच उभी राहिलेली दिसते. की आपलं लक्षच ती तिथं उभी असेल तेव्हा तिच्याकडे लागलेलं असतं कुणास ठाऊक ?

बापूनं तिच्यापासून स्वतःपर्यंत एक सरळ रेषा काढून दोघांमधलं अंतर मोजलं होतं. पासष्ट ते सत्तर फूट ते सहज होतं. म्हणजे अंतर तसं फार नव्हतं, पण हे सरळ रेषेतलं अंतर. खरं अंतर फारच मोठं. म्हणजे आपल्या घराचा दिंडी दरवाजा, ते तिच्या चंदेरी स्वप्नाचं फाटक यांच्यातलं अंतर. नंतर बंगल्यापुढची हिरवळ. आणि या दोन्हीमध्ये असलेली ' कुत्र्यापासून सावध राहा ' असं ठळक शब्दात दरडावणारी पाटी. आणि त्यानंतर जमीन ते पहिल्या मजल्यावरची ती उभी राहत असे ती खिडकी हे अंतर. साधारणतः आपण आणि चंद्र यांच्यात जेवढं अंतर असेल तेवढंच हेही अंतर म्हटलं पाहिजे.

आणि एकदा तर ते अंतर आपण आणि चंद्र यापेक्षाही जास्त असल्याचं बापूच्या लक्षात आलं.

कारण त्याच्या ठराविक जागेवरून त्यानं जेव्हा त्या खिडकीकडे पाहिलं तेव्हा परत एकदा त्याचा आपल्या डोळ्यांवर विश्वास बसला नाही.

गलमिशावाले कर्नल गुळगुळे स्वतःच त्या खिडकीत उभे होते. गुळगुळेसाहेब स्वभावानं रागीट, कोरडे, करडे, कडक असले पाहिजेत हे वेगळं सांगण्याची गरज नव्हतीच. रिटायर झालेला असला तरी बोलून चालून कर्नलच तो. शिवाय त्यांच्या त्या आकडेबाज मिशा, तांबारलेले डोळे, धिप्पाड शरीरयष्टी या सर्व गोष्टींवरूनही ते समजण्यासारखं होतं. कर्नल साहेबांना तिच्या जागी खिडकीत उभं राहिलेलं पाहून खरं सांगायचं तर बापूची चांगलीच घाबरगुंडी उडाली होती. तो तिथून सटकला होता. शक्यतो त्याला त्याच जागी अदृश्य होता आलं असतं तरीही फार बरं वाटलं असतं. पण खरं म्हणजे आपण या म्हाताऱ्याला एवढं घाबरण्याचं कारणच काय ? हा आमचा स्वतःचा वाडा आहे. या वाड्यात आम्ही कुठंही उभं राहून बाहेर पाहू शकतो. वाटल्यास दुसऱ्या कोणाला पाहायचं नसेल तर त्यानं आपले डोळे मिटून घ्यावे. अर्थात हा युक्तिवाद बापूनं खुद्द कर्नलसाहेबांसमोर उभा राहून केला नसता हे खरं. पण तो आणि ती खिडकी यात दुर्दैवानं जेवढं अंतर होतं तितकंच सुदैवानं ती खिडकी आणि तो यातही होतं ही त्यातल्या त्यात समाधानाची बाब होती.

त्या खिडकीत ती उभी असेल तेव्हा तिच्याकडं पाहणं ही गोष्टही तितकी सोपी नव्हती. बापूच्या वाड्याशेजारी एक हॉटेलही नव्यानं आलं होतं–' दिलबहार रेस्टॉरंट.' या हाटेलात गिऱ्हाइकांची बरीच वर्दळ जवळ जवळ दिवसभर चाललेली असे. भर दुपारचा थोडा वेळ सोडला तर सततच. त्यामुळं ती खिडकीत येऊन उभी राहिली की तिच्याकडं पाहायला बापूशिवाय इतर लोकही असत. त्या लोकांनी तिच्याकडं पाहायला बापूची हरकत होतीच, पण शिवाय आपण तिच्याकडं पाहत आहोत हे त्यांनी पाहायलाही त्याची हरकत होती.

कर्नल गुळगुळ्यांची ती सुन्दर मुलगी त्यांच्या बंगल्याच्या खिडकीत उभी राहून बापूला अनेकदा दर्शन देत असे हा त्याच्या रूक्ष, कोरड्या जीवनात आलेला एक नवीन दिलासा होता हे खरं, पण पुढं काय ? हा एवढाच दिलासा किती दिवस ? ती खिडकी आणि ती, खरं म्हणजे खिडकीतील तो चांदका टुकडा आणि पृथ्वीवरील तो यांच्यातलं अंतर कधी कमी होणार आणि कसं, ही चिंता बापूला पोखरीत होती. की आपण आपले माधव ज्युलियनांच्या नायकाप्रमाणंच स्वतःपुरतं प्रेम करीत झुरत बसायचं !

बापूला आपल्या बावळटपणाची लाज वाटली. म्हणजे आज इतके दिवस झाले. त्याला अजूनही तिचं नुसतं नाव देखील ठाऊक झालं नव्हतं. ती काय करते, तिच्या आवडीनिवडी कोणत्या, तिचे वीक-पॉईंटस् कोणते ही महत्त्वाची माहिती तर दूरच राहिली. हे सगळं माहीत झाल्याशिवाय आणि त्याचा अक्कलहुशारीनं उपयोग केल्याशिवाय कर्नल गुळगुळ्यांचा हा दुर्गम गड सर होणार तरी कसा ?

पण ही कामगिरी मुळातच इतकी अवघड होती. आणि बापूला आपल्या अक्कल-

उपाशीच्या प्रयत्नांची इतकी नम्र जाणीव होती की याबाबतीत काहीतरी कारवाई तातडतोब करणं आवश्यक आहे, यापलीकडं कोणताच निर्णय बापू घेऊ शकला नाही.

तसं पाहिलं तर याबाबतीत कोणतंही धाडस करायला बापूची तात्त्विकदृष्ट्या शंभर टक्के तयारी होती. पण कर्नल गुळगुळे आणि त्यांचा दांडगा अल्सेशिअन खलिफा यांचा विचार करता कोणतंही धाडस–जीवावर बेतणारं धाडस–ठरण्याची शक्यताच अधिक होती हे विसरून चालण्यासारखं नव्हतं. साहेब कोणावरही एकदा रागावले की पिस्तुलालाच हात घालीत. आणि आपलं लक्ष्य अचूक टिपण्याबाबत त्यांचा मोठाच लौकिक होता. तर त्यांचा अल्सेशिअन खलिफा याला नुसतं भुंकण्याऐवजी आपल्या सावजाचा एकदम गळा पकडणं हेच पसंत असे, हे बापूच्या कानी आलेलं होतं. तेव्हा काहीही न करणं उत्तम. माधव ज्युलियनांच्या नायकाचं आणि आपलं भवितव्य एकच. पण काही करायचंच झालं तर अत्यंत काळजीपूर्वक, योजनाबद्ध पावलं टाकण्याची गरज होती. एकंदरीत बी. ए. ला मराठी ऑनर्स मिळविण्यापेक्षाही ही कामगिरी कठीण होती.

बापूनं आपली गुप्त पोलिसी करायला हळूहळू सुरुवात केली. कर्नल साहेबांच्या बंगल्यात काम करणारा नोकर दिगू याच्याकडूनच साहेबाची अचूक नेमबाजी आणि खलिफाची लोकांच्या गळ्यांवरची ममता याबद्दलची माहिती त्यानं संपादन केली होती, आणि त्याचबरोबर बऱ्याच आडपडद्यानं तिचं नावसुद्धा. आणि ते नावही अगदी सुयोग्यच होतं. 'चंदेरी स्वप्न' या नावाच्या बंगल्यात 'चंदा' या नावाखेरीज दुसरं नाव असणाऱ्या मुलीला राहायचा अधिकारच काय?– असो. पण या गवाक्ष–सुंदरीचं नाव कळलं तरी पुढं काय?

दिगूकडून मदत घेऊन प्रगतीची आणखी काही पावलं टाकण्यात दोन अडचणी होत्या. एक म्हणजे खुद्द दिगूला कर्नल साहेबांची इतकी भयंकर भीती वाटत असे की त्यांचं नुसतं नाव घेतलं तरीसुद्धा त्याला घाम फुटत असे. म्हणजे चिठ्ठीचपाटी वगैरे पोचविण्याच्या बाबतीत दिगू कुचकामी होता. आणि दुसरी अडचण स्वतः जिला चिठ्ठी पाठवायची होती त्या चंदाचीच होती. म्हणजे आपलं अस्तित्वसुद्धा तिला जाणवलं आहे की नाही हेच माहीत नसताना उगाच चिठ्ठी वगैरे पाठविण्याची चालूगिरी करणं अत्यंत धोक्याचं ठरू शकलं असतं. समजा, ती चिठ्ठीच तिनं आपल्या प्रिय पिताजींच्या स्वाधीन केली तर आपल्याला पळता भुई थोडी होईल. पिस्तुलाची गोळी मागं लागली म्हणजे ती आपल्यावर येऊन आदळायला नको असेल तर तिच्यापेक्षा अधिक वेगानं पळता यायला हवं. छे छे, असल्या हाराकिरीत काहीच अर्थ नव्हता. गाडी धीरे धीरे हाकणंच आवश्यक होतं.

म्हणून बापूनं सुरुवातीपासूनच सुरुवात करायचं ठरविलं. म्हणजे चंदा आपल्या घराच्या दिशेनं पाहत असते तेव्हा तिचं लक्ष खरोखरच आपल्याकडं असतं काय, की ती आपली कुठंतरी पाहायचं म्हणून पाहत असते? ते समजण्यासाठी अर्थातच पत्राचा उपयोग करण्याची कल्पना बाद होती. यावर बापूनं योजलेला उपाय म्हणजे दुर्बीण. ती

तो आपल्या मित्राकडून घेऊन आला. 'बर्ड वॉचिंग' करायच्या मिषानं. आणि दुर्बिणी-तून त्यानं चंदाला पाहिलं. अनेकदा पाहिल्यावर त्याची खात्री पटली की तिचं लक्ष जरी समोरच्या 'दिलबहार' हॉटेलकडं असलं तरी बरेचवेळा त्याच्याकडंही असे.

आणि एकदा तर ? बापरे–खरं म्हणजे अरेरे, हे काय ?

चंदाच्या डोळ्यात चक्क अश्रू ! ये क्या बात है ? चँदाके आँखोंमें आँसू ? ऐसा नहीं हो सकता, ऐसा कभी नहीं हो सकता, ऐसा मैं कभी होने नहीं दूंगा.

'अरे, हे आपलं म्हणायला ठीक आहे. पण होने नहीं दूंगा तर करणार काय तू ?' हा प्रश्न बापूनं अर्थात स्वतःलाच विचारला होता.

पण सुदैवाची गोष्ट अशी की बापूला स्वतःला काहीच करावं लागलं नाही. आणि काय होतं यासाठी फार वाटही पाहावी लागली नाही. बापूचं आपल्याकडं बारकाईनं लक्ष आहे हे चंदानं हेरल्यामुळंच की काय, तिनंच पुढच्या हालचाली केल्या. खरं म्हणजे तिनं एकच हालचाल केली.

–आणि ती म्हणजे बापू जेव्हा आपल्या घराच्या वरच्या माडीत उभा होता तेव्हा एक कागदी बाण सूं सूं करीत त्याच्या समोरच येऊन पडला. हे तिनं भलतंच 'रिस्क' घेतलं होतं. कारण बापूचे वडील नानासाहेब वकील यांची ती खोली होती. आणि त्याच खोलीच्या खिडकीतून हा कागदी बाण आला होता.

बापूनं तो कागदी बाण उचलला. त्याच्या नुसत्या स्पर्शानंच बापूच्या अंगाअंगातून वीज नाचत गेली. आणि अनिमिष वगैरे डोळ्यांनी तो त्या बाणाकडं पाहतच राहिला. मग तो आपादमस्तक थरारला. चंदानं चक्क त्याच्याकडं एक बाण टाकला होता. मग तो परत एकदा थरारला. की ही तिनं केलेली थट्टाच असेल काय ? कदाचित तो एक कोरा कागदच असेल. एकदा तर बापूला वाटलं की नंतरची निराशा टाळण्यासाठी तो बाण न पाहता आपण तसाच ठेवून द्यावा. पण तसं करणंही अशक्यच होतं. अखेर एक डोळा अर्धवट उघडा ठेवून त्यानं तो बाण उलगडून पाहिला, आश्चर्याची व आनंदाची गोष्ट अशी की त्या कागदावर बायकी अक्षरात काहीतरी लिहिलेलं होतं. बापूनं बाणाची घडी मोडली. आणि कागद संबंध उलगडून तो डोळ्यांसमोर धरला.

पत्रावरच्या मायन्यानेच तो थंड पडला. तिनं लिहिलं होतं–

'ती. बापूमामा यांसी–

बालके चंदाचा शिरसाष्टांग नमस्कार... '

नुसत्या मायन्यातच तिनं आपल्याला मामा बनवून टाकलं की. पण हा गैरसमज आपण नंतर कदाचित दूर करू शकूही. सध्या तिचं उरलेलं पत्र वाचायला काय हरकत आहे ? उरलेला मजकूरही फार लांबलचक नव्हता. तिनं लिहिलं होतं–

'मामासाहेब, माझं तुमच्याकडं एक अगदी महत्त्वाचं काम आहे. या बाबतीत तुम्हीच मला मदत करू शकाल, अशी माझी खात्री आहे. काम तुम्हाला सांगण्याची लाज वाटते. पण ते आमच्या दिगूच्यानं होणं शक्य नाही. पप्पा आणि मम्मी यांनासुद्धा

सांगता येणार नाही, असं आपल्या दोघांच्यातलंच गुपित राहिल ते, पण तुम्ही 'हो' म्हणाल्याशिवाय तरी तुम्हाला सांगण्यात काय अर्थ म्हणा. आणि तुम्ही 'हो' म्हणा-लात असं समजून चाललं तरी पत्रातून लिहिण्यासारखं काम नाहीच ते. अगदी नाजूक काम आहे. कराल ना माझं एवढं काम ? आपल्या लाडक्या भाचीचं ?

आपली पडोसन.'

या पत्राचा बापूवर झालेला परिणाम मिश्र स्वरूपाचा होता. या पोरीनं आपल्याला मामा बनविणं हे त्याला कधीच पसंत पडणं शक्य नव्हतं. हे मामा–भाची प्रकरण एकदम नापसंत. पण खरं म्हणजे ते बापूच्या लक्षातच राहिलं नाही. 'तुम्हीच मला मदत करू शकाल,' 'लाज वाटते,' 'आपल्या दोघांतलंच गुपित,' 'नाजूक काम,' 'कराल ना माझं एवढं काम,' 'आपल्या लाडक्या...' 'आपली' हे शब्दच त्याच्या नजरेसमोर नाचू लागले. आणि एक सुंदरी आपल्याला असं पत्र लिहिते या कल्पनेनंच तो धन्यधन्य झाला. मग त्याचा त्या 'मामा' म्हणण्याबद्दलचा, तिच्याबद्दलचा रागही नाहीसा झाला. इतर लोकही नाही का आपल्याबद्दल गैरसमज करून घेत ? त्यातलाच हा एक म्हणायचा. आणखी ओळख झाली म्हणजे आपण तिला सांगून टाकू. कदाचित तिलाही आपली चूक कळून येईल. एकूण बापू स्वतःवर इतका खूष झाला की 'गवाक्षातील सुंदरीस' या शीर्षकाची एक कविता शार्दूलविक्रीडित किंवा वसंततिलका वृत्तात चंदावर रचण्याचा घोर निश्चयही त्यानं त्या क्षणी करून टाकला.

पत्राला उत्तर काय द्यायचं यासंबंधी प्रश्नच नव्हता. ते 'हो' असंच होतं. तिच्याकरिता तो जवळ जवळ काहीही करायला तयार होता. आपण तुझ्यासाठी चंद्रावर स्वारी करायलासुद्धा तयार आहोत फक्त कर्नलसाहेब आणि खलिफा यांना तोंड द्यायचं नसलं तर. आणि एखादेवेळी या दोन गोष्टी करायचाही आपण विचार करू. सारांश, उत्तर काय द्यायचं हा प्रश्न नसून ते कसं द्यायचं हा होता.

बापूनं योजलेला उपाय साधा होता. चंदाचं लक्ष आपल्याकडं आहे हे पाहून त्यानं आपली मान होकारार्थी हलविली. इतक्या जोरात की बिचारी त्याची मान लच-कलीसुद्धा असेल.

यानंतर काही वेळ चंदा खिडकीतून अदृश्य झाली. आणि थोड्याच वेळात तिचं दुसरं प्रेमपत्र हवाई मार्गानं बापूजवळ येऊन पोचलं. तिनं लिहिलं होतं.–

'घाईत लिहिलं असल्यामुळं मायना सबंध लिहिला नाही. तो आधीच्या पत्रा-प्रमाणंच समजावा. कर्नल काका उद्या सकाळी बाहेर जाणार आहेत. तेव्हा त्यांची गाडी दिसेनाशी होताच तुम्ही आमच्याकडं या. खलिफाची काळजी नको. त्याला मी सका-ळच्या ब्रेकफास्टबरोबर दुधातून झोपेच्या गोळ्या देणार आहे. तो चांगला दोन तीन तास तरी झोपेत असेल.'

'दॅट्स इट. म्हणजे गलमिशाबहाद्दर गुळगुळे आणि खलिफा या आपल्या अडचणी होत हे चंदानंही जाणलं तर. आणखी एक म्हणजे ही कर्नल साहेबांना काका का म्हणते ?

कदाचित ते तिचे वडील नसून काकाच असावेत आणि तेच त्या दिवशी तिच्या डोळ्यांत चकाकलेल्या अश्रूंचं कारण असेल.' त्यामुळं कर्नलांच्या रूपानं बापूच्या मनात असलेला खलपुरुष आणखीच काळाकुट्ट झाला. हा खलपुरुष आणि खलपशू खलिफा यांना वेळोवेळी तोंड द्यावं लागणार होतं.

अखेर नेहमीपेक्षा बराच उशीर करून दुसरा दिवस उजाडला. बापूनं चंदाच्या भेटीची आपल्या दृष्टीनं अत्यंत कसोशीनं तयारी केली. आणि कर्नल गुळगुळ्यांची गाडी जाण्याची वाट पाहत तो आपल्या वाड्याच्या दारात उभा राहिला. कर्नलसाहेब आर्मीतून रिटायर्ड झाले असले तरी तिथं शिकलेला वक्तशीरपणा त्यांच्यात अजून कायम असला पाहिजे. कारण नवाच्या ठोक्याला चंदेरी स्वप्नाचं फाटक उघडलं. आणि गुळगुळ्यांची फियाट गाडी त्यातून बाहेर पडली. गुळगुळे स्वतःच गाडी चालवत होते. त्यामुळं गाडीबरोबर तेही जातात की नाही याबद्दल संशयाला जागा नव्हती.

गाडी दिसेनाशी होताच बापूनं धडधडत्या छातीनं स्टार्ट घेतला आणि लांब लांब ढांगा टाकीत तो 'चंदेरी स्वप्ना'जवळ येऊन ठेपला आणि दचकला. 'कुत्र्यापासून सावध राहा' ही पाटी त्याला दिसली. त्याचे पाय जागच्या जागी घोटाळले. चंदानं खलिफाचा बंदोबस्त नीट केला असेल ना? झोपेच्या गोळ्यांनी आपलं काम बरोबर केलं असेल ना? निदान आपण तिथं असेपर्यंत खलिफाला जाग न येणं अत्यंत महत्त्वाचं होतं, पण त्याची खात्री करून घेणंही प्रत्यक्ष आत शिरून पाहिल्याशिवाय अशक्य होतं. मग कोणत्याही क्षणी परत फिरण्याच्या तयारीनं बापूनं आपलं थरथरतं पाऊल पुढं टाकलं. आणि तो बंगल्याच्या द्वारापाशी येऊन ठेपला. तरीही काहीसुद्धा झालं नाही. बापूनं आपला घाम टिपला. आणि थरथरत्या हातानं त्यानं बेल दाबली. आतल्या बाजूला कुठंतरी मंजूळ घंटानाद झाला आणि जवळ जवळ लगेच दारही उघडलं. चंदेरी स्वप्नातली परी त्याच्यासमोर उभी राहून हसत हसत त्याचं स्वागत करीत होती.

'या ना, या की. काय हो, पण अजून घाबरलेले दिसताहात. तुमचे पाय कापताहेत अजून. घाबरलात नाही ना?'

'छे छे! घाबरायला काय झालं?' आपला आवाजही कापतो आहे हे बापूच्या लक्षात आलं. 'म्हणजे काय आहे की खलिफाला नीट झोप लागली आहे की नाही याचीच काळजी मला वाटत होती!'

'त्याची नको हो काळजी. त्याची ब्रह्मानंदी टाळी लागली आहे. आणि एका भल्या मोठ्या हाडकाचा तुकडा तो आपल्या स्वप्नात चघळतो आहे.' चंदा अजून हसतच होती.

बंगल्यातून आणखी कसलीच चाहूल येत नव्हती. त्यामुळं बापूला आणखीनच बरं वाटलं.

'तुम्ही काही काळजी करू नका. दिगूला आमच्या काकासाहेबांनी कालच कायमची रजा दिली आहे. आणि तुम्ही येणार हे माझ्या आईला माहीत आहे.' हेही चंदानं सांगितल्यामुळं बापूचा जीव भांड्यात पडला.

नंतर तिनं लगेच बोलायला सुरुवात केली. ते ऐकून बापूला 'ब्यूटि अँड द बीस्ट' या गोष्टीची आठवण होणं साहजिकच होतं.

कर्नल गुळगुळे हे चंदाचे वडील नसून काका होते, हा बापूचा अंदाज बरोबरच होता. या माणसानं लग्नच केलेलं नव्हतं. चंदाचे वडील हे त्यांचे भाऊ, त्यांच्या मृत्यू-नंतर तिची आई आणि ती या काकांकडंच राहू लागली. मिलिट्रीची सगळी शिस्त काकांनी घरी आणली होती. आणि या करड्या शिस्तीत चंदाचं आजपर्यंतचं आयुष्य गेलं होतं. कोणतीही गोष्ट या खाष्ट काकानं या मायलेकींच्या मनासारखी होऊ दिली नव्हती. या दोघी जे करावं म्हणतील त्याच्या बरोबर विरुद्ध काकाजींचं मत असे. त्यामुळं कित्येकदा आपल्या मनात असेल त्याविरुद्ध गोष्टीची मागणी करूनच आपल्याला हव्या असलेल्या वस्तू त्या मिळवीत असत. पण काकांचा स्वभाव संशयीही होता. त्यामुळं ही युक्ती नेहमी चालत नसे. खरं म्हणजे काकांचं डोकंच तिरकस होतं. एकदा चंदानं त्यांच्याकडं हाय हील्सच्या चपला मागितल्या तेव्हा ते म्हणाले, 'कळली बरं का मला तुझी शक्कल. तुला पाहिजे असतील कोल्हापुरी चपला. म्हणून तू हाय हील्स पाहिजे आहेत असं सांगते आहेस. पण कुणी सांगावं तुला हाय हील्सही हव्या असतील. तेव्हा मी ठरवलं आहे की सध्या काहीच नको म्हणून' आणि यावर एखाद्या खलपुरुषासारखं विकट हास्यसुद्धा त्यांनी केलं.

विशेषतः खाण्यापिण्याच्या बाबतीत कर्नलसाहेब अगदी कडक होते. पाले आणि फळभाज्या उकडूनच खाल्ल्या पाहिजेत, त्यात तेल–मसाले वगैरे बिलकुल असता कामा नयेत असा कडक हुकूम त्यांनी सोडला होता. तेलकट पोळीऐवजी जोंधळ्याची किंवा बाजरीची भाकरी हीच त्यांना मान्य होती. वर्षानुवर्ष कसलाच चमचमीत पदार्थ त्यांच्या घरात त्यांनी होऊ दिला नाही; की मसाल्याचा खमंग सुवास कधी त्यांच्या घरात दर-वळला नाही. असंच आणखी प्रत्येक बाबतीत.

कोणत्याही दुःखी तरुणीबद्दल जी सहानभूती वाटायला पाहिजे ती साहजिकच बापूला वाटली पण स्वतःच्या जिवावर उदार होऊन तिनं आपल्याला इथं का बोलावलं हे मात्र त्याच्या अजून ध्यानात येत नव्हतं.

'आमची रडकथा तुम्हाला सांगून कशाला त्रास द्या म्हणा.' बरंचसं सांगून झाल्यावर चंदा म्हणाली. यावर त्याला काहीतरी बोलणं भागच होतं.

'छे छे, असं म्हणून कसं चालेल ? अहो, तुम्ही इथं राहायला आलात हे आमचं वैभव आहे. आणि शिवाय आम्हालाही काही शेजारधर्म आहे की नाही ? खरं सांगायचं तर तुम्ही माझ्याशी बोललात हेच माझं केवढं भाग्य. सांगा ना मी तुमच्यासाठी काय करू ? तुमच्यासाठी काहीही करायला आनंद होईल मला– '

'होऽय. कराल ? खरंच किती स्वीट आहात तुम्ही. मला माहीतच होतं. म्हणून तर तुम्हाला बोलावण्याचं धाडस केलं ना मी !'

'सांगा. सांगा. ते ऐकायलाच तर इथं आलोय ना मी.'

'नाही. पण मी नाहीच सांगणार. तुम्हीच ओळखायचं ते.'

आणि त्यानं ओळखायचा खूप प्रयत्न केला. पण तो दरवेळी फसला. तिला काही पुस्तकं वाचायला हवी होती का? छे छे, तिला पुस्तकांचा मनापासून राग असे. प्रेम-कथांचा तर तिला जवळ जवळ तिरस्कारच वाटे. कविता वाचायला लागलं की तिला मळमळू लागे आणि कादंबऱ्या वाचायला लागलं की झोप येई. (झालं म्हणजे 'गवाक्ष सुंदरीस' ही आपली कविता तिला दाखविण्यात काहीच अर्थ नव्हता!) तिला कुठल्या सिनेमा–नाटकाची तिकिटं काढून आणायला हवी होती का? अं हं. तिला घराबाहेर पडायची आणि तेसुद्धा सिनेमा–नाटक पाहायला काकाजींची परवानगी मिळणं ही अशक्य गोष्ट होती. तिला कुठल्या गाण्याच्या रेकार्डस् सुद्धा नको होत्या. गाण्यामुळं तिचं डोकं दुखायचं.

बापू अगदी निराश झाला आणि तसं पाहिलं तर चंदाच्या चेहऱ्यावरची निराशाही अधिकाधिक गडद होऊ लागली होती. त्यामुळं तर बिचारा अगदी नर्व्हसच झाला. त्याचं किंचित–कवि–हृदय शोकाकुल झालं. शिवाय आपला वेळही हळूहळू संपत चालला आहे ही कल्पनाही त्याला क्लेशकारक वाटत होती.

बापू एकदम उभाचं राहिला. आणि तिच्यापुढं हात पसरून केविलवाण्या सुरात म्हणाला,

'चंदा तुझ्या–तुमच्याकरिता हा बापू आकाशातल्या चांदण्या खुडून आणायला-सुद्धा तयार आहे.' खरं म्हणजे आपण हे केव्हाच म्हणून टाकायला हवं होतं, असं बापूला वाटून गेलं. कर्नलसाहेब परत येण्याची आणि खलिफावरील झोपेच्या गोळ्यांचा प्रभाव संपण्याची वेळ जवळ जवळ येत चालल्यामुळं असेल, घाईघाईनं तो आता बोलून गेला.

पण चंदाचा चेहरा यामुळंही खुलला नाही.

'चांदण्या खुडून आणण्याची कल्पनाही काही वाईट नाही हो. पण चांदण्या काय खायला उपयोगी पडणार आहेत?' निराशेनं परत कोचावर बसत चंदा म्हणाली.

आणि काय असेल ते असो, त्याबरोबर बापूच्या डोक्यात एकदम ट्यूब लागली. चांदण्या काय खायला का उपयोगी पडणार आहेत ... खायला का उपयोगी पडणार आहेत.

'ओळखलं. तुम्हाला काही खायला आणून देऊ का मी? समोरच्या दिलबहार हॉटेलातून?' चंदा खिडकीत उभी राहिली की आपल्या घराकडं आणि आपल्याकडं पाही. त्याचप्रमाणं त्या हॉटेलकडंही पाहत असे हेही त्याच्या आता लक्षात आलं.

बापूचं वाक्य पुरं झालं असेल नसेल. जवळ जवळ धावतच चंदा त्याच्याजवळ आली. आणि त्याचे हात हातात घेऊन म्हणाली,

'होऽय. कसं माझ्या अगदी मनातलं ओळखलंत हो तुम्ही. मग काय काय आणून द्याल मला? बटाटेवडे, इडली, सामोसे, पॅटीस, मसाला डोसा ...'

२५६७८
९७३८

'हो. का नाही ? अन शिवाय भजी, थालीपीठ, साबुदाणा वडा, मिसळ ... काय वाट्टेल ते.'

'ओ, खरंच भजी ? थालीपीठ ? आणि मिसळसुद्धा ? खरंच तुम्ही किती स्वीट आहात !'

'हो' असं बापू म्हणाला खरा. आता हे जरा अतीच व्हायला लागलं असं त्याला वाटल्याशिवाय राहिलं नाही. तरीही बटाटे वडे, भजी, थालीपीठ, मिसळ यानंतर तरी आपल्याकडं तिचं लक्ष जाईल अशी त्याला आशा होती.

अजूनही त्याचे हात तिनं सोडले नव्हते. आता तर तिनं त्याला आपल्याजवळ घेऊन त्याच्या थरथरत्या ओठांवर आपले ओठही टेकले.

'आणखी एक माझ्याकरिता कराल ? नाही म्हणायचं नाही हं ...' तिनं विचारलं.

'हो' अस्फुट स्वरात तो उद्गारला.

'माझी त्या हॉटेलच्या मालकाशी ओळख करून द्याल ? द्याल ना ?'

'अं ... काय म्हणालात ?'

'द्यायचीच हं ओळख करून. आणि इतकं तुम्ही आमच्याकरिता केल्यावर मीही नको का तुमच्यासाठी काहीतरी करायला ? मी वाचीन तुमच्याजवळच्या कादंबऱ्या. नाहीतरी झोप येतेच आहे कुठं मला अलीकडे ? आणि कवितासुद्धा वाचीन, मळमळेना का मेलं ... तुमच्यासाठी तेही करीन' ती म्हणाली.

बापू अजूनही थरथरतच होता. त्याला वाटत होतं की खलिफा आणि कर्नलसाहेब याक्षणी दोघंही एकाच वेळी आपल्या अंगावर चालून आले तरी आपल्याला त्याचं काहीही वाटणार नाही !

○ ○ ○

# कौल

पैलवान तुका आणि मारुती यांच्यातली कुस्ती पंचांनी बरोबरीनं सोडविली हा साऱ्या वाकडेवाडीत मोठाच चर्चेचा विषय झाला होता.

अनेकांचं म्हणणं असं की तुकानं ही कुस्ती सरळसरळ मारली नसली, तरी निदान एकदा मारुतीची पाठ मातीला जवळजवळ लागली होती. चीतपट होणं आणि मातीला पाठ टेकणं यात फारसा फरक नाही. शिवाय तुकानं केलेले डाव कितीतरी सरस होते. खरं पाहता नुसत्या या कौशल्यावरच पंचांनी त्याच्या बाजूनं कुस्ती सोडवायला पाहिजे होती. मानाचा जरिपटका उप–वनमंत्र्यांच्या हस्ते तुकाच्याच डोईवर चढायला हवा होता.

खरं म्हणजे तुका मैदानात उतरला तेव्हापासूनच तो सगळ्यांना भारी वाटला होता. एखाद्या गजराजासारखा झुलत झुलत तो हौद्यापाशी येऊन दाखल झाला. वनविभागाचे उपमंत्रीसाहेब त्या दिवशी मुद्दाम या गाजलेल्या कुस्तीसाठी हजर झाले होते. त्यांना मुजरा करून तो उभा राहिला आणि घुमू लागला. एवढ्या रुबाबानंच तुकानं मैदान मारून नेलं होतं असं म्हटलं तरी चालेल. मारुतीच्या बाजूचे शेपन्नास लोक सोडले तर सगळ्यांची मनं त्यानं जिंकली होती. खरं पाहिलं तर प्रत्यक्ष हनुमान आखाड्यात अवतरल्यासारखाच तो दिसायला लागला

तेव्हा तर मारुती पैलवानाच्या बाजूच्या लोकांच्या मनातही काही थोडी चलबिचल झाली होती. पण मारुतीला उचलून धरणं त्यांचं कर्तव्यच होतं. आता तुकापेक्षा मारुती अधिक चपळ होता हे खरं. पण नुसती चपळाई काय अशा ठिकाणी चालते थोडीच! तुकासमोर मारुती उभा राहिला तेव्हा बहुतेकांना असं वाटलं होतं की एका थपडेनं तुका आपल्या प्रतिस्पर्ध्याला लोळवू शकेल. तुकाच्या जयघोषानं सारं मैदान गर्जून उठत होतं.

——पण अखेर झालं ते असं.

पंचांनी कुस्तीत दोघांची बरोबरी झाल्याचं जाहीर केलं. सगळ्या कुस्ती–प्रेमी प्रेक्षकांची भलतीच निराशा झाली. विशेषतः तुकाच्या तालमीतले लोक फार नाराज झाले. त्यांनी बेभान होऊन दंगलही उडवली असती. पण उप–वन–मंत्रीसाहेब जातीनं हजर असल्यामुळं त्या दिवशी पोलिस बंदोबस्त कडक होता. त्यामुळं कोणाचंच काही चाललं नाही. शिवाय उपमंत्रीसाहेबांनी सुद्धा सुमारे एक तासभर भाषण करून लोकांच्या मारामारी करण्याच्या उत्साहावर पाणी ओतलं.

कुस्ती हा भारताचा थोर राष्ट्रीय खेळ आहे असं सांगून अहिंसा आणि कुस्ती एकमेकाला विरोधी नाहीत असं मत त्यांनी मांडलं. कुस्ती बरोबरीनं सुटली याबद्दल आपल्याला झालेला आनंद व्यक्त करून ते म्हणाले की, हा निकाल भारतीय संस्कृतीला धरूनच झाला. दोघांच्या लढाईत एकाचाच जय व्हावा हे सर्वोदयाला धरून नाही, एकाचा जय म्हणजे दुसऱ्याचा पराभव. हा कायदा माणसाचा नसून जंगलाचा कायदा आहे. त्यामुळं पराभूत वृत्ती निर्माण होते. म्हणून कुस्तीत दोन्ही पैलवानांचा जय होणं हेच योग्य आहे. त्यामुळं भारताची एकात्मता टिकविण्यास मदत होईल. अखेर दोन्ही पैलवानांशी हस्तांदोलन केल्यानंतर त्यांनी तुका व मारुती यांचीही हातमिळवणी करून दिली. नंतर तुकाच्या हातात दिलेला ( व त्यानं तो प्रेमभरानं दाबल्यापासून दुखू लागलेला ) आपला हात चोळत ते म्हणाले होते, 'यापुढंही सगळ्या कुस्त्या बरोबरीनं सोडविल्या जातील अशी सदिच्छा मी व्यक्त करतो.' कुस्त्यांचे निकाल बरोबरीनं व्हावेत असंच आपल्या सरकारचं व विशेषतः वन–विभागाचं धोरण राहील असं त्यांनी अखेरीस जाहीर केलं.

असल्या अप्रतिम भाषणानंतर टाळ्यांचा पाऊस पडावा हे उघड होतं. टाळ्या पिटून पिटून समस्त गावकरी मंडळींचे हात इतके दुखू लागले की मारामारीसाठी ते लगेच उपयोगात आणणं अशक्य झालं असावं. त्यामुळं मारामारी करण्याचा मंडळींचा उत्साह मावळला आणि लोक घरोघर निघून गेले.

पण लोकांनी मारामारी केली नाही याचा अर्थ ते काहीच बोलले नाहीत असा नाही. 'तुकावर अन्याय झाला', 'जरिपटका तुकालाच द्यायला हवा होता', 'मारुती पैलवानानं पंच फोडले, त्यांना पैसे चारले,' मारत्याला कुस्ती म्हंजे काय हे सुद्धा कळत नाही, त्यानं बांगड्या भरून भाकऱ्या भाजाव्या '——असल्या बोलण्यानं मंडळीनं नुसता कालवा केला.

मारुतीच्या कानावर हे आलं नाही असं नाही. त्याचे कान मोठे झाले होते. आणि

त्याला बारीकसारीक कुजबूजसुद्धा स्पष्ट ऐकू येत होती. झाला हा प्रकार काही ठीक नाही असं त्याला वाटू लागलं होतं. त्यात कोणीतरी रोकड्या हनुमानाला कौल लावण्याची गोष्ट काढली तेव्हा तर मारुती भलताच गडबडला.

रोकडा हनुमान ही साधीसुधी बाब नव्हती. महा कडक दैवत. आणि मोठं न्याय-प्रिय, सत्याला जागणारं. या हातानं कौल लावावा आणि दुसऱ्या हातानं न्याय घ्यावा अशी या हनुमानाची ख्याती. आज फिर्याद ऐकायची आणि पंधरा दिवसांनी, महिन्यानी निकाल द्यायचा अशी बात नाही. एकदम रोकडा सवाल. गावोगावचे, तालुक्याचे, जिल्ह्याचे लोक दुरदुरून त्याच्याकडं फिर्यादी घेऊन येत आणि न्याय घेऊन समाधानानं परत जात. फिर्याद मांडण्याची सुद्धा इथं गरज नसे. फिर्यादीशिवाय निकाल आणि तडकाफडकी निकाल. मारुतरायापुढं फिर्याद मांडायला काय ते कोर्ट होतं. त्या सर्वसाक्षी देवाला गडद अंधारात, डोळ्यात बोट गेलं तरी दिसणार नाही अशा ठिकाणी बसून सगळं काही दिसत असे. पुराव्याची, वकिलाची, जबानीची, बचावाची कसलीच गरज नाही, अशी स्थिती होती. डोळे मिटून देवापुढं जावं आणि नमस्कार करून उभं राहावं. गुरव हनुमानाच्या डाव्या उजव्या बाजूला डोळ्यांच्या-वर फुलं लावी. उजव्या बाजूचं फूल पडलं तर ' होय ', डावीकडचं पडलं तर ' नाही ' असा निकाल. त्या–त्या डोळ्याच्या पापण्या हलवून पूर्वी हा निकाल मिळत असे. पण गावात फार पाप कालविलं गेल्यापासून प्रत्यक्ष देहाची हालचाल देवानं बंद केली होती. त्याचा गावावर कोप झाला होता. तेव्हापासून आपोआप फूल पडण्याची वाट पाहावी लागत असे.

म्हणून वाकडेवाडीच्या रोकड्या हनुमानाला कौल लावावा असं जेव्हा मंडळी बोलू लागली तेव्हा मारुती पैलवानाची गाळण उडाली यात आश्चर्य नाही. त्यानं आणि त्याच्या बाजूच्या लोकांनी कौल मागण्याच्या कल्पनेला विरोध करून पाहिला. पण तसं करण्यात राम नाही हे त्यांच्या लवकरच लक्षात आलं. कौल मागायला मारुती पैलवानाचे लोक डरतात त्याअर्थी त्यांचीच बाजू लंगडी असं तुका व त्याच्या पार्टीचे लोक बोलू लागले. आणि त्यामुळं सगळं गाव बोलू लागलं. पंचांच्या निकालापेक्षा हनुमन्ताचा कौल खरा याबद्दल कोणालाच शंका नव्हती, अगदी मारुती पैलवानाला स्वतःलासुद्धा. असं जर होतं तर कौल मागण्याची भीती त्याला वाटण्याचं कारणच काय ? खरं म्हणजे ज्याची बाजू सत्याची असेल त्यानं कौलाची मागणी आनंदानं उचलून धरायला हवी.

अखेर मारुती पैलवानानं कौलाची मागणी मान्य केली. कौल मानत नाही असं म्हणणं म्हणजे आपली बाजू लंगडी आहे, आपण भ्यालो आहोत हे लिहून देण्यासारखंच होतं. त्यामुळं कौल न मागताच तुकाच्या मंडळींनी भाव खाल्ला असता. फुकटफाकट त्याला जय मिळून गेला असता. शिवाय कौल मानत नाही असं म्हणणं हे पापही होतं. माघार घेण्यात काही अर्थ नव्हता.

कौलाची मागणी कबूल केली खरी. पण ती कबुली दिल्यापासून मारुती फार

अस्वस्थ झाला. त्याला तहानभूक सुचेनाशी झाली. अन्नावरची त्याची वासनाच गेली. गूळसुद्धा गोड लागेनासा झाला. कसल्या कामात लक्ष लागेना. दररोजची मेहनत होईना. घरात तो कोणाशी बोलेनासा झाला. म्हातारीच्या आणि कारभारणीच्या अंगावर तो वसावसा ओरडू लागला. पोराबाळांवर त्याचा भारी जीव. पण त्यांना तो आपल्याजवळ उभा राहू देईना. त्यांच्याशी नेहमीप्रमाणं गोड शब्द बोलायचं बाजूलाच राहिलं. एक-दोनदाच कायतो बाहेर गेला असेल.

तसं पाहिलं तर मारुती पैलवान हा मोठा धीराचा माणूस. तसाच मोठा लबाड आणि धूर्त. कुस्तीतले डावपेच भले चारदोन कमी येत असतील त्याला. पण इतर व्यवहारातले डावपेच त्याला चांगले जमत. देवळातल्या गुरवाला, पाटलाच्या पोराला, सोनाराच्या नारायणाला अशा कित्तीक लोकांना त्यानं अडचणीतून सोडविलं होतं. चांगले वकील त्यांना गाठून दिले होते. प्रसंगी वकील काय सल्ला देईल असा सल्ला दिला होता.

पण आता त्याच्या स्वतःवरच बेतली तेव्हा बिचाऱ्या मारुतीला काही सुचेनासं झालं. डोळे मिटून बसला तरी त्याला समोर क्रुद्ध-झालेल्या मारुतिरायाचं अक्राळविक्राळ रूप दिसे. एका हातानं खांद्यावर पेललेली गदा आणि दुसरा हात उगारलेला. डोळे रोखून थेट आपल्याकडंच पाहत आहेत आणि अंगाला भोकं पाडीत आहेत. ते भयानक रूप दिसताच मारुती पैलवानानं मनातल्या मनातच रामरायाला हाक मारली आणि अगोदरच मिटलेले डोळे आणखी गपकन मिटून घेतले. दिवा लावला तरी दिसू नये अशा मिट्ट काळोखात बसणाऱ्या, कधी नीट नजरेस न पडणाऱ्या हनुमंतदेवानं आपल्याला असं दर्शन द्यावं ! ... विचार विचार इतका झाला की अखेर मारुतीला असंही वाटू लागलं की आपल्या हातून पापच घडलं असेल तर साक्षात देवानं आपल्याला दिवसाढवळ्या घरात येऊन दर्शन द्यावं हे कसं ?

असे आणखी दोन दिवस गेले. कौल मागण्याचा दिवस जवळजवळ येऊ लागला. मारुतीच्या मनाची अस्वस्थता वाढली. परवा शनिवारी कौल मागायचा. आज गुरुवार. ' कसं होणार रे तुझं ? ' ' कौल उलटा गेला म्हंजे गावात तोंड दाखवायला की रं जागा राहणार नाही तुला. ' ' काय करायचं ठरवलंस ? '

गुरुवारी संध्याकाळी मारुती एकटाच बसला होता तेव्हाची ही गोष्ट. हे प्रश्न त्याच्याच मनात येत होते असं नव्हे. तेवढ्यात घरात येऊन पोचलेल्या नारायण सोनारानं ते विचारलं होतं.

नारायणचं बोलणं ऐकताच मारुतीनं डोळे उघडून वर पाहिलं.

उभ्याउभ्याच वाकून त्याच्याकडं पाहत नारायण हसत होता. आपला बलदंड मित्र नारायण हसतो आहे याचं मारुतीला तशा दुःखातही सुख वाटलं. असा हसतमुख चेहरा त्यानं बऱ्याच दिवसांत पाहिला नव्हता.

" अरे नारायणा, किती धुंडायचं रे गड्या तुला ?" मारुती एकदम उत्साहानं नारायणाला म्हणाला.

" काय सांगू देवा. त्या लोकनाट्याच्या कोंडाळ्यात सापडलो तो पार मुंबईला भिडून आलो."

" माझ्यावर मोठी बिलामत आली बघ आणि तूही इथं नाहीस."

" तेच ऐकलं राया, म्हणून हातावर पाणी पडलं तसा थेट इथं येऊन हजर झालो. दोन तीन खेपा तुम्ही आमच्या घराकडं मारल्याचं समजलं. मग तर जल्दीच गाडी सोडली."

अशा रीतीनं त्या दोघा मित्रांची बोलणी सुरू झाली आणि ती खूप वेळ चालली. नारायणासारखा बालमित्र आल्यामुळं मारुतीला लागलेला काळजीचा घोर थोडा कमी झाल्यासारखं वाटलं. नारायणानं आपण लोकनाट्याच्या त्या कंपनीबरोबर कसं हिंडलो, सगळ्या तऱ्हेच्या पार्ट्या कशा रंगवल्या, लोकांना ते सगळं कसं पसंत पडलं, आपल्या सगळ्या सोंगांना टाळ्या कशा मिळविल्या या सगळ्याचं रसभरित वर्णन केलं.

तुका-मारुतीच्या इनामाच्या कुस्तीबद्दल सगळी हकिगत नारायणानं जेवताना घरीच ऐकली होती. ती आता मित्राच्या तोंडून त्यानं परत ऐकली. मित्रावर मोठं संकट येऊन कोसळण्याची भीती आहे हे कबूल केलं. मारुतीनं आपल्याला मोठ्या संकटातून कसं सहीसलामत सोडविलं होतं याची कृतज्ञतापूर्वक आठवण केली. याबाबतीत काहीतरी केलंच पाहिजे, किटाळ टाळलंच पाहिजे अशी स्वतःहून कबुली दिली.

मग नारायणानं पानतंबाखू काढल्यावर तर बोलण्यात फार रंग भरला. पानाबरोबर बोलणं अधिक गडद होत गेलं. घरात कोणी नव्हतं पण तरीही एकमेकांच्या कानाला लागून थोडी कुजबूज देखील झाली.

मारुतिरायाला अनुकूल करून घेण्यासाठी, कौल सत्याच्या म्हंजे आपल्या बाजूनं होण्यासाठी, देवावर अभिषेक करणं आवश्यक होतं. त्यामुळं हे कडक दैवत शांत झालं असतं.

" दक्षिणेचं विसरू नकोस नारा ! " नारायण जायला निघाला तेव्हा मारुतीनं मुद्दाम त्याला आठवण करून दिली.

नारायण मार्गाला लागला तेव्हा मारुती घराच्या दारात उभा राहून त्याच्या पाठमोऱ्या दांडग्या देहाकडं पाहत राहिला. जिवाच्या मित्राला मनचं सगळं दुःख सांगितल्यामुळं असेल मारुतीचं जडशील झालेलं मन आता हलकं झालं होतं.

नारा निघाला तो थेट देवाच्या देवळात गेला. त्यानं देवापुढं हात जोडले आणि डोकं भुईला टेकलं.

शनिवार उजाडू नये असं म्हणून तो उजाडणार नाही हे शक्य नव्हतं. शुक्रवारप्रमाणं शनिवारही उजाडला. वेळच्या वेळी न चुकता उजाडला.

कौल घेण्याची वेळ संध्याकाळची असे. त्याप्रमाणं हा कौलही तेव्हाच मागायचा होता.

मारुतीनं आता आल्या प्रसंगाला मर्दासारखं तोंड द्यायचा निश्चय केला होता.

शक्य ते प्रयत्न करणं तेवढंच नाही तरी माणसाच्या हाती असतं.

संध्याकाळी अंधार पडला. तशी देवळापाशी गर्दी जमू लागली. मारुतीकडचे काही, तुकाकडचे काही लोक येऊन दाखल झाले. आणखी बघे कितीतरी जमले.

मारुती पैलवानानं मावळत्या सूर्यनारायणाला हात जोडले. मग तो घरातल्या देवांच्या पाया पडला. आई–बापांच्या चरणी लागला. मात्यापित्यांच्या प्रेमानं त्याचं मन उचंबळून आलं.

" पाया पडतो " तो म्हणाला.

" जा रं माज्या पाडसा. येशस्वी होऊन ये. मारुतिराया तुज्या पाठीशी हाय लेकरा. चिंता करू नगस." म्हणता म्हणता त्या दोघांचे डोळे पाण्यानं डबडबले. मारुतीनंही आपले डोळे पुसले.

" रडू नगस आये. सत्याला कशाचं भ्या न्हाई." मोठ्या आत्मविश्वासानं मारुती म्हणाला आणि तो देवळाकडं निघाला. बापाकडं वळून त्यानं म्हटलं होतं, " जशी देवाची मर्जी बाप्पा."

मग त्यानं मागं वळून पाहिलं नाही. मंडळी जमली होती. मारुती थोरामोठ्यांच्या पाया पडला. त्यांचे त्यानं आशीर्वाद घेतले. सगळी गर्दी देवळाकडं निघाली.

हनुमानाच देऊळ गावाच्या कडेला होतं. स्वतः समर्थ रामदास स्वामींनी या देवळाची स्थापना केली असं गावातली म्हातारी मंडळी सांगत असे. शिवरायानं वाकडेवाडीचं इनाम या देवळाच्या गुरवाला स्वहस्ते दिलं असंही ऐकिवात होतं. देऊळ खूप जुनं आणि मोडकळीला आलेलं होतं. परंतु ते जुनं असल्यामुळं त्याकाळच्या पद्धतीनं म्हणजे यवनांपासून सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीनं बांधलेलं होतं. अगोदर भर दुपारीसुद्धा देवळात काजळासारखा, गार अंधार असेच. संध्याकाळ पडू लागली की तो अधिक दाट बने. त्यात आणखी एका मोठ्या वटवृक्षानं आपले सहस्र हात पसरून देवावर स्वतःच्या देहाची छाया घातली होती. त्यामुळं सगळीकडंच अंधार घट्ट गोळा होऊन पडे. देवळात दिवा लावण्यासाठी गुरवाला इनाम होतं हे खरं. त्याचे पूर्वज तिथं दिवे लावीत की नाही कुणास ठाऊक. पण सध्याचा विठोबा गुरव आपल्या इनामाला जागत नसे हे उघडच होतं. तिथल्या अंधारात लपून राहण्याऐवजी ही गोष्ट उलट सूर्यप्रकाशासारखी स्पष्ट दिसे. " आमच्यात इमान नसंल, पण इनामही आता ऱ्हायलेलं नाही, दादा " असं म्हणून विठोबा हशावारी नेण्याचा प्रयत्न करी.

पण त्या दिवसाच्या इतमानाला सांजेलशी एक मोठी पणती विठोबानं तयार केली होती. पणतीत लहानशी वात होती आणि थोडंसं तेल शिंपडलेलं होतं.

मारुती पैलवान आणि मंडळी देवळापाशी पोचली तेव्हा तुका आणि त्याचे सगळे लोकही येऊन हजर झाले होते. तुका खुषीत होता. आत्मविश्वास त्याच्या चेहऱ्यावरून नुसता ओसंडत होता. अंधारात तो कोणाला दिसला नाही हे वेगळं.

दोन्ही बाजूंची मंडळी जमली हे पाहिल्यावर विठोबा गुरव लगबगीनं आपल्या

घराबाहेर आला. ' आपण पूजा आणि आरती करणार आहोत, ज्यांनी आत्ता येताना स्नान केलं नसेल त्यांनी आत येऊ नये ' असं त्यानं सांगितलं. त्यामुळं अर्थातच कोणी आत शिरण्याचं धाडस केलं नाही.

मग गुरवानं यथावकाश पूजा केली. घंटा फिरवीत आरती केली. देवळातली एकमेव पणती घेऊन मारुतिरायापुढं ओवाळली. हा सर्व प्रकार इतक्या गडबडीनं झाला की काय झालं हे प्रत्यक्ष भगवंतालासुद्धा कळलं नाही. अविचल नजरेनं तो भक्ताचं कौतुक पाहत राहिला. गदा अजून खांद्यावरच रेललेली होती, आणि हातही उगारलेल्या अवस्थेत कायम होता.

मग विठोबा गडबडीनं बाहेर गेला. वाट पायाखालची असूनही त्याला पणती हातात घेणं भाग पडलं. इतका अंधार. शिवाय गर्दी आत आली म्हणजे कोणाचा पाय पणतीवर पडेल ही भीती होतीच.

पूजा आणि आरती झाली. कौल लावण्याची तयारी आहे असं विठोबानं मंडळींना सांगितलं.

त्याबरोबर मारुती आणि त्याच्याबरोबरचे लोक आत घुसले. मग तुकाच्याही लोकांनी घाई केली. पणती विझू नये म्हणून डाव्या हाताच्या पंजानं ती झाकत गुरव पुढं झाला होता. त्यामुळं नंतर आत आलेल्या तुकाच्या लोकांना काही दिसेनासं झालं. दोघे-चौघे या गडबडीत खालीसुद्धा पडले. एकच कालवा झाला.

पणतीच्या ज्योतीवरचा डावा पंजा अजून तिथंच ठेवीत ' कुणी गोंधळ गडबड करू नये, कोप होईल, ' असं गुरवानं फर्मावलं. ' कोप ' म्हणताच बऱ्याच जणांना स्नान न करता आपण आत येऊ नये या आधीच्या ताकिदीची आठवण झाली. अंग चोरून ते त्यातल्या त्यात मागं उभे राहिले. तुका सावकाश आत आला.

गुरवानं पणती खाली ठेवली. देवाच्या पायापाशी. तेव्हा साहजिकच मूर्तीच्या अंगावर जास्तच अंधार पडला. मूर्ती दिसेनाशीच झाली. अंदाजानं गुरवानं दोन फुलं मूर्तीच्या दोन बाजूंना चिकटवली. देवाची प्रार्थना करून कौल मागितला. ' बरोबरी झाली असेल तर उजवी, तुकाची सरशी असेल तर डावी ' असं म्हटलं. सगळ्यांना डोळे मिटायला सांगितले. आता सर्वांच्या डोळ्यांसमोर आधीपेक्षाही जास्त अंधार झाला.

थोड्या वेळानं गुरवानं परत पणती उचलली. लोकांना डोळे उघडायला सांगितले. फडफडणारी वात डाव्या हाताच्या पंज्यानं सांभाळीत त्यानं देवाच्या मुखाजवळ नेली.

उजव्या बाजूचं फूल पडलेलं होतं. रोकड्या हनुमन्तानं कौल दिला होता. पंचांच्या बाजूनंच आपलाही निर्णय दिला होता. ' तुकाची सरशी झाली नाही, दोघांची बरोबरीच झाली, ' असा रोकडा कौल दिला होता.

" इटुबा परत दाखवा. दिसलं न्हाई. " लोकांनी विशेषतः तुकाच्या मंडळींनी ओरडा केला.

' आपला नाइलाज आहे,' असा आविर्भाव करीत ती फडफडणारी ज्योत गुरवानं

परत देवाच्या मुखाजवळ नेली. डाव्या बाजूचं फूल जसंच्या तसं होतं. उजवं खाली पडलं होतं.

— एवढंच नव्हे, तर देवाच्या उजव्या डोळ्यातून भळाभळा पाणी वाहत होतं. ते पाहून विठोबा गुरव दचकलाच.

घाईघाईनं त्यानं पणती खाली ठेवली. ठेवता ठेवता तो बोलला.

" मारुतरायाचा कोप झाला. घात झाला. देवाबद्दलसुद्धा सौंशय घेनं चांगलं न्हाई. "

देवाचा कोप एवढ्यावरच थांबला नाही. गुरव पणती खाली ठेवत असतानाच तिनं निर्वाणीची फडफड केली. आणि भुईवर टेकताक्षणीच ती गपकन विझली. विझताना मोठी झाल्यामुळं नंतर झालेला अंधार भयानक भासला. सगळे अंधारगुडूप झाले. लोक सगळे चुपचाप उभे होते.

आता मारुतिरायाचा कोप झाला आहे या भावनेनंच सगळ्यांच्या मनावर दडपण होतं. त्यामुळं सगळेच भयभीत झाले होते. आपल्या बाजूनं कौल दिल्याबद्दल देवाचा जयजयकार करायचं भानसुद्धा मारुतीच्या पक्षाला राहिलं नाही.

मंडळी चाचपडत बाहेर पडली. खालच्या मानांनी घरच्या रस्त्याला लागली.

मारुती देवळातून निघाला तो थेट घरी गेला. ताबडतोब काहीतरी गोडधोड देवळात नेऊन हनुमन्ताला नैवेद्य दाखविणं आवश्यक होतं. मारुतीच्या आज्ञाधारक बायकोनं सगळा स्वैंपाक खिरीसकट तयार केला.

नैवेद्याचं ताट घेऊन मारुती जातीनं देवळात गेला. यावेळी त्यानं चांगली भरपूर तेल असलेली पणती देवळात लावली.

हनुमंताला नैवेद्य दाखविला. तो भक्षण करण्याची प्रार्थना केली. भुईला डोकं टेकून नमस्कार केला.

मग इकडं तिकडं कोणी नाही अशी खात्री झाल्यावर तो म्हणाला,

" ए नारा, चल रे लवकर. खाऊन घे. भूक मस्त लागली असंल तुला. "

पणतीच्या उजेडात चाचपडत नारायण गाभाऱ्यातून बाहेर आला. सवयीमुळं त्याला इतका वेळ अंधारात दिसू लागलं होतं. या उजेडानं त्याला क्षणभर दिसेनासं झालं.

" अरे किती वेळ तुला मारुतिराया ? भुकेनं जीव व्याकूळ झाला माझा. ती गदा खांद्यावर धरधरून हात दुखायला लागला. सारं अंग अवघडलं बघ. आन तो गुरव लेकाचा आंधळा तर नव्हे. बेट्यानं कौलाचं फूल लावताना उजव्या डोळ्यात बोटच खुपसलं की रे माझ्या. म्हटलं आता आरपार जातो की काय...... "

— डाव्या हातानं उजवा डोळा चोळत आणि उजव्या हातानं खिरीची वाटी पुढं ओढत नारायण बोलला.

○○○

# एका अलिशान फ्लॅट्ची गोष्ट

'हे बघ शैला, मी तुला प्रार्थना करतो की तू रडू तेवढी नकोस. नाहीतरी मी पाहतोय की 'दुर्वांची जुडी' तुला दाखवल्यापासून तू आपली अष्टांगाची करुनी घडी रडायलाच लागतेस जरा कुणी हूं म्हटलं तरी. अशीच जर का तू रडणार असशील तर 'दिवा जळू दे सारी रात' मी तुला कधीही दाखविणार नाही. आताच बजावून ठेवतोय.'

हे म्हणत असताना आपले कथानायक श्रीयुत वसंतराव हे एका डुगडुगत्या स्टुलावर उभे असून त्यांचा चेहरा घामाघूम झाला होता, त्यांच्या टकलावर केवळ नाराजीनं टिकून राहिलेले तुरळक केसही घामेजले होते. त्यांनी नेहमीप्रमाणं दिवसा पेहेनलेला नाइट-लेंगा त्यांच्या घुमटाकार पोटावरून खाली उतरत त्यांच्या कटिभागावर स्थिर झाला होता. याशिवाय त्यांनी सँडो गंजिफ्रॉकही घातलेला होता. त्यामुळं त्यांचा अवतार एकंदर फार प्रेक्षणीय झाला होता.

वसंतराव स्टुलावर उभे राहून हातातल्या काठीच्या टोकाला बांधलेल्या फडक्यानं बहालाला लोंबकळणारी कोळिष्टकं काढण्याच्या प्रयत्नात होते. काठी बहालाच्या उंचीच्या मानानं आखूड असल्या-मुळं कधी त्यांचा नेम बरोबर लागत होता तर बहुतेक

वेळा चूकत होता. या सफाईअगोदर बरीच कामगिरी सौ. शैलजादेवी यांनी यजमानांकडून करून घेतलेली होती. आणि काही वेळापूर्वी बाईसाहेबांच्या डोळ्यांत जे अश्रू दाटले त्यालाही त्यांच्या मते तसंच कारण होतं.

इतकं सगळं झालं तर एक छानदार, सुंदर झुंबरही बहालाला लटकावून द्यावं अशी त्यांची इच्छा होती. श्री. वसंतराव यांची तक्रार हीच की हे जे ' इतकं सगळं झालं ' तेच मुळात एवढं होतं की ते करता करता त्यांच्या तोंडाला फेस आला होता.

त्याचं असं होतं की श्री. वसंतराव आणि सौ. शैलजादेवी यांना एक कन्यारत्न होतं. आणि या रत्नाला यंदाच्या लग्नाच्या मोसमात कसंही करून खपवून टाकायचंच असा शैलाबाईंनी चंग बांधला होता. रेखाच्या बरोबरच्या सगळ्या मुलींची लग्नं होऊन गेली होती. आणि हिच्या बाबतीत मात्र वसंतरावांनी काहीच खटपट न केल्यामुळं ती लग्नाची राहून गेली होती.

वसंतराव हे मोठ्या मिनतवारीनं कुठल्याशा हपिसात ' क्लास टू ' च्या अभेद्य भिंतीपर्यंत येऊन पोचले होते. त्यांच्याजवळ मायाही तशी फारशी जमलेली नव्हती. आणि ते फारसे महत्त्वाकांक्षी नसल्यामुळं मुलीच्या बाबतीतही त्यांच्या उड्या फार नव्हत्या.

पण हे शैलाबाईंना अर्थातच नामंजूर होतं. त्यांच्या उड्या इतक्या गगनचुंबी होत्या की आपल्या रेखासाठी त्यांनी आकाशातल्या चांदण्या खुडून आणायला वसंतरावांना चंद्रवीरांबरोबर पाठवायला कमी केलं नसतं. शिवाय त्या गरिबीत पडलेल्या असल्या आणि वसंतरावांना म्हणजेच त्यांना फक्त नऊशे रुपये जेमतेम पगार असला तरी ती केवळ एक दुर्दैवाची गोष्ट होती. वास्तविक त्या एखाद्या उद्योगपतीकडंच पडायच्या. पण त्यांचं नकटं नाक आणि त्यांच्या अलौकिक सौंदर्याबद्दल त्या आणि कुठलेसे उद्योगपती यांच्यात झालेला मतभेद या दोन गोष्टी आड आल्या. आपल्याला जे मिळालं नाही ते चि. सौ. कां. रेखा हिला मिळवून देण्यासाठी त्यांनी वसंतरावांची कंबर कसली होती, आणि त्यांचं काहीही असो त्यांचा भाऊराया ऊर्फ दादा हा लक्षाधीश आसामी होता व तो आणि आपण यात त्या साहजिकच काहीही फरक मानीत नसल्यामुळं त्याची मदतही या लग्नाच्या बाबतीत घ्यायचा त्यांनी निश्चय केला होता.

वास्तविक दादासाहेबांच्या सांगण्याप्रमाणं रेखाला पाहायला येणाऱ्या मंडळींना तिच्या मामाकडं बोलावणं हेच शहाणपणाचं झालं असतं. पण हे अर्थातच शैलाबाईंना मान्य नव्हतं. मुलीला पाहायला लोक आमच्याकडंच येणार, आणि तुझ्या इतमामाप्रमाणं त्यावेळी आमचंच घर सजलं पाहिजे असा ठाम निर्णय त्यांनी घेतला. ' तू म्हणशील ते फायनल ' असं दादासाहेबांनी सांगितल्यावर शैलाबाई लगेच कामाला लागल्या होत्या. म्हणजेच त्यांनी वसंतरावजींना कामाला लावलं होतं हे उघड आहे.

गिरगावातल्या कुठल्याशा चाळीत पूर्वीपासून चालत आलेल्या आणि त्यामुळं जुन्या कमी भाड्याच्या चार प्रशस्त खोल्या हे त्यांचं मूळ भांडवल. पण या तुटपुंज्या भांडवलावर त्यांनी कोणाचाही विश्वास बसणार नाही इतका साज चढविला.

विशेषतः बाहेरचा हॉल–ज्याला बसायची खोली म्हणणं हे शैलाबाईंना मुळीच आवडत नसे–त्यांनी एखाद्या यक्षनगरीप्रमाणं बदलून टाकला. हॉलमध्ये असलेली रोडगे यांची मजबूत सतरंजी त्यांनी प्रथम गुंडाळून ठेवून दिली. आणि तिथं दादासाहेबांकडून आणलेले काश्मिरी गालिचे पसरले. हे काश्मिरी गालिचे किमती आणि म्हणून सुंदर होतेच पण त्यात एक बुखाऱ्याहून आणलेला गालिचासुद्धा होता. हॉलची साधी फरशी त्यांनी या गालिचांनी अशी झाकून टाकली. मग हॉलमधलं सगळं जुनाट फर्निचर काढायला लावून दादासाहेबांकडून आणलेले दोन सोफा सेट्स् तिथं मांडून ठेवले. दुर्दैवानं हे भारतात तयार झालेले असले तरी सुदैवानं त्यांच्या किमतीवरून ते विलायतेतून आणलेले असावेत हे कोणालाही पटलं असतं. आणि सोफासेट म्हणजेसुद्धा त्यावरच्या मऊ रेशमी उशा, त्याबरोबर येणारा सेंटर–पीस आणि साइड पिसेस वगैरे सगळं. यानंतर अर्थातच हायफाय रेकॉर्ड प्लेअर आलाच. तो आणि त्याबरोबर घेतलेला जादा रेकॉर्ड स्टँडसुद्धा. दादासाहेबांकडं असलेल्या दोन टी. व्ही. सेट्स्पैकी एक ताईसाहेबांनी आणावा यात काहीच आश्चर्य नव्हतं. आणि त्याप्रमाणं तो त्यांनी आणविलाच. वास्तविक तो कलर्ड टी. व्ही. सेट होता आणि ' इंडिया ' मध्ये कलर्ड टी. व्ही. दाखवायची सोय नसल्यामुळं त्याचा दादासाहेबांनाही सध्या फारसा उपयोग नव्हता. आणि ताईसाहेबांनाही. पण घरात साधा पाच हजार रुपयांचा टी. व्ही. सेट नाही म्हणजे केवढी नामुष्की ! मुलाकडच्या मंडळींना काय वाटेल ? त्यात हा इंपोर्टेड सेट, सुमारे बारा हजार रुपयांचा. त्यामुळं तर अर्थातच शैलाबाईंच्या दृष्टीनं त्याचं मोल वाढलं होतं. पण रेकॉर्ड प्लेअर आणि टी. व्ही. सेट ठेवल्यावरसुद्धा हॉल खूपच ओकाओका आणि रिकामा वाटत होता. तेव्हा त्या जागेत भरण्यासाठी दादासाहेबांचा पियानोसुद्धा आणण्यात आला होता.

' अग शैलाताई हे धूड कशाला न्यायचं तुझ्या घरी ? एक तर ते न्यायला फार त्रास होईल. आदळआपट होऊन त्याची मोडतोड होईल. शिवाय तो आणल्यापासून त्याला कोणीदेखील हात लावलेला नाही. दोनदा रिपेअर करण्यासाठीच काय तो हा पियानो उघडला होता आणि अजूनही तो नादुरुस्त अवस्थेतच आहे. मी रिटायर झाल्यावर कधीतरी वाजविता येईल म्हणून आणला. तुझ्या हॉलमध्ये त्याची नस्ती अडगळच होईल ! ' असं म्हणून ताईसाहेबांना पियानो नेण्यापासून परावृत्त करण्याचा दादा-साहेबांनी कसोशीनं प्रयत्न केला होता. पण अर्थातच ताईसाहेबांनी त्यांना जुमानलं नाही.

' आमच्या इथं तरी कोण वाजवायला बसलंय तुझा पियानो ? पण तो इंपोर्टेड आहे ना ? मग पाहिजेच हो ! मी नीट जपून नेईन आणि जपून आणून परत करीन. मग तर झालं. ' एवढंच त्या म्हणाल्या. आणि पियानोची उचलबांगडी होऊन बाहेरच्या हॉलमध्ये त्याची प्रतिष्ठापना झाली.

आपल्या परदेश–दौऱ्यात दादासाहेबांनी काही किमती आणि मौल्यवान मॉडर्न पेंटिंग्ज विकत घेतलेली होती. त्यांना त्यांची विशेष आवड किंवा समज होती म्हणून नव्हे, तर हॉलच्या भिंतीवर ती इतर लोक लावतात म्हणून. आणि शिवाय आपण तरी

दुसरं काय लावायचं म्हणून. दादासाहेबांच्या कलेक्शनमधून पाच सहा पेंटिंग्ज शैलाबाईंनी आणली होती. यावेळी बहीण–भावांचा फार मनोरंजक संवाद झाला होता.

'केवढ्याला पडली रे ही चित्रं ?'

'दोन हजारांना सहज असतील.'

'सगळी मिळून ना ? तरीही मला वाटतं फारच महागडी हो.'

'सगळी मिळून नव्हे ताईसाहेब. प्रत्येक पेंटिंगला दोन दोन हजार मोजले आहेत. एक तर चार हजारांचं असेल. कुठलं ते नेमकं आठवत नाही मला.'

'अरे, पण एवढी महागडी चित्रं घेतलीस तर एखादं तरी कसल्या सीनचं नाही का घ्यायचं ?'

'शाब्बास ! अग शहाणे, ती सीन्सचीच पेंटिंग्ज आहेत. बहुतेक, मॉडर्न असल्यामुळं ती आपल्याला समजत नाहीत एवढंच.'

'अय्या ! मला माहीतच नव्हतं. पण ही लावायची कशी ते नीट सांगून ठेव बाबा.'

'अग ते तरी कुणाला माहीत आहे ? पहिल्यांदा मी ती माझ्या दृष्टीनं बरोबरच लावली होती. पण मग माझा एक चित्रकार मित्र आला आणि त्यानं ती सगळी उलटी सुलटी आणि सुलटी उलटी करून लावली.'

'मला तर हा फसवेगिरीचाच प्रकार दिसतोय. दोन दोन हजार घेतले मेल्यांनी एकेका चित्राला, निदान कशी लावायची याबद्दल लिहून ठेवायला काय वेगळे पैसे का द्यायला हवे होते त्यांना ?'

'आपलं काय बिघडलं त्यात, उलटी त्यामुळं आपली सोयच नाही का झाली ? वाटेल तशी लावावी. एकदा अशी–एकदा तशी.'

पण चित्रं कशी लावायची हे माहीत नव्हतं म्हणून शैलाबाईंनी ती आणली नाहीत असं नव्हे. भिंतीवरून जी काढणं सोपं होतं तीच त्यांनी साहजिक पसंत केली.

'आता एवढी चित्रं नेते आहेस तर त्यातला एक पुतळाही का नेत नाहीस ? छान दिसेल तुझ्या हॉलमध्ये.'

'ई ऽ ऽ श्‌ ! ते पुतळे म्हणतोस. कसले उघडे नागडे पुतळे. त्यातल्या त्या बाईचा हात तर तुटलेलाच दिसतो आहे. मला नको बाई असलं अभद्र तिथं. इतकी किमतीची चित्रं, त्यात हे हेंगाडं नको.'

'ताईसाहेब काय बोलताय काय तुम्ही ? अहो, त्या पुतळ्यातल्या बाईचा हात नंतर तुटलेला नाही. तुटलेला हात असलेल्या बाईचाच पुतळा आहे तो. तिला व्हीनस म्हणतात आणि किमतीच्या दृष्टीनं म्हणशील तर या पुतळ्याइतकं किमती माझ्याजवळ दुसरं काहीही नाही. इथल्या प्रत्येक गोष्टीपेक्षा तो अधिक मूल्यवान आहे.'

'अय्या ! हे नव्हतं हो माहीत मला. तसं असेल तर मात्र नेईन हो मी तो बाईचा पुतळा.' त्याची किंमत कळल्यावर शैलाबाईंच्या तोंडाला अक्षरशः पाणीच सुटलं आणि कसंही करून तो हॉल सजविण्यासाठी न्यायचाच असं त्यांनी ठरविलं.

‘ ताईसाहेब, एवढंच करा. तो पुतळा जरा जपूनच न्या. नाहीतर त्याचा आणखी एखादा अवयव तोडून पुतळयाची किंमत वाढवून ठेवाल ’ असं हसत हसत दादासाहेबांनी त्यांना बजावलंही पण त्यांचं अर्थातच तिकडे लक्ष नव्हतं.

इतकं झाल्यावर आपल्या ताईसाहेबांची थोडीशी मस्करी करायला कोणाला आवडलं नसतं ? दादासाहेबांनाही तो मोह अनावर झाला.

‘ इतकं सगळं नेते आहेस तर मला वाटतं तेवढ्या सेफचीच कमतरता नको. नाहीतर तेवढ्यामुळंच तुझ्या भावी जावईबुवांची नामर्जी व्हायची. आता फक्त भिंतीत बसविलेली ती सेफ भिंतीसकट तुझ्या घरी कशी न्यायची तेवढाच क्षुल्लक प्रश्न आहे.’

‘ ए, उगीच थट्टा करतोस होय रे ? तुझी सेफ नेऊन मला काय करायचंय ? आणि म्हणे भिंतीसकट न्यावी लागेल ! ’

‘ असं कसं म्हणतेस तू ताई ? अग, दिवाणखान्यातली तिजोरी हा तिथल्या फर्निचरचाच एक भाग असतो. तिच्यामुळं तिथल्या सौंदर्यात भरच पडते. नाहीतर मी कशाला ठेवली असती ? ’

दादासाहेब असं म्हणाल्यावर मात्र शैलाबाईंना वाटलं की कदाचित हे बरोबरही असेल.

‘ पण ती न्यायची कशी हा प्रश्न आहे. ’

‘ ठीक आहे. भिंतीतली सेफ नका नेऊ. दुसरी एक छोटी, हलविता येईल अशी सेफ आहे माझ्याकडे. नेणार का ? ’

‘ हो, का नाही नेणार ? ’

आणि अर्थातच नव्या डिझाइनची ही छोटी सेफ ताईसाहेबांच्या घरी येऊन थडकली.

दादांच्या घरची एक वस्तू मात्र केव्हापासून शैलाबाईंच्या मनात स्वतः होऊनच भरली होती. ती म्हणजे त्यांच्या हॉलमध्ये लावलेलं ते सुंदर झुंबर. शेकडो हिरे, माणकांनी लहडलेलं. एखाद्या बहरलेल्या आंब्याच्या झाडाला आंबे लोंबकळत असावे त्याप्रमाणं दिसणारं. कसंही करून ते आपल्या हॉलमध्ये आणलंच पाहिजे.

आणि डगमगत्या स्टुलावर उभं राहून तोल सांभाळत वरची कोळिष्टकं झाडू पाहणाऱ्या आपल्या यजमानांना हाच महत्त्वाचा मुद्दा पटवून देण्याचा त्या प्रयत्न करीत होत्या. वसंतरावांना न पटणारी कोणतीही गोष्ट पटवून देताना शैलाबाईंना हुकमी रडता येत असे. आणि तेच अस्त्र त्यांनी आत्ता आपल्या यजमानांवर उगारलं होतं.

‘ काही हरकत नाही माझी. नका दाखवू मला ‘ दिवा जळू दे सारी रात ’. मी आपली तशीच रडेन. पण काहीही झालं तरी ते झुंबर मला इथं पाहिजे ! ’ त्यांनी अश्रूंनी भिजलेल्या शब्दात सांगितलं, ‘ येऊन जाऊन एक तर मुलगी. इतरांना चारचार असतात. आणि सगळ्यांची लग्नं ते कशी हौसेनं करतात. तुम्हाला मेली कसली हौसच नाही. आणि माझ्यासारख्या कुणी सुचवलं तर तुम्ही ते थट्टेवारी नेणार. ’

' ठीक आहे. ठीक आहे. चुकलो. आणतो बरं. ते झुंबरही आणतो. मग तर झालं ना ? ' वसंतरावांना आणखी काही ऐकून घेण्याची इच्छा आणि ताकदही नव्हती. हिचं बरंच ऐकून शेवटी जे करायचंच आहे ते सगळं ऐकण्याच्या आधीच केलेलं काय वाईट ?'

आणि अखेर ते झुंबरही येऊन दाखल झालं.

' स्पेन की फ्रान्समधून आणलेलं आहे हो ते. माझ्या काळजाचा तुकडाच असल्यासारखं प्रिय आहे ते मला, जपून लावा, असं दादासाहेबांनी बजावलंय बरं का ' वसंतरावांनी सांगितलं. आणि बरीच खटपट करून त्यांनी ते वजनदार धूड तुळईला टांगलं तेव्हा आपल्या वजनानं तुळईसकट ते कधीही जमीनदोस्त होईल अशी भीती त्यांना वाटत होती.

कसंही असो. ते झुंबर आपला लखलखता पिसारा उघडून मोठ्या दिमाखानं शैलाबाईंच्या हॉलमध्ये मिरवू लागलं हे खरं.

आता हॉलची सजावट अगदी शैलाबाईंच्याही पसंतीला उतरली.

' हुश्श् ! सुटले ग बाई एकदा या सजावटीच्या कटकटीतून, ' त्या म्हणाल्या, ' आता पोरगी एकदा पसंत पडू दे म्हणजे झालं, गंगेत घोडं न्हालं. '

यातलं पुढचंच वाक्य बरोबर होतं. पहिलं खरं म्हणजे वसंतरावांनी म्हणायला हवं होतं. कारण या सजावटीच्या कटकटीतून सुटले होते ते स्वतः

' आता कपडे करायचे आणि मुलीला नटवून थटवून पाहुण्यांची वाट पाहायची एवढंच राहिलं. '

' वाट पाहू आम्ही तुमच्याबरोबर. पण निदान तुमचं नटणंथटणं आणि कपडे करणं एवढं मात्र मला सांगू नका.' वसंतराव आता थोडेसे कावल्यासारखेच झाले होते.

' बरं बरं. चार गोष्टी जरा इकडच्या उचलून तिकडे ठेवल्या तर त्याचं एवढं हे नको आहे बरं करायला. मला ताकद असती तर मी देखील केलं असतं. आपल्या मुलीकरिताच करायचं ना सगळं ? ' शैलाबाईंनी यजमानांना गप्प केलं. आणि त्या पुढच्या कामालाच लागल्या.

बिचारे वसंतराव मात्र आपल्या घामेजलेल्या टकलावरून हात फिरवीत बराच वेळ सोफ्याच्या खुर्चीवर बसून राहिले. दुपारभरच्या कामानं त्यांच्या कंबरेचा काटा अगदी ढिला झाला होता. आणि थोडीतरी विश्रांती घेतल्याशिवाय त्यांना पुढच्या तयारीला लागणं अशक्यच झालं असतं.

बऱ्याच वेळानं मायलेकी नटूनथटून बाहेर आल्या.

' मला वाटतं की तुझ्याकडं पाहिल्यावर आपण कोणाला पाहायला आलो आहोत याबद्दल नाही म्हटलं तरी पाहुण्यांचा थोडा गैरसमज होणं अशक्य नाही. ' वसंतराव म्हणाले. खरं म्हणजे त्यावर त्यांनी आणखी हसायला नको होतं. पण सुदैवानं याचा कोणताही परिणाम शैलाबाईंनी आपल्या कोमल आणि भावनाप्रधान मनावर होऊ दिला नाही. म्हणजे वसंतरावांच्या छद्मी बोलण्यानंतर त्यांना रडायचं नव्हतं असं नव्हे;

पण रडल्यास मेकप खराब होईल अशी त्यांना भीती वाटत होती.

शिवाय वसंतराव म्हणाले त्यात काही चूक नव्हती. दादांकडून आणलेले बहुतेक सगळे दागिने शैलाबाईंनी स्वत: घातले होते आणि रेखासाठी नेकलेसशिवाय आणखी एकदोन किरकोळ असेच दागिने ठेवले होते. साडीसुद्धा त्या अगदी तिच्या तोडीस तोड नेसल्या होत्या.

आपणच दागिने जास्त घातले आहेत हेच योग्य याबद्दल बाईंची खात्री होती. त्या तसं म्हणाल्यासुद्धा.

'करायचे आहेत काय तिला जास्त दागिने घालून ? उगाच मुलाकडच्या लोकांचा गैरसमज व्हायचा. कन्यादान सालंकृत करणार आहोत म्हणून. शिवाय माझी रेखी दागिन्यांशिवायच सुंदर दिसते मुळी ... आणि कम्माल आहे हं बाई तुमची. अज्जून तुमची तयारी नाही ना ? तरी बरं मिठाई वगैरे सगळे खायचे पदार्थ बाहेरूनच आणण्याची व्यवस्था मी केली हो. उठा आता, आणि चांगला सूट घाला ... आणखी महत्त्वाचं म्हणजे त्यांच्याशी नीट बोला. म्हणजे मी आहेच. पण आपल्याला काही कमी आहे असं वाटता कामा नये त्यांना. आपण चाळीत राहत असलो तरी. काय ? इंप्रेशन झकास झालं पाहिजे.'

यानंतर उठून तयार होण्याशिवाय वसंतरावांना गत्यंतर नव्हतं.

थोड्याच वेळात पाहुण्यांच्या स्वागताची जय्यत तयार झाली. पण आनंदाची आणि आश्चर्याची गोष्ट अशी की अशा प्रसंगी मुद्दाम जरा उशीरच करून येण्याची जी पद्धत असते तसं या लोकांनी केलं नाही. खरं सांगायचं तर वेळेच्या आधीच आले ते. खेदाची गोष्ट एवढीच होती की त्यांच्याबरोबर कोणी बाईमाणूस तेवढं दिसत नव्हतं. म्हणजे शैलाबाईंनी केलेला थाटमाट अर्धा अधिक फुकटच गेला होता म्हणायचा. तेवढ्यात वसंतरावांजवळ त्या हळूच कुजबुजल्यासुद्धा.

'भायखा माणसं खुणी खशी धिसत नाहीत ?'

'अग हे बडे धंदेवाईक लोक. आले असतील परस्पर कारखान्यातून. यांना काय एक काम असतं का ? बायका परत येतील. त्यात काय एवढंसं ?' वसंतरावांनी बायकोचं कसंबसं समाधान करण्याचा प्रयत्न केला. पण तेवढ्यात पाहुणे जवळ येऊन ठेपलेसुद्धा.

'ओः ! हाऊ डु यु डू मिस्टर भडभडे. वी आर सॉरी टु बार्ज इन लाइक धिस ...' आलेल्या तिघातला प्रौढ वयाचा माणूस म्हणाला. त्याच्याबरोबर आणखी एक प्रौढ माणूस आणि एक काळसर पण तरतरीत दिसणारा तरुण होता. हेच अर्थात जावईबुवा. काळा आहे थोडा, पण तरतरीत आहे.

'असं कसं म्हणता साहेब ? या या ! वेलकम ! बसा. डू सिट डाऊन प्लीज. मी पंखा सोडतो हा जरा.'

'वाः ! कूलरही दिसतोय तुमच्याकडं ?' त्या प्रौढ माणसानं विचारलं.

'हॅः हॅः हॅः, म्हंजे काय मला कूलरच आवडतो बुवा. त्यामुळं जास्त थंड वाटतं.

नाही ? फॅन्स मेक टू मच नॉइज म्हणून घेतला हजाराला. हंः हंः, आणि या आमच्या मिसेस बरं का. आणि ती डॉटर. ओन्ली डॉटर ... ' आपण किती मुलायमपणं कृत्रिम हसू शकतो याचं कौतुक करीत वसंतराव बोलले.

' हजार कुठचे आलेत हो. पंधराशे पडलेत त्या कूलरला. इंपोर्टेड आहे ना ! '

' असं का ? वा वा ! आणखी बऱ्याच वस्तू इंपोर्टेड दिसताहेत. नाइस. हा टी. व्ही. सेट छानच आहे. '

' हो ना ! कलर्ड आहे. फार नाही. बाराला बसला. ट्वेल्व्ह थावजंड ओन्ली. म्हटलं असू द्यावा आपल्याकडं. इंडियात सुरू होणारच कधी ना कधीतरी. म्हंजे ब्लॅक अँड व्हाइटही आहे. पण हंः हंः हंः ... '

' हो आहे ना. पण तो किनई दुरुस्तीला टाकलाय. साडेचार पडले होते त्याला. म्हणजे साडेचार हजार ... ' मध्येच बोलायची संधी शैलाबाई कशी दवडतील ?

' ओ ऽ आय सी, आय. सी. आणि रेडिओग्रॅमही दिसतो आहे. ब्युटिफुल पीस बरं का. इंपोर्टेडच दिसतोय. '

' इंपोर्टेडच नाहीतर काय ? आपल्याकडं होत नाही असा माल तयार. म्हंजे काय तेवढी क्वालिटीच नाही ना. म्हणून हा इंपोर्टेड घेतला. हाय फायडेलिटी जॉब. माझं काय आहे एक वीकनेस की आपल्याला सगळं बेस्ट लागतं. बेस्ट इन द मार्केट. प्राइस इज नो प्रॉब्लेम ... '

' वा वा वा ! फार छान ! पण केवढ्याला पडला ? '

' नक्की आठवत नाही. पण एट थावजंड तरी असणार. आठ हजार. पण बिल्ट इन रेडिओ, टेपरेकॉर्डर सगळंच आहे त्यात. ऑल इन वन ... हंः हंः हंः ...'

' छान छान ! एक्सलंट ! आणि हे रग्ज ... गालिचे. टॉप दिसतायत अगदी. '

' येस, येस. अगदी प्युअर काश्मीर बरं का. आणि तो सेंटरला आहे तो तर बुखाऱ्याचा आहे हां. पाच हजाराला बसला ... '

' बुखाऱ्याचा म्हणजे इंपोर्टेडच नाही का ? ग्रेट बरं का, ग्रेट ! आणि तो तिकडच्या कोपऱ्यात पियानो दिसतोय ? '

' येस ऑफ कोर्स. उत्कृष्ट पीस बरं का. वाजवत असे मी एकेकाळी. पण आता या ऑफिसच्या कामापुढं हो ! – बिलकुल वेळ होईल तर शपथ. आता मिसेस वाजवतात. आणि ऑफ कोर्स माय डॉटर प्लेज व्हेरी वेल इंडीड ... दहा हजाराला पडला. इटलीतनं आणला खास. मोझार्टचा हात एकदा लागला होता त्याला म्हणे ! ... '

' ओः ग्रेट ! यू आर लकी मिस्टर भडभडे आय मस्ट से. पिॲनो विथ द मोझार्ट टच ना. वा वा वा, फाइन ! '

' तशी माझी हॉबी म्हणाल तर पेंटिंग बरं का. आय विल रिटायर विथ अ ब्रश इन हँड. म्हणूनच ही पेंटिंग्ज मुद्दाम आणली. टु टु थावजंड तरी पडलेच प्रत्येकाला ...'

' त्या मानानं किंमत फार नाही ... '

‘तसं त्यातल एक फोर थावजंडचंही आहे. पण गंमत काय आहे की इंडियात मॉडर्न आर्ट कळतेय कुणा लेकाला ? अहो, ही चित्रं उलटी की सुलटी टांगायची हेसुद्धा कळत नाही अनेकांना ... ’

‘राइट राइट, आणि खालून वर पाहायची की वरून खाली तेसुद्धा. करता काय हो आपल्या पब्लिकच्या इग्नरन्सपुढं ? ’

‘हो ना ! पुअर कंट्री अँड पुअर पीपल. पण आपल्याला काय राहवतंय का हॉबीवर खर्च केल्याशिवाय ? ’

‘ओः मिस्टर भडभडे, दॅट शँडेलियर ओव्हरहेड इज द मोस्ट एक्सक्विझिट पीस आय हॅव एव्हर सीन ... ’

‘ओः दॅट ! म्हणजे ते झुंबर म्हणताय ना ? फॅटॅस्टिकच आहे ते. आपल्या लोकांना कळतच नाही किती अलौकिक वस्तू आहे ती. ऑक्शनमध्ये घेतला तो पीस लिलावात ... ’

‘लिलावात घेतला असला तरी इंपोर्टेडच बरं का ! ’ मध्येच शैलाबाईंनी सांगितलं.

‘इट हॅज गॉट टु बी इंपोर्टेड. अहो, फक्त व्हर्सायच्या पॅलेसमध्येच आहेत अशी शँडेलियर्स. म्हंजे आय हॅव सीन देम विथ माय ओन आइज्’ तो तरतरीत तरुण म्हणाला.

‘पण काय हो, इट मस्ट हॅव कॉस्ट यू अ फॉर्च्यून. ’

‘फॉर्च्यून नाहीतर काय ? फिफ्टी थावजंड बक्स. पन्नास हजाराला एक पैसा कमी नाही. पण म्हटलं आपल्यावर तरी काय रिस्पॉन्सिबिलिटीज् आहेत एवढ्या ? ही एवढी मुलगीच फक्त. ओन्ली धिस मॅरेजेबल डॉटर ... मग काय आम्ही दोघंच. हजबंड अँड वाइफ. तेव्हा घेऊन टाकलं झालं ... ’

‘नाही पण मला आश्चर्य वाटतं की तुम्ही चाळीतल्या या चार खोल्यांत राहता हे कसं ? ’

‘बरेच लोक विचारतात बरं का. पण त्याचं काय आहे ओल्ड ॲटॅचमेंटस् असतात ना ? म्हंजे काय आहे की आय वॉज बॉर्न इन धिस व्हेरी ब्लेसेड चॉल. या चाळीतच माझा जन्म झाला. इथंच सगळं बाळपण गेलं ... ’

‘पण तसं असलं तरी बाहेर एखादा ओनरशिप फ्लॅट् असणारच. ’

‘येस ऑफ कोर्स. एक का दोन आहेत. एक नेपिअर सी रोडवर आहे आणि एक कंबाला हिलवर ... ’

‘दॅट्स इट. तरी मी म्हटलंच, आपल्यासारखा शौकीन असल्या चाळीत कुठून राहायला ? बरेच पैसे द्यावे लागले असतील नाही या फ्लॅटस्ना ? ... ’

‘होय हो. प्रायसेस पाहिल्यात ना ? काय स्काय रॉकेट झाल्या आहेत त्या. एकाला तीन आणि दुसऱ्यात काहीतरी चार पडले वाटतं ... ’

‘ओ आय सी. आय सी. यू मस्ट बी अ लकी वन इंडीड. लकी आणि रसिकही ... ’

'कसचं कसचं. पण थँक्स हं ...'

'वा वा माझं लक्षच गेलं नव्हतं हा अजूनपर्यंत, सॉरी हं, तुमच्या त्या छोट्या सेफकडं. यू मस्ट एक्सक्यूज मी. आतल्या दागिन्यांपेक्षाही जास्त किमती वाटतं.'

'इतकी नाही. पण तसं पाहिलं तर खूपच कॉस्टली बरं का. आजकाल मिळतच नाहीत. पण निदान सेवन टु एट पडत असलेच पाहिजेत तिला.'

'सात आठ हजार ? माय हेवन्स ! म्हंजे इतक्या मूल्यवान तिजोरीतले दागिने किती मूल्यवान असणार हो.'

'कसचं. कसचं. अहो, आहेत ते सगळे मिसेस आणि मुलीनं घातलेच आहेत. आणि आजकाल असल्या तिजोऱ्यांचा काय उपयोग ? एव्हरी लिटल थिंग हॅज टु गो टु द सेफ डिपॉझिट व्हॉल्ट. काय ? ... अरे, पण या लोकांना चहाला इतका वेळ का लागला ? आलोच हां मी. जस्ट ए सेकंड. माय डॉटर, म्हंजे माझी मुलगीच चहा घेऊन येईल. यू कॅन आस्क हर एनी क्वश्चन्स इफ यू प्लीज ...' असं म्हणून वसंतराव स्वयंपाकघरात गेले. आपण नुसतेच या लोकांशी बडबडत बसलो आणि चहाची चौकशी केली नाही याबद्दल नंतर बाईसाहेबांची बोलणी खायला नकोत म्हणून.

पण आत काही सूचना घेऊन आणि काही देऊन वसंतराव परत बाहेर आले तेव्हा हॉलमधला सर्व सीन बदलला होता.

ते हॉलमध्ये येताच तो प्रौढ गृहस्थ एकदम उठून उभा राहिला.

'डोंट बॉदर अबाउट द टी मिस्टर भडभडे. वी आर ऑन ड्यूटी. मी इन्कम-टॅक्स कमिश्नर मल्होत्रा. हे दोघं कृष्णस्वामी आणि बोबडे. दोघंही आयकर खात्याचे अधिकारी आहेत. मला वाटतं तुम्ही अगोदरच खूप बोलला आहात. यू हॅव टॉक्ड टू मच ऑल रेडी. आय ॲम सॉरी. पण तुमच्या या वस्तूंतल्या काही मला घेऊन जाव्या लागतील. हे तुमचं झुंबर, ही पेंटिंग्ज, तो पियानो, ती छोटी सेफ, व्हीनसचा तो सुंदर पुतळा. आणि माफ करा, पण तुमच्या मिसेसचे दागिनेसुद्धा. तुम्हाला सगळ्यांची रिसीट मिळेल. आणि ही माझी नोटीस. हे समन्स आहे. उद्या सकाळी साडेदहा वाजता माझ्या ऑफिसात हजर राहण्याबद्दल. येताना सगळी बॅंक बुकं आणायला विसरू नका. अर्थात तुम्ही आतापर्यंत दिलेल्या कोऑपरेशनबद्दल आय ॲम ग्रेटफुल.'

कमिश्नरसाहेब फाडफाड नुसते बोलतच होते. वसंतरावांना त्यांनी एक अक्षरही मध्ये बोलू दिलं नाही. आणि बोलू दिलं असतं तरी काय म्हणा. वसंतराव अवाकच झाले होते.

मग तो तरुण ऑफिसर बाहेर गेला. आणि त्यानं बाहेरच्या कुणाला तरी खूण केली. त्याबरोबर चारपाच लोक एकदम हॉलमध्ये घुसले आणि काश्मिरी गालिचांपासून सगळ्या वस्तू त्यांनी उचलून बाहेरच्या गाडीत नेऊन ठेवल्या.

जितक्या वेगानं त्या आल्या त्यापेक्षाही अधिक वेगानं त्या तिथून नाहीशा झाल्या.

नंतर लगेच मल्होत्रासाहेब वसंतरावांकडं वळले.

'सॉरी टू मिस युअर नाइस टी मिस्टर भडभडे. पण थँक्यू नेव्हर द लेस. उद्या आपण भेटूच. गुड ब्राय ... उद्याचं विसरू नका.'

कमिश्नर मल्होत्रासाहेब आणि त्यांच्या बरोबरचे दोघे अधिकारी निघून गेले. त्याला पाच मिनिटंही झाली असतील नसतील. भडभड्यांच्या बंद दारावरची बेल नेहमीच्या मंजुळपणानं वाजली.

आणि धडधडत्या छातीनं व कापऱ्या हातानं वसंतरावांनी जेव्हा दार उघडलं तेव्हा नटलेल्या बायका पुरुषांचा एक लहानसा घोळका त्यांच्या समोर उभा होता. त्यातला एक प्रौढ माणूस पुढं होऊन हात जोडीत म्हणाला,

'नमस्कार हां मिस्टर भडभडेसाहेब. आणि माफ करा. आम्हाला यायला नाही म्हटलं तरी थोडा उशीरच झाला ...'

# गोष्ट: माझी आणि अप्पासाहेबांची

स्वतःची प्रौढी उगाच लोकात सांगू नये असं म्हणतात. कोण्या शहाण्याचे हे उद्गार आहेत कुणास ठाऊक. पण ते शहाण्याचेच उद्गार होत आणि त्यामुळं ते खरे असले पाहिजेत असं आमचे तीर्थरूप म्हणत असत. ' तुझ्या हातून प्रौढी मिरविण्यासारखी एखादीसुद्धा गोष्ट होईल अशी भीती मला वाटत नाही म्हणा. पण चुकून झालीच तर लक्षात ठेव. उगाच सगळीकडं सांगत सुटायचं नाही. लोकच काय स्वतः होऊन म्हणतील ते खरं ' असं त्यांनी मला अनेकदा बजावलं होतं. माझ्या बाबांचं ते वाक्य मी प्रमाण मानलं आणि त्यामुळंच आजवर स्वस्थ बसलो.

मराठी साहित्यात एवढे मोठे पराक्रम मी आजवर केले आहेत, पण त्यांच्याबद्दल एक अवाक्षर-सुद्धा मी कोणाजवळ आजपर्यंत बोललेलो नाही. असल्या गोष्टी आपण केल्या असल्या आणि भले त्या चार-चौघांना सांगितल्या तरी आम्री या लोकांचा त्यावर विश्वास बसत नाही, आणि उगाच आपलं हसं मात्र होतं.-निदान अशी अगदी कालपरवापर्यंत माझ्या मनाची अगदी घट्ट समजूत होती.

पण आता मात्र मी ठरवलं आहे की गप्प नाहीच बसायचं. नाही म्हणजे का गप्प बसावं मी ? एवढे पराक्रम मी जर खरोखरच केले आहेत तर ते

सांगून टाकायला हरकत कसची ? म्हणून मी ठरवूनच टाकलं आहे की विश्वास ठेवा अगर ठेवू नका, सांगून टाकायचं, हसलात तर हसा. माझी हरकत नाही. कारण आमच्या बाबांनी सांगितलेलं आणखीही एक माझ्या लक्षात आहे ना. 'जो हसेल त्याचे दात दिसतील.' तेव्हा हसायचं असलं तरी जरा जपूनच. विशेषतः दात आर्टिफिशिअल असले तर अधिकच. उगाच कवळी खाली पडून फुटायची.

मला अगदी सहज साध्य असलेली गोष्ट म्हणजे मला कादंबऱ्या चुटकीसरशी लिहिता येतात ही नव्हे. कादंबरी लिहिणं ही तर मला अगदी क्षुल्लकच गोष्ट वाटते. म्हणजे काय आहे की माझ्याकडं कादंबऱ्या तयार करण्याचा एक मोठा साचा आहे. तर मी काय करतो की शब्दकोशातले काही हजार शब्द गोळा करतो, ते शाईत थोडे भिजवून या साच्यात ओततो. आणि मग हा साचा थोडा वेळ उन्हात नेऊन ठेवतो. दहा पंधरा मिनिटांत तो वाळला रे वाळला की कादंबरी तयार. आहे काय न् नाही काय ! पण या लेखनकामाला मी फारसं महत्त्व देत नाही. तो माझा पोटापाण्याचा धंदा आहे !

पण माझा खरा पराक्रम हा की मी दुसऱ्या लेखकांच्या कादंबऱ्यांत जाऊन अचाट गोष्टी करू शकतो. तुम्हाला कल्पना नसेल पण भाऊंच्या अनेक कॅरेक्टर्सना मीच सरळ बोलायला शिकवलं. आता तुम्ही विचारणारच की हे भाऊ कोण ? तर हे भाऊ म्हणजे अर्थातच पानपतावर नाहीसे झालेले सदाशिवरावभाऊ नव्हेत. हे आपले साधेच भाऊ-साहेब. आता तुम्हाला माहीत असेलच. या भाऊसाहेबांच्या कॅरेक्टर्सना सुरवातीला मुळी धड बोलताच येत नसे.अहो, उपमा काय उत्प्रेक्षा काय, कशाचा कशाचा पत्ता नाही. कोणी त्या वापराव्या याला काही ताळमेळच नाही. नायक–नायिकेपासून तो रामा गडी, सखू मोलकरणीपर्यंत सगळ्यांच्या आपल्या उपमा आणि उत्प्रेक्षा. सखू मोलकरीण भांड्यांची आदळआपट करते आणि त्यांना पोचे आणते. पण बाईंनी त्याबद्दल काही तक्रार केली तर त्यांचा एक शब्दही खाली पडू देत नाही. ती म्हणते, " जीवन हे असंच नाही का ? पोचे आलेल्या भांड्यांसारखं ! जीवनसंग्रामात आपण जे टक्केटोणपे खातो त्यामुळं आपल्या मनाला असेच पोचे नाही का येत ? " रामा गडी भाजीला दिलेल्या पैशातून दररोज विडी काडी एवढंच नव्हे, तर चहा 'पाणी' इत्यादींसाठी होणाऱ्या स्वतःच्या खर्चाचे पैसे बाजूला काढून ठेवतो. पण बाईसाहेब किंवा बुवासाहेब त्याला एखाद दिवशी बोलले, अगदी टाकून बोलले तरी भाऊसाहेबांचा हा रामा असला काही आसुरी सूर लावतो विचारू नका. " जीवन हे असंच नाही का बाईसाहेब, (किंवा साहेब) आपली वंचना, प्रतारणा होत आहे असं आपल्याला सारखं वाटत असतं. पण जीवन हे खरं म्हणजे किती निर्मळ असतं–सनलाइटनं धुतलेल्या कपड्यासारखं. जीवनाकडे आपण जसं पाहू, ज्या चष्म्यातून पाहू तसं ते आपल्याला दिसतं. रंगीत चष्मा वापरलात तर रंगीत. पिवळा वापरलात तर पिवळं दिसतं–कावीळ झालेल्या माणसासारखं. बरं मी आता जातो. शेजारचा गोविंदा मला पान खायला बोलावतो आहे. जीवनाची हाक ही अशीच नसते का ? "–आता या असल्या मूर्खपणावर बाई किंवा बुवासाहेब यांनी तरी

काय बोलावं ? माणसासारखं बोलावं. पण छे, ते कसं शक्य आहे ? कारण ही भाऊसाहेबांचीच कॅरेक्टर्स पडली ना सर्व ! आमच्या बाईसाहेब यावर रामाला म्हणतात, " खरं आहे रामा तू म्हणतोस तेच. आम्ही आपले चष्मे बदलून घेतले पाहिजेत हेच खरं. मंडईतून तू आणलेला नारळ मला लहान वाटतो आणि तुला मोठा वाटतो. जीवन हे असंच नाही का ? विवेकानंद, लोकमान्य टिळक, स्टीफन झ्वाइग, अर्न्स्ट टोलर यांना ते मोठं दिसतं, तर आमच्यासारख्यांना ते लहान, क्षुद्र दिसतं. पण यात नवल ते काय ? बरं तू आता जा. गोविंदाच्या हाकेला 'ओ' दे. जीवनाच्या बाबतीतही हेच खरं नाही का ? त्याच्या हाकेला आपण वेळेवर 'ओ' दिली नाही तर कसं चालेल ? मीही तुला हाका मारीन नंतर. पण माझ्याकडं आपला बहिरा कान फिरवू नकोस. जीवन कित्येकदा आपल्या हाकांकडे फिरवतं तसा. "

..." अरे अरे अरे, हा काय प्रकार काय आहे ? " मी ओरडलोच. " ही काय तुमची संभाषणं आहेत की चेष्टा आहे ? " राम्याला बोलावून मी ऐसाजे दम दिला आहे की विचारू नका. पण तसं कशाला ? आमचा संवादच तुम्हाला थोडक्यात सांगतो.

" रामाऽऽ " मी कडाडलो.

पण तो गात असल्यामुळं त्याचं माझ्याकडे लक्ष नव्हतं. म्हणून मी मोठ्यांदा ओरडलो, तेव्हा तो एकदाचा माझ्यासमोर येऊन उभा राहिला.

" जीवनाचं गीत असंच तुटत नाही का अधूनमधून ? " रामा म्हणाला.

" रामा...ही बडबड बंद. आजच नव्हे तर रोजही. लक्षात ठेव. तुला ही नोकरी करायची आहे की नाही ? " मी त्याला खडसावलं. यामुळं तो काहीसा भानावर आला.

" जी साहेब पण जीवनात..."

" शटप्, परत जीवन हा शब्द तुझ्या तोंडातून निघू दे. याद राख. या घरात माणसासारखं बोलायचं. लक्षात ठेव. जीवनावर तुला जी बडबड करायची असेल ती तिकडं भाऊसाहेबांकडे—इथं नाही, काय समजलास ? जीवन म्हणजे काय हे समजण्याची अक्कल तरी आहे का तुला ? अरे लेका, ते मलाही कळलं असं मी म्हणत नाही. पण तुझ्या भाऊसाहेबाला तरी काय कळतंय कुणास ठाऊक ? म्हणून परत सांगतो, 'जीवन' हा शब्द जर का तुझ्या तोंडून परत ऐकला तर प्रत्येक वेळी पंचवीस पैसे कापून घेईल तुझ्या पगारातले. काय समजलास ? माझ्यापुरतं जीवन म्हणजे काय हे समजायची अक्कल मला परमेश्वरानं दिली आहे. ती तू शिकवायची गरज नाही. चल जा. कामाला लाग."

रामा गडबडला सुरुवातीला हे खरं, पण मग अगदी सरळ आला—सुतासारखा. जीवनासारखा नव्हे ! सखू मोलकरीण तर ताबडतोब सुधारली. या जीवनाला ती मुळातच खूप वैतागली होती. हां हां म्हणता ती माणसासारखं बोलायला लागली.

भाऊसाहेबांच्या कादंबऱ्यांत मी आणखी खूपच गंमती—जमती केल्या. भाऊसाहेबांनी खूप कादंबऱ्या लिहिल्या—असं निदान भाऊसाहेबांना वाटतं. मला तसं मुळीच वाटत नाही. त्यांचा आवडता उपमा हा अलंकार माझ्या वाक्यात मला घालायचा असला

तर मी म्हणेन की भाऊसाहेबांनी खरं म्हणजे एकच कादंबरी लिहिली आहे, हिंदी सिनेमे खूप झालेले असले तरी मुळात जसा एकच हिंदी सिनेमा आहे त्यासारखंच हे. या कादंबऱ्यांची गंमत अशी की यांतले सगळे नायक गरीब, नायिका श्रीमंत–पैसेवाल्या, यामुळं काय व्हायचं की या नायकांना समाजवाद, समता इत्यादी नाणी खुळखुळावून गळा काढायला भलतंच फावायचं. म्हणून मी काय गंमत केली की भाऊंच्या पहिल्या कादंबरीतल्या नायकाला लॉटरीचं बक्षीस देऊन मी एका रात्रीत लक्षाधीश बनवून टाकलं. यांचे सगळे नायक सारखेच–दरिद्री. त्यामुळं काय मजा झाली की एक नायक श्रीमंत होताच सगळेच श्रीमंत झाले. आणि ताबडतोब यांची समाजवाद वगैरेची बडबड बंद. यामुळं जो काही घोटाळा उडाला तो विचारूच नका. श्रीमंत नायक, श्रीमंत नायिका यांची फर्स्टक्लास प्रेमं जमली आणि भाऊसाहेब आपले बसले हाका मारीत, 'जीवन जीवन' म्हणून. इकडं बिचाऱ्या जीवनानंही 'भाऊ भाऊ' करीत प्राण सोडला ! हजारो वाचक माझ्यावर खूष झाले.

– पण भाऊंच्या आणखी गंमती नाही सांगत बसत. इतर आणखी गंमती सांगितल्या पाहिजेत.

आपले कविवर्य माधवरावच घ्या. म्हणजे त्यांच्या कविता घ्या. यांच्या कवितातल्या नायक–नायिका बेट्या काय करायच्या की रात्रंदिवस एकमेकांसाठी नुसत्या झुरत बसायच्या. बस् झुरणं उसासे, अश्रू–काही विचारू नका. याला माधवराव 'प्लेटॉनिक लव्ह' म्हणत आणि हे काहीतरी नवीन विलायती टॉनिक असावं असं समजून सगळेच गप्प बसत. पण मी कसला खमंग ! मी काय साहेबी टॉनिकला दाद देतोय. सरळ गेलो. या नायक–नायिकेला गाठलं आणि त्या नायकाला बखोटीला धरून विचारलं,

"काय रे लेका, या ठकीवर तुझं प्रेम आहे ना ?" तो रडण्याच्याच बेतात होता, पण मी म्हटलं, "खामोष. रोनेका काम नाही. तुझं या ठकीवर प्रेम आहे की नाही बोल. माझ्यासमोर रडत बसायला मी माधवराव नव्हे !"

हे काही वेगळंच प्रकरण आहे असं त्या नायकाच्या ध्यानात आलं.

"होऽय. आहे." तो लाजत म्हणाला.

"हॅत्तीच्या, एवढंच ना. मला वाटलं की तिचं तुझ्यावर प्रेम आहे, पण तुझं नाही म्हणून रडतोयस तू. अरे तुमचं एकमेकांवर प्रेम असेल तर रडत काय बसलात लेको ? चला, माझ्याबरोबर."

—आणि लगेचच्या मुहूर्तावर मी त्यांचं लग्नच लावून टाकलं. 'नांदा सौख्यभरे' चला. पळा इथून.' त्या दोघांना मी म्हटलं. बोला आता, लग्न झाल्यामुळं ती दोघं दुःखी झाली असतील. पण माधवरावांच्या काव्याच्या वाचकांनी मला केवढा दुवा दिला बरं !

काव्याच्या प्रांतात मी केलेल्या गमतीजमतीचं हे केवळ एक उदाहरण हो. इरेस पडलो तर काय करू शकतो हे आपल्या नवकवींना मी चांगलंच दाखवून दिलं. उदाहरणार्थ, मी त्यांच्या कवितातल्या मात्रा–गण–वृत्तं या गोष्टीच पळवून नेल्या. ही हत्यारं

मी पळवल्यामुळं त्यांचं सुतारकाम बंद पडलं की काय असंच वाटू लागलं होतं. आता या बाबतीत मला निराशा पत्करावी लागली हे सोडून द्या. पण आमचे बाबा म्हणत त्याप्रमाणे ' यत्न तो देव जाणावा ' यावर आमचा ठाम विश्वास. कित्येकदा तर मी नुसती ही हत्यारं पळवूनचं नाही थांबलो, तर एकेका कवितेच्या ओळीसुद्धा मी पळवल्या. यांच्या कित्येक कविता तीन पायांवर लंगडत राहिलेल्या दिसतात त्या उगाच का ! अर्थात आपल्या कवितांतल्या मोकळ्या जागा याच अधिक आशयघन इत्यादी इत्यादी म्हणून या मंडळींनी त्यातूनही पळवाट काढली हे खरं. अहो, एकदा तर एका नवकवीनं आपल्या हस्तलिखितांचा ठोकळा माझ्याकडं फेकून माझ्या पायाचा अंगठा जायबंदी करून टाकला होता. पण आपण नाही हरलो. एकदा तर एका नवकवीला मी चक्क चिमटीत पकडलं आणि त्याला आमच्या लायब्ररीमध्ये मराठीच्या कपाटात ज्ञानेश्वर आणि तुकाराम यांच्यामध्ये बरेच दिवस कोंडून ठेवलं. नवकविता तुम्ही जर बारकाईनं वाचल्या असतील तर याचा सुपरिणाम तुमच्या लक्षात आला असल्याशिवाय राहिला नसेल !

नवकवींची थोडी मौज केल्यावर मी आपल्या काही रडाऊ नाटकांकडं वळलो. ' सोडतो हा फूल–पुडी ' किंवा ' तुकडे करायचेत् मला ' या दोन नाटकांत तर मी स्वतः खूपच कामं केली म्हणजे मी स्वतःच ही ' फूल–पुडी ' सोडली आणि त्यातली नीरांजनं, तबकं, समया, पणत्या, रांगोळीचं सामान, उदबत्त्या आणि त्यांची घरं, देवांच्या तसबिरी या सर्व वस्तू हां हां म्हणता लंपास केल्या. एवढंच नव्हे तर या नाटकातलं भलं मोठं तुळशीवृंदावन आतील तुळशीसकट मी रातोरात एकट्यानं हलवलं. म्हटलं ' आता बसा लेकाच्यांनो रडत.' प्रेक्षकांना रडविण्यासाठी या वस्तूंचा ' भयंकर ' उपयोग होतो हे मला माहीत होतंच. त्यामुळं त्यादिवशी फूलपुडी पाहताना या गोष्टी स्टेजवर न दिसल्यामुळं प्रेक्षकांच्या हसून हसून मुरकुंड्या वळल्या. ' तुकडे करायचेत मला ' मध्ये तर मी वेगळीच गंमत केली. या नाटकातील वहिनी म्हणजे साक्षात कारुण्यमूर्ती. त्या स्टेजवर आल्या की सर्वत्र रडारड. म्हणून मी काय केलं की तडक स्टेशनावर गेलो. वहिनींच्या माहेरचं तिकीट काढून आणलं आणि त्यांना माहेरच्या गावी जाणाऱ्या गाडीत बसवून दिलं. वहिनींना काय माहेरी जायला हवंच होतं. त्या मुकाट्यानं गाडीत बसून निघून गेल्या. ' माझ्या माहेराची ट्रेन तिच्या डब्यात फूड–ग्रेन माझा भाऊराया ब्रेन स्पेश्यालिस्ट ' एवढं गाणं मात्र त्यांनी जाताना चांगलं सात–आठ मिनिटं घोळून घोळून म्हटलं आणि पदरानं डोळे टिपीत त्या गाडीत जाऊन बसल्या. एवढं सोडलं तर नंतर नाटकात खूपच मजा आली. वहिनीच नसल्यामुळं नाटकातले भावोजी आणि वन्स; सूनबाई नसल्यामुळं मामंजी आणि लक्ष्मी नसल्यामुळं त्यांचे विष्णुपंत यांना नाटक सुरू झाल्यावर हसावं की रडावं हेच कळेना.

' लहान तोंडी मोठा घास घेऊ नये ' असे म्हणतात हे खरं. पण दुसऱ्याच्या लेखनात मुलुखगिरी करण्याचा अवखळपणा मी खुद्द आचार्यांच्या बाबतीतसुद्धा केला. आचार्यांचे अग्रलेख इतके पॉवरफुल का झाले तुम्हाला माहीत नसणार. पण त्यांचे

आधीचे आणि नंतरचे लेख पाहिलेत तर लक्षात येईल. नंतरच्या लेखांत जागोजाग तुम्हाला ' हरामखोर, ' ' फटके मारले पाहिजेत, ' ' चांडाळ. ' ' रौरव नरकात पडेल ' ' नराधम ' असे पॉवरफुल शब्द सापडतील. या शब्दांचे प्रमाण वाढवून त्यांचा इफेक्ट वाढविण्याचं काम कुणाचं म्हणता ? माझंच. ' मोरारजी ' या नावावरून सुचलेला ' मोरावळा ' हा शब्द मी त्यांना सांगितला तेव्हा तर ते दोन दिवस सारखे हसत होते ... आणि त्यांचं इकडे लक्ष नाहीसं पाहून मीसुद्धा ' हरामखोर ' आणि ' चांडाळ ' हे शब्द आणखी चारपाच ठिकाणी पेरले आणि ' फटके मारले पाहिजेत ' या वाक्याच्या सुरुवातीला ' लाखो ' हा शब्द टाकला.

असो. तर ही प्रस्तावनाच खूप लांबली. ' मिया मूठभर आणि दाढी हातभर ' असं करणं चांगलं नव्हे, हा आमच्या तीर्थरूपांचाच उपदेश. म्हणून आता आप्पा-साहेबांकडंच वळलेलं बरं. कारण ती गंमत सांगायची हाच तर माझा मुख्य हेतू.

आप्पासाहेब हे माझे फार आवडते लेखक बरं का. कसं छान छान, गोडगोड लिहितात. यांच्या कादंबऱ्यांत आपलं सगळंच गोड. अपघात गोड, भांडणं गोड, फार काय दुःखसुद्धा गोड. सुरुवात, मध्य, शेवट, गुंतागुंत, निरगाठ, सुरगाठ, उकल, सगळं गोडच गोड. मी तर एके ठिकाणी म्हटलं आहे की आमचे आप्पासाहेब कादंबरीकार नसते झाले तर साखर कारखानदार तरी नक्कीच झाले असते. निदान गुळाच्या ढेपी बनविण्याचा कारखाना आणि रसाचे गुऱ्हाळ एवढीतरी त्यांनी नक्कीच चालविली असती. अर्थात असं काही झालं नाही. महाराष्ट्रीय कारखानदारीचं नशीब, असं काही कुत्सित टीकाकार म्हणोत बिचारे. पण आप्पांना त्याचं काहीच वाटत नाही. म्हणजे सोयरसुतक.

आमचे आप्पा आणि भाऊ यांच्यात एक महत्त्वाचं साम्य आहे. ते असं की अगदी खर्ररर्रर सांगायचं तर भाऊंप्रमाणेच आप्पांनीही एकच कादंबरी लिहिली आहे. मात्र भाऊंच्या कॅरेक्टर्सच्या मानानं आप्पांची कॅरेक्टर्स खूपच माणसासारखी बोलतात. भाऊंची पात्रं ' समाजवाद ', ' समता ' म्हणून विवळतात. पण आप्पांची पात्रं विवळत नाहीत. ती आपली कूजन करीत असतात. प्रीती, प्रेम असल्या अडीच अक्षरी शब्दांचं.

आपल्याला स्वातंत्र्य मिळालं त्यापूर्वी आपल्या सगळ्यांप्रमाणंच आप्पांचंही स्वातंत्र्यावर प्रेम होतं. आणि ऊठसूट प्रेम करण्याची सवय आप्पांच्या कॅरेक्टर्सना असल्यामुळं त्यांचंही स्वातंत्र्यावर प्रेम असणारच. तसं ते होतं. आपल्या प्रेमळ नायका-करवी भारताला स्वातंत्र्य मिळवून द्यावं अशी आप्पांची फार प्रेमळ अशी इच्छा होती. पण ज्या गोष्टीवर आपण हे प्रेम करतो ती आपल्याला मिळत नाही हे आप्पांना आणि त्यामुळं त्यांच्या नायकमंडळींना माहीत नसल्यामुळं नसताच तिढा उत्पन्न झाला होता. हा तिढा शेवटपर्यंत सुटला नसता. पण सांगायची गोष्ट अशी की मी तो सोडवला. अगदी आप्पांच्या नायकाकरवी सोडवला. निदान भारताला नंतर स्वातंत्र्य मिळालं हे सर्वांनाच माहीत असल्यामुळं तो मी सोडविला हे सिद्धच होतं.

‘ हातचा मळ ’ ही आप्पांची पाचशेएकाव्वी कादंबरी. ५०१ नावाचा साबण तुम्हाला माहीत असेलच. या साबणाच्या एका विक्रेत्याचं प्रेमप्रकरण हा या कादंबरीचा विषय आहे. पण साबणविक्रेता हा आपला नावापुरता. आपलं मुख्य काम सोडून दुसरे सगळे उद्योग करणं हे या साबण्याचं काम. म्हणजे साबणविक्रण न विकता उगाच प्रेम करण्यात वेळ घालविणं हा याचा एक महत्त्वाचा उद्योग. आणि त्यातून जो फावला वेळ उरेल--म्हणजे दिवसाकाठी एक दोन मिनिटं--तो स्वातंत्र्यासाठी ‘ चळवळ ’ करण्याकरिता घालवायचा.

या असल्या फालतूपणामुळं भारताला स्वराज्य मिळणं शक्य नाही हे माझ्या केव्हाच लक्षात येऊन चुकलं. एकदा तर या साबण्यावरचा माझा राग अगदी अनावर झाला. म्हणून मी त्याला गाठून खडसावलंच.

“ काय रे साबण्या, तू धड नोकरी करीत नाहीस, आणि हा असला फालतूपणा करीत हिंडतोस. तुझं पोट तरी कसं भरतं ? ”

“ ज्याला प्रीती करायची असते त्याला पोट भरण्याची गरजच काय ? नुसती प्रीती करण्यानंच माझं पोट भरतं. प्रीती हीच विश्वातली सर्वश्रेष्ठ शक्ती आहे असं मला वाटतं. ”

“ थांब जरा थांब ... ” मी त्याला मध्येच थांबवीत म्हटलं, “ असं लाडात येऊन बोलायचं तुला काय कारण आहे रे ? माझम् काय, भरतम् काय, असम् काय आणि वाटतम् काय. सरळ बोलायला तुला शिकवलम् नाही वाटतम् आप्पांनी ? ”

“ त्याचं काय आहे की मी सारखा प्रेमात पडलेला असतो ना, त्यामुळं असं बोलायची सवय लागलीय मला ” साबण्या म्हणाला.

“ ठीक आहे. पण माझम् तुझ्यावर प्रेम नाही हे नक्की. तेव्हा तू माझ्याशी लाडात न येता बोलावंस हेच बरं. तर तू मला आता असं सांग की काहीही काम न करता तुला पैसे मिळायला तू स्वतःला लिव्हर ब्रदर्स समजतोस की काय रे ? ” साबण्याला मी बरोबर चिमटीत पकडला.

“ नाही, हो. मी स्वतःला त्या अनेक लिव्हर ब्रदर्सपैकी एक असं सुद्धा नाही समजत. ” साबण्या काकुळतीला येऊन म्हणाला.

“ ठीक आहे. तुला भारताला स्वातंत्र्य मिळवून द्यायचं आहे की नाही ? का आपलं तुझी ती कोण प्रेमा की प्रतिभा आहे तिच्याशी लग्न करून दुःखी व्हायचंय तुला ?”

“ भारताला स्वातंत्र्य मिळवून द्यायचं आहे मला. आमच्या प्रेमात अलीकडं फार अडथळे आणायला लागलेत आप्पा ” साबणे काहीसं कुरकुरत म्हणाला.

“ बरं तर. मग हे स्वातंत्र्य कसं मिळेल असं वाटतं तुला ? झेंडा ऊंचा रहे हमारा--असं बेसूर आवाजात ओरडून आणि घसा कोरडा करून मिळेल का ? ” मी सरळ रोकडा सवाल टाकला.

“ नाही, मला असं वाटतं की आम्ही जो साबण विकतो त्यामुळं लोकांचे कपडे

इतके स्वच्छ होतील की त्यामुळं त्यांची हृदयं ब्रिटिश सरकारला या स्वच्छ कपड्यातून आरपार दिसतील. आणि या हृदयातली व्यथा एकदा का सरकारला कळली म्हणजे त्याचा हृदयपालट होऊन भारताला स्वातंत्र्य मिळेल." सात्रण्यानं आपला सिद्धांत स्पष्ट केला.

त्यावर मी प्रथम थोडा वेळ खो खो हसलो. मग म्हटलं,

"सात्रणे, अहो आचार्य म्हणतात त्याप्रमाणं तुमची ही चळवळ नसून नुस्ती वळवळ आहे आणि तुम्हाला स्वातंत्र्याची तळमळ लागली नसून केवळ मळमळ होत आहे. अशानं कोणालाही स्वातंत्र्य कसं मिळेल बरं? तुमच्या असल्या उद्योगामुळं भारत सोडून जायला ब्रिटिश लोकांना तुम्ही काय गाढव समजता?" मी वैतागलो.

"तुम्ही म्हणता ते खरं वाटतं. पण मी आता करू तरी काय?" सात्रणे रड-कुंडीला येत म्हणाला.

"काय करू म्हणजे? फुल टाइम देशसेवा कर. किंवा ते जमत नसेल तर फुल टाइम नोकरी" मी निर्णायक शब्दात म्हटलं.

"ठीक आहे. ठरलं." सात्रणे म्हणाला आणि दुसऱ्या दिवसापासून तो फुल टाइम देशसेवक बनला.

पण इकडे गंमत काय झाली की या सात्रण्याची जी कोण प्रतिभा होती ती तो नीट नोकरी करीत नसल्यामुळं आणि फुलटाइम प्रेमच करीत असल्यामुळं त्याच्यावर रागावली होती. शिवाय हे 'झेंडा ऊंचा'... वगैरे म्हणताना होणारा सात्रणेचा केविल-वाणा चेहरा तिला पाहवत नसे आणि त्याच्या बेसूर, भसाड्या आवाजालाही ती कंटाळली होतीच, त्यातच माझ्या सांगण्यावरून सात्रणेने नोकरीही सोडली, मग तर विचारू नका.

सात्रणेविरुद्ध या प्रतिभेचे मन वळविणं मला अगदी सोपं गेलं. पण हे करीत असताना मी स्वतः मात्र मोठ्याच गोत्यात सापडलो. तो असा की या प्रतिभा नामक मुलीचं माझ्यावरच 'भयंकर' प्रेम बसलं. मला कायमची नोकरी आहे, मी गात वगैरे नाही, कूजन वगैरे करीत नाही हे तिला कळल्यावर तर विचारूच नका. तिनं सात्रणेवरचं प्रेम काढलं आणि चक्क माझ्यावर बसवलं.

सात्रणेनं फुलटाइम देशसेवा पत्करली आणि पुढं १९४७ साली आपल्याला स्वातंत्र्य मिळालं हे काही मी कोणाला सांगितलं पाहिजे असं नाही. आप्पासाहेबांच्या नायकाकरवी भारताला मी स्वातंत्र्य मिळवून दिलं ते असं.

अर्थात याचा आणखी एक परिणाम म्हणजे प्रतिभा नामक आप्पांच्या या नायिकेचं माझ्याशी लग्न झालं. आता यामुळं मी कायमचा दुःखी झालो हे सोडा, पण त्याच्या बदल्यात मी देशाला स्वातंत्र्य मिळवून दिलं त्याचं काय?

○○○

# बेपत्ता

न्यूयॉर्क, लंडन, टोकिओ ही जगातली दादा शहरं आहेत, अशी माझी परवा परवापर्यंत समजूत होती. पुणे शहर हे त्यामानानं काहीच नव्हे, असं मी काहीशा उपहासानं देखील म्हणत असे. पण याबाबतीत आता माझा संपूर्णपणे भ्रमनिरास झाला असून पुणं हेच खरं दादा शहर आहे अशी माझी पूर्ण खात्री झाली आहे. तसं मी लिहून द्यायलासुद्धा तयार आहे. नव्हे, मी ते लिहून देतोच आहे.

कारण पत्ता शोधण्याचीं साधी गोष्टच घ्या. न्यूयॉर्क शहरात तुम्हाला हवा असेल तो पत्ता तुम्ही सहजासहजी शोधू शकता. लंडन किंवा पॅरिसमध्येसुद्धा मी हे केलं आहे. पण पुण्यात ? अशक्य अगदी अशक्य.

हा बहुमोल अनुभव मला मिळाला याचं कारण अर्थातच बापूसाहेब उकिडवे. खरं पाहिलं तर बापूसाहेबही नव्हेत मी स्वतःच. कारण या बापूसाहेबांचा पत्ता शोधायला त्यांनी स्वतः मला कधीच आव्हान दिलेलं नव्हतं. म्याच जादा शहाणपणा करून अतिउत्साहाच्या भरात ते घेतलं आणि पस्तावलो.

माझ्या ऑफिसातील हेडक्लार्क नानासाहेब यांचे बापूसाहेब हे दूरचे नातलग. नानासाहेबांच्या अनेक कन्यारत्नांपैकी एकीची पत्रिका त्यांनी बापू-

साहेबांकडे पाठविली त्याला बरेच दिवस होऊन गेले होते. दुसरीकडे कुठंही हे रत्न खपत नव्हतं. त्यामुळं बापूसाहेब हा एकच आशेचा धागा शिल्लक होता. पण पुण्याचे हे बापूजी नानासाहेबांना बिलकुल दाद देत नव्हते. वास्तविक या भल्या गृहस्थानं अनेक लग्नाळू मुलींची लग्नं जमवून दिली असा त्याचा लौकिक. म्हणूनच मुळात त्यांच्याकडं पत्रिका पाठविली होती. पण या बापूजीकडून पत्र नाही, की चिठ्ठीचपाटी नाही, की साधा निरोपही नाही...या सद्गृहस्थांचा पत्ता शोधून काढणं नानांना कधीच जमलं नाही. दुसऱ्या एका कामाकरिता पुण्यात आले असताना त्यांनी बराच वेळ खर्च करून बापूजींना जंगजंग पछाडण्याचा प्रयत्न केला होता. पण तो सपशेल वाया गेला होता. पदरी पडली होती ती नुसती पायपीट आणि त्यामुळं वाढलेली डोकेदुखी.

या सगळ्या प्रकाराला वैतागून नानासाहेब मला एकदा म्हणाले होते,...

'तुमचं पुणे शहर ही एक अजब चीज आहे बुवा! कुणाचाही पत्ता शोधणं ही तिथं जवळजवळ काय–पूर्णपणे अशक्य गोष्ट आहे. नुसता वैताग आहे वैताग!'

'अरे अरे अरे, एवढं डोक्यात राख घालायला काय झालंय तुम्हाला? बापूसाहेब उकिडव्यांचा पत्ता शोधणं एवढ्या साध्या गोष्टींबद्दल इतका वैताग? हे काही खरं नाही तुमचं नानासाहेब! आणि आपण तरी तुम्हाला आमच्या पुण्याबद्दल भलतंसलतं नाही बोलू देणार. अस्सल पुणेकर ना आम्ही. वाटेल तो पत्ता सांगा. डोळे मिटून हुडकून देतो. आहे काय न् नाही काय? उगाच आपलं एखाद्या थोर शहराला नावं ठेवणं बरं नव्हे, केवळ एक साधा पत्ता सापडत नाही म्हणून.' माझा नस्ता शहाणपणा मी म्हणतो तो हाच.

'हे पाहा, तुमच्या नुसत्या पुणेकरी गमजा नको आहेत मला. हा बापूसाहेबांचा पत्ता घ्या आणि शोधून द्या.' नानासाहेबांनी मला उघड उघड आव्हान दिलं.

चारचौघांत जवळ जवळ मागून घेतलेलं हे आव्हान नाकारणं मला अशक्य होतं. निदान त्यावेळी तरी मी ते हसत हसत स्वीकारलं. तीन दिवसांची कॅज्युअल टाकली. ती नाकारणंही नानासाहेबांना अर्थातच अशक्य होतं. बापूसाहेब उकिडव्यांचा पत्ता असलेला कागद मी खिशात टाकला आणि सुटलोच मुंबईहून. थेट पुण्याला येऊन पोचलो.

अर्ध्या एक तासात बापूसाहेब उकिडव्यांचा किल्ला सर करायचा. उरलेला सगळा वेळ पुण्याच्या रिकामटेकड्या मित्रमंडळींना जमवून चकाट्या पिटायच्या. मन मानेल त्याप्रमाणं भटकायचं आणि आरामात मुंबईला परतून बापूसाहेबांनी नानासाहेबांच्या कन्यारत्नासाठी पकडलेलं सावज किंवा त्याचा ठावठिकाणा वधुपित्याजवळ हजर करायचा असा साधा, सरळ बेत मी रचला होता.

हाती घेतलेलं कोणतंही काम प्रथम निकालात काढायचं आणि नंतरच चैन किंवा मौज मजा असा माझा नियम आहे. यावरून मौज मजा करायला मला फारशी संधी मिळत नाही हे तुमच्या लक्षात आलं असेलच. कारण पहिलं म्हणजे माझी हाती घेतलेली कामं सहजासहजी संपत नाहीत. आणि त्यामुळं मजेसाठी वेळ उरत नाही. वेळ असला

तरी पैसे नसतात, त्यामुळं नुसता वेळ असूनही उपयोग काय ? पण यावेळी मला भरपूर वेळ होता. तीन अख्खे दिवस. यातला अगदी कमाल म्हणजे अर्धा दिवस बापूजी उकिडव्यांचा छडा लावण्याच्या कामगिरीत गेला तरी सबंध अडीच दिवस बाकी राहणार होते. आणि ते सर्वस्वी माझे होते. शिवाय नुकतेच मिळालेले जादा डी. ए. चे पैसे मी नेहमीप्रमाणं पुण्याच्या या ट्रिपसाठी चोरून बाजूला ठेवले होते. वेळ आणि पैसा असल्यावर मौज करण्यासाठी लागतात मित्र. तसे माझे अनेक टोळभैरव मित्र पुण्यातही होते. अर्थात टोळभैरव हा शब्द माझा नाही. तो आमच्या सुविद्य पत्नीचा आहे हे ज्यांना मित्र असतात आणि ज्यांना बायका असतात त्यांना सांगण्याची गरज नाही.

सारांश, पुण्याला पोचल्याबरोबर मी आंघोळ वगैरे केली. चहा घेतला. अधिक ताजातवाना होण्यासाठी विश्रांती घेतली. ' उदईक बापूजींशी मुकाबला करणेचा मनसुबा रचला. ' सकाळी उठायला थोडा उशीर झाला खरा. आणि ' उदईक ' याचा अर्थ जरा समजून घेतला तर तसं पाहता सकाळीच ' यायला उशीर होईल ' अशी उशिरा येण्याची ऐसपैस परवानगी घेऊन मी बाहेर पडलो.

बापूजींचा पत्ता मी अजूनपर्यंत पाहिला नव्हता. तो आता सुदैवानं सापडला. कारण तो मिळताच मी कागदाची घडी करून व्यवस्थितपणे पँटीच्या खिशातल्या पाकिटात ठेवून दिला होता. सुदैव म्हणण्याचं कारण तीच पँट मी पुण्याला आणली होती आणि तीसुद्धा आतलं पाकीट मुंबईला न विसरता. पत्ता मी घराबाहेर पडलो तेव्हा पहिल्यांदा पाहिला त्यावरून माझा आत्मविश्वास तसंच पुण्यावरील विश्वासही सिद्ध होतो. असो.

तर पत्ता असा होता–

श्री. रा. रा. बापूसाहेब उकिडवे,
राहणार पुणे, भाऊसाहेबांचा बोळ येथे.
तालुका हवेली, जिल्हा पुणे.

पुणे शहर हवेली तालुक्यात आहे आणि हवेली तालुका पुणे जिल्ह्यात आहे ही बहुमोल भौगोलिक माहिती पत्त्यात होती. पण उकिडवे भाऊसाहेबांच्या बोळात राहतात ही गोष्ट महत्त्वाची होती. आता ' भाऊसाहेबांचा ' यापैकी भाऊ उठून दिसत होता. पण मधला साहेब जरा अस्पष्ट झाला होता. आणि शेवटचा ' चा ' पार उडून दिसत होता, मधल्या साहेबाचा लोप झाला होता. पण त्यामुळं काही बिघडणार नव्हतं. बापूजींचा पत्ता लिहून घेताना नानासाहेबांनी त्यांच्या हेडक्लार्कच्या पोस्टला शोभेसा वेंधळेपणा केला होता हे उघड दिसत होतं. शिवाय पत्ता लिहायला ऑफिसची स्टेशनरी वापरलेली होती. तरीही आडनाव स्पष्ट होतं हेच नशीब !

मी स्वतःशीच हसलो. सगळा घोटाळा नेहमीप्रमाणं साहेबांनी केला होता याची मला मौज वाटली. या घोटाळ्यामुळंच नानासाहेबांनी लिहिलेली पत्रे पुण्याला नीट पोचली नसणार हे उघड होते.

पण माझ्यासारखा पुणेकर असल्या चुकांनी फसणारा नव्हे. ' भाऊसाहेब ' च्या

ऐवजी ' भाऊमहाराज ' लिहायला पाहिजे होतं ही गोष्ट अगदी उघड होती. साहेबाच्या गुलामगिरीत उभा जन्म गेल्यामुळं नानासाहेबांनी पत्ता लिहून घेताना ही चूक केलेली होती यात संशय नव्हता. अर्थात बापूसाहेब उकिडवे म्हणजे काही दत्तो वामन पोतदार नव्हेत. त्यामुळं भाऊमहाराजाच्या बोळात शिरून त्यांचं नाव विचारताच कोणीही तडक त्यांच्याकडं मला नेऊन सोडील असा मला भ्रम नव्हता. त्यात थोडा फार वेळ जाणार हे मला समजत होतं. पण बोळाचं नाव एकदा नक्की ठरल्यावर काम पन्नास टक्के किंवा जास्तच फत्ते झालं हे सांगायला कोणा ज्योतिषाची किंवा पोस्टमनचीही गरज नव्हती.

असली कामं सायकलवरून जाऊन होणारी नव्हेत. म्हणून मी पायीच, भाऊसाहेब नव्हे भाऊमहाराज बोळाकडं निघालो. या ऐतिहासिक स्थानावरून मी पूर्वी अनेकदा गेलो असेन. त्यामुळं साहजिकच माझ्या ओळखीचाच सगळा भाग होता. आपले अप्पा-साहेब जसे सराइताप्रमाणं महाराष्ट्रात कोणताही किल्ला काबीज करू शकतात, तसंच भाऊमहाराज बोळात दबा धरून बसलेल्या बापूजींनाही मी करू शकेन असं मला वाटत होतं.

भाऊमहाराज बोळ म्हणजे काही लांबलचक पसरलेला लक्ष्मी रोड किंवा टिळक रोड नव्हे. मोठ्या नावानं मिरविणारी ही लहानशी गल्ली पादाक्रांत करणं ही हसत हसत करण्यासारखी गोष्ट होती. निदान सुरुवातीला तरी मला तसं वाटलं होतं.

अखेरीस मात्र या भाऊमहाराजांनी मला रडकुंडीला आणलं. बोळाच्या एका बाजूनं आत शिरून प्रत्येक वाड्यात जायचं आणि बापूसाहेब उकिडव्यांचा ठावठिकाणा मिळतो का पाहायचा असा माझा साधा व्यूह होता. आणि त्यातून आमचं सावज निसटू शकणार नाही अशी माझी खात्री होती.

पण प्रत्यक्षात मात्र घोर निराशाच माझ्या पदरी पडली. प्रत्येक वाड्यात शिरून जवळजवळ प्रत्येक घरात मी चौकशी केली. या पाहणीत मला दहा पंधरा जोशी, वीस पंचवीस देशपांडे आणि तीस पस्तीस कुळकर्णी आढळले, पण उकिडवे नावाची असामी मात्र नाही. बापूसाहेबही अनेक होते पण त्यांपैकी एकही उकिडवे कुलदीपक नव्हता.

या पदयात्रेतील पायपीट सोडली तर ज्ञान आणि मनोरंजन या दृष्टीनं सुरुवातीला तरी ती लाभदायक होती, यात शंका नाही.

सुरुवातीलाच एक नमुनेदार गृहस्थ भेटले.

' आपणच महादेवराव का ? ' मी दात जोडीत त्यांना विचारलं ...

' ह्यं: ह्यं: ह्य ... अं ... हो ... मी महादेवरावच. पण ओळखलंत कसं तुम्ही ? अहो, आम्ही जुन्या पिढीची माणसं, कामातनं गेलेली ... '

' अहो, असं काय करताय रावसाहेब ? आपल्याला कोण ओळखत नाही ? अं ... ' असं म्हणत मी म्हातारबुवांची कळी खुलवली. पण वास्तविक बाहेरच्या पाटीवर त्यांचं नाव स्पष्ट लिहिलेलं होतं ते वाचूनच मी त्यांचं नाव ओळखलेलं होतं. हे मी अर्थातच त्यांना सांगितलं नाही.

तरी पैसे नसतात, त्यामुळं नुसता वेळ असूनही उपयोग काय ? पण यावेळी मला भरपूर वेळ होता. तीन अख्खे दिवस. यातला अगदी कमाल म्हणजे अर्धा दिवस बापूजी उकिडव्यांचा छडा लावण्याच्या कामगिरीत गेला तरी सबंध अडीच दिवस बाकी राहणार होते. आणि ते सर्वस्वी माझे होते. शिवाय नुकतेच मिळालेले जादा डी. ए. चे पैसे मी नेहमीप्रमाणं पुण्याच्या या ट्रिपसाठी चोरून बाजूला ठेवले होते. वेळ आणि पैसा असल्यावर मौज करण्यासाठी लागतात मित्र. तसे माझे अनेक टोळभैरव मित्र पुण्यातही होते. अर्थात टोळभैरव हा शब्द माझा नाही. तो आमच्या सुविद्य पत्नीचा आहे हे ज्यांना मित्र असतात आणि ज्यांना बायका असतात त्यांना सांगण्याची गरज नाही.

सारांश, पुण्याला पोचल्याबरोबर मी आंघोळ वगैरे केली. चहा घेतला. अधिक ताजातवाना होण्यासाठी विश्रांती घेतली. ' उदईक बापूजींशी मुकाबला करणेचा मनसुबा रचला. ' सकाळी उठायला थोडा उशीर झाला खरा. आणि ' उदईक ' याचा अर्थ जरा समजून घेतला तर तसं पाहता सकाळीच ' यायला उशीर होईल ' अशी उशिरा येण्याची ऐसपैस परवानगी घेऊन मी बाहेर पडलो.

बापूजींचा पत्ता मी अजूनपर्यंत पाहिला नव्हता. तो आता सुदैवानं सापडला. कारण तो मिळताच मी कागदाची घडी करून व्यवस्थितपणे पँटीच्या खिशातल्या पाकिटात ठेवून दिला होता. सुदैव म्हणण्याचं कारण तीच पँट मी पुण्याला आणली होती आणि तीसुद्धा आतलं पाकीट मुंबईला न विसरता. पत्ता मी घराबाहेर पडलो तेव्हा पहिल्यांदा पाहिला त्यावरून माझा आत्मविश्वास तसंच पुण्यावरील विश्वासही सिद्ध होतो. असो.

तर पत्ता असा होता—

श्री. रा. रा. बापूसाहेब उकिडवे,<br>
राहणार पुणे, भाऊसाहेबांचा बोळ येथे.<br>
तालुका हवेली, जिल्हा पुणे.

पुणे शहर हवेली तालुक्यात आहे आणि हवेली तालुका पुणे जिल्ह्यात आहे ही बहुमोल निरुपयोगी माहिती पत्त्यात होती. पण उकिडवे भाऊसाहेबांच्या बोळात राहतात ही गोष्ट महत्त्वाची होती. आता ' भाऊसाहेबांचा ' यापैकी भाऊ उठून दिसत होता. पण मधला साहेब जरा अस्पष्ट झाला होता. आणि शेवटचा ' चा ' परत स्पष्ट दिसत होता. मधल्या साहेबाचा लोप झाला होता. पण त्यामुळं काही बिघडणार नव्हतं. बापूजींचा पत्ता लिहून घेताना नानासाहेबांनी त्यांच्या हेडक्लार्कच्या पोस्टला शोभेसा वेंधळेपणा केला होता हे उघड दिसत होतं. शिवाय पत्ता लिहायला ऑफिसची स्टेशनरी वापरलेली होती. तरीही आडनाव स्पष्ट होतं हेच नशीब !

मी स्वतःशीच हसलो. सगळा घोटाळा नेहमीप्रमाणं साहेबांनी केला होता याची मला मौज वाटली. या घोटाळ्यामुळंच नानासाहेबांनी लिहिलेली पत्रे पुण्याला नीट पोचली नसणार हे उघड होते.

पण माझ्यासारखा पुणेकर असल्या चुकांनी फसणारा नव्हे. ' भाऊसाहेब ' च्या

ऐवजी ' भाऊमहाराज ' लिहायला पाहिजे होतं ही गोष्ट अगदी उघड होती. साहेबाच्या गुलामगिरीत उभा जन्म गेल्यामुळं नानासाहेबांनी पत्ता लिहून घेताना ही चूक केलेली होती यात संशय नव्हता. अर्थात बापूसाहेब उकिडवे म्हणजे काही दत्तो वामन पोतदार नव्हेत. त्यामुळं भाऊमहाराजाच्या बोळात शिरून त्यांचं नाव विचारताच कोणीही तडक त्यांच्याकडं मला नेऊन सोडील असा मला भ्रम नव्हता. त्यात थोडा फार वेळ जाणार हे मला समजत होतं. पण बोळाचं नाव एकदा नक्की ठरल्यावर काम पन्नास टक्के किंवा जास्तच फत्ते झालं हे सांगायला कोणा ज्योतिषाची किंवा पोस्टमनचीही गरज नव्हती.

असली कामं सायकलवरून जाऊन होणारी नव्हेत. म्हणून मी पायीच, भाऊसाहेब नव्हे भाऊमहाराज बोळाकडं निघालो. या ऐतिहासिक स्थानावरून मी पूर्वी अनेकदा गेलो असेन. त्यामुळं साहजिकच माझ्या ओळखीचाच सगळा भाग होता. आपले अप्पासाहेब जसे सराइताप्रमाणं महाराष्ट्रात कोणताही किल्ला काबीज करू शकतात, तसंच भाऊमहाराज बोळात दबा धरून बसलेल्या बापूजींनाही मी करू शकेन असं मला वाटत होतं.

भाऊमहाराज बोळ म्हणजे काही लांबलचक पसरलेला लक्ष्मी रोड किंवा टिळक रोड नव्हे. मोठ्या नावानं मिरविणारी ही लहानशी गल्ली पादाक्रांत करणं ही हसत हसत करण्यासारखी गोष्ट होती. निदान सुरुवातीला तरी मला तसं वाटलं होतं.

अखेरीस मात्र या भाऊमहाराजांनी मला रडकुंडीला आणलं. बोळाच्या एका बाजूनं आत शिरून प्रत्येक वाड्यात जायचं आणि बापूसाहेब उकिडव्यांचा ठावठिकाणा मिळतो का पाहायचा असा माझा साधा व्यूह होता. आणि त्यातून आमचं सावज निसटू शकणार नाही अशी माझी खात्री होती.

पण प्रत्यक्षात मात्र घोर निराशाच माझ्या पदरी पडली. प्रत्येक वाड्यात शिरून जवळजवळ प्रत्येक घरात मी चौकशी केली. या पाहणीत मला दहा पंधरा जोशी, वीस पंचवीस देशपांडे आणि तीस पस्तीस कुळकर्णी आढळले, पण उकिडवे नावाची असामी मात्र नाही. बापूसाहेबही अनेक होते पण त्यांपैकी एकही उकिडवे कुलदीपक नव्हता.

या पदयात्रेतील पायपीट सोडली तर ज्ञान आणि मनोरंजन या दृष्टीनं सुरुवातीला तरी ती लाभदायक होती. यात शंका नाही ...

सुरुवातीलाच एक नमुनेदार गृहस्थ भेटले.

' आपणच महादेवराव का ? ' मी हात जोडीत त्यांना विचारलं ...

' ह्यंः ह्यंः ह्य ... अं ... हो ... मी महादेवरावच. पण ओळखलंत कसं तुम्ही ? अहो, आम्ही जुन्या पिढीची माणसं, कामातनं गेलेली ... '

' अहो, असं काय करताय रावसाहेब ? आपल्याला कोण ओळखत नाही ? अं ... ' असं म्हणत मी म्हातारबुवांची कळी खुलवली. पण वास्तविक बाहेरच्या पाटीवर त्यांचं नाव स्पष्ट लिहिलेलं होतं ते वाचूनच मी त्यांचं नाव ओळखलेलं होतं. हे मी अर्थातच त्यांना सांगितलं नाही.

'बरं मग काय काम काढलं होतंत ? पत्रिकेविषयी आपलं आधीच सांगून ठेवतो हां. नुसता गोषवारा सांगायचा असेल तर पाच रुपये. आता लग्न, नोकरी, बढती, बदली याविषयी विशिष्ट प्रश्न असले तर दोन रुपये प्रत्येकी. म्हणजे प्रत्येक प्रश्नास. काय ? आधी सांगून ठेवलेलं बरं. मागाहून उगाच गैरसमज नको ...'

ज्योतिषातला कोणताच प्रश्न मला विचारायचा नाही, असं मी या ज्योतिषीबुवांना सांगितलं तेव्हा ते काहीसे खट्टू झाले. पण निदान स्वतःचं ज्योतिष त्यांना नीट कळत असावं. कारण त्यांचा त्या दिवसाचा बकरा मी नव्हे हे त्यांनी ओळखलं असावं. मी त्यांना उकिडव्यांबद्दल विचारलं.

यावर गृहस्थ थोडे विचारात पडल्यासारखे दिसले.

'उकिडवे ... उकिडवे ... उकिडवे ...' उजव्या हाताच्या तर्जनीने डोक्यावर ठेका धरीत ते म्हणाले. त्यावरून तर मला क्षणभर वाटलं की उकिडव्यांना जादूनं हे आपल्या डोक्यातून काढूनच माझ्या समोर उभं करणार ... 'हां ... हां ... हे नाव कुठंतरी ऐकल्यासारखं वाटतंय ... पण ... ते आता तुम्हाला भेटणार कसे हाही एक प्रश्नच आहे ...'

'का बुवा ? त्यांचं काही बरं वाईट झालं की काय ?'

'अहो. बरं कसलं वाईटच म्हणायला पाहिजे. ते गेले ना. ही डाईड ...'

मला धक्काच बसला.

'पण तुमचे उकिडवे हे नसावेत बरं का. कारण यांना जाऊन पंधरा वर्षे तरी नक्कीच झाली. जास्तच !'

यावरून मला हवे असलेले उकिडवे मेलेले नसावेत एवढीच बहुमोल माहिती मला मिळाली.

मला हवे असलेले जिवंत उकिडवे मला भेटतील काय, असा प्रश्न या ज्योतिषी-बुवांना टाकून आपले दोन रुपये पणाला लावावे की काय असा मोह मला झाला होता. पण तो मी आवरला आणि तिथून सटकलो.

नंतर भेटलेल्या गोडबोलेसाहेबांना मी उकिडव्यांच्या शोधात आहे या गोष्टीचा परम आनंद झालेला दिसला. पण यामुळं मला झालेला आनंद क्षणभरच टिकला, कारण हे साहेब स्वतःच उकिडव्यांच्या शोधात होते. 'यांचा पत्ता तुम्हाला लागला तर जरूर मला कळवायचं बरं का' त्यांनी मला बजावलं.

नंतर भेटलेले गृहस्थ गोपाळराव हे छोटेसे इतिहाससंशोधक होते. आणि ते जरी मला बापूसाहेब उकिडव्यांचा ठावठिकाणा देऊ शकले नसले तरी उकिडवे घराणं मूळचं कुठलं, आणि महाराष्ट्रात ते कुठंकुठं पसरलेलं आहे याची सविस्तर हकीगत या गोपाळ-रावांनी मला सांगितली. शेवटी आमचा कुलवृतांत काढणं कसं महत्त्वाचं आहे हेही त्यांनी मला पटवून दिलं आणि अगदी थोडक्या पैशात ही महत्त्वाची जबाबदारी आपण घ्यायला तयार आहोत असं आश्वासनही त्यांनी मला दिलं.

नंतरच्या श्रीयुत भाऊरावांनी पुण्यातल्या निरनिराळ्या बोळांची नावं मला सांगितली. तसंच भाऊमहाराज हे नाव या गल्लीला कसं पडलं असावं याचा स्वतःचा अंदाजही सांगितला. शिवाय गुजराथमध्ये 'बोळ' या शब्दाऐवजी 'पोळ' हा शब्द वापरतात ही रोमहर्षक माहितीही याच भाऊरावांनी मला दिली आणि शेवटी उकिडवे नावाचे गृहस्थ भाऊमहाराज बोळात असणे शक्य नाही असा निर्वाळाही दिला.

सर्वच ठिकाणी माझं असं स्वागत झालं असं मात्र नाही. मलेरियाच्या रोग्यांची नोंद करणारा कारकून असं मला समजून एका गृहस्थांनी खाड्कन आपला दरवाजा लावून घेतला. फक्त तो बंद करताना 'आमच्या घरात कोणालाही मलेरिया झालेला नव्हता, नाही आणि एवढ्यात होण्याची आशा नाही' एवढी माहिती मात्र या सद्गृहस्थांनी मला तत्परतेनं दिली हे कबूल केलं पाहिजे.

मी इन्कमटॅक्सचा इन्स्पेक्टर आहे अशीही एका भल्या माणसाची समजूत झाली. त्यानं माझं अत्यंत प्रेमानं स्वागत केलं. एवढंच नव्हे तर त्याच्या माहितीच्या एकदोन लोकांबद्दल काही 'गुप्त' माहितीही त्यानं मला देऊ केली. खरं म्हणजे ते त्याचे मित्र. पण इथं देशाच्या पैशाचा प्रश्न आल्यामुळंच त्याचा नाइलाज झाला होता. या बाणेदार देशभक्ताला आवरता आवरता माझ्या नाकी नऊ आले. 'इतकी गुप्त माहिती स्वीकारायचा मला अधिकार नाही, तुम्ही थेट साहेबाला जाऊन भेटा.' असं सांगून मी त्याची कशीबशी समजूत काढली आणि तिथून पळालो.

त्या दिवशी मी कोणाकोणाला काय काय वाटणार होतो हे मला अखेर समजेना. मी सी. आय. डी. असल्याचाही एकाला संशय आला. नव्हे, तशी त्याची खात्रीच पटली. अर्थात त्याच्या दृष्टीनं त्याचीही काही चूक नव्हती. कारण एकदा पोलीस म्हटला की तो पोलिसाच्या वेषात नसल्यास गुप्त पोलिसाच्या वेषातच असणार! 'आता मी तुम्हाला ओळखलं हे सोडा, पण इतर कोणाच्याही लक्षात येणार नाही असा बेमालूम ड्रेस केला आहात हं तुम्ही. आणि हे 'उकिडवे' हे कमालच नाव हा बाकी. डोकं आहे तुमचं यात शंका नाही. म्हणजे काय हे एक आडनाव तर आहे, पण अशा चमत्कारिक नावाचा माणूस इथं नाही हे लक्षात घेऊनच तुम्ही त्यांची चौकशी करीत हिंडता आहात. आयडिया बरं का. पण आपण स्पष्ट सांगतो की मला तुमची काही भीती वाटत नाही बुवा. आपला व्यवहारच मुळी खुल्लम् खुल्ला. आहे काय त्यात लपवायचं? या, आणि पाहा. पण काय हो एक विचारू का? म्हंजे असं होत नसेल कधी. पण समजा, अशा नावाचा माणूस तुम्हाला खरोखरच भेटला तर काय करणार तुम्ही? इट् वुड बी ए प्रॉब्लेम, नाही का?'

आता माझ्या पुढं खरा प्रॉब्लेम या माणसाला भेटण्याचाच होता हे मी या चाणाक्ष माणसाला कसं पटवून द्यावं? 'खरं सांगायचं तर मी उकिडव्यांच्याच तपासात आहे बरं का. आणि मला ते सापडले तर जरूर आपल्याला कळविल्याशिवाय राहणार नाही मी.' एक डोळा मिटत खाजगीत मी चाणाक्ष–महाशयांना सांगितलं, आणि तिथून

काढता पाय घेतला.

पण वाड्याच्या बाहेर पडल्यावर माझ्या लक्षात आलं की उकिडव्यांचा पत्ता एक भलंमोठं प्रश्नचिन्ह घेऊन माझ्यासमोर उभाच होता. दोन अडीच तासांत त्या टीचभर गल्लीत मी अनेक मैलांची पायपीट केली असणार. एकंदरीत भाऊमहाराज ही मला वाटली तशी लहानसहान असामी नव्हतीच. उकिडव्यांना पाठीशी घालून त्यांनी मला अक्षरशः जेरीस आणलं होतं.

हे बापूसाहेब मग या गल्लीत राहतच नव्हते काय ? भाऊमहाराज हे सबंध नावच चुकीचं पडलं असेल काय ? हा गृहस्थ पुणे मुक्कामी कुठेतरी राहतो एवढंच पत्त्यातलं खरं असेल काय ? किंवा याचं दुसरं काही आडनाव असेल काय ? पुण्यातल्या इतर बोळांत हा कुठं दडलेला असेल असं समजून तिकडेच आपण चौकशी करावी काय ... ?

इतर बोळांची आठवण होताच त्यांच्या नावाची एक पलटणच्या पलटण माझ्या नजरेसमोर उभी राहिली. मुंजाबाचा बोळ, काकिरड्यांचा बोळ, तांब्यांचा बोळ, शालूकरांचा बोळ. बापरे. असे आणखीही कितीतरी असतील. आणि समजा हे सगळे पालथे घातले तरी आपल्याला हे बापूसाहेब प्रसन्न होणार की नाही ?

नानासाहेबांनी मला दिलेला पत्ता अपुरा होता हे खरं. त्यात त्यांनी बापूसाहेब राहत असतील त्या वाड्याचं नाव, घरनंबर काहीतरी द्यायला हवं होतं हेही खरं. पण अतिआत्मविश्वासाच्या पोटी धड पत्तासुद्धा न पाहता मी हे आव्हान स्वीकारलेलं होतं. आता कोणालाही दोष लावण्यात काय अर्थ होता बरं ?

सुन्न झालेल्या डोक्यानं 'आता पुढं काय ?' या प्रश्नाचा विचार करीत मी रस्त्यावरच उभा राहिलो. आणि समोरच्या देवळातील रामाला माझी दया आल्यामुळं की काय, आशेचा एक किरण मला दिसला. पोस्टमन ! जवळजवळ धावतच जाऊन मी त्याला थांबवलं, आणि विचारलं.

'हे नाव काही ऐकलेलं नाही बुवा आपण.' तो म्हणाला.

'असं कसं म्हणता तुम्ही ? अहो, तुम्ही पोस्टमन ना ?' यावर पोस्टमननं मला आपादमस्तक न्याहाळलं.

'का राव वाकड्यात शिरता उगाच ? सरळ सांगितलं ना पहिल्यांदाच ...'

'माफ करा. सरळच विचारतो आहे. जरा आठवा. तुम्ही नेहमी इकडे बटवडा करीत हिंडत असणार म्हणून विचारतोय' मी गयावया करीत म्हणालो.

'आता हे हो तुम्हाला कुणी सांगितलं ? कालपासनंच या बीटवर आलोय मी.' त्यानं मला शांतपणे सांगितलं. आणि लांबलांब ढांगा टाकीत तो समोरच्या बोळात दिसेनासासुद्धा झाला.

'काय हो, कोण पाहिजे होतं तुम्हाला ?' मंडईला जाणाऱ्या एका गृहस्थानं मला आस्थेवाईकपणं विचारलं.

मलाही कोणाच्यातरी सहानुभूतीची त्या क्षणी अत्यंत गरज होती. त्या माणसाला मी शोधत असलेल्या पत्त्याविषयी सांगितलं.

'माझ्या अनुभवावरून सांगतोय तुम्हाला. कोणताही पत्ता शोधण्याचा प्रयत्न शहाण्या माणसानं या पुण्यात करू नये. आता तुम्हाला वाटलं असेल की ही एक तर लहानशी गल्ली. आहे काय अन् नाही काय, हां हां म्हणता शोधू. आता तुम्हाला माहीत आहे का भाऊ या नावानं सुरू होणारे आणखीही बोळ पुण्यात आहेत.' सद्‌गृहस्थ आपली मंडईची पिशवी सावरीत म्हणाले.

'नाही. मला माहीत नव्हतं. आणखी कोणते आहेत?'

'अहो, भाऊ रंगाऱ्याचा बोळ आहे. तो कसा विसरता तुम्ही?'

'अस्सं, आणखी कोणते?'

'मला माहीत नाही. पण आणखी असलेच पाहिजेत. नाही तर तुम्हा-आम्हाला त्रास कसा होईल पत्ते शोधताना?' — या बोलण्यावरून हे सद्‌गृहस्थही कधीतरी माझ्यासारख्याच आपत्तीत सापडले असले पाहिजेत हे उघड होतं.

'इतर राहू दे. पण निदान हा भाऊ रंगाऱ्याचा बोळ कुठं आहे तेवढं कृपा करून सांगाल का?' मी काकुळतीलाच आलो होतो.

'तेवढं मात्र विचारू नका. मी ऐकलंय तेवढं सांगतो. शिवाय आजकाल ही जुनी नाव बदलून नवीन देण्याची पद्धत सुरू झाली आहे ना. भाऊ रंगाऱ्याच्या बोळाचा अमकातमका पथ सुद्धा झाला असेल एव्हाना. बरंय, आता उशीर होईल. मी जातो.'

आणि पिशवी सावरीत हे गृहस्थ निघून सुद्धा गेले. जाताजाता अर्थातच हे भाऊ रंगाऱ्याचं पिल्लू त्यांनी माझ्यापाशी अलगद सोडून दिलं होतं.

आता भाऊमहाराजांना मी तात्पुरतं विसरलो आणि भाऊ रंगाऱ्यांचं काय करायचं याचा विचार करू लागलो. तोपर्यंत माझं डोकं चांगलंच गरगरू लागलं होतं. म्हणून आज कोणाचंच काहीही करायचं नाही. फक्त विश्रांती घ्यायची एवढा निश्चय मात्र मी केला.

मित्रमंडळींच्या समवेत वेळ फार चांगला गेला हे सांगणं नको. दुसऱ्या दिवशी शालूकर बोळातील आमच्या एका जुन्या मित्राकडेही जाऊन आलो. यानंतरचा एकच दिवस बाकी उरला होता. त्यानंतर हात हलवीत मुंबईस परत जाण्याचा प्रसंग ओढवणार याची टोचणीही मनाला लागली होती.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी या मित्राच्या घरच्या पाहुणचाराचा समाचार घेऊन मी घरी परतलो. तेव्हा पुण्याला मी जी कामगिरी घेऊन आलो होतो तिची आठवण परत एकदा व्हावी हे साहजिकच होतं.

'या शालूकराच्या बोळावरून आठवण झाली बघ. भाऊ रंगाऱ्याचा बोळ माहीत आहे का तुला?' मी माझ्या दोस्ताला विचारलं.

'अरे शहाण्या, ही दोन्ही एकाच बोळाची नाव आहेत.' त्याने खुलासा केला.

‘ मग आधीच नाही का मला सांगायचंस ? ’ मी कपाळाला हात लावीत त्याला विचारलं.

‘ तू कुठं विचारलं होतंस ? ’ तो थंडपणे म्हणाला. म्हणजे जी गोष्ट संबंध दिवसभर भेटेल त्याला विचारून सुद्धा मला कळली नव्हती ती अशी अचानकपणं मला कळली होती.

साहजिकच आता परत शालूकरांचा ऊर्फ भाऊ रंगाऱ्याचा बोळ पालथा घालणं हे मला क्रमप्राप्त होतं. भाऊमहाराजांनी माझी जी संभावना केली होती ती लक्षात घेता या दुसऱ्या कामगिरीबद्दल मी फारसा उत्सुक नव्हतोच. त्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी वर्तमानपत्रामध्ये ‘ कानोशा ’त जे पत्र पाहिलं ते वाचून तर माझा उरलासुरला उत्साह आणि धैर्य दोन्हीही निकालात निघाले. त्यात एका पत्रलेखकानं समस्त पुणेकर नागरिकांना धोक्याची प्रेमळ सूचना पुढील शब्दांत दिली होती–

## संभावित उचल्यापासून सावध राहा !

‘ अमुकतमुक नावाचे गृहस्थ इथंच राहतात का, अशी चौकशी करीत हिंडायचं आणि घरात सहज प्रवेश मिळवून हातास लागतील त्या मौल्यवान वस्तू लंपास करायच्या हा संभावित उचलेगिरीचा नवा प्रकार अलीकडं आढळून येतो. ‘ श्री. उकिडवे इथेंच राहतात का ? ’ अशी चौकशी करीत, एक दिसायला सभ्य वाटणारा तरुण कालच हिंडताना आढळला. आपला कोणी संशय घेऊ नये यासाठी आपण मलेरिया–कारकून, इन्कमटॅक्स इन्स्पेक्टर, सी. आय. डी. ऑफिसर इ. असल्याची बतावणी हा तरुण करतो. गोड बोलण्यात तो पटाईत आहे. तरी या माणसापासून सर्व नागरिक बंधू आणि विशेषतः भगिनींनी सावध राहावे.

– एक ‘ हितचिंतक. ’

डोळे चोळून चोळून हितचिंतकाचं ते पत्र मी पुन्हा पुन्हा वाचलं. मग अर्थातच भाऊ रंगाऱ्याच्या बोळावर करावयाच्या स्वारीचा बेत ताबडतोब रद्द केला. आणि दुपारच्या गाडीनं व खालच्या मानेनं मुंबईस परतलो.

तेव्हापासून पुण्यातल्या कोणाचाही पत्ता शोधण्याचं धाडस मी केलेलं नाही !

०००

मराठीतल्या सर्वांत लोकप्रिय आणि तडाखेबंद खप असलेल्या मासिकाच्या ऑफिससमोर मी आलो आणि सायकलीवरून उतरलो. रसिक वाचकांच्या दिवाळीच्या आनंदात भर टाकण्यासाठी जी विनोदी कथा मी लिहिली होती ती संपादक महाशयांकडं सुपूर्द करून आणखी कथा वळण्यासाठी मला ताबडतोब घरी परतायचं होतं. कथा पोस्टानं पाठविणे हा शहाणपणा झाला असता. पण मी वेळ वाचवायला गेलो आणि तिथंच सगळं गाडं फसलं.

म्हणजे मी सायकलवरून खाली उतरल्यावर मागं पाहिलं आणि चकित झालो. कारण सायकलच्या कॅरिअरला लावलेलं माझ्या कथेचं पुडकं तिथून नाहीसं झालं होतं. मी परत परत पाहिलं. छे, कॅरिअरवर चक्क स्वतःच्या हातानं मी घरून निघताना बसवलेली कथा तिथून गायब झाली होती. कॅरिअरला हात लावून मी उगाच चाचपून पाहिलं. पण अर्थातच तिथं काही नव्हतं.

स्वतःच्या गाढवपणाला जितका दोष देता येणं शक्य असतं तितका देत मी काही मिनिटं जागच्या जागीच उभा राहिलो. वाचकांच्या आनंदात भर टाकण्याऐवजी स्वतःच्या दुःखात भर टाकीत.

आता करायचं काय ? कथा हरवली ही थाप

नव्हे हे मी संपादक महाशयांना समजा पटवून देऊ शकलो असतो तरीही चहाचा एक कप देऊन माझं माफक सांत्वन करण्यापलीकडं ते काय करू शकले असते ? कथा परत लिहून त्यांना नेऊन देण्याशिवाय मला काही पर्यायच नव्हता.

मुकाट्यानं मी सायकल बरोबर विरुद्ध दिशेला म्हणजे घराच्या बाजूकडं फिरविली. कथेचं पुडकं वाटेत कुठं पडलेलं असलं आणि कोणा उपकारकर्त्या महाभागाच्या कृपेनं ते आपल्याला परत मिळणार असलं तर उगीच वेळ का दवडा ?

थेट घराच्या दिशेनं पण खाली रस्त्याकडं पाहत मी चाललो होतो. त्यामुळं माझं आजूबाजूला बिलकूल लक्ष नव्हतं. पण मासिकाच्या कचेरीपासून मी पंधरावीस यार्ड गेलो असेन नसेन, इतक्यात हाक आली,

' अहो लेखक ! लोकांच्या नजरा चुकवीत कुठं पळून चाललात ? काही आजू-बाजूनं ओळखीपाळखीचे लोक जात येत असतात म्हटलं !

हे अर्थातच आपले दिगंबरपंत. श्रेष्ठ लेखक.

' अरे, तुम्ही होय ? माझं लक्षच नव्हतं हा पंत, एक्सक्यूज मी, माफ करा.' सायकलवरून उतरून रस्त्याच्या बाजूला थांबत मी माझं वाक्य पुरं केलं.

' कसल्या तरी तंद्रीत दिसताय. कुठं कामाला चाललात वाटतं ? '

' अं. हो. तसं कामच म्हणायचं. म्हंजे काय झालं सांगू का पंत ? अहो, माझी एक गोष्ट घेऊन चाललो होतो. तर पाकिटच वाटेत कुठं तरी गायब झालं बघा. साय-कलच्या कॅरिअरला लावलं होतं मागं. '

' आऽल्ला, म्हंजे अजूनही तुम्ही गोष्टीबिष्टी लिहिता वाटतं ? दिगंबरपंत हे स्वतः मराठी लेखक असले तरी मराठीत इतर लेखकांच्या काय उचापती चालल्या आहेत याकडं त्यांचं बिलकुल लक्ष नसतं.

' असं काय करताय पंत. अहो, आता दिवाळी नाही का आली ? ' हँडलवरचे हात तात्पुरते सोडीत मी पंतांना कोपरापासून नमस्कार केला.

' हात्तीच्या म्हंजे दिवाळी आली का इतक्या लवकर ? एकंदर दिवाळी अंकाची गोष्ट दिसतेय ही तुमची ! कधी आहे हो दिवाळी ! ' शाब्बास म्हणजे सद्गृहस्थाला दिवाळीचाही पत्ता नव्हता.

' दिवाळी ही आलीच की, ऑक्टोबरमध्ये आहे यंदा. आणि माझी गोष्ट दिवाळी अंकाची हे खरं. पण ती आता दिसत नाही. हरवली हेच तर सांगत होतो तुम्हाला.'

' आऽल्ला. म्हणजे तुमची दिवाळीची गोष्ट लिहून पुरी झाली आणि हरवलीसुद्धा. कमाल आहे हां मालक तुमच्यापुढं. अहो, आमचा कशाचा कशाला पत्ता नाही अजून.'

' अहो पंत, असे कसे तुम्ही हो ? चक्क माझी लिहिलेली गोष्ट हरवली म्हणून मी तुम्हाला सांगतो आहे आणि तुम्हाला त्याचं अगदी काही म्हणजे काही कसं वाटत नाही ? '

' वाटत नाही कसं मालक. वाटतं ना. पण काय हो, अलीकडं तुमच्या विनोदी-

पैकी कोण आहे मराठीत ? म्हणजे चिं. वि., पु. ल., आणखी कोण ?'

'आहेत ना. चिं. वि., पु. ल. मग पी. जी. वोडहाऊस आहे, मिकेश आहे ... झालंच तर तुम्ही आहात...'

'वा वा वा. तुम्ही म्हणजे अगदी विनोदच करताहात की. चला. आता आपण चहा किंवा पान घेऊ या.'

'चहा किंवा पान नव्हे. चहा आणि पान असेल तरच मी तयार आहे. आणि खरं पाहिलं तर मला त्या गोष्टीचं केलं पाहिजे काहीतरी.'

'कराल हो. त्यात काय एवढं मोठं. आता एवढी लिहून काढलेली गोष्ट काय तुम्ही सोडता हातची ? दोन तास बसाल आणि लिहून काढाल. हं, घ्या तो चहा.'

चहा आणि पान घेऊन मी निघालो. पंत म्हणाले त्याप्रमाणं दोन तासात गोष्ट लिहून काढणं सोपं होतं का ? मी विचार करू लागलो. आणि माझ्या लक्षात आलं की, आपल्याला आपली गोष्टच नीट आठवत नाही. झालं म्हणजे मग तिच्यातले वेगवेगळे विनोदी तपशील कसे आठवणार ?

मी पंतांना सोडलं आणि सायकलवर बसून निघालो. उतार असल्यामुळं सायकल वेगात चालली होती.

इतक्यात हळी आली.

'हो ऽ हो ऽ हो ऽ ... सावकाश. थांबा. लेखकमहाशय.' हे आमचे आणखी एक लेखक. रहस्यकथांचे सम्राट. त्यांना आपण अण्णा म्हणू. खरं सांगायचं तर अण्णा मला रस्त्यात भेटले नाहीत. ते आपले कोपऱ्यावरच्या आपल्या दुकानातच उभे होते. गिऱ्हाईक नसल्यामुळं दरवाजापाशी येऊन रस्त्यावरची मजा पाहत. भरीला आणखी आमचे तात्याही उभे. तात्या म्हणजे अर्थातच आपले दादा ग्रामीण लेखक. आता या दोघा मातबर मंडळींनी हटकल्यावर कोणता लेखक पुढं जाईल ?

मी मुकाट्यानं दुकानाच्या कडेला सायकल लावली. आणि पायऱ्या चढून आत शिरलो. खुर्चीवर मी बसता बसताच अण्णा मला म्हणाले,

'तुम्ही आज हरवल्यासारखे दिसताय. काहीही म्हणा. का तुमचंच हरवलंय काही ?'

'तुम्ही कसं ओळखलंत हो ? खरंच हरवली माझी गोष्ट. आणि मी हरवलो असेन तर तात्पुरता, माझी गोष्ट हरवली म्हणून. पण तुम्ही ओळखलं कसं ते सांगा आधी.'

'अहो कसं म्हंजे काय ? एलेमेंटरी माय डिअर. उगाच रहस्यकथा लिहितो की काय मी, नुसतं चेहऱ्याकडं पाहिलं आणि ओळखलं. द्या टाळी.'

मी एक दुबळा हात पुढं केला. आणि अण्णांच्या टाळीमुळं हाताला आलेल्या झिणझिण्या नंतर मोजत बसलो.

'काय हो, पण तुमच्या रहस्यकथा किती झाल्या ? किती खून पाडले ?'

'तात्यांना तेच सांगत होतो. 'पानापानागणिक खून' या नावाची कादंबरीच

टाकलीय मी यावेळी. तुम्ही मंडळी तक्रार करता ना यांच्या कादंबऱ्यात पानाला एक खून असतो म्हणून. आता मी ते खरंच करून दाखविलंय. सवाल नाही. पानं मोजा. खून मोजून घ्या. तुमच्यासारखं नाही. पानापानागणिक हशा. सगळं खोटं. वाट्टेल तेवढी पानं खा. चेहऱ्यावर सुरकुती पडेल तर शपथ ' यावरून अण्णा एकंदरीत भलतेच फॉर्मात होते हे उघड आहे.

' अन् तुमचं काय तात्या ? ' आपले ग्रामीण कथालेखक इतका वेळ आपलं खास पान लावण्यात गुंगून गेले होते. त्यामुळं आमच्या संभाषणाकडं नुसतं लक्ष देण्यापलीकडं काही करायला त्यांना सवड नव्हती. आता मी त्यांना विचारतोय तेवढ्यात त्यांचं पान लावून झालं. अल्लाद ते दाढेला लावीत तात्या बोलले.

' हल्ली आम्ही नुसती पानंच लावीत असतो. कादंबरीची नव्हे. खायची. लेखनाचं म्हणाल तर लेखनसंन्यास घेतलाय मी सध्या. हं, काय घेणार का पान ? फर्स्टक्लास रामटेकची पानं आहेत. बोला '. तात्यांनी अंगठा आणि तर्जनी एकत्र करीत पान कसं आहे हे सांगितलं.

' आता नको बुवा, पान. आत्ताच एक झालं. आपले पंत भेटले होते. '

ते पंतांचं पान वेगळं. हे वेगळं. नाही, पानाला नाही म्हणून कसं चालेल ? आणि तुमची गोष्ट हरवलीय म्हणता. तोही एक पानं जुळवण्याचाच प्रकार नव्हे का ? घ्या. पंतांचं एक पान. आमचं दुसरं. या अण्णांचं तिसरं. जुळली का तीन पानं तुमच्या गोष्टीची ? आता हाणा गाडी पुढं. हां हां म्हणता गोष्ट जमून जाईल. एक्स्प्रेस एकदम. या पाना-सारखीच ! इतकी जोरदार शिफारस खुद्द तात्यांनी केल्यावर मग त्यांचं पान नाकारणार तरी कसं ? मुकाट्यानं हात पुढे केला.

' झकास पान हं तात्या. थँक्स ' मी म्हणालो.

' झकास म्हंजे काय. जंक्शन पान आहे दादा.' तात्या एक डोळा मिटत म्हणाले, ' बसा, अशी दहा पानं जुळवली की झालं. एक बेस्ट गोष्ट तयार ... बरं का दादा, आमचीही एक गोष्ट हरवली होती बघा एकदा.'

' अरेच्या, मग केलंत तरी काय तुम्ही तात्या ? कशी जुळवली गोष्ट परत ? ' हरवलेल्या गोष्टीचा उल्लेख ऐकताच मी कान टवकारले.

' तशी नाही हरवली दादा. म्हंजे आमची गोष्ट होती जशीच्या तशीच. पहिल्या पानापासून शेवटच्या पानापर्यंत. पण आमच्या संपादकांच्या मते ती हरवली होती बघा.'

' ते कसं काय ? '

' ते काय मला माहीत नाही. पण मी जेव्हा त्यांना विचारायला गेलो तेव्हा ते म्हणाले गोष्ट तपशिलात हरवल्यासारखी वाटते.'

' अस्सं. म्हंजे हे वेगळ्या प्रकारचंच हरवणं झालं. मग केलंत काय तुम्ही तात्या ? '

' आता मी तरी काय करणार हो ? समोर प्रत्यक्ष दिसत असलेली गोष्ट हरवली

म्हणायला लागल्यावर. उचलली आणि दुसऱ्या संपादकाला नेऊन दिली.'

'बरं, मग' ?

'मग काय. दुसऱ्या दिवशी त्यानंच फोन करून सांगितलं. गोष्ट हरवली बिरवली नाही. छापून टाकतो.'

'माझं तसं नाही तात्या. माझी ही गोष्ट तपशिलासकट पार बेपत्ताच आहे हो!'

'मी म्हटलं ना. तुम्ही पान खा. तंबाखूचा बार मारा. आणि अशी पानापानांनी गोष्ट जुळवा–!'

एकंदरीत तात्यांच्या दृष्टीनं हरवलेली गोष्ट परत मिळविण्याचं काम सोपं होतं, तितकंच ते मला तरी वाटलं नाही.

अखेर अण्णा आणि तात्यांना दुकानाच्या फळीवरच उभं ठेवून मी निघालो. या गोष्टीबद्दल काही तरी करणं जरुरीचं होतं.

अशा प्रकारं हरवलेल्या एखाद्या कथेचं पुढं काय होईल याच विषयावर एखादी कथा लिहिली तर? किंवा एखाद्या व्रात्य माणसाच्या हाती ती लागली तर तो तिचं काय करील या विषयावर? किंवा एखाद्या सुंदर तरुणीच्या ती हाती लागली तर– हा विषय कसा आहे?

नाही, पण यातल्या कुठल्याच विषयावर माझं मन ठरत नव्हतं, मला आपली सारखी आठवण होती ती माझी हरवलेली गोष्ट आणि ती अशी सहजासहजी हरवण्यात मी दाखविलेला गबाळेपणा. वास्तविक ते पुडकं मी नीट एखाद्या पिशवीत ठेवून, ती पिशवी सायकलच्या हँडलला लावली असती तर अगदी डोळ्यांसमोर राहिली असती आणि ती हरविण्याचा प्रसंगच उद्‌भवला नसता.

पण आता त्याबद्दल काही करता येण्यासारखं नव्हतं. शिवाय घरी परत जाऊनही फारसा उपयोग नव्हता. गोष्ट हरवल्याचं माझ्या लक्षात आल्यापासून आतापर्यंत पंत-अण्णा–तात्या या तीन थोर लेखकांनी माझा इतका वेळ घेतला होता की एवढ्या वेळात त्या पुडक्याचं काहीही झालं असणं शक्य होतं.

ठीक आहे. त्या पुडक्याचं किंवा आतील कथेचं आता व्हायचं असेल ते होवो. आपण आता थेट प्राध्यापकांकडं जायचं. प्राध्यापक असल्यामुळं जन्मसिद्ध हक्कानंच ते विसरभोळे, धांदरट आहेत. त्यांच्या हातूनही एकच का अनेक कथा हरवल्या असतील आजपर्यंत. त्यांनी काय केलं असेल अशावेळी आपल्याला पाहिलं पाहिजे. कदाचित त्यांच्याशी बोलत असताना आणखीही एकदोन जर्म्स मिळून जातील. कोणी सांगावं? किंवा आपल्यालाच आपली कथा आठवली तर ती त्यांना सांगून अधिक चांगली कशी करता येईल हे कदाचित प्राध्यापकमहाशय सांगू शकतील.

माझी सायकल मी त्यांच्या घराच्या दिशेनं वळविली.

आणि काय असेल ते असो. माझ्या हरवलेल्या गोष्टीचा विषय मला एकदम आठवला.

खून नावाची ती गोष्ट होती. एक कारकून आपल्या साहेबाचा खून करायचा असे ठरवतो. त्याप्रमाणे तो रविवारी त्या तयारीनं ऑफिसला जातो. साहेब रविवारी ऑफिसमध्ये येतो हे त्याला माहीत असतं. साहेबाला चक्क सांगून त्याचा खून करायचा असं या कारकुनानं ठरविलेलं असतं. पण तो जेव्हा ऑफिसचे दार उघडून साहेबाच्या खोलीत जातो, तेव्हा त्याचं सगळं अवसान गळून जातं. मग साहेबच त्याला सांगतो की, ही खून करायची पद्धत बरोबर नाही. माझा खून तू समजा केलास तर इतका पुरावा तू इथं ठेवतो आहेस की सहज पकडला जाशील. शिवाय आज सुट्टीचा तू एकटा आलेला. शिपायानं तुला पाहिलेलं असणारच. तो तुझं नाव सांगणार. शिवाय सगळीकडं तुझ्या बोटांचे ठसे उमटलेले आहेत. मी दिलेली सिगरेट तू ओढलीस त्या सिगारेटसकट. म्हणून मला तुझ्याबद्दल सहानुभूती वाटते ती याबद्दल की समजा, तू माझा खून केला नाहीस तरीही पकडला जाणारच आहेस. कारण काय आहे की तू इथनं जायचाच अवकाश. मी स्वतः पिस्तुलानं गोळी झाडून आत्महत्या करणार आहे. मी एका अशा लफड्यात सापडलो आहे की, मला दुसरा मार्गच उरलेला नाही. यावर तो कारकून इतका घाबरतो की पुढचा मागचा कसलाही विचार न करता जीव घेऊन पळत सुटतो.'

हा त्या गोष्टीचा केवळ सांगाडाच. गोष्टीतले बहुतेक तपशील मी विसरलो होतो आणि मला ती अशी बरीच संगतवार आठवली हेच नशीब. कारण या गोष्टीबरोबर सुरू केलेल्या इतर अनेक गोष्टींचे विषय एकमेकात मिसळून डोक्यात बराच गोंधळ उडण्याचीही शक्यता होती.

प्राध्यापक महाशयही सुदैवानं घरी सापडले.

त्यांचीही एका गोष्टीशी झटापट चालली होती.

माझं ऐसपैस स्वागत करीत ते म्हणाले,

' काय ? आकडा कितीवर गेला ? '

पण मी ही माझ्या दिवाळीलेखनाची खानेसुमारी आणि त्याबद्दलच्या कोपरखळ्या सहन करण्याच्या मनःस्थितीत नव्हतो.

' अरे, नुकतीच एक खेदजनक घटना घडली. माझी गोष्ट हरवली. '

' गोष्ट हरवली हे नामंजूर. पण ही घटना खेदजनक हे मंजूर. '

' का बुवा ? '

' कारण सोपं आहे. एकदा लिहिलेली गोष्ट हरवली तरी तुम्ही ती परत लिहिल्याशिवाय काही राहात नाही. आणि दुसरं म्हणजे हरवलेली गोष्ट या विषयावर तुम्ही आणखी एक गोष्ट हाणणार. हरवली म्हणून सापडली वगैरे. आता मराठी वाचकांच्या दृष्टीनं ही घटना खेदजनक नव्हे काय ? म्हणजे एकाऐवजी तुमच्या दोन गोष्टी त्यांना वाचाव्या लागतील ही. '

' माफ कर बाबा. तू म्हणत असशील तर नाही लिहिणार. पण आता ही गोष्ट हरवून बसलो आहे तिचं काय करायचं हे सांगशील का मेहेरबानी करून ? ' मी म्हटलं.

' आल्या रस्त्यानं परत विचारत जायचं एवढी साधी गोष्ट तुला समजू नये ? '

या साध्या गोष्टीत काय काय अडचणी आल्या, कसा वेळ गेला आणि तेवढ्या वेळानंतर ती सापडणे कसे अशक्य होते हे मी त्याला सांगितले.

' आहे तरी काय एवढी गोष्ट ही ? ' त्यानं विचारलं.

आणि मी त्याला थोडक्यात ती सांगितली.

' गोष्ट बरी आहे. पण महत्त्व माझ्या मते तपशिलाला आहे. बरं, ती कोणाकडून तू घेतली आहेस. म्हणजे या कारकुनाकडून, की साहेबाकडून. मला वाटतं तो ऑफिसातला प्यून तिथं होता त्याच्याकडूनही घेण्यासारखी आहे. ' ही प्राध्यापकांची मल्लीनाथी.

' मी कोणाकडूनही घेतली वगैरे नाही. असल्या फिल्मी टेक्निकवर आपला विश्वास नाही. गोष्ट माझ्या मते जशी घडली तशी सांगितली आहे.'

' ते तू विचार करून बघ. मी ती तिघांकडूनही घेतली असती. पण काय रे, तुझ्यासारख्या व्यवस्थित माणसाच्या हातून अशी तयार झालेली गोष्ट चक्क हरवते याचा अर्थ काय ? आमचे सोडून द्या. आम्ही गबाळे. पण तुम्हीसुद्धा ? ' त्यानं मला ऐकवलं... ' पण ते असो. आता फक्कडसा चहा घे. तुझी गोष्ट तुला डिटेलवार आठवलीच पाहिजे बघ...' चहा झाला आणि मी निघालो. येतानाही त्यानं मला परत बजावलं,

' तो साहेब, प्यून यांच्याकडूनही गोष्ट घेता येते का पाहा, बरं का.'

' हो हो, सगळ्यांचंच नीट पाहून घेतो.'

– आणि मला आठवत असलेल्या सांगाड्यात परत जीव घालून तो जिवंत कसा करायचा या विचारांनी गोंधळलेल्या मनःस्थितीतच मी घरी पोहोचलो. गोष्ट परत लिहावी लागणार या कल्पनेनं मी अगोदरच भलता हैराण झालो होतो.

सायकलीला कुलूप लावून किल्ल्यांची साखळी हातानं फिरवीत घरात आलो. तोच कोणीतरी ओरडून सांगितलं.

' अहो, तुमच्या नांवाचं एक पाकीट आताच कोणीतरी आणून दिलं. टेबलावर ठेवलंय तुमच्या.'

' माझ्या नावाचं पाकीट ? ' मी बुचकळ्यात पडलो. ही पोस्टमन येण्याचीही वेळ नव्हती.

लांब टांगा टाकत टेबलापाशी जाऊन मी पाहिलं.

–माझ्या हरवलेल्या कथेचं बंडल तिथं पडलेलं होतं. फरक म्हणजे त्यावर आता पूर्वी नसलेला एक कागद कोणीतरी टाचणीनं जोडलेला होता. त्यावर ठळक अक्षरात लिहिलेलं होतं.

' साभार परत–एका वाचकाकडून. '

•

○ ○ ○

# हिसका

सांताक्रुझ विमानतळ जवळ आला. 'विझवा त्या विड्या आणि आवळा ते कंबरपट्टे' हा संदेश मिळाला. मी माझी शेवटून दुसरी अमेरिकन सिगरेट् विझवली आणि अक्षरशः कंबर कसून स्वागतासाठी तयार झालो. विमानाचे पाय शेवटी एकदाचे जमिनीला लागले. आता आपण अधांतरी नाही. जमिनीचं आणि आपलं नातं परत एकदा जुळलं. मातीचा उबदार प्रवाह रक्तात परत सुरू झाला आणि विमान–अपघातासाठी केलेलं एक लाख डॉलर्सचं इन्शुअरन्स आता फुकट गेलं होतं तरी त्याचं वाईट वाटलं नाही. नाहीतरी पायाखालीही आकाश आणि डोक्यावरही आकाश हा अधांतरी प्रवास काही खरा नव्हे. यक्ष किन्नर इत्यादी प्राण्यांना तो ठीक. आपल्यासारख्या 'मनुजा'ला पायाखाली जमीनच असलेली बरी. विमानानं पाय जमिनीवर रोवले आणि आम्हाला एक दणदणीत हिसका बसला. इतका गोड हिसका खायची आपली तयारी कधीही आहे. जमिनीला पाय लागताना एवढा हिसका काहीच नव्हे. आता विमान–अपघातात सापडण्याची भीती नाही. मोटार–अपघात, बस उलटणं, पुरात सापडणं, गाडी नदीत पडणं एवढे किरकोळ अपघातच आता उरले याची सुखद जाणीव त्या हिसक्याबरोबरच झाली.

'एअर इंडियाच्या हवाईसुंदरीचं ते विलोभनीय हास्य आणि 'Good bye' चे ते दोनच पण एकापेक्षा एक अधिक सुंदर असलेले शब्द–मला इतके काही आवडले की, त्यांना ताबडतोब पाकिटात घालून मी आतील खिशात ठेवून दिले.

– आणि अखेर सागर, आकाश इत्यादी पाच मंडळींशी आम्ही ज्या मायभूमीला परत घेऊन चला अशी बोलणी चालविली होती त्या भूमीवर पायाचे तळवे टेकवले.

तळाच्या दिशेनं आम्ही चालायला लागलो. गच्चीवर उभ्या असलेल्या अनेकांनी आमच्याकडे पाहत हातरूमाल हलविले. आम्हीही ते आपल्याकरिताच आहेत असे समजून आमचे हातरूमाल हलवून त्यांना प्रत्युत्तर दिलं. कोट, कोटावरील टॉप कोट, कॅमेरा आणि हातातली बॅग इत्यादी सरंजाम सावरीत मी तळाच्या इमारतीकडे निघालो.

फाटच्या बारीला बरीच पाव्हणं मंडळी विलायतेहून परत येणार अशी कुणकुण तळावरच्या लोकांना लागली असावी. कारण दारात बरेच लोक आमची वाट पाहत उभे होते. 'या पाव्हणं' एवढंच म्हणायचं बाकी ठेवून आमचं त्यांनी सगळं काही आगत-स्वागत केलं. म्हणजे आम्हाला त्यांनी ताबडतोब रांगेत उभं केलं. एक लांबच लांब रांग तयार झाली अशी खात्री झाल्यावर हे लोक गडबडीनं कुठंतरी निघून गेले. समोरच्या लांबच लांब काउंटरवर चार पाच खाकी ड्रेसवाले लोक बसले होते. रांगेच्या दुसऱ्या टोकाला उभा असलेला मी आपला नंबर कधी लागणार म्हणून हाशहुश करीत घाम पुसायला सुरुवात केली.

काउंटरवर बसलेले ते चौघे काय तपाशीत होते त्यांनाच माहीत. पण अत्यंत गंभीर चेहरे करून ते बराच वेळ काहीतरी लिहीत होते हे मात्र खरं. नालबंद वहाणा घातलेले दोन शिपाई या साहेबांच्या मागच्या बाजूला उगाचच इकडून तिकडे, तिकडून इकडे हिंडत होते. बहुधा ते साहेब कामबिम करीत नाहीत ना अशी खात्री करून घेत असावे किंवा आमच्याकडं ते मुद्दाम दुरून लक्ष ठेवणारे 'शायडी' सुद्धा असण्याचा संभव होता.

आपल्यासमोर परदेशातून नुकतेच परत आलेल्या लोकांची एक बरीच मोठी रांग मघाचपासून उभी आहे हे बऱ्याच वेळानंतर त्या कामात गढलेल्या साहेबांच्या लक्षात आलं असावं. शिवाय हे लोक मोठ्या शिस्तीत, रांगेत उभे आहेत व अत्यंत केविलवाण्या नजरेनं आपल्याकडे पाहत आहेत तेव्हा त्यांचं आपल्याकडे काही काम असण्याचा संभव आहे असा संशयही त्यांना आला असावा. संशय आला आणि साहेबांचे चेहरे अधिकच त्रासिक झाले. बरोबरच आहे. सकाळच्या झोपायच्या टायमाला आपली ही मोठी रांग. साहेबांचं ऑफिस म्हणजे काय दूध–केंद्र होतं असं आम्ही समजलो की काय ? पण साहेब लोक झाले तरी करतात काय ? घरी बायका, कच्चीबच्ची असावीत, पोटापाण्या-करिता तरी काम करायला हवंच. ते कुणाला चुकलं आहे. कामाच्या जाणीवेनं त्या सगळ्यांच्या कपाळावर आठ्यांची जाळी पसरली हे इतक्या दुरूनही माझ्या लक्षात आलं. सगळ्यांच्या कपाळांना आठ्या पडणं हे सरकारी शिस्तीच्या दृष्टीनंही योग्यच होतं. कारण त्या सगळ्यांचे कपडे सारखे, सगळ्यांच्या कपड्यांना इस्त्री तर मग आठ्याही सगळ्यांना

नकोत काय ? तसं झालं नसतं तर सौंदर्याची किती हानी झाली असती बरं !

— पण शेवटी म्हणजे सुमारे एका तासानंतर हे आठीवाले साहेबलोक फुसकेच आहेत हे माझ्या ध्यानात आलं. म्हणजे आम्ही येताना आफ्रिकेवरून आलो तेव्हा आम्हाला पिवळ्या तापानं वगैरे पछाडलं नाही ना, एवढंच त्यांना पाहायचं होतं. आता या कामाळा एक तास लागायला नको होता असं कोणी चोंबडेपणानं म्हणेल. पण ते अर्थातच बरोबर नाही. कारण काम लवकर होईल असा संशय येताच या चौघांपैकी दोघे उठून उभे राहिले आणि अत्यंत गडबडीनं कुठंतरी निघून गेले. त्याअर्थी या महत्त्वाच्या कामाला निदान एक तास लागलाच पाहिजे असा त्यांना वरिष्ठांचा हुकूम असला पाहिजे. पिवळ्या तापाचं काम म्हणजे काय चेष्टा आहे ! ते तरी बिचारे काय करणार ?

पिवळ्या तापाच्या कचाट्यातून सुटलो आणि एकदा चंबुगबाळं सावरीत, घाम पुशीत निघालो. तेवढ्यात माझ्या खिशातील उरल्यासुरल्या अमेरिकन चलनाचा वास एका एजंटाला आला. 'हार्ड' करन्सी बदलून घेणं अत्यंत आवश्यक आहे असं अतिशय गंभीर चेहरा करून त्यानं मला बजाविलं. 'ही माहिती बरोबर आहे किंवा काय ?' असं मी दुसऱ्या एका इसमास पुशिलं तेव्हा तो उत्तरला की 'फॉरिन करन्सी डिक्लेअर करणंच कंपल्सरी आहे.' माझं इंग्रजी साधारण बरं असल्यामुळं या वाक्याचा मथितार्थ मी तत्काळ ताडला आणि 'हार्ड' करन्सीबद्दलचे नियम समजायला एकंदरीत बरंच कठीण आहे असं जाणून नंतर उगाच नस्तं लचांड नको असा विचार केला. मजजवळची उरलीसुरली अमेरिकन माया त्या एजंटास दिली. त्यानं दिलेली स्वदेशी माया घेऊन पुढं निघालो.

उतारूंनी बरोबर आणलेल्या मुद्देमालाची तपासणी यानंतर व्हावयाची होती. माल आपल्या पाठीशी घालून बरेच कस्टम अधिकारी तिथं आमच्या स्वागतास सज्ज होते. याच वेळी आम्हाला भेटायला आलेली सर्व मंडळीही पलीकडच्या टोकाला उभी असलेली दिसली. तपासनीसांची एवढी मोठी फौज तिथं असल्यामुळं आमचं काम लवकर होणार आणि ताटकळत आपल्या भेटीसाठी उभी राहिलेली मंडळीही लगेच भेटणार याचा आनंद बहुत झाला. पण कसचं काय आणि कसचं काय ! सरकारी काम लवकर होणार याविषयीचा आनंद जीवनाप्रमाणंच क्षणभंगुर असतो हे नंतर माझ्या लक्षात आलं. मज-बरोबर आलेल्या बहुतेक उतारूंनी एकेका तपासनीसाला गाठलं होतं. मी अजूनही एकाकीच होतो. परंतु इतरांच्या कामालाही सुरुवात झाली नव्हती ही त्यातल्यात्यात समाधानाची गोष्ट. शेवटी काही वेळ थांबून आपल्याला कोणी भेटतो का म्हणून तपासास लागलो. परंतु पहिल्याच माणसानं 'ती ड्यूटी माझी नाय्' म्हणून मार्गास लावलं. 'माझं हे काम कोण करील ?' असा प्रश्न अत्यंत नम्रपणं मी त्यास पुशिला परंतु त्याचं काहीच उत्तर मला मिळालं नाही. यावरून मी कोणाकडं जावयास पाहिजे ते सांगण्याची ड्यूटीही 'माझी नाय्' असं त्यास म्हणावयाचं असावं असं मी समजलो. मग मोकळा असलेला अधिकारी दिसला की त्याच्याकडं मी धावावं आणि माझा केविलवाणा प्रश्न

विचारावा. त्यानंही तितक्याच तत्परतेनं मला दुसरीकडे पाठवावं असा मनोरंजक प्रकार बराच वेळ चालला. एवढ्या लहानशा आवारातसुद्धा मी एकंदर दोनएक मैल सहज चाललो आणि धावलो. हे सर्व बरोबरच्या सामानासकट केल्यामुळं मधूनमधून धापा टाकण्यासाठी आणि घाम पुसण्यासाठी मला थांबावं लागत होतंच. शेवटी मी कंटाळलो की दमलो दोन्ही कुणास ठाऊक, पण हे एक दोन तासात होणं नाही असं मला निश्चित कळून चुकलं आणि फाटकात उभ्या असलेल्या नातलग मंडळींकडे अत्यंत केविलवाण्या नजरेनं पाहत मी तिथल्या पंख्याखाली उभा राहिलो. इतक्या शांतपणं उभा राहिलेला हा ' प्याशिंजर ' कोण, असा संशय येऊन की काय दोघा - तिघांनी प्रथम दुरून आणि नंतर जवळून माझ्याकडं भयंकर संशयी नजरेनं पाहिलं. पण मी तिकडे बिलकुल लक्ष न देता ' आपली काही तक्रार असल्यास अधिकाऱ्यांना सांगा ' या बोर्डाकडे मख्खपणे पाहत उभा राहिलो. बोर्ड पाहता पाहता काही नाही तरी निदान तक्रार करावी असा एक आततायी विचारही माझ्या मनात चमकून गेला. पण तसं करणं हे फारच बावळटपणाचं ठरलं असतं. कारण ही सामान्य ड्यूटी तिथं हजर असलेल्या बड्या-बड्या अधिकाऱ्यांपैकी कोणाचीही असणं शक्य नाही हे सहज ध्यानात येण्याजोगं होतं.

असा बराच वेळ गेला. पण मग एकाएकी माझा पासपोर्ट फक्त १९६७ पर्यंतचाच आहे हे माझ्या लक्षात आलं आणि सुदैवानं तेवढ्यातच एका साहेबाला माझी दया येऊन त्यानं मला आपल्याजवळ बोलाविलंही. तो माझं काम करणार हे कळल्यावर माझ्या डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहिले यात नवलं ते काय ? संकटातून वाचविल्यानंतर सिंदबाद गुडघे टेकून अल्लाला दुवा देत असे. तेवढंच काय ते मी केलं नाही. साहेबानं मला बोलावताच मी वायुवेगानं त्याच्याकडे धावलो. बरोबरचं सर्व सामान घेऊनही मी ज्या झपाट्यानं आम्हा दोघातलं अंतर तोडलं त्याबद्दल माझं मलाच फार कौतुक वाटलं.

' ड्यूटी ' वगैरे सर्व भरून झाल्यावर या प्रेमळ साहेबानं मी काकासाहेबांचा कोण, फर्ग्यूसन म्हणजे पुण्याचेच थोर कॉलेज ना वगैरे चौकशी केली. काकासाहेब मध्यवर्ती सरकारचे मंत्री झाल्यापासून यांच्या पहिल्या प्रश्नाचं उत्तर देणं मला कधीच जड गेलेलं नाही. अर्थातच मी त्यांचा पुतण्या होतो ( महाराष्ट्रातील इतर सगळ्यांच्याप्रमाणं ) हे काय वेगळं सांगावयास पाहिजे होतं ! कागदपत्रं, पावत्या, पासपोर्ट परत देताना 'आपल्या भेटीनं फार आनंद झाला ' असेही उद्गार साहेबानं काढल्यामुळं मी धन्य झालो. ' मलाही पै न् पै कर भरावा लागल्यामुळं फार दुःख झालं ' असं प्रत्युत्तर देऊन जड अंतःकरणानं पण हलक्या खिशानं मी तेथून सटकलो.

त्यादिवशी विश्रांती घेणं शक्यच नव्हतं. बोटीनं पाठविलेल्या सामानाचा ताबा मिळविणं ही अत्यंत अवघड कामगिरीही मला करायची होती. एजंट साहेबांची कचेरी कोर्टात कुठंशीशी होती. तो पत्ता शोधीत तिथं गेल्यावर अर्थातच कळलं की मला पाहिजे होती तीच ब्रँच तिथं नव्हती. अशारीतीनं दोनतीन फांद्यांवरून उड्या मारल्यानंतर शेवटी एकदा योग्य ती फांदी सापडली. पण म्हणून काय झालं ? मुंबईच्या ऑफिसातला साहेब

काय सहजासहजी भेटतो ? मी गेलो तेव्हा तो नुकताच बाहेर गेला होता. ही गोष्ट स्वाभाविकच होती. साहेब लोक, त्यांत आणखी मुंबईचे. मी शांतपणे एका उंच स्टुलावर बसून एजंटाच्या ऑफिसचं विहंगमावलोकन करू लागलो.

बराच वेळ वाट पाहिली. शेवटी घरी परत जावं असं तिसऱ्यांदा ठरविलं. तेव्हा एजंटसाहेब परत आले आणि येताच सुदैवानं मिनिटाच्या आतच माझी 'केस' त्यांनी घेतली.

त्यानंतर बराच वेळ वूडहाऊसच्या पात्रांमध्ये जसे संवाद नेहमी होतात तशा प्रकारचा एक मनोरंजक संवाद आमच्यात झाला.

'तुमचं 'लँडिंग सर्टिफिकेट' कुठं आहे ?' एजंट.

'म्हणजे काय ?' मी.

'सर्टिफिकेट ऑफ लँडिंग.' एजंट.

'असली काही भानगड मला माहीत नाही. आणि माहीत असली तरी ती मजजवळ नाही.' मी.

'काय म्हणता तुमच्याजवळ लँडिंग सर्टिफिकेट नाही ?' एजंट.

'नाही.' मी.

'नाही ?' एजंट.

'नाही.' मी.

'नाही.' एजंट.

'नाही.' मी.

'एल्. सी. नाही ?' एजंट.

'एल्. सी. नाही.' मी.

असा प्रकार सुमारे पाच मिनिटं चालला. 'त्रिवार नाही' च्याही खूपच पलीकडं गेल्यावर आम्हाला दोघांनाही त्याचा कंटाळा आला. त्याच्या प्रश्नाबद्दल मला वाटणारं आश्चर्य आणि माझ्या उत्तरामुळं त्याला बसलेला धक्का दोन्ही बरीच कमी झाली.

एजंटाच्या नंतरच्या बोलण्यावरून माझ्या हे लक्षात आलं की एल्. सी. म्हणजे केवळ विमानातून आल्याचं सर्टिफिकेट नव्हे. त्यामुळं केवळ थांबलेल्या विमानातून उतरण्याच्या गुन्ह्याबद्दल पुरावा लागत नाही हे कळलं. बोटीतून जो मुद्देमाल पाठविला त्यावरचा कर योग्य प्रमाणात वसूल करण्यासाठी विमानातून पाटुंगळीला काय आणलं याचीही नोंद अथपासून इतिपर्यंत पाहिजे. तीं असलेली एल्. सी. या नावाची अत्यंत बहुमोल चीजच माझ्याजवळ नव्हती.

'इतकी साधी गोष्ट तुम्हाला माहीत नाही ! मला आश्चर्य वाटतं.' एजंट अत्यंत गंभीर चेहरा करून म्हणाला.

'साधारणपणे पाहिलं तर कुणी एखादी गोष्ट आपल्याला सांगितली किंवा तिच्या विषयी माहिती वाचली म्हणजे ती मला कळू शकते. काही अवघड गोष्टीही मला सम-

जतात. उदाहरणार्थ, हे तुमचं ऑफिस मी एकट्यानं शोधून काढलं.' नम्रपणे मी एजंटाला सांगितलं.

'म्हंजे काय ? प्लेनमध्ये तुम्हाला कोणी सांगितलं नाही ?'

'आमच्याकडं पाहून गोड हसण्यापलीकडं त्या होस्टेसनं काहीही केलं नाही.'

'बरं मग एअरपोर्टवर ?'

'ते सांगायची ज्याची 'ड्यूटी' होती तो कामावर नसला पाहिजे. कारण कामावर असलेल्यांपैकी तरी कुणाची ही 'ड्यूटी' नव्हती.' उगाच आपली सरकारी लोकांवर टीका करणं कसं अन्यायाचं होईल हे मी पटवून द्यायचा प्रयत्न केला.

'मग आता काय ?'

हा प्रश्न मी एजंटाला विचारायचा अशी माझी वेडी समजूत होती. पण ज्याअर्थी तोच त्यानं मला विचारला त्याअर्थी माझीच काहीतरी गफलत झाली असण्याचा संभव आहे. मी काहीच बोललो नाही.

'आता मी ज्या मोटारीतून आलो त्या गृहस्थांना तुम्ही पाहिलं का ?' थोड्या वेळानं एजंट महाराज बोलते झाले.

'मग त्याचं काय ?'

'त्याचं विशेष काही नाही म्हणा. पण त्यांचीही केस तुमच्यासारखीच होती आणि त्यांच्याकडून रुपयाला रुपया ड्यूटी आणि शिवाय रुपया दंड अशी दुप्पट रकम वसूल केली. या स्वतःच्या हातानं मी तीन हजार भरून आलो.' त्यानं बोलता बोलता माझ्यापुढं हात पसरला.

'पण माझ्याजवळ मुळातला रुपयाच नाही. तुम्ही मला या प्रकरणात मदत करायला हवी.' मी शक्य तितका दुःखी चेहरा करून म्हणालो.

'ऑफ् कोर्स, मी तुमच्याबरोबर येईन. पण यू कीप द अमाउंट रेडी.'

या संभाषणावरून मला असं कळलं की जरी माझी केस 'जेनुइन्' होती आणि तियले सगळे लोक त्याच्या ओळखीचे होते तरी दंड चुकविणं ही अशक्य गोष्ट होती. म्हणजे एजंट माझ्याबरोबर येणार होता तो मी सर्व पैसे भरताना हाताला हात लावण्याकरिता येणार होता आणि या कामगिरीबद्दल त्याची फी फक्त अडीचशे रुपयेच होणार होती. हो, आणि शिवाय मला तो कष्टमहपीस कुठं आहे हे दाखविणार होता हे वेगळंच. आणखी महत्त्वाची गोष्ट अशी की त्यानंतरच्या सगळया गोष्टींची काळजी तोच माझ्याकरिता करणार होता. मला काहीही करणं आवश्यक नव्हतं.

ही मेहेरबानी फार मोठी होती हे खरं. पण मुख्य म्हणजे कष्टम्सचं हपीस मला माहीत होतं आणि तिथं जाण्यासाठी मला 'कंपनी' चीही विशेष आवश्यकता होती असं नव्हे.

'मी एकटाच जाईन. तुमचा 'बहुमोल' वेळ अधिक घेत नाही' असं म्हणून मी एजंटाचा निरोप घेतला. दोन तासांत माझा सबंध अडीचशे रुपये फायदा झाला होता

हिसको
०२/८०  0२५६/०० 

याचा आनंद मला इतका झाला की त्या भरात टॅक्सी करून मी दादरला आलो. आमच्या ओळखीच्या जोशीसाहेबांना गाठण्याशिवाय आता गत्यंतर नव्हतं.

त्यांच्याकडं अर्थातच जोशीणबाई मला साहेबांच्या आधी भेटल्या.

' आहे म्हणजे, तुम्हाला आमची आठवण आहे म्हणायची ! '

' माफ करा हं. खरं म्हणजे सकाळीच येणार होतो पण हे कस्टमचं काम निघालं.'

' नाही म्हटलं, तुम्ही मोठी माणसं. त्यांत फॉरेन रिटर्न, आम्ही गावंढळ. तुम्ही कशाला याल आमच्याकडं, मी आपलं माझ्याकडनं म्हणून ठेवलं होतं हो कुसुमताईंना, की ह्यांच्याही ओळखी आहेत कष्टममध्ये. वेळ पडला तर माहीत असावं. झटकन् काम होऊन गेलं असतं. पण कसंही असो. झालंना तुमचं काम. आम्हाला त्यातही आनंद आहे हो. अगदी आमच्याच वशिल्यानं व्हायला पाहिजे असं नाही काही. '

यावर मी एक दीर्घ निःश्वास सोडला.

' अहो, माझं काम अजून झालेलं नाही. म्हणूनच इतक्या तातडीनं आलोय म्हणा ना. ' मी शेवटी म्हणालो.

' काय पण खोडकी जिरलीय. जास्त शिष्टपणा करीत होता नाही का ! ' असा अर्थपूर्ण दृष्टिक्षेप माझ्याकडं टाकून जोशीणबाई साहेबांना सांगण्यासाठी तेथून चालत्या झाल्या आणि जीव भांड्यात पडणं म्हणजे काय असतं हे मला कळलं. सुदैवानं जोशी-साहेब लगेच आले. माझ्या सर्व अडचणी मी त्यांना एका दमात सांगून टाकल्या.

' एल. सी. नाही हीच फार मोठी अडचण आहे. '

' दॅटस् टेरिबल. काय ! ' जोशीसाहेब म्हणाले.

' कबूल, पण या चुकीला मी जबाबदार नाही. '

' दॅटस् द हॉरिबल पार्ट ऑफ इट्, काय ! अहो म्हणजे तिथं आणलेलं सामान विकून पैसे उभे करावे लागतात लोकांना. आय हॅव सीन इट विथ माय ओन आइज. काय ? ' जोशीसाहेब म्हणाले. ' शिवाय इग्नरन्स ऑफ द लॉ ईज नो एक्सक्यूज. काय !'

' पण आता ते सर्टिफिकेट नाही हे तर खरं. यावर उपाय काय ? ' मी अजीजीनं म्हणालो.

' म्हंजे आय नो दोज पीपल. काय ! पण धिस् इज सिंपली टेरिबल, काय ! ' ' टेरिबल ' ' हॉरिबल ' आणि ' काय ' हे साहेबांचे फार आवडते शब्द आहेत एवढंच मला आतापर्यंतच्या संभाषणावरून कळलं होतं.

यानंतर मी काय काय आणलं आहे याची चौकशी झाली.

' टाइपरायटर. ' मी म्हणालो.

' टाइपरायटर ! झालं म्हणजे दीड हजार रुपये. काय ! '

' अहो, पण माझा टाइपरायटर साधा पोर्टेबल आहे. मोठं मॉडेल नव्हे.' मी सांगितलं आणि शेवटी ऐकण्याच्या सवयीमुळं ' काय ' सुद्धा म्हणालो.

' मोठं मॉडेल असलं तर टेरिबलच. अडीच हजार रुपये ! मला पर्सनलीच माहीत

आहे. म्हंजे दररोज आमचे तेच व्यवहार चालू असतात ना, काय ! '

' आणि एक कॅमेरा ' मी सांगितलं.

' काय ? कॅमेरा ! ! ' जोशीसाहेब म्हणाले आणि आपलं ' टेरिबल ' आश्चर्य व्यक्त करण्यासाठी मटकन खालीच बसले. ' मी बरोबर गांजा आणला आहे. ' असं सांगितल्यावर एखाद्यानं जसा भयानक चेहरा केला असता तसा त्यांनी केला.

' म्हणजे टू थावजंड. पण कॅमेऱ्याचं असं आहे की केवळ दंडावर भागणार नाही. इट् वुइल बी फॉर्फिटेड्. जप्त करणार तो. काय ?'

म्हणजे कॅमेरा आणणं या भयंकर गुन्ह्याबद्दल काळ्या पाण्यावर वगैरे पाठवीत नाहीत ही त्यातल्यात्यात समाधानाची गोष्ट होती. मग वस्तूंची ' हॉरिबल ' यादी मी लांबवीत बसलो नाही ! काय ! कारण माझ्या गुन्ह्याबद्दलच्या शिक्षा सारख्या वाढतच गेल्या असत्या अशी भीती मला वाटायला लागली.

' तुम्ही आता असं पाहा की ते लोक जास्तीत जास्त काय करणार आहेत ? फाशी तर देत नाहीत ना, काय ! '

' ते लोक तुमच्या म्हणण्याप्रमाणं चालले तर तेही अशक्य नाही.' असं मी म्हणणार होतो. पण फाशी जाण्याची वेळ आलीच तर कसं फाशी जावं या बाबतीत तरी आपल्याला त्यांच्या ओळखीचा फायदा होईल असा विवेक करून मी गप्प बसलो.

' आणि ॲडिशनल डिफिकल्टी काय आहे सांगू का ! द मॅन् आय नो इज ट्रान्सफर्ड. तुम्ही काल आला असता ना, तर काहीतरी करता आलं असतं. काय !'

काल मी कायरोला होतो. तिथून मोठ्यांदा ओरडून जर मी जोशीसाहेबांना मला त्यावेळी माहीत नसलेली माझी अडचण सांगितली असती तर नक्कीच त्यांनी आपला ' इन्फ्लुएन्स वापरला असता ही गोष्ट निःसंशय होती. ही साधी गोष्ट मला कायरोला असताना कशी सुचली नाही याबद्दलचा अतिशय पश्चात्ताप करीतच मी जोशीसाहेबांच्या घराबाहेर पडलो.

आता परत एखादा एजंट शोधून काढणं आवश्यक होतं. त्यामुळं ' एजंटापासून एजंटाकडे ' असा माझा प्रवास सुरू झाला. पण या नव्या एजंटाचा वेळ कमी ' बहुमोल ' असणं आवश्यक होतं.

असा एक इसम अखेर मला कष्टम्स् ऑफिसात भेटला. परिस्थितीचं गांभीर्य त्यानं मला स्वतःच्या इंग्रजीत पटवून दिलं. त्यात त्यानं बरेच गुजराथी शब्द वापरल्यामुळं परिस्थिती कमी गंभीर आहे असं मला उगाचच वाटू लागलं. जो कागद मजजवळ नव्हता आणि ज्याच्या उल्लेखाचीसुद्धा मला आता भीती वाटायला लागली होती. त्याला तो ' लँडिंग सर्टिफिकेट ' म्हणण्याऐवजी नुसतंच ' लँडिंग ' म्हणत होता.

लँडिंग नसलं तर वधारे वांधा होणार ' असं म्हणून त्यानं आपल्या बोटांची सुरी ( स्वतःच्या ) मानेवरून फिरवली आणि तोंडानं ' चक् ' असा आवाज करून माझी काल्पनिक मान छाटून टाकली. या अभिनयामुळं मी इतका घाबरलो की कलेक्टरसाहे-

बांनाच थेट जाऊन भेटायचं हा माझा निर्वाणीचा उपाय मी जाहीर केला.

आता घाबरण्याची पाळी त्या एजंटाची होती.

'कलेक्टरसायबाला भेटून कायबी फायदा नाय्' हे आपलं विदग्ध मत मला पटवायचा त्यानं इतका प्रयत्न केला की त्यामुळं त्या साहेबांकडं गेलंच पाहिजे अशी माझी अधिकाधिक खात्री पटत गेली. मान छाटून घ्यायचीच असेल तर ते काम उच्च सरकारी अधिकाऱ्यानं केलेलं त्यातल्या त्यात बरं असं मी ठामपणे ठरविलं.

पण एजंट आणि त्याच्या सहकाऱ्यांना माझा हा आततायीपणा बिलकुल नामंजूर होता. 'कलेक्टरसाहेब भयंकर कडक आहेत. ते तुमचा एक शब्दबी ऐकेल नाय्. मी तुमाला बराबरच सांगेल' इत्यादी भयंकर कडक शब्दांत एजंटानं परत एकदा मला समजवायचा निर्वाणीचा प्रयत्न केला. तरीही जेव्हा मी सरळ जायलाच निघालो तेव्हा त्या सगळ्यांनी मिळून जवळजवळ हिसकाहिसकीचाच प्रकार केला. शेवटी मी पुढं आणि ते दोनतीन लोक माझ्यामागं याप्रमाणं आम्ही पळतपळतच कलेक्टरसाहेबांच्या ऑफिसा-कडे निघालो.

तिथं आम्ही पोचलो तरीही एजंटानं आपला हेका सोडला नव्हता आणि जेव्हा मी साहेबांच्या ऑफिसात प्रत्यक्ष शिरलो तेव्हा तर वाघाच्या पिंजऱ्यात जाणाऱ्या शेळी-कडे दयार्द्र आणि हताश नजरेनं पाहावं तसं त्यानं माझ्याकडे पाहिलं. मानेनं नकोनको म्हणत शेवटी हातही जोडले. पण मी तिकडे लक्षही दिलं नाही. मान कोणाकडून कापून घ्यायची याविषयी माझा निश्चय दृढ झाला होता.

थोड्यावेळानंतर साहेबांच्या खोलीतून मी सबंधच्या सबंध बाहेर आलो. माझी मान जागच्याजागी होती एवढंच नव्हे तर पहिल्या एजंटाला भेटल्यापासून लोपलेलं हास्यही परत होतं तिथं आलं होतं. माझी अडचण मी साहेबांना समजावून सांगितली होती आणि त्यांचंही समाधान झालं होतं.

ऑफिसातून मी बाहेर पडलो आणि माझी वाट थोपवून धरणाऱ्या एजंट आणि मंडळी दोन्ही हातांनी अक्षरशः लोटत धावत पळत जवळात जवळचं तारऑफिस गाठलं. माझ्यानंतर अमेरिकेकडून परत येत असलेल्या आमच्या मंडळींना तॉबडतोब केबल करणं हे माझ्या दृष्टीनं त्या क्षणाला माझं सर्वांत मोठं जीवितकार्य होतं.

—विलक्षण घाईनं मी तो फॉर्म घेतला आणि वार्षिक परीक्षेच्यावेळी शेवटच्या दहा मिनिटांतही जितक्या घाईनं लिहिलं नसेल तितक्या घाईनं तो लिहून काढला. 'लँडिंग सर्टिफिकेट' हे शब्द त्या केबलमध्ये मी जास्तीत जास्त वेळा लिहिलेच. पण बायकोच्या नावाच्या जागीसुद्धा त्या भयानक सर्टिफिकेटाचं नाव लिहिलं नसेलच असं मी आजही छातीठोकपणे सांगू शकणार नाही.

○ ○ ○

# नानाची शंभर नंबरी थाप

परवाच मला मिरासदारांचा नाना भेटला होता. परवा म्हणजे अगदी परवाच. ऑलिंपिक सामन्यांचे एकेक निकाल लागत होते. आपल्या हॉकी–संघाचा निकाल म्हणजे खऱ्या अर्थानं निकाल लागला होता. तरी मॉँट्रियलला इतर खेळाडू जुने उच्चांक साफ मोडून नवनवे उच्चांक प्रस्थापित करीत होते. नाही म्हटलं तरी मला त्यात कोमट का होईना, पण कुतूहल होतंच.

पण पुढचा किस्सा सांगण्या अगोदर या नानाबद्दल थोडसं. नाना म्हणजे मिरासदारांचा नाना नव्याण्णवबाद ! मजेदार थापा मारणारा एक इरसाल माणूस, आपण आपलं त्याला अस्सल बेनं असंच म्हणू म्हणजे तुमच्या लक्षात येईल. या माणसानं मारलेल्या शंभर थापांपैकी नव्याण्णव सरळ सरळ बाद. म्हणूनच तर त्याचं नाव नव्याण्णवबाद नाना असं मिरासदारांनी ठेवलं.

तर असा हा नाना मला भेटला.

‘ काय नानासाहेब, आज इकडं कुठं वाट चुकला ? ’

‘ वाट आत्ता नाही चुकलो साहेब. आधी चुकलो होतो ! ’

म्हंजे कुठं मुंबईला गेला होता काय ? ’

‘ मुंबई हितल्या हितं राहिली. पार दूर गेलो

होतो सातासमुद्रापलीकडं ! ”

मी मनात म्हटलं की हे बेनं लागलं बरं का बंडलं मारायला.

‘ सातासमुद्रापलीकडं ? ’

‘ म्हंजे काय विचारता साहेब. जावं लागतं. अलॅक्रिकला आपली पोरं चालली होती. मला म्हणाली नाना तुम्ही चला.’

‘ अस्सं, म्हंजे तुम्ही ऑलिंपिक्सचा पल्ला गाठला म्हणता ? ’

‘ अहो, आपलं काय गेलं ? आमच्या त्या पार्शिणीनंच खर्च केला. आम्ही गेलो. इथंच पडून राहायचं तर म्हटलं तिकडं जावं. आपला हुईल उपयोग कुणाला ? ’

मी विचारलं, ‘ म्हंजे तुम्ही तिथं कुणाचे हो उपयोगी पडला ? काय शर्यतीत भाग घेतला कसल्या की मुष्टियुद्धात ? नाही म्हंजे हॉकीच्या संघात तुमचं नाव नव्हतं. म्हणून विचारतो ! ’

‘ अहो ते सुद्धा झालं होतं. आपला गोविंदा नाही का जखमी होऊन पडलेला. मला म्हणत होते की चला नाना तुम्हीच खेळा त्याच्या जागी.’

‘ मग– ! ’

‘ मग काय ? मीच सांगितलं ते आपल्याच्यानं नाही जमायचं. नाहीतर काय हो. हे लोक हरणार आणि अपेशाचं खापर आमच्या डोसक्यावर.’

‘ अस्सं, मग तुम्ही केलंत तरी काय ? ’

‘ आता पळण्याच्या शर्यतीत घेणार होतो भाग. पण आमची ती पार्शीण होती ना बरोबर. ती म्हणाली, ‘ नाही रे बाबा. माझ्या राया, मी नाही तुला भाग घेऊ देणार. तुझ्यावाचून करमायचं कसं मला ? ’

‘ मग काय केलं म्हणता तुम्ही ? ’

‘ मी म्हटलं बाई, मी नाही तर नाही. पण निदान आमचा एक पठ्ठा तरी तयार करतो.’

‘ मग केला म्हणता कोणाला तरी तयार ? ’

‘ तर ? सोडतो की काय. अहो, या नानानं एकदा मनात आणलं की त्याला काय उशीर ? एकदा तर मनात आलं की या पळण्याच्या पळपुट्या शर्यतीपेक्षा आपण डॉक्सिंगमध्येच का भाग घेऊ नये ? डॉक्सिंग म्हणजे आपलं मुष्टियुद्ध हो. डोक्याशी संबंध म्हणून डॉक्सिंग. आपले लोक यातही मागं आहेत. तर म्हटलं आपला पंढरपुरी हिसका दाखवावाच या पाटलोणवाल्यांना.’

‘ भले म्हंजे तुम्ही स्वतःच उतरणार होतात की काय ? ’ मी विचारलं.

‘ तर ? शंका आहे की काय ? ’

‘ मग माशी कुठं शिंकली ? ’

‘ माशी नव्हे हो. ही आमची पार्शीण. ती म्हणाली, नका या भानगडीत पडू. उगाच कोणाच्या तरी बरगड्या मोडून ठेवाल आणि आपण इथं मजा करायला आलो

आहोत तर नसती बिलामत येईल आपल्यावर. तेव्हा म्हटलं बरं महामाये, सोडलं तुझ्यासाठी सुवर्णपदकावर पाणी.'

'त्या पार्शिणीचा एकंदरीत तुमच्यावर फार जीव दिसतोय हां बाकी.'

'ते काही विचारू नका. अहो, माझ्याशी लग्न करायचाच हट्ट धरून बसली होती. हे तर खुद्द दादासाहेबांनीच लिहून ठेवलंय.'

'हे कोण दादासाहेब ?'

'दादासाहेब म्हणजे आपले मिरासदार नव्हेत का ?'

'हां. ते विसरलोच. पण मग तुम्ही काय म्हणता की पळण्याच्या शर्यतीसाठी तुम्ही एक पठ्ठा तयार केला. पुढं काय ?'

'पुढं काय म्हंजे काय तात्यासाहेब. त्यानं बाजी मारली की.' नानानं शांतपणे सांगितलं. ही थाप माझ्या गळी उतरणं अर्थातच कठीण होतं. एरवी मी आधी ऐकत बसलो होतो तसं केलं असतं. पण म्हटलं, आता जर याला अडवला तर हा आणखी एखादी सुरस बात लगावील.

'नाना, तुमच्या बंडलबाजीला काही सीमा ? अहो, बाजी मारली याचा अर्थ पळण्याच्या शर्यतीत आपला पठ्ठा पहिला आला म्हणता ?'

'ते फार मोठं महाभारत आहे.' असं सांगून नाना म्हणाला, तात्यासाहेब, पण तो पहिला आला कसा हे आधी सांगतो. आपल्या एका पोराला मी तिथं गाठलं आणि म्हटलं, पोरा, पळशील कारे बाबा तू ? तुला तयार करतो.'

'हे कुठलं बेनं गाठलं तुम्ही ?'

'बेनं म्हणजे बेनंच अगदी. हे क्यानडाचे लोक बर्फाळ प्रदेशात शेती कशी करतात हे पाहायला तिथं एक गावकरी मंडळ आलं होतं. त्यातल्या एकाला धरला. म्हटलं लेका ऐके माझं. एक सुवर्णपदक मिळून जाईल. देशभर गाजावाजा होईल तुझा. मग काय म्हणता, महाराज. झालं की एक पोरगं तयार.'

'बरं पुढं शर्यतीच्यावेळी काय झालं ? आला का हा पठ्ठा तुमचा पहिला ?'

'बेशक. पहिला म्हंजे पहिलाच. पण मला काय डोसकं लढवावं लागलं तुम्हाला कल्पना नसेल. अहो, याला येत होतं सगळं. म्हणजे पळण्याखेरीज सगळं. म्हटलंसुद्धा मी त्याला 'तू काय रे धावणार बाबा, हळू धावण्याची शर्यत असली तर त्यात पहिला येशील तू फार तर.'

'पहिला म्हंजे शेवटचाच ना ?' मी हसत हसत म्हटलं.

'होय हो. तेच म्हणतोय. पहिला म्हणजे शेवटचाच. ही हळू धावण्याची शर्यत ना ?'

'मग अशी किमया तरी काय केलीत तुम्ही नाना. हे तट्टू तुमचं पहिलं आलं कसं ?'

'यायलाच पाहिजे. न येऊन सांगतो कुणाला ? मी काय केलं माहीत आहे ?

तुम्हाला माहीतच आहे की या शर्यती सोडण्याच्या वेळी त्या सोडणारा माणूस हवेत बंदूक उडवतो.'

' हो, ते मला माहीत आहे. पण काय केलं ते मला हवं आहे. '

' माझ्या जरा जवळ या. तुमच्या कानात सांगतो. कांपिटिशन आहे ते.'

बराच वेळ डोकं खाजवल्यावर माझ्या लक्षात आलं की कांपिटिशन म्हणजे कॉन्फिडेन्शिअल. खाजगी. एकीकडं हसू दाबीत मी नानाच्या जवळ कान देऊन वाकलो.

' अहो आहे काय न् नाही काय ? शर्यत सुरू होण्याच्या आधी या पोराला म्हटलं मी बाजूला घेऊन. बघ रे बाबा. हा साहेब, त्या बंदुकीतून खरी गोळी मारतो. ती चुकवायची असेल तर तुला जीव खाऊन पळालं पाहिजे. बंदुकीच्या गोळीपेक्षा जास्त वेगानं पळालास की तुझा पहिला नंबर आणि तुझ्या गळयात सुवर्णपदक ठेवलेलंच.'

' मला आश्चर्य वाटतं की हे पोरगं तयार कसं झालं ? ' त्यानं माघार कशी घेतली नाही, हे बंदुकीच्या गोळीचं सांगितल्यावर.

' घेतली होतीच त्यानं माघार. पण मी काय म्हटलं. पोरा, या साहेबाचं आणि आपलं बरं नाही. गोऱ्या साहेबाचं आणि आपलं कधी होत का बरं ? तर तू आता शर्यतीत पळ किंवा पळू नको. तो गोळी झाडणारच. तेव्हा कुठं पोरगं तयार झालं. इकडं आडात जावं तरी गोळी, तिकडं विहिरीत जावं तरीही गोळीच. करतो काय ? ' नाना आत्मविश्वासानं बोलला.

' अशी गुंडी चालवली तर तुम्ही एकंदरीत, कमाल आहे हो तुमची.'

' काय करता तात्यासाहेब ? देशाकरिता करावं लागतं असं कधी कधी. अहो, एवढा मोठा आपला देश ! आपल्याला एक सुवर्णपदक मिळू नये ? मी मनात म्हटलं– नाही हे नाना चालू देणार नाही.'

थापा मारताना नानाला पकडणं यात गंमत नाही. पण म्हटलं की हा आता बरा सापडलाय, आता जर याला आपण पकडतो आहोत असं वाटलं तर हा आणखी भारी बंडल सोडणार.

' नानासाहेब, तुमच्या थापेबाजीची कमाल आहे हां. अहो, हा तुमचा पठ्ठा जर पहिला आला म्हणता तर त्याला सुवर्णपदक मिळालं असलंच पाहिजे आणि पेपरात तर त्याचा मागमूसही नाही. एकही पदक न घेता आमचे सगळे लोक हात हलवत परत आले, असं चक्क छापून आलंय, ' मी ठासून नानाला सांगितलं.

पण नाना डगमगला नाही की बावचळला नाही.

' तुम्ही माझं पुरं ऐकून न घेताच बोलता आहात, साहेब. अहो, हे पोरगं पहिलं आलं हे खरं. त्याला सुवर्णपदक मिळायला पाहिजे हेही खरं. पण तिथंच सगळं गाडं फसलं. हेच सांगतोय ना तुम्हाला मी. जरा ऐकून तर घ्याल.'

' ठीक, ठीक. ऐकतो बाबा. तू पुरी कर तुझी गोष्ट.

हे विचारताना मी काहीसा चक्रावून गेलो होतो, हे नाकबूल करण्यात अर्थ नाही.

‘ काय झालं सांगू का तात्यासाहेब, साहेबानं ती बंदुकीची गोळी उडवली. पळा म्हणून सुचवलं. शर्यत सुरू झाली. आमचं पोरगं बंदुकीच्या पुढं धावलं. त्यामुळं ते पहिलंही आलं पण—’

‘ पण काय ? ’

‘ तिथंच तर सगळा इस्कोट झाला ना. अहो, हे जे पळायला लागलं ते थांबलंच नाही. पळत पळत जे गर्दीत घुसलं ते पार दिसेनासंच झालं. पळता भुई थोडी झाली त्याला, म्हणा ना. त्याचं नाव जाहीर करण्यासाठी साहेबानं, जंगजंग पछाडलं. पण याचा पत्ताच नाही.’

‘ अरे, पण तू सांगायचंस मग साहेबाला.’

‘ मी कसं सांगणार ? साहेबाचं आणि माझं स्वातंत्र्याच्या चळवळीपासून वाकडं ना. तो कशाला माझं ऐकतोय ? आणि मी कशाला त्याच्याशी बोलतोय. ’

मी कसंबसं स्वतःला सावरीत विचारलं, ‘ पण मग या विक्रमी वीराचं पुढं झालं तरी काय ? परत आलाच नाही की काय तो ? ’

‘ तो कसला परत येतोय साहेब. हे पदकाच्या बाबतीत असं ऑफस झालं आणि नंतर ते ब्रेनवॉशिंग का काय म्हणता तुम्ही ते. ’

‘ म्हणजे इथं ब्रेनवॉशिंगचा संबंध काय नानासाहेब ? ’

‘ संबंध हाच की पोरगं पहिला नंबर मारून जे गर्दीत घुसलं ते थेट एका गोऱ्या मुलीच्या गळ्यात आणि ती तर याच्यावर इतकी खूष झाली की बया म्हणे करीन लग्न तर याच्याशीच. आता बोला ? अन् नुसतं याच्याशी लग्न करीन असं नाही तर याला हितच ठेवून घेईन. ’

‘ आता बोलायला जागाच नाही. पण मुलीला कोणी आई-बाप वगैरे होते की नाही ? पोरगी कोणाच्या तरी गळ्यात पडते काय आणि तिचे आईबाप त्याला कबूल होतात काय ? ’

‘ अहो, कबूल न होऊन काय करणार ते तरी. या प्रेमाच्या भानगडी अशाच असतात एकंदरीत. बरं, मलाही बोलायची सोय नाही. तिच्या आईबापांनी मला फाट-दिशी गप करून टाकलं असतं. ’

‘ ते कसं काय ? ’

‘ कसं काय म्हंजे ? अहो आमच्या बरोबर होतीच की आमची पार्शीण ! तिच्या-बद्दल मला विचारलं असतं तर आली असती की नाही पंचाईत ? ’ म्हणून शेवटी म्हटलं. ठीक आहे. आमचं सुवर्णपदकही राहिलं आणि पोरगंही राहिलं. ’

‘ अन् मग ? ...’ मी आश्चर्यानं विचारलं.

‘ मग काय. आम्हीही आलो परत हात हलवीत इतरांसारखं. ’ नाना म्हणाला आणि मग ते सगळं झटकून टाकल्यासारखं त्यानं म्हटलं, ‘ ते जाऊ द्या. झालं ते गंगेला मिळालं. आता जरा पान काढा. ...’

‘ एक सोडून दोन घ्या नानासाहेब. पण ही सगळी चित्तरकथा तुम्ही सांगितलीत यात थापा किती आणि सत्याचा अंश किती ? ’

‘ अहो तात्यासाहेब, यात थाप मुळीच नाही. अगदी आमचे दादासाहेबसुद्धा नाही म्हणणार तसं. ’

‘ ते कशावरून ? ’

‘ कशावरून म्हंजे ? आता सांगा. दादासाहेबांनीच माझं नाव काय ठेवलंय ? ’ नानानं पान तोंडात सरकवीत विचारलं.

‘ नव्याण्णवब्राद नाना. ’

‘ नव्याण्णवब्राद याचा अर्थ काय साहेब ? ’

‘ याचा अर्थ हाच की तुझ्या शंभर गोष्टींपैकी नव्याण्णव थापा म्हणून ब्राद असतात. ’

‘ हे कसं अगदी बरोब्बर बोललात. पण यातला एकच पाइंट तुम्ही विसरला साहेब. ’

‘ यात आणखी काही पाइंट असेल असं नव्हतं वाटलं मला. ’

‘ पाइंट आहे तर. नाही कसा. पाइंट हाच की मी सांगितलेल्या शंभर गोष्टींपैकी नव्वाण्णव ब्राद असल्या तरी ही अलेंब्रिकची त्यातली नाही. ’

इथं नाना इफेक्ट घेण्यासाठी क्षणभर थांबला. मग तंबाखूची एक भलीमोठी चिमूट तोंडात सोडीत तो म्हणाला, ‘ ही माझी शंभरावी गोष्ट आहे ! ’

○ ○ ○

# बिंग

त्या दिवशी सकाळ झाली तशीच पाटलाच्या वाड्याला जाग आली. एरवी सूर्योदया-नंतर घटका दीड घटका निपचित पडून राहणारी जांभूळवाडीही त्या दिवशी पहिल्या बागेलाच जागी झाली.

दौलतराव पाटील नुकतेच आपल्या सिंहा-सनावर येऊन स्थानापन्न झाले होते. पान सारखं करून त्यांनी पानाला चुना लावला, सुपारी कातरून ती पानावर सोडली. पान दाढेला लावलं आणि आता तंबाखूची चिमूट आत सोडणार इतक्यात त्यांना कसलीतरी चाहूल लागली.

" कोण रं त्यो ? " पाटील गरजले. पाट-लांचा आवाजच असा पहाडी की त्या सकाळच्या शांत वातावरणात त्यांना स्वतःलाच दचकायला व्हावं असा आवाज घुमला. अशा मुलुखमैदान तोफेला उत्तर न देणं ही गोष्ट सोपी नव्हती.

" कोन न्हाई जी. म्याच की ! " मेंढरानं वाघाशी बोलावं तसा कोणीतरी भेदरत आवाज काढला

" आरं म्या कोन. तू का तुझा बा. असा पुढं ये की रं " पाटील परत गरजले. इतक्या मोठ्यांदा की समोरचा भला मोठा दिंडी दरवाजासुद्धा क्षणभर थरथरला.

“ बा नव्हं जी. मीच बाजीराव.” घोरपडयाचा बाजी दबकत पुढं येत म्हणाला.

“ बाजीराव पहिला का दुसरा रं तू ? इतका डर्पोक कसा निघालास भाडया. बोलायला हुई ना का तुला ? आन् इतक्या फाटंचा कुठं अडमडलास इकडं?” पान आणि कोटी दोन्ही चांगली जमल्यामुळं पाटलांना अधिकच जोर चढला, आणि आपल्यावरच खूष होऊन पाटील गडगडाटासारखं हसले.

“ तसं न्हाई. म्हंजी म्या म्हनलं की आज पाव्हणं येणार शेरचं. बघावं आपल्या-जोगं निघालं काई काम तर ! ” एवढं वाक्य पुरं करायला बाजीला बराच वेळ लागला. आणि ते पुरं झाल्यावर तो दमून धापा टाकीत उभा राहिला.

“ शेरचं पाव्हनं आँ, आन तुझं त्येच्याशी काय काम रं ? ती ग्रामशेविकाबाई येनार माज्या मुलाकतीला. तुज्यासंगं लगीन लावायला न्हवं. ” यावर तर पाटील इतके खूष झाले की हसं त्यांना अगदी आवरलं नाही. त्या गडगडाटानं घाबरून काम करता करता झोपी गेलेली गडीमाणसं दचकून उठून कामाला लागली. रवंथ करताना पेंगायला लागलेली बैलं खडबडून जागी झाली. आणि परत कडबा चघळू लागली.

बाजी बिचारा आधीच भलता घाबरला होता. ग्रामसेविकेच्या या उल्लेखामुळं माणसाला जितक्या प्रमाणात लाजणं शक्य असतं तेवढ्या प्रमाणात तो लाजला. आणि त्यामुळं अधिकच घाबरला.

“ न्हाई जी आमचं काय काम असतंय त्यांच्यासंगं ! ” तो कसंबसं म्हणाला आणि आणखी शोभा करून घेण्यासाठी तिथं मुळीच न थांबता त्यानं पळ काढला.

एवढ्या वेळात चारपाच डोकी दरवाजापाशी डोकावून गेल्याचं पाटलांनी पाहिलं होतंच. पण ही गंमत पुरी झाल्यावर तिकडे लक्ष द्यावं म्हणून त्यांनी तिकडे दुर्लक्ष केलं होतं. बाजीनं पोबारा केल्यावर त्यांना तिकडं लक्ष द्यायला वेळ मिळाला.

“ का रं ग्यानबा, तुका, पुढं का, या ना. ”

या आमंत्रणाची वाटच पाहत असलेले ग्यानबा आणि तुकाराम ताबडतोब पुढं झाले.

“ रामराम.” ते दोघे म्हणाले.

“ आरं एवढ्या फाटंला कुठं निघाला रं ? ”

“ कुठं न्हाई बा. ”

एवढं बोलणं फारसा आरडाओरडा न होताच झाल्यामुळं या दोघांच्याबरोबर आलेल्या इतरांना थोडा धीर आला. नामा, संतू, गणा, इटुबा असे हळूहळू आत येऊन उभे राहिले.

पाटलांना हा प्रकार काय आहे कळेचना. वारीला निघाल्यासारखं हे टोळकं सकाळीच कुठं इकडं येऊन दाखल झालं. एरवी सूर्योदय कसा होतो हे माहीत नसणारी ही माणसं. आज यांच्या बाबतीत असं काय इप्रित घडलं !

“ तुका का बोलंनास रं मर्दा. नुस्ता इटुबावानी उभा न्हायला ! ” पाटील स्वतःच

अखेर बोलले.

तुका थोडा गडबडला पण अखेर सगळं धैर्य गोळा करून तो बोललाच–

" न्हाई आम्ही आइकलं की सेविकाबाई येनार आज हितं."

" मग ? त्येचं काय म्हंता ? "

" म्हनत न्हाई पण आइकलं. "

" आइकलं तर ठीक. पन त्येचं पुढं काय ? "

" पुढं काई नाही जी. पन आम्हाला पसंत न्हाई. "

या लोकांवर रागावणं अशक्य होतं म्हणून पाटील हसले.

" नसं ना का पसंत. तुला काय तिच्याशी लगीन करायचंय ? "

पाटील म्हणाले पण त्यांना नीट समजेना. मघाशी तो बाज्री आला, आता हे चौवे पाचजण, शिवाय आणखी काही डोकी दिसतातच आहेत. एक साधी ग्रामसेविका भेटायला येणार त्याचं या लोकांनी चालवलंय तरी काय एवढं.

" त्या बाईचं काई न्हाई जी. पन आम्हाला हे नियोजन पसंत न्हाई " पाटलांना फार ताणून धरण्यात अर्थ नाही हे ओळखून तुकानं वेळेवरच सांगितलं.

" पुढं " पाटील निर्विकारपणं म्हणाले.

" कोणालाच पसंत न्हाई. " तुकानं सांगितलं.

" पुढं "

पाटील काहीतरी विरोध दर्शवतील आणि आपल्याला अधिक बोलायला संधी मिळेल याची तुका वाट पाहत होता. पण पाटलाच्या 'पुढं' मुळं त्याला काही बोलताच येईना.

तुका, ग्यानबा आणि मंडळी जागच्या जागी चुळबुळत उभी राहिली.

अखेर पाटील स्वतःच बोलले,

" मग काय म्हंतोस तुक्या, तुला हे नियोजन पसंत न्हाई ? "

" न्हाई जी."

" आरं पन तू तुज्या बायलीला इच्यारून मगच मला सांगायला आलास ना ? "

" बायली, हितं बायलीचा संबंधच काय ? " तुका बोलला.

" आरं मर्दा, ती शेविकाबाई सभा घेणार तुम्हा समद्यांची. आन् मला कशापायी नसता तरास रं इकतचा ? हे सर्कारी काम असतंय. म्या न्हाई म्हनलो बाईला तर ब्लाकसाहेब डोईवर केस ठेवणार न्हाई माज्या. "

" समद्यांची म्हंजी ? "

" समद्यांची म्हंजी समद्यांची. दादले बी आन् बायकाबी ! "

" तिच्या मारी, आसं असतंय वं ह्येचा तर पत्ताच नवता आमाला. आता कसं वं ? " तुका अर्धवट आपल्या साथीदारांना आणि अर्धवट पाटलांना उद्देशून म्हणाला.

" म्हनून म्हनलो नियोजन पसंत नसंल तर जावा घरी आन कारभार्णीला

इचारून या. ”

तरीही तुका आणि त्याची टोळी हलेना.

“ जावा म्हनतो ना. पळा. ह्ये विसावं शतक हाय लेकाच्यांनो. आताच्याला बायका मर्दाच्या बरोबरीनं असत्यात. दोन पावलं पुढंच म्हना की, पन मागं न्हाई...हं. जावा. पळा बघू पहिलं. ” पाटील एवढं म्हणाल्यावर तिथं थांबण्यात आणि आणखी शोभा करून घेण्यात काही मतलब नव्हता.

मंडळी निघून गेल्यावर पाटीलबुवा परत लोडाला टेकून बसले. आणि इतका वेळ मिशीत लपवून ठेवलेलं त्यांचं हसू दणाणा सगळ्या वाड्याला ऐकू गेलं.

हसण्याची शेवटची तान हवेंत विरल्यावर पाटील परत नीट टेकून बसले. आणि अचानक स्वर्गातून उतरलेल्या अप्सरेसारखी ग्रामसेविकाबाई एकदम त्यांच्यापुढं येऊन उभी राहिली.

“ आरं द्येवा, आन् तुमी कदी आला ? ” पाटील गडबडीनं आपला अगडबंब देह सावरीत उठले आणि या प्रयत्नात साहजिकच त्यांची धांदल उडाली.

“ ही काय आत्ताच आले मी. एस्टीच्या स्टँडवर उतरले आणि आले थेट इकडंच. ”

‘ वा वा वा, काय ते गोळीबंद बोलणं ! ’ ग्रामसेविकेच्या ऐटबाज शहरी पोशाखा-मुळं पाटील अर्धेअधिक गळाठून गेलेच होते. आता ते पार गडबडले. पाच मिनिटांपूर्वीच धूमधाम माजवणारे दौलतराव पाटील एकदम नरम आले. खालच्या आवाजात बोलू लागले.

“ काय सेवा करू मी आपली ग्रामशेविकाबाई ? ” पाटलांचा लाडका नातू बारकू याचा अपवाद सोडला तर इतकी मऊ वागणूक दुसऱ्या कुणालाच मिळत नसे.

“ ग्रामसेविकाबाई ! अरे बापरे ! या भयंकर नावानं नका बाई माझ्याशी बोलू. शिवाय तुम्ही चांगले आमच्या आजोबांइतके असाल की. म्हणजे नातच मी तुमची. तुम्ही आपलं मला म्हणा कुसुम. काय ? ”

या कुसुमकृत वात्सल्याच्या आव्हानानं तर दौलतराव पाटील अक्षरशः जमीन-दोस्तच झाले. ‘ केवढं शिक्षान झालं असेल या बाईचं. नम्रपना मानसांच्या अंगी असावा तर असा. ’

विश्रांती–बिश्रांती घ्यायच्या पाटलांच्या सगळ्या विनंत्या कुसुमबाईनं धुडकावून लावल्या. चहाचं पाणीच तिनं काय ते घेतलं. आणि सभेला चलायचंच तिनं पाटलांना सुचविलं.

ही कुसुम आल्यापासून काय असेल ते असो. यक्षिणीच्या कांड्याच फिरायला लागल्या. सभेची दवंडी पिटली होतीच. आता नुसत्या सेविकाबाई बोलणार हे कळताच लोकांनी ही गर्दी केली. अगदी म्हातारेकोतारे, बायाबापड्यांसकट सगळे जांभूळवाडीच्या शाळेच्या पटांगणात जमले.

पाटील कुसुमबाईच्याबरोबर शाळेत पोचले तेव्हा त्या गर्दीत पुढंच बसलेली ग्यानबा, तुकाराम आणि मंडळी त्यांना दिसल्याशिवाय राहिली नाही. तरीही कुसुमबाई या सगळ्यांना व्यवस्थित गप बसवील याची पाटलांना केव्हापासूनच खात्री होती.

बाईंचा आवाज एवढ्या गडबडीत सगळ्या गर्दीला कसा ऐकू जाणार याची पाटलांना सुरुवातीला उगीच थोडा वेळ काळजी वाटली. पण त्यांनी नुसतं 'सभ्य स्त्री-पुरुषहो,' म्हणताच सगळीकडं चूपचाप झालं. सगळे चित्रासारखे बसून राहिले. बाईंच्या म्हणण्याला संमतिदर्शक हलविल्या जाणाऱ्या माना आणि त्यांनी विचारलेल्या प्रश्नांना 'हो'–'नाही' अशी दिलेली सार्वजनिक उत्तरं एवढं सोडलं तर चित्रात आणि या सभेत काही फरक राहिला नाही.

निरनिराळी छोटीछोटी वाक्यं वापरून बाईंनी धमाल उडवली.

संसार लहान फार छान.

संसार मोठा दुःखाला नाही तोटा.

एकदोन मुलं छान छान फुलं.

तीनचार मुलं खायला उरलंसुरलं.

अशी एकदोन नाही चांगली दहापंधरा वाक्यं त्यांनी आपल्या भाषणात अधूनमधून पेरली. 'कुटुंब छोटं सुख मोठं' असं भल्या मोठ्या अक्षरांत लिहिलेल्या पाट्याच त्यांनी बरोबरच आणल्या होत्या आणि त्या सभेच्या जागी सगळीकडं लटकावून ठेवल्या होत्या.

छोट्या कुटुंबात सुख फार असतं. खायला प्यायला भरपूर, ल्यायला मनासारखं मिळतं. पैसे साठविता येतात. शेतासाठी खर्च करता येतो, बायकोला दागदागिने करता येतात, मुलांना शिक्षण देता येतं. छोट्या आटोपशीर कुटुंबात आनंदीआनंद असतो. म्हणून काय की लग्न उशिरा करा किंवा करू नका. केलंच तर पोराबाळांची संख्या मर्यादेत राहू द्या. त्याकरिता पुरुषवर्गानं सरकारशी सहकार्य करावं. ऑपरेशन करून घ्यावं. याकरिता सरकार मदत देईल. खर्च देईल आणि वर बक्षीस सुद्धा देईल.

बाईंनी आपलं भाषण संपवलं. आणि त्या खाली बसल्या. त्याबरोबर सभेतल्या बायकांनी टाळ्यांचा गजर केला. पुरुषांनीही टाळ्या वाजविल्या नाहीत असं नाही, पण त्यांचा उत्साह त्यामानानं कमी दिसला.

शेवटी बाईंनी शंकासमाधानासाठी प्रश्न विचारायची परवानगी दिली.

कुटुंब मोठं नसावं या बाईंच्या मूळ कलमालाच पुरुषवर्गात काहीजणांचा विरोध दिसला.

तुकानं केव्हापासून आपला हात झेंड्यासारखा उचलून धरला होता. बाईंचं त्याच्याकडं लक्ष होतंच.

"काय म्हणता तुम्ही ?" बाईंनी विचारलं.

"आता म्या काय म्हननार ? ... पन म्हनलं की तीनचार प्वारं असली की शेतकामात उपयोगी पडत्यात. आता या एकदोन प्वारांनी कसं भागावं शेताचं ?"

दीच नवीन. त्यामुळं ते भलतेच संतापले. " कां रं मुडद्यांनो आग लागलीय व्हय. कशापायी एवढं बोंबलून ऱ्हायला तुम्ही ? " आपला सोटा आपटीत ते गरजले. शहरातून आलेल्या पाहुण्या आपल्या संगतीला आहेत याचं भानसुद्धा त्यांना राहिलं नाही.

पाटलांच्या गर्जनेनं वाडा दणाणल्यावर मात्र एकदम बरीच शांतता झाली. मग वाड्याच्या आतल्या बाजूनं पाटलांचा आवडता नातू धावत आला. रडतरडतच त्यानं आपल्या आजोबाला मिठी मारली. पाटलानं त्याला कुरवाळत म्हटलं,

" कारं माज्या पाडसा, का रडतोस रं मर्दा ? "

आजोबांनी इतकी प्रेमळ चौकशी केल्यावर बारकूच्या डोळ्यांत गंगायमुनांचा पूरच आला. " बजाकाकानं मला हानलं रं आज्या ऽ " असं म्हणून बारकूनं शक्य तितका वरचा सूर लावला.

आपल्या लाडक्या नातवाला नावडत्या पोरानं मारलेलं आजोबाला कळलं मात्र. सोटा आपटीत ते ओरडले, " कुठं हाय त्यो बजाबा. बजा ... ये रं माझ्या म्होरं. " त्याबरोबर आतल्या घरातून बारकूचा बाप असलेला पाटलाचा मधला मुलगा येऊन पाटलापुढं उभा राहिला.

" का रं तुला उद्योग नाईत रं दुसरं. माझ्या पाडसावर का हात टाकला सुकासुखी."

बजाबा काही बोलला नाही. धोतराचा सोगा एका हातात धरून खाली मान घातलेला तो उभाच राहिला.

" म्या काय म्हनलो ऐकलंस रं तू बजा. बोलत का न्हाईस भाड्या. बाला भितोस व्हय ? " पाव्हणीणबाईच्या समोर म्हणून पाटील शक्य तेवढी मर्यादा ठेवून बोलत होते.

बाप आपला ठेका सोडेचना तेव्हा बजाबाचाही नाइलाज झाला.

" बारकू म्हंतो मला लगीन करायचंय " बजाबानं सांगितलं, " कायबी समजावलं तरी ऐकचना. "

" अहो, त्यात काय एवढं मारायचं. लहान पोर आहे. केला असंल हट्ट. " कुसुमबाईंनी मध्यस्थी केली.

" त्येच मी बी म्हंतो. पोर हाय, केला असंल हट्ट. " पाटील कुसुमबाईंची री ओढीत म्हणाले.

" पण तेवढ्यावर थांबं ना पोरगा. म्हंतो आज्याचं लगीन उद्या व्हनार त्येच्या बरोबरीनं माझं बी झालं पायजे. "

बजाबानं हे शांतपणं आणि स्पष्ट आवाजात म्हटलं. शेवटपर्यंत त्यानं आपली खाली घातलेली मान वर केली नाही.

बजाबाच्या या शेवटच्या वाक्यानंतर सगळीकडं क्षणभर शांतता पसरली. शेवटी कुसुमबाईंना अगदी राहवलं नाही. " काय म्हणता तुम्ही आजोबा. तुमचं लग्न. मी ऐकतेय ते खरं आहे ? " त्या आश्चर्यानं जवळजवळ किंचाळल्याच.

' आमचं लगीन कसलं म्हणता बाई. माझी वर्षं साठ आणि दोन वर. नवरीची

वर्ष पंधरा. सांजसकाळ भाकऱ्या बडवण्याबिगर समजतंय काय तिला ? ह्येला काय लगीन म्हंत्यात ? पन न्हाई बाई, वेव्हार कुनाला चुकला न्हाई. आता त्या पोरीचंच बघा. वेळच्या वेळी व्हायला नको का सगळं ? तिचं तरी पहिलंच लगीन नव्हं का ह्ये ?–' पाटीलबुवा शांतपणं अरगुमेंट करीत होते.

ग्रामसेविका कुसुमबाई हे ऐकून चांगल्याच हादरल्या. पण मग त्यांनी स्वतःला कसंबसं सावरलं.

' तसं पाहिलं तर तुमची तरी काय चूक म्हणा पाटीलसाहेब. तुमचं स्वतःचं सोडा एक वेळ, पण तुमचं नवं कुटुंबही लहानच म्हटलं पाहिजे. वय वर्षं पंधरा ना फक्त ? '– बाईंच्या मते या वाक्याला उपहासाची धार होती.

' आता कसं बोलला बाईसाहेब तुम्ही ? हा पाइंट माझ्या डोक्यातच आला नव्हता बघा.' कुटुंब लहान, सुख महान.

पाटील बेरकेपणानं बोलला आणि आपला म्हातारा मित्र गणपा याच्याकडं पाहात त्यानं आपला एक डोळा मिटला ते चक्रावून गेलेल्या कुसुमबाईंच्या ध्यानातसुद्धा आलं नाही !

○ ○ ○

# माझी लाखातील एक पाकक्रिया

" मग मी जाऊ ना मुंबईला ? " सौ. मीनानं मला विचारलं.

' बेशक जा. बेलाशक जा. बेधडक जा.' मी खाडदिशी सांगितलं.

' किती दिवसांसाठी जाऊ ? ' तिनं भीतभीत विचारलं कारण ती फार दिवस नसली म्हणजे माझी जेवणाखाण्याची आबाळ होईल असं तिला वाटलं असावं.

' वाट्टेल तितके दिवस जा. आठवडाभर जा. एक महिनाभर जा. दोन महिने जा.' मी तिला पाहिजे तितके दिवस मुंबईला जाण्याची परवानगी दिली.

' काय ? दोन महिने जाऊ ? ' अविश्वासानं तिनं विचारलं.

' होऽय दोन महिने जा. वाटल्यास चार महिने जा. आणि फक्त मुंबईलाच जा असं नाही. दिल्ली, कलकत्ता, मद्रास कुठंही जा. आपल्या भावा-बहिणींना भेटून ये ' मी छातीठोकपणं सांगितलं.

' वा : आज भलतेच खुषीत दिसताहात. मला जायला आवडेलसुद्धा, पण मेली काळजी वाटते ना ?'

' मेली काळजी नव्हे. काळजी मेली असं समज. कसलीही काळजी करू नकोस. पैसे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात तुला येथून रवाना होतील.'

‘ छे हो. मला पैशाची मुळीच काळजी नाही. काळजी आहे ती तुमच्या जेवणाखाण्याची. ’

‘ हुड्डुत् . माझ्या जेवणाखाण्याची काळजी ? त्यात कसली आली आहे काळजी ? ते पाहून घेण्यास आम्ही समर्थ आहोत. ’

‘ तसं नव्हे हो. म्हणजे तुम्हाला खाणावळीतलं जेवण आणि हॉटेलातलं खाणं मानवणार नाही म्हणून म्हणते. ’

‘ खाणावळीतलं जेवण ? हॉटेलातलं खाणं ? कोण जातो आहे खाणावळीत किंवा हॉटेलात ?.मी म्हणतो कुठंही बाहेर जाण्याचं कारणच काय ? ’

‘ मग काय करणार आहात तुम्ही ? फारतर तुम्ही एखाद्या मित्राकडं जाल. पण मुलांचं काय ? त्यांना तर मित्राकडं नेणार नाही ? ’

‘ मीही कुठं जाणार नाही, आणि त्यांनाही कुठं नेणार नाही. सगळ्यांची जेवणं दोन्ही वेळ इथं घरात होतील.’ माझ्या शब्दाशब्दांतून आत्मविश्वास ओसंडत होता.

‘ अग बाईऽऽ. म्हंजे दोन्हीवेळचं जेवण स्वतः करायचा बेत दिसतोय. छान छान छान. ’

‘ मीने, ही हशावारी नेण्यासारखी गोष्ट नव्हे. पोळ्या, भाजी, आमटी, भात यासकट सगळा स्वयंपाक मी स्वतः करू शकतो. चटणी, कोशिंबीर, पापड वेगळी. आहे काय त्यात ? मला फार जुना अनुभव आहे. खरं म्हणजे अनेक वर्षांचा अनुभव माझ्या पाठीशी उभा आहे असं म्हणणंच जास्त बरोबर होईल ! ’

‘ अस्सं. कारकून होण्याअगोदर ही कलाही शिकला होतात हे बरीक माहीत नव्हतं मला. ’ तिच्या दोन्ही हातांचे दिवे माझ्याभोवती ओवाळले गेले.

‘ तो प्रश्न अलाहिदा. तुला मुंबईला जायचं आहे की नाही हा माझा सवाल आहे.’

आणि हो नाही करता आमची काळजी करीत करीतच आमचं कुटुंब मुंबईला रवाना झालं. पंप्या आणि बेबी यांच्या शाळा असल्यामुळं त्यांना बरोबर जाणं शक्य नव्हतं. त्यामुळं माझ्यावर त्यांना सोपविण्यावाचून त्यांच्या मातोश्रींना गत्यंतर नव्हतं.

तो दिवस एकंदर गडबडीत गेला. एक म्हणजे सामानासकट बायकोला स्टेशनवर पोहोचवून सर्व डागांसकट तिला नीट गाडीत बसवून देणं, मग वेळेवर ऑफिसात जाऊन तिथं दिवसभर असणं व मग ऑफिसातून घरी येणं यामुळं मी अगदी दमून गेलो होतो. माणूस इतका दमला असला की त्याला साहजिकच चहा हवा असणार. म्हणून मी कपडे बदलले, आरामखुर्चीत बसलो आणि अगदी स्वाभाविकपणं फर्मावलं, ‘ बेबी, एक कप फर्स्टक्लासपैकी चहा घेऊन ये बघू.’

‘ अहो, पण बाबा मला चहा नाही करता येत.’

‘ कमाल आहे हं. एवढी मोठी शाळेत जाणारी मुलगी तू. आता दहा–पंधरा वर्षांनी तुझं लग्न करायचं आणि तुला चहा नाही करता येत अजून ? चहासारखी साधी गोष्ट ? ’

'तसं वयावरनं पाहिलं ना बाबा, तर तुम्हाला सगळा स्वयंपाक करता यायला पाहिजे ' ही पंप्याची अक्कल. बेबी बिचारी काहीच बोलली नाही. दहापंधरा वर्षांनी वयाच्या का होईना, पण लग्नाचा उल्लेख झाल्यामुळं ती नुसती लाजलीच होती आणि माझं नशीब की पंप्यानंही माझं लग्न झाल्याला पंधरा वर्षं झाल्याचं मला सुनावलं नाही.

'पंप्या, तू शांतपणं तुझा अभ्यास करायला काय घेशील बाबा ? तुझ्या वयाच्या दृष्टीनं पाहिलं तर तुलाही बऱ्याच गोष्टी करता यायला पाहिजेत. आणि काय रे शहाण्या, मला स्वयंपाक करता येत नाही हे तुला कोणी सांगितलं ? आता आज मी तो करणार नसलो म्हणून काय झालं ? ' मी पंप्याकडं वळून म्हटलं.

बेबीला चहासारखी साधी गोष्ट बनविता येऊ नये हे खरं नव्हे हे मला पटलं होतं. पण एखादी गोष्ट येत नाही म्हणून उगाच कोणावर रागवायची माझी पद्धत नाही. मी तिला म्हटलं.

' येत नसलं तर मी शिकवतो हं तुला बेबी. चहा करण्याच्या अनेक पद्धती आहेत. त्यातली सर्वात सोपी म्हणजे चहा, साखर, दूध आणि पाणी यांचं योग्य प्रमाणात मिश्रण करायचं. मग ते गॅसवर ठेवायचं. थोड्याच वेळात चहा तयार होतो. मग तो गाळण्यानं थेट कपात गाळायचा आणि कपातून किंवा बशीनं प्यायचा.'

' योग्य प्रमाणात ' म्हणजे काय हे ठरवायचं ही अर्थातच एक खुबी आहे. आणि ती तिला सांगत बसण्याऐवजी मीच उठलो आणि माझ्या सोप्या पद्धतीनं चहा तयार केला. तो सुमारे सहासात कप झाला. माझ्या खास पद्धतीनं केल्यामुळं तो इतका वेगळा झाला होता की क्षणभर तो मलाही ओळखू आला नाही. मुलांच्या मते तो चहा नसून काढा झाला होता आणि त्यांनी तो दोनदोन कपच काय, मुळीच घ्यायचं नाकारलं त्यामुळं त्या वेगळ्या चहाची चव फक्त मलाच कळली.

' चहा आई करते तसा झाला नाही म्हणून घ्यायचा नाही हे बरोबर नाही बरं का मुलांनो. आपण असं सवयीचं गुलाम असता कामा नये. ' मी त्यांना कडक शब्दात सांगितलं. तरीही त्याचा काहीही उपयोग झाला नाही. एकट्यानं चहा पिण्यात तरी काय मौज, म्हणून मग अखेरीस मीसुद्धा तो अर्धा कपच घेतला.

' तुमच्यासाठी का होईना. पण मला आता नेहमीच्या कंटाळवाण्या पद्धतीनंच चहा करायला हवा. ' मी म्हणालो.

नंतर थोडावेळ पेपर वाचून झाला आणि आणखी थोडी विश्रांती झाली. तेवढ्यात बेबी तिथं आली.

' बाबा, अहो स्वैपाकाला लागताय ना ? आम्हाला भुका लागल्या आहेत. आई केव्हापासनं स्वैंपाकाला लागते माहितेय ना ? '

' लागलीस का तूही मला शिकवायला ? बेबीताई, माझी स्वैंपाक करण्याची पद्धत आईपेक्षा अगदी वेगळी आहे. समजलीस ना ? आता आजच दाखवलं असतं पण जाऊ दे. आज मी जरा दमलो आहे. तेव्हा आज आपण...' पण माझं वाक्य अर्धवटच राहिलं.